सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)

पृ.शी: खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षण मिळण्याची होत असलेली मागणी.

मु.शी. खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षण मिळण्याची होत असलेली मागणी या विषयावर श्री.विनायक मेटे, श्रीमती शोभाताई फडणवीस,श्री.सुभाष चव्हाण, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री हेमंत टकले, चंद्रकांत पाटील,एस.क्यू.जमा, डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

श्री.विनायक मेटे (महाराष्ट्र विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यामध्ये एकूण 52 टक्के आरक्षण राज्यातील आदिवासी, मागासवर्गीय आणि इतर मागासवर्गीय तसेच भटके व विमुक्त यांना शैक्षणिक,आर्थिक व राजकीय आणि नोकरी यामध्ये आरक्षण देण्यात येणे, तसेच या व्यतिरिक्त खुल्या वर्गाकरिता असणाऱ्या 48 टक्क्यांपैकी काही टक्के आरक्षण खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या सर्व दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षण मिळावे यासाठी काही संघटना अनेक वर्षापासून प्रयत्न करीत असणे, त्यावर शासनाने याबाबत सहानुभूतीने विचार करण्याची अनेकवेळा केलेली घोषणा, याची अंमलबजावणी अद्यापही होत नसणे, परिणामी, त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कारवाई."

सभापती महोदय, सर्वप्रथम मला या विषयाच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल मी सुरुवातीलाच आपले मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.तसेच दुसरे म्हणजे सुरुवातीलाच आभार व्यक्त करतो की, या विषयावर या वेळेस प्रत्येकाच्या मनामध्ये यासंदर्भात आपापल्या पध्दतीच्या भावना असतात. त्यामध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, माननीय श्री. सय्यद पाशा पटेल व इतरही सर्व सन्माननीय सदस्यांनी स्वत:हून अशी भूमिका घेतली की, या विषयावर चर्चा झाली पाहिजे आणि या बाबतीत मार्ग निघाला पाहिजे.त्याबद्दल मी या सदनातील ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे . . ..

सर्व सन्माननीय सदस्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, आपण जेव्हा आरक्षणाच्या बाबतीत विचार करतो तेव्हा आपल्याकडे आज आरक्षण किती आहे याचाही पहिल्यांदा विचार केला पाहिजे. जेव्हा घटना लिहिण्यात आली. त्यावेळी सुरुवातीला एस.सी.आणि एस.टी.साठी अमुक इतके रिझर्वेशन घटना समितीने मान्य केले. ओ.बी.सीं.च्या संबंधातील आरक्षण हे मंडल आयोगानंतर म्हणजे 1992-93 पासून लागू झाले. त्या बाबतीत मी नंतर बोलतो.पण सुरुवातीचे जे आरक्षण आहे त्याबाबत सांगावयाचे तर जो रंजलेला आहे, गांजलेला आहे, पिचलेला आहे, गावकोसाच्या बाहेरचा आहे किंवा वाड्यावर, तांड्यावर, पाड्यावर राहणारा वर्ग आहे, ज्याला न्याय मिळत नाही मग तो सामाजिक असेल, आर्थिक असेल, शैक्षणिक असेल, अशा वेळी या घटकाला वर आणण्यासाठी घटनाकारांनी ही सोय केलेली आहे. त्यावेळेस हे रिझर्वेशन देण्यात आलेले आहे.आपल्या देशामध्ये आरक्षणाच्या बाबतीत सांगावयाचे तर केंद्रामध्ये किती आरक्षण आहे? तर अनुसूचित जातींना 15 टक्के आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ....

अनुसूचित जमातीसाठी 8 टक्के आरक्षण आहे. इतर मागासवर्गीयांसाठी 27 टक्के आरक्षण आहे. या तीन कॅटेगरीज केंद्र शासनाच्या आहेत. आपल्या महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जातीकरिता 13 टक्के आरक्षण आहे. अनुसूचित जमातीकरिता 7 टक्के आरक्षण आहे. इतर मागावर्गीयांकरिता 19 टक्के आरक्षण आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीकरिता 11 टक्के आरक्षण आहे. विशेष मागास प्रवर्गाकरिता 2 टक्के आरक्षण आहे. यामध्ये इतर मागास प्रवर्ग तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग तसेच विशेष मागास प्रवर्ग हे प्रवर्ग राजकारणातील आरक्षणामध्ये मात्र ओबीसीमध्ये येतात. बाकीच्या शैक्षणिक आणि नोकरीमधील आरक्षणासाठी त्याचे वेगवेगळे प्रवर्ग तसेच अ, ब, क, ड अशी कॅटेगरी केलेली आहे. आज आपल्या महाराष्ट्रामध्ये एकूण 52 टक्के आरक्षण आहे. सुप्रीम कोर्टाने सुरुवातीला असा निकाल दिला होता की, 49 टक्केच्या वर आरक्षण द्यावयाचे नाही. परंतु आज महाराष्ट्रामध्ये वेगळ्या नियमांचा आधार घेऊन 52 टक्के आरक्षण केले आणि काही समाजाला न्याय देण्याची भूमिका शासनाने घेतली. ते चांगले झाले. आम्हाला त्याबद्दल काही म्हणावयाचे नाही. उलट या सगळ्या गोष्टींचा आम्हाला आनंद आहे.

सभापती महोदय, आपण महाराष्ट्रा व्यतिरिक्त भारतामध्ये पाहिले तर अनेक राज्यांमध्ये अशा पध्दतीचे आरक्षण वाढविलेले पहावयास मिळते. तामिळनाडूमध्ये जवळपास 69 टक्के आरक्षण आहे. कर्नाटकमध्ये 66 टक्के आरक्षण आहे. केरळमध्ये 62 टक्के आरक्षण आहे. सचिव श्री. मिना या ठिकाणी बसलेले आहेत. ते ज्या राज्यातून येतात त्यांच्या राज्यामध्ये 76 ते 78 टक्के आरक्षण आहे तरीही त्या ठिकाणी त्यांचा वाद सुरु आहे, हा भाग वेगळा. परंतु अनेक राज्यांनी 50 टक्केच्या पुढे आरक्षण वाढविलेले आहे. त्याचे कारण असे की, त्या त्या राज्यामधील जो उपेक्षित वर्ग आहे, जो गरीब वर्ग आहे मग शैक्षणिकदृष्ट्या असेल, सामाजिकदृष्ट्या असेल किंवा आर्थिकदृट्या असेल त्यांना न्याय देण्याची भूमिका त्या ठिकाणच्या सरकारने घेतली आणि त्या त्या काळामध्ये त्या त्या ठिकाणी मोठमोठी आंदोलने वगैरे झाली. प्रश्न असा आहे की, आपल्याकडे ते का होऊ नये ? जर इतर राज्यांमध्ये होत असेल आपल्या राज्यामध्ये ही भूमिका का घेऊ नये ? आपल्याकडे अनेक वेळा घोषणा झाली. या सभागृहामध्ये मी स्वत: आणि अन्य सन्माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

सदस्यांनी आठ-दहा वेळा या संदर्भात प्रश्न उपस्थित केले, चर्चा उपस्थित केल्या. यामध्ये गंमतीचा भाग असा आहे की, त्या संदर्भात कधी सामाजिक न्याय खात्याकडून उत्तर दिले जाते तर कधी सामान्य प्रशासन विभागाकडून उत्तर दिले जाते. त्यामध्ये ताळमेळ नाही हा भाग वेगळा. त्यावर मी काही बोलणार नाही. कोणीही उत्तर देऊ द्या पण शेवटी सरकार म्हणून उत्तर देत असताना या वर्गाला न्याय मिळाला पाहिजे अशी आमची भूमिका आहे. इतर राज्ये करीत असतील तर आपल्याकडे हे का होऊ नये ?

सभापती महोदय, अनेक वेळा त्या त्या काळामध्ये जे जे सरकारचे प्रमुख असतील किंवा अन्य नेतेमंडळी असतील त्यांनी सरकारच्या बाजूने भूमिका मांडलेली आहे की, या राज्यामध्ये आरक्षणाव्यतिरिक्त खुला प्रवर्ग जो 48 टक्के आहे त्यामध्ये ब्राम्हण समाज असेल, मुस्लीम समाज असेल, मराठा समाज असेल, कॅथलिक समाज असेल तसेच गुजराथी, मारवाडी समाज आहे, जैन समाजाला अल्पसंख्यांकामध्ये घातले पण रिझर्वेशनच्या बाबतीत त्यांना खुल्या प्रवर्गामध्ये घातलेले आहे. या सगळ्या खुल्या प्रवर्गातील जे गरीब लोक आहेत, ग्रामीण भागामध्ये जे डीआरडीए अंतर्गत येतात त्यांच्या बाबतीत अनेक लोक साक्षी देऊ शकतील की, त्यांच्या डोळ्यासमोर घरेदारे उद्ध्वस्त झालेली आहेत. त्या आमच्या भगिनीला वर्षातून एक लुगडे सुध्दा मिळत नाही किंवा त्या माणसाला एक धोतर सुध्दा मिळत नाही. आमच्या सन्माननीय सदस्या ज्या मतदारसंघातून येतात त्या चंद्रपूर जिल्ह्यात किंवा विदर्भामध्ये अनेक लोकांची अतिशय वाईट परिस्थिती आहे. त्या भागातील आदिवासी असतील किंवा अन्य शेतकरी असतील त्यांच्यामध्ये आणि या खुल्या प्रवर्गातील लोकांमध्ये काहीही फरक नाही. या संदर्भात बाजू घेऊन अनेक संघटनांनी अनेक लोकांनी अनेक वर्षापासून आंदोलने सुरु केलेली आहेत. त्याची दखल घेऊन त्या त्या काळातील शासन प्रमुखांनी घोषणा केल्या, भूमिका घेतली की,

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

सहानुभूतीने विचार करुन तुम्हाला न्याय देण्याची भूमिका घेऊ. त्याच्या पुढे जात नाही, ही दुर्दैवी गोष्ट आहे. त्याला आधार काय दिला जातो ?

त्या संदर्भातील 2-3 महत्वाचे मुद्दे आहेत. एक कारण असे सांगितले जाते की, आपल्याला 50 टक्क्याच्या पुढे जाता येत नाही. परंतु 50 टक्क्याच्या पुढे इतर राज्ये जात असतील तर आपण का जाऊ शकत नाही याचा विचार शासनाने निश्चितपणे केला पाहिजे. सुप्रीम कोर्टाने 1994 मध्ये एस.व्ही.जोशी विरुध्द कर्नाटक राज्य या केसचा निकाल देताना असे म्हटले आहे की, "एखाद्या समाजाला राज्य शासनाला 50 टक्क्यापेक्षा जास्त आरक्षण द्यावयाचे असेल तर त्या समाजाची सर्वंकष अत्याधुनिक संपूर्ण माहिती गोळा करावी व त्या निकषामध्ये बसवून शासनाला वाटत आहे तेवढे टक्के आरक्षण त्या समाजाला द्यावे." या निकालामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "It has been laid down that if the State wants to exceed 50 per cent reservation then, it is required to based its decision on quantifiable data." त्या समाजाचा डेटा एकत्र करुन त्याच्या आधारावर त्या त्या समाजाला न्याय देऊ शकता. या निकालाच्या आधारावर काही राज्यांनी त्याप्रमाणे आरक्षण दिलेले आहे. परंतु 50 टक्के किंवा 52 टक्क्याच्या पुढे कसे जायचे हे ठरविण्यामध्ये अडचण येत आहे. परंतु या निर्णयाचा शासनाला आधार घेता येईल असे मला वाटते. शासनाला त्यापेक्षा वेगळा निर्णय घ्यावयाचा असेल तर नाईंन्थ शेडयूलचा आधार घेता येईल. तामीळनाडूत जादा आरक्षण आहे. श्री.मीना हे राजस्थानमधील आहेत. तेथेही जादा आरक्षण आहे. या नाईन्थ शेडयूलनुसार त्या समाजाला आरक्षण दिले तर कोणत्याही कोर्टामध्ये आव्हान देता येत नाही. पण तसे करण्याची शासनाची मानसिकता दिसत नाही. मुळात कायद्याचा आधार घेऊन अनेकदा नाही असे उत्तर दिले जाते. काही वेळा तर कोणतेच उत्तर दिले जात नाही. पण शासनाला एस.व्ही.जोशी विरुध्द कर्नाटक सरकार या केसच्या निकालाच्या आधारे व नाईन्थ शेड्यूलच्या आधारे आरक्षणामध्ये वाढ करण्याची मुभा दिलेली आहे. सरकारला वाटले तर त्या त्या समाजाला सरकार न्याय देऊ शकते, आरक्षण देऊ शकते. त्या समाजातील भावी पिढीला पुढे घेऊन जाऊ शकते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.विनायक मेटे....

सभापती महोदय, आरक्षण वाढवून न देण्याला अनेक कारणे सांगितली जातात. पण मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार ? हा कळीचा मुद्दा आहे. सभागृहात बसणाऱ्या अनेक सन्माननीय सदस्यांच्या मनात याबाबत सकारात्मक भावना असू शकेल तर काहींच्या मनात नकारात्मक असू शकेल. प्रत्येकाची वेगवेगळी भूमिका असू शकते. परंतु कोणी नाही म्हणावयाचे आणि कोणी होय म्हणावयाचे येथे खरी गोम आहे. मी तर असे म्हणेन की, शासनाने मतांच्या व राजकारणाच्या आहारी इतके का जावे, शासन पुढील 25-50 वर्षांचा विचार करणार आहे की नाही, राज्याला, देशाला पुढे न्यायचे म्हणजे कोणाला पुढे न्यावयाचे ? दगड, मातीला पुढे घेऊन जायचे काय, या देशाची, या राज्याची प्रगती होणे म्हणजे राज्य पुढे जाणे, देश पुढे जाणे असे मानले पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लंगडे घोडे व चांगले घोडे अशा प्रकारची भूमिका घेतली होती. त्यामुळेच त्यांनी उपेक्षितांना, मागासवर्गीयांना न्याय देण्यासाठीच डिरिझर्व्हेशनचा कायदा आणला होता.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

आता जे रिझर्व्हेशनच्या बाहेरचे आहेत, जे मराठा समाजाचे आहेत, ब्राह्मण समाजाचे आहेत त्यांचे काय ? आपणा सर्वांना माहीत आहे की, पूर्वी महाराष्ट्रातील जवळपास शेकडो नाही तर हजारो एकर जमिनी कुलकर्णी आणि देशपांडेंच्या ताब्यात होत्या. आज परिस्थिती अशी आहे की, ग्रामीण भागात त्यांना रहायला जागा नाही.

मी माझे स्वत:चे उदाहरण देतो माझा कुलकर्णी नावाचा एक क्लासमेट आहे. त्याचे वडील भिक्षुकी करीत होते. आता त्यांची भिक्षुकी बंद आहे. पण आजही भिक्षुकी करण्याऐवढे त्यांचे दारिद्रय आहे. ब्राह्मण समाजातील अनेक लोक दारिद्र्यामध्ये आहेत. त्यांनी ब्राह्मण जातीमध्ये जन्म घेतला हा त्यांचा गुन्हा झाला काय ? त्यांनी काही मागायचे नाही काय ? माझा मुद्दा एवढाच आहे की, खुल्या वर्गातील जे गरीब आहेत, डीआरडी खालचे आहेत त्यांना आरक्षण द्या. हे आरक्षण लागू झाले तर ते उद्या विनायक मेटेला मिळणार नाही, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना मिळणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांना मिळणार नाही. जे खरोखर गरीब आहेत त्यांना त्याचा लाभ होईल मग ते कोणत्याही समाजाचे असो.

या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदया प्रा. फौजिया खान उपस्थित आहेत. आज मुस्लिम समाजाची किती वाईट अवस्था आहे. त्या समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. अलीकडच्या 5-10 वर्षामध्ये हे प्रमाण वाढलेले आहे. मुस्लिम समाजाची मुले कुठे हॉटेलमध्ये, भंगारामध्ये, छोटी-मोठी कामे करताना दिसतात. त्यांना कोण वाली आहे ? उत्तर प्रदेशमध्ये ते मुलायमसिंग यांच्या मागे आहेत. महाराष्ट्रात तर मुस्लिम समाजामध्ये प्रत्येक जण नेता आहे. जसे मराठा समाजामध्ये नेते आहेत त्या प्रमाणे मुस्लिम समाजामध्ये सगळे नेते आहेत. त्यामुळे भांडणार कोण आणि मागणार कोण हा प्रश्न आहे. त्यांच्यामध्ये एकी नसल्यामुळे त्यांना काही मिळत नाही. जंगलातील वाघाच्या गोष्टीसारखी अवस्था झालेली आहे. पूर्वी या वाघाकडे बघण्याची कुणाची हिंमत होत नव्हती. परंतु आता कावळा, चिमणी, कोणीही येते आणि टोच मारुन जाते. कारण तो वाघ अशक्त झालेला आहे. या वाघासारखी आज खुल्या समाजातील गरीब लोकांची परिस्थिती निर्माण झालेली आहे. काय खायचे,जीवन कसे जगायचे याची पंचाईत झालेली आहे. पूर्वी देशपांडेंचे वाडे असायचे, मराठ्यांचे वाडे असायचे. आता ह्या वाड्या आणि गढया साफ झाल्या आहेत. माती विकून खाल्ली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

तरी पोट भरत नाही. मुंबईच्या झोपडपट्टयांमध्ये ब्राह्मण समाजाचे, मराठा समाजाचे, मागासवर्गीय समाजाचे, मुस्लिम समाजाचे अनेक लोक कसे तरी जीवन जगत आहेत.

सभापती महोदय, मी स्वत: अनेक वर्षे झोपडपट्टीमध्ये राहिलो आहे. पैसे नव्हते म्हणून मला शिक्षण अर्धवट सोडावे लागले. नंतर ते मी पूर्ण केले हा भाग वेगळा. मी भाजीपाला विकून उदरनिर्वाह केलेला आहे म्हणून मी हे बोलतोय. माझे म्हणणे एवढेच आहे की, जे खरोखर गरीब आहेत मग ते कोणत्याही समाजाचे असोत त्यांना तुम्ही न्याय देण्याची भूमिका घेणार आहात की नाही ? काल मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना 25 आमदारांचे पत्र दिले आणि याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्यास सांगितले. हा निर्णय घेण्यासाठी काहीसा वेळ लागला तरी हरकत नाही. परंतु त्यादृष्टीने सर्वांना विश्वासात घेऊन पुढे चला. आम्ही केव्हा आरक्षणाचे नाव काढले की काही लोक पटकन उठून उभे रहातात.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे...

मुळात असा प्रश्न आहे की, या सगळया बाबतीतमध्ये आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना एक पत्र दिलेले आहे. यासंदर्भात शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. आपणास तो निर्णय जेव्हा घ्यावयाचा असेल तेव्हा घ्या. परंतु सगळयांना विश्वासात घेऊन हा निर्णय घेतला गेला पाहिजे. आम्हाला कोणाचे आरक्षण काढून घ्यावयाचे नाही.

महोदय,मी तर पहिल्या दिवसापासून भूमिका घेतो आहे की, ज्यांना ज्याना आरक्षण लागू करण्यात आलेले आहे ते आरक्षण तसेच ठेऊन किंबहुना त्यातील एक टक्का सुध्दा आरक्षण कमी न करता, त्याला हात न लावता, जे वेगळे आहे, त्या वेगळयातून गरीब लोकांना आरक्षण द्या असे म्हटले तरी श्री.विनायक मेटे जातीयवादी ठरतो. दुसरे कोणी आरक्षणाच्या बाबतीत बोलले तर ते पुरोगामी ठरतात. आम्ही मात्र जातीयवादी ठरतो. या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये मोठा चमत्कार आहे. आम्ही जी मागणी केलेली आहे, त्याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष घालणे आवश्यक आहे. अनेक समाजाचा यामध्ये समावेश करावा असे मी प्रस्तावातच म्हटले आहे. काही म्हणतात, कशाला द्यावयाचे? काय द्यावयाचे म्हणतात, परंतु त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहेबांनी एक भूमिका घेतली होती. त्या घटना समितीमध्ये असणारे श्री.मुन्शी साहेब, श्री.मुखर्जी साहेब यांनी यासंबंधी भूमिका घेतली होती. तो महत्वाचा मुद्दा आहे. 1992-93 मध्ये मंडल आयोग आला. तेव्हापासून ओ.बी.सी.चा वर्ग सुरु झाला. ही अतिशय चांगली गोष्ट झाली. त्याच्यामध्ये काही लोकांना न्याय मिळाला. तेव्हा काय होती ? शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक गणिते त्यामध्ये मांडलेली होती. ती गणिते मांडली आणि आताच्या कसोटीवर या सगळया समाजासाठी ती वापरली तर ते योग्य होणार नाही असे मला वाटते.

महोदय, आपण नवीन सर्व्हे करा. सर्व्हे करण्यासाठी एखादा आयोग नेमा. त्यांना सहा महिन्याची मुदत द्या. या ओपन घटकामध्ये ब्राम्हण असतील, मुस्लीम असतील, ख्रिश्चन असतील, मराठा असतील, मारवाडी असतील, गुजराथी असतील, अन्य कोणी असतील हा सगळा समाज ओपन वर्गामध्ये येतो. त्यांची खरोखर शैक्षणिक आणि आर्थिक परिस्थती कशी आहे, प्रशासकीय परिस्थिती कशी आहे, याचा तरी एकदा सर्व्हे करा. आज कोणीही उठतो आणि आम्हाला एवढे टक्के आरक्षण द्यावे अशी मागणी करतो. शासनाला वाटते की, तेवढे टक्के गृहीत धरा. आता जातनिहाय गणना होत आहे. त्या गणणेमध्ये किती खरी माहिती येईल हा एक शंकेचा विषय आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे...

मराठा समाजाचे लोक कुणबी म्हणून लिहावयास लागले आहेत. ओ.बी.सी.ची संख्या 10 टक्क्यांनी वाढली तर त्यात मला आश्चर्य वाटणार नाही. कारण अनेक समाज ओ.बी.सी.मध्ये येणार आहेत. ओ.बी.सी.ची शंभर टक्के संख्या वाढणार आहे. मग काही नेते लगेच म्हणतील की, आतापर्यंत आम्ही केले. तुम्ही आमचे बाकीचे खाल्ले असतील, ही भावी काळामधले काही वादाची ही प्रकरणे आहेत. हे वाद कायम स्वरुपी मिटवावयाचे असेल तर या सगळया समाजाचा सर्व्हे होणे गरजेचे आहे. त्या सर्व्हेसाठी एखादा आयोग तुम्ही नेमा. त्या आयोगाला काही ठराविक कालमर्यादा घालून द्या. ती कालमर्यादा तुम्ही घातली तर निश्चितपणे त्याच्यानंतर शासनाला धोरण ठरविता येईल. या सगळया लोकांना न्याय देता येईल. कोणत्याही समाजाचे काहीही अडचण येणार नाही हे मी या ठिकाणी निश्चितपणे सांगू इच्छितो.

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

माझ्या हातामध्ये एक प्रमाणपत्र आहे. हे प्रमाणपत्र तामीळनाडू राज्यातील बॅकवर्ड क्लासबाबतचे आहे. श्री.श्रेयस सतीश चव्हाण या व्यक्तीला तामीळनाडू राज्याकडून बॅकवर्ड क्लासचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. चेन्नईमध्ये मराठा समाज बॅकवर्ड क्लास गणला जातो. कर्नाटक राज्यात मराठा समाज ओबीसीमध्ये मोडतो आणि महाराष्ट्रामध्ये मराठा समाज खुल्या प्रवर्गात आहे. ही असमानता दूर करण्यासाठी शासनाने निश्चितपणे धोरण ठरविण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मी दोन दिवसापूर्वी नांदेड येथे गेलो होतो. तेथून मुंबईकडे येत असताना परभणी कृषी विद्यापीठातील काही मंडळींनी मला फोन करुन माझी भेट घेण्याची इच्छा प्रदर्शित केली. मी त्यांना रेल्वे स्थानकावर भेटण्यास बोलावले. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर अशी माहिती मिळाली की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जून, 2011 मध्ये 1869 पी.एस.आय.ची पदे भरण्यात आली. 1869 पैकी 825 पदे आरक्षित प्रवर्गासाठी राखीव होती. उर्वरित 449 पदे ही खुल्या प्रवर्गाची होती. जे धोरण आहे ते बदलता येत नाही. परंतु आरक्षित गटातील मुले त्यांच्या कर्तृत्वामुळे, बुध्दिमत्तेमुळे खुल्या प्रवर्गात आली. त्यांच्या बुध्दिमत्तेबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे. परंतु राखीव कोट्यातून अर्ज केलेल्या आणि ओपनमध्ये कन्व्हर्ट झालेल्या मुलांचे प्रमाण 54.42 टक्के आहे. गावकुसाबाहेर असणारी मुले आपल्या बुध्दिमत्तेच्या जोरावर पुढे जाऊ शकत असतील तर ओपनमधील मुले का जाऊ शकत नाहीत? हा प्रश्न खुल्या प्रवर्गातील सर्व वर्गाला भेडसावत आहे.

आरक्षणाची ही स्थिती असेल तर 52 ऐवजी 60 टक्के आरक्षण करावे. परंतु एकदा आरक्षण निश्चित झाल्यानंतर 60 टक्क्यामधील उमेदवाराला 40 टक्क्यामध्ये संधी मिळता कामा नये आणि 40 टक्क्यातील उमेदवाराला 60 टक्क्यामध्ये संधी मिळता कामा नये. असे धोरण निश्चित ठरविण्यात आले पाहिजे. आज 52 टक्के आरक्षण आहे असे म्हटले जाते. त्यातील 26 ते 27 टक्के खुल्या समाजाचा वाटा असताना 78 टक्के वाटा आरक्षित समाजाला दिलेला आहे. मग पीएसआय परीक्षेत खुल्या प्रवर्गातून आरक्षित प्रवर्गातील मुलांना प्रवेश मिळत असेल तर त्यांच्याबद्दल आणि सरकारबद्दल खुल्या प्रवर्गातील मुलांचे काय मत तयार होईल? भावी पिढी काय करणार आहे याचा विचार करणे गरजेचे आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे.....

सभापती महोदय, राज्यात राज्य मागासवर्गीय आयोग अस्तित्वात आहे. मुस्लीम समाजाला आंध्रप्रदेश राज्यात 4 टक्के आरक्षण आहे. केरळमध्ये, यु.पी.मध्ये सुध्दा आरक्षण दिलेले आहे. माननीय पंतप्रधान यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्रीमती मायावती यांना पत्र लिहून उत्तरप्रदेशमध्ये मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याची विनंती केली होती. श्री.मुलायमसिंग यादव यांनी देखील तशी घोषणा केली आहे. ब्राम्हण समाजाला 18 टक्के आरक्षण दिले पाहिजे ही घोषणा श्रीमती मायावती यांनी केली होती. मुस्लीम समाजाला त्या पध्दतीने आरक्षण दिले आहे. राजस्थानमध्ये आजही आंदोलन सुरु आहे. अनेक राज्यामध्ये खुल्या प्रवर्गातील गरीब लोकांना आरक्षण देण्याची भूमिका घेतली आहे.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

आपल्याकडे सुध्दा ती घेतली पाहिजे.

आतापर्यंत 94 वेळा घटना दुरुस्ती झाली. यात प्रामुख्याने दोन पध्दतीने आपल्याला विचार करता येईल. एक म्हणजे सरकारने निर्णय घेऊन आणि दुसरी पध्दत प्रत्येक वेळेला सुप्रीम कोर्टाने निर्णयानुसार केंद्र शासनाने 340 वी घटना दुरुस्ती केली त्याप्रमाणे करता येईल. मागासवर्गीयांसाठी केंद्र शासनाचा स्वतंत्र आयोग आहे त्याच धर्तीवर राज्यात सुध्दा असा आयोग नेमला पाहिजे. तसा आपल्याकडे हा आयोग आहेच. त्याचे अध्यक्ष सुरुवातीला बापट साहेब होते, त्यानंतर सराफ आले, त्यांना आता मुदतवाढ दिली आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या बाबतीत त्यांनी तर पूर्णपणे अन्याय केला. त्यासंबंधीचे निष्कर्ष आणि अहवालाची प्रत माझ्याकडे आहे. त्यावरुन दिसून येते की, मराठा समाजावर त्यांनी सरळ-सरळ अन्यायच केला आहे. अर्थात ते सर्व वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही पण अन्याय केला त्याविषयी आता जास्त बोलत नाही. या आयोगाकडे ज्यांनी ज्यांनी अर्ज केले, ज्यांनी शिफारशी केल्या की शासनाला आणखी आरक्षण देण्याचा अधिकार आहे, त्यांचा विचार केला पाहिजे. पण यात असे काही लोक बसलेले आहेत, त्यांच्याविषयी मला बोलावयाचे नाही पण त्यात आमचे चांगले मित्र म्हणून प्रा. हरी नरके हे सुध्दा आहेत. त्यांच्या विद्वत्तेबद्दल बोलावे तेवढे कमीच आहे. पण हे नरके साहेब मात्र ओपनमध्ये जो वर्ग आहे त्या 48 टक्के वर्गातील सर्वच जण कसे बदमाश आहेत, कसे वाईट आहेत आणि कसे आरक्षणाच्या बाहेरच राहतील हे जाहीरपणे सभेत बोलत असतात. टी.व्ही. चॅनल्सच्या माध्यमातून बोलतात तर कधी पुस्तकांच्या माध्यमातून आणि वर्तमान पत्रातूनही लिहितात. हेच गृहस्थ पुण्याच्या नामांकित यशदा सारख्या संस्थेवर आणि माननीय उच्च व तंत्र शिक्षण परिषदेवर सुध्दा आहेत त्याचबरोबर राज्य मागासवर्गीय आयोगावर सुध्दा आहेतच. अशा प्रकारे आपण एखादा सदस्य आपला म्हणून अशा जागांवर नेमतो पण अशा आयोगाकडे नि:पक्षपातीपणे विचार करणारेच लोक असले पाहिजे. अन्यथा यांना कसे मातीत घालता येईल असे ठरविणाऱ्या लोकांकडून न्यायाची अपेक्षा कशी होणार आणि अशाच लोकांना पुन्हा पुन्हा अशा महत्वाच्या जागांवर आपण संधी देणार काय याचाही विचार शासनाने करावा.

अर्थात माझ्या ओळखीचे कोणी आहे व त्यांना अशा आयोगावर घ्यावे असे माझे म्हणणे नाही. तसेच नागपूरला श्री. चरडे आहेत, सराफ देखील याच आयोगावर आहेत, श्री. कुंभार हे

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

औरंगाबादला आहेत, ज्यांच्या नावाने आपण रेणके आयोगाची निर्मिती केली होती त्यांची मुलगी श्रीमती पल्लवी बाळकृष्ण रेणके ही सुध्दा अशा आयोगावर आहे, शौकत अली कांबळे हे देखील आहेत तसेच अकोल्याचे गौड हे देखील अशा आयोगावर आहेत. त्याप्रमाणे इतरांनाही यात समाविष्ट केले पाहिजे अशी माझी सूचना आहे. त्याचबरोबर आपण राज्य मागासवर्गीय आयोगाला कशा प्रकारचे पत्र देतो हे सुध्दा ते सांगण्यास तयार नाही अथवा कोणतीच माहिती देण्यास तयार नाहीत इतका सावळागोंधळ सुरु आहे. एवढी गुप्तता पाळण्याची गरज काय आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

तसेच या चर्चेच्या अनुषंगाने माझी मागणी आहे की, एकूण आरक्षण वगळून 48 टक्के ओपनसाठी आपण ठेवतो त्यात सुध्दा एखादा आरक्षणातून मेरिटमध्ये आलेला उमेदवार असेल तर त्याला नियुक्ती दिली जाते, म्हणजेच त्याची वर्णी ओपनमधून लागते, रिझर्वेशनची जागा खालीच राहते व ती ओपनमधल्या माणसाला मिळत नाही. या निमित्ताने माझी मागणी आहे की, अशा प्रकारे ओपनमध्ये कोणत्याही रिझर्व्ह कॅटेगरीच्या माणसाची नेमणूक न करता त्या जागा ओपनसाठीच राखीव ठेवाव्यात, अन्यथा त्याचे दूरगामी दुष्परिणाम निश्चितपणे भोगावे लागतील, अशी भीती व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते) : या प्रस्तावावर एकूण 12 सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. तसेच सदर प्रस्तावावरील चर्चा मंत्री महोदयांच्या उत्तरासह 11.30 वाजेपर्यंत पूर्ण करावयाची असल्याने प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी कमी वेळात जास्तीत जास्त मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करावा.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी नियम 97 अन्वये जी चर्चा उपस्थित केली आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, हा खरोखरच अत्यंत स्तुत्य असा उपक्रम आहे. कोणी कोणाच्या आरक्षणात हात घालावयाचा आणि तो पोळून घ्यावा की, नाही अशा पध्दतीच्या विचाराबद्दल कोणीच बोलण्यास तयार नसते. परंतु सन्माननीय सदस्य श्री. मेटे यांनी या विषयाच्या संदर्भातील तरुणांच्या मनातील विद्रोह कमी करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल मी त्यांचे सर्वप्रथम आभार मानते. देशाच्या बरोबर राज्याला न्यावयाचे असेल किंवा देशाला पुढे न्यावयाचे असेल तर तरुण पिढीला विकासाकडे नेण्याच्या संदर्भात तसेच त्यांच्या शिक्षणाच्या संदर्भात विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. देश सुदृढ करावयाचा असेल तर तरुणांकडे, विद्यार्थ्यांकडे लक्ष देण्याची गरज आहे. आरक्षणाच्या संदर्भात दुर्बल माणसाला सशक्त माणसाबरोबर धावाधाव करण्यास लावू नये. दुर्बल माणूस सशक्त माणसाच्या स्पर्धेत टिकणार नाही व त्यासाठीच आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. कोणाला किती टक्के आरक्षण दिले याच्या खोलात मी जाणार नाही यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी सविस्तर माहिती दिलेली आहे. आरक्षण देत असतांना कोणाच्या तरी हिश्श्याचे आरक्षण काढून ते दुसऱ्याला दिले जाते ही जी पध्दत आहे त्या पध्दतीमुळे युवकांच्या मनात विद्रोह निर्माण झालेला आहे, त्यांच्या मनात एक प्रकारची चीड निर्माण झालेली आहे. लोकपाल आयोगाच्या विधेयकात 4.8 टक्के अल्पसंख्यांक लोकांना आरक्षण देण्यात यावे असा उल्लेख करण्यात आलेला आहे. या आरक्षणाच्या संदर्भात सर्वपातळीवर प्रचार झाला व इतर मागासवर्गीय लोकांना वाटू लागले की, आमच्या आरक्षणातून अल्पसंख्याकांना 4.8 टक्के आरक्षण दिले जाणार आहे. 52 टक्क्याच्यावर आपल्याला आरक्षण देता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. ओबीसीच्या कोटयातून अल्पंसख्यांकाना 4.8 टक्के आरक्षण दिले तर आमचे आरक्षण कमी होईल असे त्यांना वाटले. ओबीसीमध्ये 260 जाती आहेत व असे असतांना ओबीसीचा कोटा कमी झाला तर आमचे काय होणार असे ओबीसींना वाटू लागले. केंद्रामध्ये अजूनपर्यंत लोकपाल विधेयक संमत झालेले नाही. तरी सुध्दा ओबीसींमध्ये मोठया प्रमाणात आपले आरक्षण कमी होईल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

अशी चर्चा सुरु झाली. या ज्या चर्चा आहेत त्या राज्याला घातक ठरणार आहेत असे माझे मत आहे.

आरक्षण दिले पाहिजे याबाबत कोणाचेही दुमत नाही परंतु कोणामधून द्यावयाचे याबाबत असंतोष आहे. दुर्बलांना सशक्त माणसांपर्यंत आणावे व समाजाला एका सूत्रात आणून या राज्याला व या देशाला मोठे करावे हाच खरा लोकशाहीचा पाया आहे. आरक्षण देत असतांना कोणाचेही तरी आरक्षण कमी करुन देण्यापेक्षा केंद्राने त्यांच्या कोटयातून कोणाचेही आरक्षण कमी न करता आरक्षण वाढवून देण्याची गरज आहे असे माझे मत आहे. आता एकंदर 52 टक्के आरक्षण आहे. 48 टक्के आरक्षण हे सर्वसाधारण लोकांसाठी आहे. मला फक्त एकच म्हणावयाचे आहे की, मागासवर्गीय, अनुसूचित जाती जमाती, भटक्या जमाती यांच्या आरक्षणाचा कोटा ठरवून देण्यात आलेला आहे. या लोकांना त्यांच्या कोटया प्रमाणे नोकरीमध्ये, शिक्षणामध्ये आरक्षण मिळत असते. परंतु सन 2008 ते 2012 पर्यंत आरक्षणाचा कोटा किती टक्के भरला याचा हिशोब महाराष्ट्र शासनाकडे नाही. यासंदर्भातील हिशोब नियोजन खात्याकडे होता पंरतु सन 2008 पासून नियोजन खात्याकडून हा हिशोब ठेवला जात नाही. त्यामुळे सन 2008 ते 2012 पर्यंत किती अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमातीचे किती टक्के आरक्षण भरले याचा काही सुध्दा हिशोब ठेवला गेला नाही. असे असतांना आरक्षणाचा कोटा पूर्ण भरत आहोत असे म्हणण्याचा शासनाला काहीही अधिकार राहिलेला नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, आरक्षणाच्या संदर्भात नियोजन आणि हिशोब ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. आरक्षणाच्या टक्केवारीचा मग त्यामध्ये नोकरी असो, शैक्षणिक असो यामध्ये जे आरक्षण दिले जाते या सर्वांचा रिपोर्ट नियोजन विभागाने सन 2012 पासून सुरु करावा अशी मागणी करते.

सभापती महोदय, गेल्या 7-8 वर्षापूर्वी आरक्षणाच्या संदर्भात मी नियोजन विभागाकडून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमातींचर किती पदे भरली, शैक्षणिक सुविधांमध्ये कोणता लाभ देण्यात आला यासंदर्भात माहिती मागितली होती. यासंदर्भातील जी काही माहिती मिळाली होती ती मी विधानसभेत मांडली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

सभापती महोदय, एका ठिकाणी भटक्या जमातीच्या 70 जागा भरावयाच्या होत्या व त्यासाठी 100 मुले इंटरव्हयूसाठी आली होती व त्यातील फक्त 5 जागा भरल्या गेल्या. जी मुले इंटरव्हयूसाठी आली होती त्यामध्ये धनगर समाजातील मुले नव्हती, मच्छीमार नव्हते असे असतांना 75 मधील फक्त 5 जागा भरल्या गेल्या. यासंदर्भात मी ऑब्जेक्शन सुध्दा घेतले होते.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

परंतु आता अहवाल देणे बंद झाल्यामुळे कुणाच्या किती जागा भरल्या आहेत याची माहिती मिळत नाही. अनुसूचित जमातीमधील आदिवासी मुले भित्री असतात, कमी प्रमाणात शिकलेली असतात आणि ती जेव्हा मुलाखतीला जातात तेव्हा त्या ठिकाणी शहरातील मुले नोकऱ्यांवर हात मारुन जातात. खेडयातील मुलांना बोलतांना सुध्दा भीती वाटते, हुशार असून सुध्दा ते आपले शब्द ओठावर आणू शकत नाहीत अशी त्यांची परिस्थिती असते. म्हणून माझे नेहमी असे म्हणणे असते की, तुम्ही ज्या जिल्ह्यात नोक-या उपलब्ध करता तेथील स्थानिक तरुणांना त्या उपलब्ध करुन द्याव्यात.

मध्यंतरी शासनाने एक गोष्ट मान्य केली, परंतु त्या बाबत कुणी तरी कोर्टामध्ये गेले असून आजकाल कोर्ट राज्य चालविते अशी स्थिती आहे. महाराष्ट्रातील सर्व लोकांना एकत्र आणा असा कोर्टाने निर्णय दिला. आज पुण्यातील माणूस चंद्रपूरला नोकरी मागतो, नोकरीवर रुजू झाल्यानंतर एका वर्षात पुण्याला बदली मागतो. त्यानंतर पुन्हा चंद्रपूर व गडचिरोलीला रिक्त जागेचा प्रश्न कायम रहातो. म्हणून आपण या ठिकाणी या लोकांना आरक्षणाचे संरक्षण देत आहोत ते देत असतांना पुन्हा सुदृढ लोकांच्या रांगेत त्यांना उभे करावयाचे हा कोणता न्याय आहे, ही आरक्षणाची कोणती पध्दत आहे? म्हणून या ठिकाणी त्या त्या जिल्ह्यातील लोकांना जिल्ह्याच्या ठिकाणी नोकरी देऊन त्यांच्यातील असंतोष खऱ्या अर्थाने आपण कमी केला पाहिजे.

या राज्यातील तरुणवर्ग ही या राज्याची शक्ती आहे, या राज्याला मोठे करणारी शक्ती असल्यामुळे त्यांच्यासाठी जिल्ह्याच्या जागा जिल्ह्यामध्ये भरण्यात याव्यात यासाठी आपण प्रयत्न करणे गरजेचे आहे. जे हुशार तरुण आहेत त्यांना सर्वसाधारण वर्गासाठी असलेल्या 48 टक्के आरक्षणामध्ये सामावून घेतो. परंतु मघाशी माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 48 टक्के आरक्षणामध्ये ब्राम्हण, जैन,ख्रिश्चन, मुस्लिम वर्ग आहे. ते म्हणाले की, मुस्लिम समाजामध्ये शैक्षणिकदृष्टया पुरुषांचे प्रमाण 60 टक्के आहे तर महिलांचे प्रमाण केवळ 3 टक्के आहे ही या देशातील स्थिती आहे. असे असतांना या मागासलेल्या लोकांच्या मुलांनी आयुष्यभर भंगार उचलायचे काय, भंगार विकायचे काय, 9 वर्षापासून चोऱ्या करावयाच्या काय, त्यांच्या बायकांनी भांडी घासावयाची काय? जर तुम्हाला सर्व समाजाला एकत्र आणावयाचे असेल, एका तराजूमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

मोजावयाचे असेल तर आरक्षणाच्या बाबतीत सर्वांना सारखा न्याय मिळाला पाहिजे. 52 टक्के आणि 48 टक्क्यामध्ये सर्व समाजाला सामावून घ्यावयाचे असेल तर त्यांची देखील टक्केवारी आपण कायम राखली पाहिजे. याबाबत आपण विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, या राज्यामध्ये व देशामध्ये 30 टक्के श्रीमंत वर्ग आहे आणि 70 टक्के दुर्बल वर्ग आहे, जो आर्थिकदृष्टया मागासलेला आहे. आजच्या या परिस्थितीतून एवढी मोठी दरी निर्माण झाली आहे. त्यामध्ये मनी पॉवर असेल, मसल पॉवर असेल, मॅन पॉवर असेल त्या माध्यमातून 30 टक्के लोकांच्या हातामध्ये सत्ता व संपत्ती जमा झाली आहे आणि 70 टक्के लोक केवळ गुलामाचे जीवन जगत आहेत. अशावेळी 70 टक्के लोकांना सुरक्षित करावयाचे असेल तर तो कोणत्याही समाजातील असो त्याला 48 टक्क्यामध्ये आरक्षण न देता दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या विचारात घेऊन 5 किंवा 10 टक्के आरक्षण या आर्थिक दृष्टया मागासलेले लोकांना देण्याची गरज आहे आणि ते आपण याठिकाणी दिले पाहिजे. बाकीची राज्ये जर 59 टक्के 60 टक्के आरक्षण देतात तर मग आपण 52 टक्यावर का थांबलो आहोत. आम्हाला सांगण्यात येते की, सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार 52 टक्क्याच्या पुढे आरक्षण देऊ नका. तर मग सुप्रीम कोर्टाचा निर्णय फक्त महाराष्ट्राला लागू आहे काय? बाकीच्या राज्यांना हा निर्णय लागू नाही काय? या बाबत सर्व बाजूंनी अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी आपण खऱ्या अर्थाने अभ्यास करुन किती लोक आर्थिकदृष्टया मागासलेले आहेत, किती शिकलेले आहेत याचा सर्व्हे केला पाहिजे. आज 38 लाख लोक बेरोजगार आहेत, 17 लाख नोकऱ्या उपलब्ध आहेत, परंतु फक्त 1 लाख लोकांना नोकऱ्या दिल्या आहेत. आपण 16 लाख लोकांना नोकऱ्या का देऊ शकलो नाही, 38 लाख लोकांना रोजगार का देऊ शकलो नाही? याला आपण एम्प्टी माईंड डेली वर्कशॉप म्हणतो, हे बुध्दिमान मुलांचे डोके भविष्यामध्ये विध्वंसक ठरणार आहे. या नंतर आरक्षण कसे व किती द्यावयाचे या बाबत इतर राज्यांनी जसा स्वत: निर्णय घेतला त्याप्रमाणे या राज्याने निर्णय घ्यावा व सर्वच मागासलेल्या लोकांना, आर्थिकदृष्टया मागासलेल्या लोकांना नोकरीवर सामावून घेण्यासाठी आरक्षण देण्याची आवश्यकता आहे एवढे सांगून माझे भाषण संपविते.

(यानंतर श्री. भारवि)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांनी अतिशय मोठा मुद्दा या निमित्ताने चर्चेला घेतला आहे.

माननीय श्री.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. माननीय श्री.यशवंतराव चव्हाण हे द्रष्टे पुरूष होते. हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावला आहे. महाराष्ट्रामध्ये अठरापगड जाती-जमाती आहेत. आज विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळते ती केवळ माननीय श्री.यशवंतराव चव्हाण यांच्यामुळे. माननीय श्री.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी अभूतपूर्व ऐतिहासिक असा निर्णय घेतला. महाराष्ट्रामध्ये शाळेत, महाविद्यालयात जे विद्यार्थी शिकतात त्या सर्वांना इबीसीची सवलत देण्याचा अभूतपूर्व असा निर्णय माननीय श्री.यशवंतराव चव्हाण यांनी घेतला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थी शिकू शकले. मी इबीसीची सवलत घेऊन महाविद्यालयात शिकलो. पण आज दुर्दैवाने महाराष्ट्रातील बहुजन समाजातील मुलांना इबीसीची सवलत मिळत नाही. आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे अनेक विद्यार्थी शाळा-महाविद्यालय सोडून देतात. गुरा-ढोरांपाठी जातात. माननीय श्री.यशवंतराव चव्हाणांना अपेक्षित होते की, या महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्याने शिकून कुटुंबाची आर्थिक उन्नती घडविली पाहिजे. त्या मुख्य उद्देशालाच शासन तडा देते आहे काय, अशा प्रकारचा संशय निर्माण व्हावा अशी गंभीर परिस्थिती महाराष्ट्रातील आहे. त्यामुळे मला माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती करावयाची आहे की, अठरा पगड जाती-जमातीतील मराठा असेल, ब्राह्मण असेल, मुस्लिम बांधव असतील, पारसी असतील, गुजराती असतील, या सर्व सामाजाचे विद्यार्थी शिकले पाहिजेत.

आमचे सन्माननीय सदस्य श्री.सतीशराव चव्हाण हे देखील इबीसीची सवलत घेऊन शिकले. हा माननीय श्री.यशवंतराव चव्हाण साहेबांनी निर्णय घेतला नसता तर कदाचित आपण या विधान परिषदेमध्ये येऊ शकलो नसतो. श्री.पाशाभाई पटेल आपण रोजगार हमी योजनेवर राहिला असता आणि मी शेतातल्या नांगरावर राहिलो असतो. आज खेड्यापाड्यातील डोंगरपट्टयातील बहुजन समाजातील विद्यार्थी दहावी नंतर शेळ्या मागे जातात. बारावी नंतर गुरा-ढोरा मागे जातात किंवा आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्यामुळे ते अन्य मार्गाने आपापल्या उद्योगाच्या दिशेने वाटचाल करतात. ही परिस्थिती अतिशय गंभीर आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

या निमित्ताने मला एकच मुद्दा मांडावयाचा आहे की, महाराष्ट्रातील बहुजन समाजातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही अशा सर्व विद्यार्थ्यांना ही इबीसीची सवलत पुन्हा सुरू करून त्या द्रष्ट्या महापुरूषास, आदरणीय श्री.यशवंतराव चव्हाण यांना आदरांजली वाहावी अशी मी आग्रहपूर्वक विनंती करणार आहे. प्रत्येक वेळी शाहू महाराज, आंबेडकर, महात्मा फुले यांचा आपण गजर करीत असतो. या भागातील, या मातीतील प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. बहुजनांचे चित्र वाईट आहे. काम मिळाले नाही म्हणून घराकडे परत फिरणारा मराठी माणूस अंगावरच्या जीर्ण झालेल्या वस्त्रांची दुपटी करून ती मुलांच्या अंगाखाली अंथरता येईल काय याची विवंचना वाहतो.

यानंतर सौ.रणदिवे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . . .

पावसाचे पाणी अंगावर पडत असताना एखाद्या झोपडीमध्ये एखादी मानिनी बाळंतपणाच्या वेदना सहन करीत-करीत जीवन जगत आहे. बाहेर मात्र झेंडा फडकत आहे आणि "जय भवानी" "जय शिवाजी" अशा घोषणा दिल्या जात आहेत पण दुर्दैवाने झोपडीतील जीवाकडे हेतूत: दुर्लक्ष केले जात आहे. या जीवांना राष्ट्रीय प्रवाहामध्ये आणण्याचा संकल्प आपण करणार आहात काय हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, यानिमित्ताने मी आपल्याला आग्रहपूर्वक विनंती करीन. कारण कै. यशवंतराव चव्हाण यांचा वसा आणि वारसा घेतलेले आमचे माननीय शिक्षण मंत्री आहेत. तसेच ते उच्च विद्याविभूषित आहेत.त्याच प्रमाणे अतिशय सु-संस्कारित आहेत. त्यांच्या वडिलांचा आदर्श आम्हा सगळयांसमोर आहे. आमच्या मराठवाड्यामध्ये त्या काळात ते वकिली व्यवसाय करीत होते तसेच ते खासदार देखील होते.त्यावेळी आमच्या सारख्यांना असे वाटावयाचे की, आपण आता माननीय मंत्री श्री.राजेश टोपे साहेबांसारखे कुठेतरी जावे. जर आपण त्यांचा वसा आणि वारसा घेतला असेल तर मला असे वाटते की, आपण या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा विचार करणे आवश्यक आहे. कारण विद्यार्थी वर्गा मध्ये गेले पाहिजेत आणि शिकून बाहेर आले पाहिजेत आणि त्यांनी सगळा समाज सुसंस्कारित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे तर मग बाहेर बलात्काराचे आणि हिंसेचे चित्र माजलेले आहे त्यावर आपल्याला अंकुश आणावयाचा असेल तर समाज सुसंस्कारित करावा लागेल आणि त्यासाठी विद्यार्थी शिकावे लागतील आणि ते शिकण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना किमान ईबीसी सवलत द्यावी एवढीच मी आग्रहपूर्वक विनंती करतो आणि कै.यशवंतराव चव्हाण यांचे स्मरण करीत असताना पुन्हा एकदा या निमित्ताने त्यांना आदरांजली अर्पण करावी एवढीच आग्रहाची विनंती करुन मी थांबतो.

. . . .के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी एका अतिशय मुलभूत विषयाच्या बाबतीत चर्चा घडवून आणलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आणि सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले यांनी मांडलेल्या मुद्यांची मी पुनरावृत्ती करणार नाही.पण त्या मुद्यांना स्पर्श करुन पुढे गेले पाहिजे. त्यानी वारंवार असा मुद्दा मांडलेला आहे की, 1950 मध्ये घटना स्विकारल्यानंतर संपूर्ण भारत देशामध्ये जातीच्या आधारावर आरक्षणाची रचना निर्माण झाली आणि त्याला जातीच्या आधारावरील आरक्षणाच्या बाबतीत जी अस्पृश्यता होती त्याची पार्श्वभूमी होती. त्यामुळे एका दृष्टीने काही प्रमाणात ती मान्य देखील करण्यात आली की, ते केवळ त्याच जातीमध्ये जन्माला आले म्हणून वर्षानुवर्षे त्यांना जर गाव कुसाबाहेर ठेवण्यात आले असेल आणि शिक्षणापासून वंचित केले असेल, आर्थिक प्रगतीपासून वंचित केले असेल तर त्यांना संपूर्ण समाजाच्या बरोबर आणण्यासाठी एक वेगळी रचना केली पाहिजे. त्यासाठी जे लॉजिक मांडण्यात आले, ते बरोबर होते. जर एका घरामध्ये चार मुले असतील तर त्या चार मुलांमधील जो अशक्त मुलगा असतो त्याला सशक्त करण्यासाठी बाकीच्यांनी थोडी तोशीस सोसावयाची असते. त्यावेळी बाकीच्यांनी असे म्हटले पहिजे की, हा जरा अशक्त आहे, त्यामुळे त्याला आपल्यापेक्षा जास्त दूध देऊ. त्यानुसार इतर तीन भावांनी ही तोशीस सोसल्यामुळे आणि त्यांच्यातील थोडे दूध अशक्त भावाला दिल्यामुळे मग तो मुलगा देखील बाकीच्या तीन मुलांप्रमाणे सशक्त होऊन कुटुंबाची पर्यायाने आपल्या देशाची एका अर्थाने उभारणी करण्यामध्ये आपला वाटा उचलतो. मला असे वाटते की, आरक्षणाच्या बाबतीत रचना करीत असताना मुळात 10 वर्षासाठी हे आरक्षण ठेवावे, त्यानंतर त्याचा आढावा घेण्यात यावा आणि मग पुन्हा नव्याने विचार करावा अशा प्रकारची ही रचना करण्यात आली होती आणि आता याला 60 वर्षे पूर्ण झाली आहेत.

सभापती महोदय, एका बाजूला सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले सरांनी यांनी मुद्दा मांडला की, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी, घटकांसाठी आरक्षण देणे गरजेचे आहे, तसेच जे आरक्षण जातीच्या आधारावर देण्यात आले आहे त्याचा सुध्दा आढावा घेण्याची आवश्यकता आहे की, याबाबतीत नेमके काय झाले? कारण थोडी थोडकी नाही तर याला 60 वर्षे झालेली आहेत. यामध्ये वेगवेगळया प्रकारच्या नवीन सूचना, वेगवेगळया प्रकारचे बदल येण्याची देखील आवश्यकता आहे आणि त्यातील एक भाग क्रिमी लेअरचा आहे. याबाबतीत सुध्दा कठोरपणे आढावा घेऊन याची मर्यादा वाढविता येईल याचा विचार केला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील . . . .

सभापती महोदय, वर्षानुवर्षे जे मागास राहिले त्या घरातील एका मुलाला शिक्षण मिळाले, एका मुलाला नोकरी मिळाली. एका मुलाला बढती मिळाली आणि त्यातून जर त्या कुटुंबाची प्रगती झाली असेल तर त्याच जातीत आरक्षण असावे परंतु त्या जातीतील दुसरे जे अविकसित आहेत त्यांच्यासाठी आरक्षण ट्रान्सफर व्हावयाचे असेल तर मला असे वाटते की, आरक्षणाच्या बाबतीतील नियमांची सुध्दा कठोर अंमलबजावणी केली पाहिजे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ....

अन्यथा 60 वर्षाचा आढावा घेत असताना त्या त्या जातीतील एक टक्का, दोन टक्के, तीन टक्के, चार टक्के, पाच टक्के इतकेच लोक प्रगत झाले आणि बाकीचे लोक आहे त्याच ठिकाणी आहेत असे दिसेल. त्यामुळे त्या आरक्षणाच्या बाबतीत जर आपण निकष नीट करणार नसलो तर आणखी 100 वर्षे आरक्षण दिल्यानंतर सुध्दा त्या त्या जातीतील शेवटचा माणूस विकसित झाला आणि त्यातून आता आरक्षणाची गरज राहिली नाही अशी स्थिती येणार नाही.

सभापती महोदय, दोन्ही सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडले त्याच्या व्यतिरिक्त मी वेगळा मुद्दा असा मांडतो की, ज्या जातीच्या आधारावर आरक्षणाची व्यवस्था आहे त्याचा आढावा घेऊन त्याच जातीमध्ये आरक्षण द्यावे. त्या जातीचे आरक्षण रद्द करावे असा कोणाचाही आग्रह राहणार नाही. त्याच जातीमध्ये ते आरक्षण देऊन त्या जातीतील पुढच्या घटकाला आरक्षण मिळण्याची काय व्यवस्था राहणार आहे ? अन्यथा गरीब हा गरीबच राहील आणि त्या जातीमध्ये सुध्दा जातीयता निर्माण होईल. आज नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या या चर्चेमध्ये आर्थिक मागासलेपणाचाही विचार करावा असा प्रमुख मुद्दा आहे.

मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी त्यांच्या भाषणामध्ये शेवटच्या टप्प्यामध्ये जो मुद्दा मांडलेला आहे तो फार महत्वाचा आहे. तो मुद्दा जर विचारात घेतला तर वेगळे आर्थिक आरक्षण करावे लागणार नाही असे मला वाटते. 52 टक्के आरक्षणातील जे लोक आहेत त्यांच्यातील जे लोक मेरिटवर येतात ते जर 48 टक्क्यामध्ये येणार असतील तर जे 52 टक्के आरक्षण आहे ते 80 ते 85 टक्केपर्यंत सुध्दा जाईल. 52 टक्के आरक्षणामध्ये जे लोक येतात त्यांनी 48 टक्के आरक्षणामध्ये सरकावयाचे नाही, त्यांच्या जातीसाठी जे आरक्षणाचे पर्सेंटेज आहे ते मेन्टेन करावयाचे असे बंधन घातले तर आर्थिक दृष्टया मागास लोकांसाठी जे 5 टक्के, 10 टक्के आरक्षण मागतो त्या ऐवजी 48 टक्के आरक्षण मिळेल. कारण शेवटी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती या सगळ्या कॅटेगरीज गेल्यानंतर काही मोजकेच समाज उरतात पण त्यांची लोकसंख्या मात्र जास्त आहे. मराठा समाज म्हटला तर त्याची 37 टक्के लोकसंख्या आहे. ब्राम्हण समाज म्हटला तर त्याची 8 टक्के

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील .....

लोकसंख्या असेल. लोकसंख्येच्या मानाने मोठ्या पण जाती मात्र पाच-दहाच उरलेल्या आहेत त्यांच्या किती उपजाती उरल्या असतील ? त्यांना 48 टक्के आरक्षण पुरेसे होईल. त्यामुळे वेगळे आरक्षण मागण्याऐवजी 52 टक्केमध्ये ज्या जाती आहेत त्यांनी 48 टक्केमध्ये शिफ्ट व्हावयाचे नाही असा जरी कायदा आपण केला तरी ज्या जातींना आरक्षण नाही त्यांना सरळ 48 टक्के आरक्षण मिळेल आणि त्याची खूप आवश्यकता आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, समजा आज आम्ही आडनाव पाटील लावले. केव्हा तरी 100 वर्षापूर्वी गावचे पाटील असू. पण जमिनीचे विभाजन होता होता माझ्या वडिलांच्या वाट्याला जेव्हा अडीच एकर जमीन उरली त्यावेळी त्यांना अडीच एकर कोरडवाहू जमिनीमध्ये आपली गुजराण करता येत नाही म्हणून दहाव्या वर्षी पळून मुंबईमध्ये येऊन मिलमध्ये नोकरी करावी लागली. त्यांना मिलमध्ये पहिला पगार दरमहा 10 रुपये होता. सेवानिवृत्त होताना माझ्या वडिलांना शेवटचा पगार 1800 रुपये होता. मी गावचा पाटील असेन पण उपयोग काय आहे ? वडिलांना 10 रुपये पगार होता आणि सेवानिवृत्त होताना 1800 रुपये पगार होता. तरीही मी मराठा असल्यामुळे मला आरक्षण मिळणार नाही.

आज शेतकऱ्याच्या आत्महत्या होतात त्याकडे आपण आत्महत्या एवढ्याच भूमिकेतून पाहतो. त्याचे जर आपण विश्लेषण केले तर असे लक्षात येईल की त्या आत्महत्यांमधील 70 टक्के पेक्षा जास्त शेतकरी हे दलित नसलेले आहेत. जे दलित आहेत त्यांच्याकडे शेती नसल्यामुळे ते मजुरीच करतात. शेतकरी मयत झाला म्हणजे तो दलित नसलेला शेतकरीच मयत झालेला आहे. शेतकरी मयत झाला म्हणजे दलित मयत झाला असे नाही. कारण ते मजूर आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे आपण कधी तरी विश्लेषण केले तर असे दिसेल की त्या गावातील दलित नसलेला आणि एका अर्थाने स्वत:ला फार सवर्ण समजणारा आणि अडीच एकर जमिनीमध्ये गुजराण न झाल्यामुळे आत्महत्या करणारा शेतकरी आहे. त्यामुळे हे 48 टक्के आरक्षण अमागास वर्गासाठी असले पाहिजे, याचाही विचार केला पाहिजे. अन्यथा आर्थिक मागास विद्यार्थ्यांना प्रामुख्याने शिक्षणामध्ये, नोकऱ्यामध्ये आणि बढत्यांमध्ये आरक्षण दिले पाहिजे. कोणी राजकीय आरक्षण मागत असेल असे मला वाटत नाही. त्या त्या कुटुंबाची स्थिती नीट व्हावी यासाठी हे आरक्षण मागितले जाते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ....

असे बोलले जाते की, आपण आरक्षण मागता पण गावामध्ये तुमची जी पत आहे ती यामुळे आहे की, तुम्ही एका अर्थाने कोणाला तरी देण्याच्या स्थितीमध्ये आहात. त्या त्या गावातील जो ओबीसी आहे, जो दलित आहे तो घेण्याच्या स्थितीमध्ये आहे आणि तुम्ही देण्याच्या स्थितीमध्ये आहात. मला असे वाटते की, ही बढाई पुरे झाली. त्या बढाईने पोट भरणार नाही. त्यामुळे कोण देणारा आहे आणि कोण घेणारा आहे यापेक्षा ज्याची आर्थिक स्थिती वाईट आहे त्याला आरक्षण मिळाले पाहिजे या मुद्याचा आपण सगळ्यांनी आग्रह धरावा तसेच इबीसीच्या सवलतीची मर्यादा सुध्दा वाढविली पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

त्याची नीट अंमलबजावणी झाली पाहिजे. शिक्षणामध्ये व नोकऱ्यांमध्ये आरक्षण आर्थिक निकषानुसार मिळाले पाहिजे अशी आग्रहाची मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी नियम 97 अन्वये एका चांगल्या विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांच्यावर मध्यंतरीच्या काळात टीका सुध्दा झाली होती. ते एका विशिष्ट समाजासाठी, फक्त मराठी समाजासाठी आरक्षणाची मागणी करतात असे बोलले जात होते. परंतु आज त्यांनी विशाल भावनेतून ही चर्चा उपस्थित केलेली आहे. आर्थिकदृष्टया सर्व दुर्बल घटकांसाठी आरक्षण देण्याची त्यांनी मागणी केली आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, मराठा, वाणी, मारवाडी, गुजराथी, ख्रिश्चन, मुसलमान या समाजात जे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत त्यांना आरक्षण द्यावे. पण आर्थिकदृष्ट्या दुर्बल कोण आहेत याची व्याख्या ठरविणे कठीण आहे. केंद्र शासनाने असे जाहीर केले आहे की, ज्याचे दिवसाचे उत्पन्न 26 रुपये आहे तो आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकामध्ये येतो. परंतु ज्या सर्वसामान्य माणसाचे उत्पन्न 1 लाखापेक्षा कमी असेल त्यांना आरक्षण व सवलती देण्याची भूमिका राज्य शासनाने घेतली आहे ती केंद्र सरकारपेक्षाही चांगली वाटत आहे. गरिबी हा सर्वात मोठा रोग आहे. या रोगाला आरक्षण व सवलत ही दोन औषधे आहेत. 2000 ते 2005 पर्यंत आरक्षण घटनात्मक आहे काय, देता येईल काय याबाबत चर्चा चालू होती.

माझ्यासमोर दोन केसेस आहेत. त्यात 2006 मधील एम.नागराज ॲण्ड अदर्स वर्सेस युनियन ऑफ इंडिया ही पहिली केस आहे. 2008 मधील अशोककुमार ठाकूर वर्सेस युनियन ऑफ इंडिया ही दुसरी केस आहे. या केसेसचा निकाल पाहिल्यानंतर घटनेत बदल करण्याची आवश्यकता नाही. ज्या राज्य सरकारांना 50 टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आरक्षण द्यावयाचे असेल तर ते देता येईल. त्यावेळच्या केसच्या निकालामध्ये 93 व्या घटनादुरुस्तीचा रेफरन्स घेऊन असे म्हटले आहे की, " Constitution Act 2005-Reservation exceeding 50% could be made only on the basis of quantifiable data before the Government. However, it appears that till today the exercise has not been undertaken and the State Government has not collected quantifiable data." किमान राज्य शासनाने सर्वंकष व अद्ययावत माहिती एकत्र केली पाहिजे. या कामाला शासनाने सुरुवात केली पाहिजे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी...

सन्माननीय सदस्यांनी अशी माहिती दिली की, आरक्षणाच्या बाबतीत तामीळनाडू राज्य सर्वात पुढे आहे. ही वस्तुस्थिती आहे. तामीळनाडूमध्ये 69 टक्के, कर्नाटकमध्ये 66 टक्के व केरळमध्ये 62 टक्के आरक्षण लागू आहे. आपल्या राज्यामध्ये जे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत ते कोणत्याही समाजाचे असोत त्यांना आरक्षण द्यावे अशी सन्माननीय सदस्य श्री.मेटे यांनी केलेली मागणी अतिशय रास्त आहे हे मी शासनाला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, दारिद्रय रेषा हा परवलीचा शब्द झाला आहे. रामायणामध्ये लक्ष्मण रेषा होती. आता दारिद्रय रेषेच्यावर आणि दारिद्रय रेषेच्या खाली म्हणजे ए.पी.एल. आणि बी.पी.एल. हे दोन महत्वाचे शब्द झालेले आहेत. सामाजिक न्याय देण्यासाठी त्याची सुरुवात झाली आहे. सन्माननीय उच्च तंत्र शिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे हे सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी एक चांगला निर्णय घेतला आहे. ज्या खाजगी संस्था आहेत तेथे गरिबांसाठी 25 टक्के आरक्षण लागू करण्यात येणार आहे. मी याबाबतच्या क्लिपिंग पाहत असताना भारतीय जनता पक्षाने भोपाळच्या अधिवेशनामध्ये सवर्णांमधील जे गरीब आहेत त्यांना आरक्षण देण्याचा विचार केला होता. राजस्थान सरकारने आर्थिकदृष्ट्या दर्बल घटकांसाठी 14 टक्के आरक्षण देण्यासंबंधी विचार केला आहे. आमच्या पक्षाचे नेते आदरणीय श्री.शरद पवार यांनी असे सांगितले आहे की, घटनेमध्ये बदल करण्याची गरज आहे. जे गरीब आहेत त्यांना आरक्षण दिले पाहिजे असे त्यांनी 2003 साली म्हटलेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

जे गरीब आहेत त्यांना आरक्षण दिले पाहिजे. मी शासनाला विनंती करतो की, 49 टक्क्याच्या पुढे जाऊन सवर्णामधील जे गरीब आहेत त्यांना विविध माध्यमातून आरक्ष्ण देण्याचा विचार करावा आणि त्यांना न्याय द्यावा.

सभापती महोदय, ग्लोबलायझेशन आणि लिब्रलायझेशमुळे आरक्षणाचे फायदे कमी होत आहेत. सरकारी कारखाने वाढत नाहीत. खाजगी कारखाने वाढत आहेत. तेव्हा पब्लिक लिमिटेड, प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यामध्ये आरक्षण देता येईल का हे पहाण्याची गरज आहे. हा वादग्रस्त आणि कठीण प्रश्न असला तरी आपण त्यादृष्टीने विचार केला पाहिजे. ग्लोबलायझेशन आणि लिब्रलायझेशनचा फायदा फक्त विकसित देशांना झाला. त्याचा लाभ विकसनशील देशांना होण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांच्या ठरावाला पाठिंबा देत असताना सवर्णातील जे गरीब आहेत त्यांना न्याय देण्याची भूमिका राज्य सरकारने घ्यावी अशी माझी भूमिका मांडून मी माझे भाषण संपवितो.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मला आता जो एसएमएस आलेला आहे तो मी सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखवितो. "Crime Branch claims to have solved Mannapuram Gold theft case. Recovers 18 Kg Gold and cash. Insiders are involved."

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी: खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षण मिळण्याची होत असलेली मागणी

मु.शी. खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षण मिळण्याची होत असलेली मागणी या विषयावर श्री.विनायक मेटे,श्रीमती शोभा फडणवीस,श्री.सुभाष चव्हाण, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री हेमंत टकले, चंद्रकांत पाटील,एस.क्यू.जमा, डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

(चर्चा पुढे सुरु...)

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये एकूण 52 टक्के आरक्षण आदिवासी, मागासवर्गीय आणि इतर मागासवर्गीय तसेच भटके व विमुक्त यांना शैक्षणिक, आर्थिक व राजकीय आणि नोकरी यामध्ये देत असताना 48 टक्क्यांपैकी काही टक्के आरक्षण हे खुल्यावर्गातील आर्थिकदृष्टया सर्व दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक व नोकरीमध्ये असावे यासंबंधी अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. मी सांगू इच्छिते की, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे आणि मराठा महासंघाचे अनेक कार्यकर्ते यांनी या संदर्भात आमच्या पक्षाच्या नेत्यांची भेट घेतली, त्यांच्याशी चर्चा केली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणा-यांना आरक्षण देण्याचा हा विषय आहे. एक राजकीय अपरिहार्यता म्हणून आरक्षण हा विषय गेल्या 15 वर्षात ऐरणीवर आलेला आहे. ज्यावेळी मंडल आयोग आला त्यावेळी संपूर्ण भारतभर आर्थिकदृष्ट्या सर्वेक्षण करुन काही जातींचा समावेश मंडल आयोगामध्ये करण्यात आला. अनेक समाजातील घटकांना ज्यांना जातीच्या आधारावर आरक्षण मिळालेले नाही त्यांचा विकास विषम पध्दतीने झालेला दिसत आहे. काही समाजातील घटक हे वर्षानुवर्षे प्रगतीपासून वंचित राहिलेले आहेत. या विषयाच्या बाबतीत सहानुभूतीने आणि राजकीय

डॉ. नीलम गो-हे....

इच्छाशक्तीने तोडगा काढला पाहिजे असे मला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी आमच्या पक्षाची भूमिका मांडताना सर्व प्रकारच्या आरक्षणाला विरोध केलेला आहे. मागासवर्गीय समाजाला, दलित समाजाला, महिला वर्गाला कोणती संधी मिळू नये असा त्याचा अर्थ नाही. राजकीय आरक्षणामध्ये ओबीसी समाजाला कोणतेही आरक्षण नाही. लोकसभेचे माजी अध्यक्ष श्री. पी.ए.संगमा यांचे एक वाक्य आहे. ते म्हणतात, आरक्षणाचा विषय कुठे येतो, तर केवळ समान संधी आणि गुणवत्ता यापुरते आरक्षण मर्यादित नाही, पण गुणवत्ता असून सुध्दा एखाद्याला डावलले जाते त्यावेळी आरक्षणाचा विषय पुढे येतो.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि म्हणून मला वाटते की, समाजातल्या ज्या घटकांना आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीमध्ये त्यांच्यात गुणवत्ता असून सुध्दा संधी नाकारली जाते त्यांना संधी मिळाली पाहिजे. आज विविध जातींच्या आरक्षणामुळे आमचा समाज यादवीकडे आणि फुटिरतेकडे निघाला आहे की काय अशा पध्दतीने प्रत्येक गावा गावांमध्ये, शहरा शहरांमध्ये एक वेगळया प्रकारचे जाती युध्द, त्यातून जातीय विद्वेश आणि मनातल्या मनात जातीय दुरावा सातत्याने दिसतो आहे, त्याचे प्रातिनिधिक उदाहरण मराठा विरुध्द कुणबी हे आहे. या संपूर्ण वादाकडे मी सभागृहाचे लक्ष वेधणार आहे.

महोदय, कुणबी समाजातील जे घटक आहेत ते अतिशय निराश आणि दु:खी आहेत. वर्षानुवर्षे ज्यांना ओ.बी.सी.असल्यामुळे संधी नाकारली गेली. या वेळी जात पडताळणीमध्ये तशा अर्थाने पारंपारिक दृष्टया जे ओ.बी.सी.नाहीत, अशा लोकांनी जातीची प्रमाणपत्रे मिळविली हा एक फार मोठा संशोधनाचा विषय होईल. खऱ्या अर्थाने जन्मत: ज्यांना ओ.बी.सी.म्हणून मानले गेले. ज्या समाजाला महात्मा ज्योतीबा फुले यांनी खास करुन क्षुद्र ते क्षुद्र असे ज्यांचे वर्णन केलेले आहे. त्या साध्या निकषांमध्ये बसणाऱ्या जाती जमातीच्या लोकांना किती आरक्षण ओ.बी.सी. म्हणून मिळाले. त्या विषयी आपण चर्चा करावयास लागलो तर त्याचे गांभीर्य आपल्याला स्पष्ट होईल असे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते. याच्यामध्ये मराठा समाजाच्या संदर्भात सातत्याने उल्लेख होतो आहे. अनेक घटकाच्या लोकांना शेतीमधून, उद्योगामधून न्याय मिळत नाही.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी उद्योगामधील आरक्षणाचे काय याबाबत मुद्दा मांडला आहे. मला एक मुद्दा मांडावयाचा आहे की, मराठा असो, ओ.बी.सी. असो, अनुसूचित जाती, जमाती लोक असो. महाराष्ट्रातील उद्योगामध्ये मराठी भूमिपुत्राना आणि भूमिकन्यांना किती आरक्षण ठेवणार आहात, याच्याबद्दल जोपर्यन्त आपण मूलभूत निर्णय घेणार नाही, तो पर्यंत सर्व उद्योगामध्ये,एन.डी.ए. महाविद्यालयामध्ये ज्यांना मराठी येते, अशी मुले गुणवत्ता असूनही डावलली गेलेली दिसून येतात. याला कारण असे आहे की, यासंदर्भात कोणतेही बंधन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

आणलेले नाही. या प्रश्नाच्या बाबतीत सर्व संमतीने तोडगा काढला पाहिजे की, ज्याच्यामध्ये आर्थिकदृष्टया मागासलेल्या सर्व जाती जमातीतील घटकाना कशा पध्दतीने विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेतले जाईल यासंदर्भात निर्णय घेतला पाहिजे असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे मनोगत पूर्ण करते. धन्यवाद.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोबाईलवरील संदेशाबाबत

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक मॅसेज आलेला आहे, तो मॅसेज मी या ठिकाणी वाचून दाखवितो."Mannapuram Gold theft case is detected. The looters of the rich restricted and the looters of the poor respected."

डॉ.नीलम गोऱ्हे : मला दुसऱ्या एका विषयाचा मॅसेज आला आहे. तो मॅसेज काय आहे ते मी सभागृहाला सांगू इछिते. श्री.अनंत कान्हेरे, श्री. कर्वे आणि श्री. देशपांडे यांनी नाशिक येथे जॅक्सनला मारले म्हणून त्यांना ठाण्यामध्ये फाशी दिली होती.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी आपले भाषण सुरु करावे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी: खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षण मिळण्याची होत असलेली मागणी.

मु.शी. खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षण मिळण्याची होत असलेली मागणी या विषयावर श्री.विनायक मेटे,श्रीमती शोभा फडणवीस,श्री.सुभाष चव्हाण, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री हेमंत टकले, चंद्रकांत पाटील,एस.क्यू.जमा, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु...

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, राजकीय परिअर्हता आणि सामाजिक अपरिअर्हता या विषयावर या ठिकाणी चर्चा झाली. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओ.बी.सी. आणि इतर सर्व यांच्या आरक्षणाशिवाय असणाऱ्या खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी 48 टक्क्यांपैकी काही आरक्षण द्यावे अशा प्रकारचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी सभागृहासमोर आणलेला आहे.

महोदय, एक गोष्ट खरी आहे की, खुल्या प्रवर्गात आर्थिकदृष्टया मागासवर्गीय आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओ.बी.सी.चे, विमुक्त व भटक्या जमाती यांच्या आरक्षणाला धक्का न लावता आरक्षण दिले जावे. त्यांच्या या भूमिकेशी मी सुध्दा सहमत आहे. आदरणीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांनी आरक्षणाच्या बाबतीत एक स्टेटमेंट केले होते. घटने प्रमाणे आपल्याला आता 49.05 टक्क्यांच्या पुढे जाता येणार नाही. परंतु 50 टक्क्याच्या पुढचे आरक्षण

आर्थिकदृष्टया मागास घटकांना देण्यासाठीचा प्रस्ताव आला तर त्या प्रस्तावाला आमचा पाठिंबा राहील. जो पर्यंत घटना दुरुस्ती होणार नाही. तो पर्यंत अशा प्रकारचे आरक्षण येणे घटनात्मकदृष्टया अशक्य आहे. या ठिकाणी मला सांगावयाचे आहे की, या ठिकाणी चर्चा झाल्या, नेहमी चर्चा होत असतात, आम्ही आमदार असलो तरी आम्ही मागावर्गीय जातीचे आहोत याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आम्हाला वारंवार जाणीव करुन दिली जाते. जातीयवाद संपलेला आहे यावर माझा विश्वास नाही. आर्थिक सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न झाला, आम्हाला राजकीय आरक्षण मिळाले. परंतु सामाजिकदृष्टया जो सन्मान मिळावयास पाहिजे, तो अजूनही मिळालेला नाही.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

आरक्षणाची सुरुवात ज्या शाहू महाराजांनी केली ते स्वत: सकाळी नदीवर आंघोळीला जात असत. त्यावेळी मंत्र म्हणायचा प्रश्न येत असे. सरदारांकडून पुराणोक्त मंत्र म्हटले जात, वेदोक्त मंत्र म्हटले जात नव्हते. त्यावेळी शाहू महाराजांना सांगण्यात आले की, यावेळी पुराणोक्त मंत्र म्हटले जातात, वेदोक्त मंत्र म्हटले जात नाहीत. शाहू महाराजांनी मंत्र म्हणणाऱ्यांना विचारले की, तुम्ही पुराणोक्त मंत्र म्हणता, वेदोक्त मंत्र का म्हणत नाही? त्यांनी असे उत्तर दिले की, शाहू महाराज तुम्ही शूद्र आहात. शाहू महाराजांना ते शूद्र असल्याचे सांगितले गेले. क्षत्रिय आणि वैश्य उच्चवर्णीय आहेत हेच कोणी मानायला तयार नाही. मग शाहू महाराजांनी आरक्षणाचा विचार केला आणि त्या ठिकाणी मागासवर्गीयांना आरक्षण दिले. ही क्रांतीकारक घटना घडलेली आहे.

सभापती महोदय, त्यावेळची सामाजिक परिस्थिती आणि आजची सामाजिक परिस्थिती यामध्ये निश्चितपणे बदल आहे. आम्हाला राजकीय आर्थिक स्वातंत्र्य मिळाले. आरक्षणामुळे शैक्षणिक फायदा झाला. नोकरीत फायदा झाला. राजकारणात काही अंशी आम्ही आहोत. मी काही अंशी असा शब्द मुद्दाम वापरते. कारण आरक्षण नसते तर किती अंशी आलो असतो मला माहित नाही. माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल या सभागृहाचे सदस्य झाले म्हणजे त्यांच्यासारख्या अल्पसंख्याक समाजाबद्दल प्रेम निर्माण झाले असे होत नाही. या सध्याच्या परिस्थितीत या सगळ्या गोष्टीचे पृथक्करण होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी मागील आठवड्यात एक बातमी वाचली होती. ती बातमी वाचून मला प्रचंड धक्का बसला. लोकमान्य टिळक हे स्वर्गवासी झाले. महात्मा गांधी यांनी त्यांच्या तिरडीस खांदा दिला. त्यावेळी त्यांचे प्रेत म्हणजे त्यांची तिरडी खाली उतरविण्यात आली आणि त्या प्रेताला आंघोळ घालून नंतर प्रेत पुढे नेले गेले. जी माणसे या राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी स्वत:चे आयुष्य घालवितात, त्या महात्मा गांधी आणि लोकमान्य टिळक या राष्ट्रीय नेत्यांबद्दल जे आम्ही वाचले ते खरे असेल तर यासारखी दुर्दैवाची बाब असू शकत नाही.

सभापती महोदय, आजही परिवर्तनाच्या चळवळीची भाषणे केली जातात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शाहू महाराज यांचे नाव घेणे फार सोपे आहे. महात्मा फुले यांचे नाव घेणे सोपे आहे. त्यांच्या नावाने राजकारण करणे सोपे आहे. ज्यांना आरक्षण मिळाले त्यांना दिलेले आरक्षण मानसिकतेने पचविणे सोपे नाही. ते पचविण्याची गरज आहे. आजही पारधी समाजाच्या बायका

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

दगडावर दगड ठेचून लेकराची नाळ तोडतात की नाही? किती दिवस आरक्षण देणार? आरक्षण कायम ठेवता येणार नाही हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनीच सांगितले आहे. ते कधी ना कधी बंद करावेच लागेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक आरक्षणाकडे कधी ना कधी जावे लागेल असे म्हटले होते. कारण असमानता निर्माण झाली तर तो उपाय असू शकतो. ती परिस्थिती अद्याप आलेली नाही. म्हणून आरक्षणाला मुदतवाढ दिली जाते.

सभापती महोदय, मराठवाड्यात भिल्ल समाजाच्या बायका टोळ्याटोळ्याने राहतात. डोंबाऱ्याचा खेळ करणाऱ्या, रेड झोनमध्ये जाणाऱ्या महिलांमध्ये जास्तीत जास्त महिला या भटक्या, विमुक्त समाजाच्या आहेत, ज्यांचा पोट भरण्याचा प्रश्न असतो. ही दरी दूर करण्याचा प्रयत्न आरक्षणामुळे काही प्रमाणात झालेला आहे. आरक्षण हे हत्यार आहे. समाजाच्या परिवर्तनाच्या चळवळीचा एक भाग आहे. आरक्षणाचे आम्ही समर्थन करतो. समाजाने ती मानसिकता निर्माण करावी. आज सवर्ण समाजामध्ये सुध्दा आरक्षणाची मागणी होत आहे. जे शिक्षणापासून वंचित आहेत, विकास प्रक्रियेपासून वंचित राहतात. त्यांच्यासाठी घटना दुरुस्ती करावी. महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे मागणी करण्याबाबत पुढाकार घ्यावा आणि हे आरक्षण सर्वर्णांना सुध्दा द्यावे अशा प्रकारची विनंती करुन माझे भाषण संपविते.

नंतर श्री.खर्चे..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे आणि इतर सदस्यांनी मिळून अतिशय महत्वाचा प्रश्न या अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून सभागृहात चर्चेसाठी आणला, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, 52 टक्के आरक्षणात कोण आणि 48 टक्क्यात कोण, आपल्या राज्याने यासंबंधी कोणता निर्णय घेतला आणि इतर राज्यांमध्ये काय परिस्थिती आहे, तसेच यासाठी जे आयोग नेमले गेले, त्यांचे अहवाल आणि त्यावर झालेल्या सदस्यांच्या नियुक्त्या या सर्व विषयांचा बऱ्यापैकी उहापोह अगोदरच्या सन्माननीय सदस्यांनी केलेला असल्याने मी त्यावर जास्त भाष्य करणार नाही. मला या निमित्ताने एवढेच म्हणावयाचे आहे की, या प्रश्नाचा मागोवा घेताना स्वातंत्र्यपूर्व काळापासून अनेक थोर विभूतींची नावे मोठ्या अभिमानाने आपण घेत असतो. स्वातंत्र्यपूर्व काळात जी एक रचना होती त्यावेळेस राज्यकर्ते मात्र बाहेरचे होते हे विसरुन चालणार नाही. हे राज्यकर्ते संख्येने कमी होते आणि आपला देश मात्र लोकसंख्येने अतिशय मोठा होता, भौगोलिक दृष्ट्या मोठाच होता परंतु अतिशय कमी मनुष्यबळात पारतंत्र्यात असलेल्या या देशाचे साम्राज्य चालविणे आणि वाढविण्यासाठी ज्या काही राजकीय क्लृप्त्या करणे आवश्यक होत्या त्या तर केल्याच पण त्यांनी त्या काळातील समाज रचना करण्याचाही प्रयत्न केला होता. आपणा सर्वांनाच माहीत असेल की ज्यावेळेस सैन्य दलाची स्थापना झाली तेव्हा सैनिकांच्या बटालियन्स तयार करताना एका विशिष्ट समाजाच्याच असायच्या. त्यात महार रेजिमेंट्स, मराठा इन्फन्ट्री अशी ही रचना होती आणि हे त्यांच्या एकोप्यासाठीच करण्यात आले होते. या देशातील सर्व लोक स्वत:च्या जातीभोवती व धर्माच्या भोवती इतके गुंफलेले आहेत की ते एकत्रपणे एका ठिकाणी ठेवता आले व त्यांना काही देऊ केले तर ती शक्ती हे साम्राज्य टिकविण्यासाठी निश्चित उपयोगी पडेल असाच यामागील दृष्टीकोन होता.

महोदय, स्वातंत्र्य चळवळ सुरु झाली त्यावेळचा एक प्रसिध्द वाद म्हणजे आगरकर विरुध्द टिळक असा होता. त्यावेळी दूरदृष्टीचे समाजसुधारक आग्रहाने मांडत होते की जितकी सामाजिक सुधारणा अगोदर करता येईल ती करुन स्वातंत्र्य तर मिळालेच पाहिजे पण त्याच्या लढ्यात सामाजिक समतेची लढाई कुठेतरी हरवून बसल्यानंतर स्वातंत्र्याला प्राधान्य देणे हे अत्यंत आवश्यक होते. पण ज्यावेळेस स्वातंत्र्य मिळाले आणि कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.....

त्यात या सर्व व्यवस्थेबाबत पत्रकारांनी त्यांना विचारले होते तेव्हा त्यांनी सांगितले होते की, एखादा लहान मुलगा बाहेर आल्यानंतर त्याला बागेत एक आंब्याचे झाड दिसते. त्या झाडाचा आंबा त्याला हवा असतो. त्यासाठी तो एक दगड मारतो, त्या दगडाने एकच आंबा नव्हे तर दोन आंबे खाली पडतात. त्याप्रमाणे स्वातंत्र्यानंतर केवळ स्वातंत्र्यच नव्हे तर त्याबरोबर लोकशाही सुध्दा मिळाली आणि ती चालविण्यास आम्ही समर्थ आहोत काय याचाही विचार करणे आवश्यक आहे. आपणच ज्यावेळी राज्यकर्ते असतो तेव्हा आपल्या मनातील आणि आवश्यक असलेली कल्याणकारी समाज रचना आपल्याला करावयाची आहे की नाही हा प्रश्न निर्माण होतो.

लोकशाही आली की, निवडणुका आल्या, राजकारण आले, मतांचे गठ्ठे आले, मतांची संख्या आली, त्यात कोणाचे तरी लांगुलचालन करुन एक गठ्ठा मते मिळविण्याच्या दृष्टीने थोड्या थोड्या प्रमाणात कुठे कुठे वाटा टाकायचा अशा प्रकारची रचना, राजकारण असेही प्रश्न निर्माण होतात. अशी रचना केल्यामुळे "नाहीरे" वर्गातील लोकांना "आहेरे" वर्गातील लोकांच्या बरोबर बसण्याची संधी द्यावयाची आणि आम्ही समाजासाठी खूप काही करतो अशा प्रकारचा बनाव निर्माण करावयाचा अशी विषम समाजरचना होताना दिसत आहे. या विषमतेवर मात करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन अनेक कल्याणकारी योजनाही राबवित असते. त्यात प्रामुख्याने सर्व 6 ते 14 वयोगटातील मुलांना शिक्षणाचा हक्क हा मूलभूत गाभा आहे. त्या माध्यमातून गरिबांना कोणत्याही शाळेत जाण्यासाठी 25 टक्के आरक्षण दिले. तो शिक्षणापासून वंचित राहणार नाही म्हणून आपण नेहमी प्रयत्न करतो. एकीकडे हे सर्व नवीन कायदे तयार करतो, दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी स्वस्त धान्य पुरवठा करणे, 100 दिवस रोजगार मिळेल अशा योजना तयार करणे या सर्व योजनांची अंमलबजावणी होताना समाजातील आर्थिकदृष्ट्या मागे पडत चाललेल्या वर्गाचाही विचार केला पाहिजे. शिक्षणाची आणि नोकरीची संधी मिळाली नाही तर लोक आणखी मागे जातील आणि ज्यांना अशी संधी मिळते ते आणखी पुढे पुढेच राहतील. त्याचा परिणाम म्हणून असे वाद व संघर्ष असे टोकाला पोहचतील की त्यातून क्रांति झाल्याशिवाय राहणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ...

यासाठी लढणाऱ्या ज्या संघटना असतात त्यांच्याकडे पूर्वग्रह दूषितपणे न बघता त्यांचा जो समाज विचार आहे, त्या विचाराला महत्व दिले पाहिजे. ते कोणासाठी भांडत आहेत ? ते स्वत:साठी भांडत नाही तर ते समाजातील आर्थिक, दुर्बल लोकांसाठी भांडत आहे व हाच याचा गाभा आहे. त्यामुळे ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे. या देशाची समाज रचना एका नव्या पध्दतीने करावयाची असेल व तांत्रिक युगामध्ये मागे पडत चाललेल्या वर्गाला आपल्या बरोबर घेऊन जायचे असेल तर त्या आरक्षणाचा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे. राज्यकर्त्यांची इच्छा शक्ती असेल तर नियम, कायदे, सुप्रीम कोर्ट, केंद्र सरकार असे काहीही असले तरी आपण आपल्या राज्यातील नागरिकांचे भले करण्यासाठी थोडीशी पायवाट सोडनू काही निर्णय घ्यावे लागले तर ते आव्हान राज्य सरकारने स्वीकारले पाहिजे व त्या पध्दतीचे निर्णय घेऊन समाजाला दाखवून दिले पाहिजे की, या संघटीत समाजाला प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी जे जे आवश्यक आहे ते ते करण्याची आमची तयारी आहे व त्या दृष्टीने या प्रस्तावाचा विचार करावा अशी विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन माझे विचार पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, डॉ. टिळक म्हणजे मा. जयंतराव टिळकांचे सुपूत्र व लोकमान्य टिळकांचे नातू यांच्याशी मी आताच दूरध्वनीवरुन संपर्क साधला. आपल्याकडे स्मशानामध्ये मृतदेहाला आंघोळ घालण्याची परंपरा आहे. महात्मा गांधीनी खांदा दिला होता म्हणून रस्त्यात अंत्यात्रा थांबवून लोकमान्य टिळकांना आंघोळ घालण्यात आली असे उद्‌गार सन्माननीय सदस्यांनी येथे काढले आहेत. परंतु तसा काही प्रकार झाला नव्हता असे त्यांच्या कुटुंबीयांनीच आता मला सांगितले आहे त्यामुळे रेकॉर्डवर चुकीचे राहू नये यासाठी मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी नियम 97 अन्वये जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. आरक्षणाच्या संदर्भात चर्चा उपस्थित करण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. मेटे साहेबांनी पुढाकार घेतल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. आरक्षणाची मागणी जाती धर्माच्या पलीकडील आहे. आरक्षणाची मागणी आता राष्ट्रीय मागणी झालेली आहे त्यामुळे या आरक्षणाला कोणाचा विरोध असण्याचे काहीही कारण नाही. आपण म्हणाला की, मी आरक्षणाच्या संदर्भात बोलतो म्हणून आम्हाला जातीयवादी ठरवले जाते परंतु तसे काहीही नाही. इतर मागासवर्गीयांच्या प्रश्नाचे अभ्यासक आमचे नेते मा.गोपीनाथ मुंडे साहेबांनी देखील या आरक्षणाला पाठिंबा दिलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात विरोध असा कोणाचाच राहिलेला नाही. मी मा. मुंडे साहेबांचा प्रतिनिधी म्हणून आरक्षणाच्या मागणीला या ठिकाणी पाठींबा देत आहे. अल्पसंख्यांक प्रश्नाचे अभ्यासक श्री. पी.ए.इनामदार यांनी सुध्दा अल्पसंख्याकांच्या आरक्षणाच्या संदर्भात शब्द वापरले आहेत की, "आरक्षणाला राजकारण्यांची गरज नाही."

सभापती महोदय, या ठिकाणी मी केवळ दोन तीन महत्वाचे मुद्दे मांडणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले आहे की, आता सरकारी नोकऱ्या संपल्या असून आता खाजगी नोकऱ्या सुरु झालेल्या आहेत. त्यामुळे खाजगी नोकऱ्यांमध्ये आरक्षण कसे काय देणार ?

सभापती महोदय, तुमच्या शेतात जे 25 मजूर काम करतात त्यामध्ये या जातीचे-2, त्या जातीचे-2 घ्या या बाबत कोणी अर्ज केला आहे काय ? शेतीमध्ये काहीच मिळत नाही त्यामुळे शेतीच्या नोकऱ्यामध्ये कोणीच आरक्षण मागत नाही. शेतीमध्ये श्रम जास्त व पैसे कमी आहेत त्यामुळे शेतीमध्ये कोणी आरक्षण मागत नाही. ज्या ठिकाणी कष्ट कमी आहे व फायदा जास्त आहे अशाच ठिकाणी अर्ज केले जातात. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी असे विचार व्यक्त केले आहेत की, महाराष्ट्रात सगळयात जास्त आत्महत्या या शेतीशी निगडीत असलेल्या मराठा समाजामध्येच झालेल्या आहेत. यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की, खरे म्हणजे शेतीमधीलच हे दारिद्रय आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 5 मिनिटांकरिता वाढविण्यात येत आहे.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, मी या ठिकाणी एक गोष्ट सांगू इच्छितो की, आंध्र प्रदेशामधील एका मुस्लिम समाजातील शेतकरी कुटुंबाने आत्महत्त्या केली आहे. एका कुटुंबातील कुटुंब प्रमुख असलेल्या महिलेने शेतीमधील दारिद्रयाला कंटाळून आत्महत्त्या केली आहे. हा सर्व खे्ळ आहे. आपण सर्वजण म्हणत आहात की, ही अराजकतेकडे घेऊन जाणारी परिस्थिती निर्माण झाली आहे. सर्वात मोठा असलेला वर्ग गावामध्ये रहातो तो जो धंदा करतो त्या धंद्यामध्ये तोटा असल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे सद्या असलेली ही परिस्थिती आपल्याला बदलता येणे शक्य नाही त्यावर जर आपल्याला मलमपट्टी करावयाची असेल तर आरक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही. माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी सांगितल्याप्रमाणे खेडयातील मुलांना तांत्रिक शिक्षणामध्ये जर शिष्यवृत्ती मिळाली तर हा असंतोष थोडाफार कमी होऊ शकतो. मी पुन्हा एकदा माननीय सदस्य श्री. विनायक मेटे साहेबांना शुभेच्छा देतो. ज्या सरकारामध्ये आपण बसलेले आहात त्या सरकारला आपण पटवून दिले तर हा महाराष्ट्र आपल्याला विरोध करणार नाही एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या ठिकाणी एका अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणण्यात आली आहे. ही चर्चा होत असतांना आर्थिक दृष्टया दुर्बल असलेल्या घटकांना म्हणजेच ओपन कॅटॅगरीतील लोकांना आरक्षण देण्यासंबंधीचा प्रस्ताव माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी मांडला आहे.

आरक्षण हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. या आरक्षणाला या ठिकाणी बसलेल्या कोणत्याही माननीय सदस्यांचा विरोध असेल असे मला वाटत नाही. फक्त प्रत्येक मागासलेल्या असेल ओबीसी असेल अनुसूचित जातीचा असेल त्यांचे 52 टक्के जे आरक्षण आहे त्या आरक्षणाला कोणताही धक्का न लावता आर्थिकदृष्टया मागासलेल्या लोकांना आरक्षण देण्यात यावे अशा मताची मी आहे. आपण नेहमी शाहू,फुले व आंबेडकर यांचे उदाहरण देतो. निश्चितच त्यांनी या मागासवर्गीय समाजाला शैक्षणिक, राजकीय, आर्थिक प्रवाहामध्ये आणले. या वेगवेगळया क्षेत्रात समाजाला आरक्षण मिळाल्यामुळे मी आज तुमच्यापुढे उभी आहे. 1200 एकर जमीन असलेल्या घरामधून तोंडामध्ये सोन्याचा चमचा घेऊन मी जन्माला आले. मला राजकारणामध्ये सहभागी व्हावयाचे होते जर मला ओबीसी समाजासाठी असलेले आरक्षण मिळाले नसते तर मी नगरसेवक, महापौर झाले नसते किंवा या सभागृहामध्ये मुळीच आले नसते. या ठिकाणी 60 वर्षे झाल्याचे सांगितले गेले. पंरतु मला आपल्याला सांगितले पाहिजे की, राजकारणामध्ये सुध्दा हे आरक्षण असलेच पाहिजे. आम्ही ठराविक जातीचे लोक असल्यामुळे आम्हाला आजपर्यन्त डावलले जात होते. आरक्षण लागू झ ाल्यामुळे आम्ही मंडळी या सभागृहामध्ये आलो असून आता मोठया प्रमाणावर समाजामध्ये समानता येऊ लागली असली तरी ती संपूर्णपणे आली आहे असे मी म्हणणार नाही....

(वेळ संपल्याची घंटा वाजविण्यात येते)

सभापती महोदय, माझे मुद्दे अजून संपलेले नाहीत, मला अजून बोलावयाचे आहे...

तालिका सभापती : माननीय सदस्यांनी त्यांचे भाषण पुढे सुरु ठेवावे...

श्री. विनायक मेटे : सभापती महादय, महत्वाचा विषय असल्यामुळे अनेक माननीय सदस्यांना या प्रस्तावावर अजून बोलावयाचे आहे. माझी आपणास विनंती आहे की, माननीय सदस्यांचे भाषण ऑन लेग ठेवून प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आपण मंत्री महोदयांचे उत्तराचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे....

भाषण संपेपर्यन्त ही चर्चा पुढे सुरु करावी किंवा प्रश्नोत्तराचा तास अर्धा तास पुढे ढकलून ही चर्चा संपविण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती : माझ्याकडे नावे दिलेल्या यादीनुसार माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात आली आहे. आणखी एक-दोन माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली जाईल. त्या करिता सभागृहाच्या कामकाजाची वेळ 12 वाजेपर्यन्त वाढविण्यात येत आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, माननीय सदस्यांना विवक्षित जागा ठरवून देण्यात आलेली आहे. त्या जागेवरुन त्यांनी वक्तव्य करावे अशी आपली अपेक्षा असते. परंतु माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे साहेबांनी दुसऱ्या जागेवरुन वक्तव्य केले आहे त्या विषयी आपण आपला निर्णय द्यावा.

(यानंतर श्री. भारवि)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दीप्ती चवधरी : सभापती महोदय, येथे जनगणना झाली पाहिजे असा मुद्दा अनेकांनी मांडला. मी केंद्र सरकारचे अभिनंदन करते की, त्यांनी ओबीसींची जनगणना करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशी जनगणना प्रत्येक समाजाची झाली पाहिजे. त्यातून आर्थिकदृष्ट्या कुठला समाज कुठे आहे हे सत्य बाहेर येईल. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाला कोणतीही जात-पात असता कामा नये. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या प्रत्येक माणसाला आरक्षणाचा लाभ मिळाला पाहिजे. या मताची मी आहे. आरक्षणाचा आढावा घ्यावा असे प्रत्येकाचे मत आहे. अजून त्या गोष्टीपर्यंत आपण आलेलो नाही. ज्यांना ज्यांना आरक्षण दिले आहे ते लोक आर्थिकदृष्ट्या सशक्त झाले आहेत, असे कुठेही चित्र नाही. उलट विदारक असे चित्र आहे. अजूनही लोक मागासलेले आहेत. तसेच काही लोक आर्थिकदृष्ट्या देखील मागासलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरक्षण द्यावे असा मुद्दा मांडलेला आहे. 52 टक्के आरक्षणाला कुठलाही धक्का न लावता आरक्षण देणार असाल तर आमचा त्याला कोणताही विरोध नाही. आमचा या आरक्षणाला पाठींबा आहे. धन्यवाद.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांनी जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे ती अत्यंत महत्त्वाची आहे. या विषयावरील सगळे मुद्दे सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी मांडलेले असल्यामुळे मी फक्त काही मागण्या करणार आहे.

मराठा समाजाला आरक्षण द्यावे या मताचा मी आहे. त्याच वेळेस आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांना मग ते कोणत्याही समाजातील, जातीतील असो त्यांना आरक्षण दिले पाहिजे. 19 फेब्रुवारी रोजी शिवनेरी गडावर सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती की, मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय अंतिम टप्प्यात आहे. त्याचे पुढे काय झाले ? ही घोषणा प्रत्यक्षात कधी येणार आहे?

मागे आमच्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांनी सांगितले होते की, इबीसीची सवलत मर्यादा एक लाखावरून पाच लाखापर्यंत करण्यात येणार आहे. सदर बाब विचाराधीन आहे असे देखील त्यांनी सांगितले होते. तेव्हा यासंबंधी देखील त्यांनी लवकर निर्णय करावा. राज्यातील शैक्षणिक नेतृत्त्व मराठवाड्याकडे आले आहे. उच्च शिक्षण मंत्री, शालेय शिक्षण मंत्री व दोन्ही विभागांचे राज्यमंत्री हे मराठवाड्यातील आहेत याचा आम्हाला अभिमान आहे. एका तज्ज्ञाने सुसंस्कृत राज्याची व्याख्या केली आहे. ज्या राज्यात संरक्षणापेक्षा शिक्षणावर जास्त खर्च होतो ते सुस्कृंत राष्ट्र म्हणून ओळखले जाते. आपल्याकडे शिक्षणावर 2-3 टक्के खर्च होतो आणि संरक्षणावर 10 ते 15 टक्के खर्च होतो.

आज सर्व राज्ये त्यांच्या अधिकारामध्ये आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांना आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेत आहेत. त्यासंबंधातील आकडेवारी आताच सर्व माननीय सदस्यांनी दिलेली आहे. त्यामुळे मी त्याची पुनरावृत्ती करीत नाही. माननीय सदस्य श्री.मेटे यांनी उदाहरण दिले आहे की, आरक्षण देऊ नये या मताचे जे तज्ज्ञ असतात अशा तज्ज्ञांची महाराष्ट्र शासन नेमणूक करते. आज त्यांनी श्री.हरि नरके यांचे उदाहरण दिले. ते अत्यंत विद्वान आहेत. ते सर्व समाजाचे आहेत. परंतु एका डबक्यात कोंडून घेतल्या सारखे ते बोलतात, असे ऐकिवात आहे. हे मी एक-दोन ठिकाणी ऐकलेले आहे.

श्री.दीप्ती चवधरी : सभापती महोदय, या वाक्याला माझी हरकत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मी माझे शब्द मागे घेतो. बदल्यांच्या धोरणासंबंधी तसेच अपॉईंटमेंट बाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी आपले मत व्यक्त केले आहे. सरकारी नोकर हा त्या त्या जिल्ह्यात नोकरीला लागतो. भले तो आरक्षणामध्ये लागत असेल किंवा ओपनमधून लागत असेल. बदल्या मागताना त्यांचा ओढा मुंबई-पुण्याकडे जास्त असतो. त्यामुळे विदर्भातील माणूस विदर्भातच राहिला पाहिजे. नंतर तो पुण्या-मुंबईमध्ये जाता कामा नये अशी तरतूद करावी, अशी मी विनंती करतो व सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांनी अल्पकालीन चर्चेन्वये जी मागणी केली आहे तिला मी पाठिंबा देतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

.....

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्याला धन्यवाद देतो. खरे म्हणजे हा खूप मोठा विषय आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.विनायकराव मेटे यांनी जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे, त्यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या वर्गाला आरक्षण देण्याविषयीचा मुद्दा आहे.याबाबतीत सर्वांचे आणि माझे देखील असे मत आहे की, समाजामध्ये 52 टक्के आरक्षण आहे. मग ते आदिवासी असतील किंवा मागासवर्गीय असतील तर त्यांचे आरक्षण कायम राहिले पाहिजे आणि मग यामध्ये घटनात्मक बदल करुन आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना देखील आरक्षण देण्याच्या बाबतीत निश्चितपणे विचार झाला पाहिजे. परंतु मला याबाबतीत काही मूलभूत प्रश्न मांडावयाचे आहेत.

सभापती महोदय, हजारो वर्षापासून आपल्या समाजामध्ये जी जाती व्यवस्था आहे त्यामुळे जी माणसे सर्व प्रकारच्या प्रगतीपासून दूर राहिलेली आहेत त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी, त्यांना विविध प्रकारच्या संधी उपलब्ध होण्यासाठी शाहू महाराजांनी 1902 साली आरक्षण सुरु केले.परंतु आज या आरक्षणाच्या बाबतीत वेगवेगळ्या चर्चा होतात. त्यामध्ये समाजातील किंवा विशेषत:राजकारणातील असे काही लोक आहेत की, जे व्यासपीठावर वेगळे बोलतात आणि समाजा मध्ये जाऊन वेगळी चर्चा करतात. विशेषत: मागासवर्गीयांच्या आरक्षणाबद्दल चर्चा करताना काही राज्यकर्ते त्यांच्या मनामध्ये चुकीच्या गोष्टी भरविण्याचे काम करीत असतात. मी या ठिकाणी तरुण वर्गाच्या मनातील विद्रोहाबद्दल बोलत आहे. 1947 मध्ये आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले, एक राष्ट्र निर्माण झाले अशा वेळी आपल्या सर्वांच्या मनामध्ये ही भावना असली पाहिजे की, आपल्या समाजातील एक घटक अतिशय दुर्बल आहे.आजही आपण मागासवर्गीय वस्तीमध्ये किंवा आदिवासी वस्तीमध्ये जाऊन पाहिले किंवा अल्पसंख्यांकांची अवस्था पाहिली तर आपल्याला हे जाणवते की, ते लोक प्रगतीपासून खूप दूर आहेत. त्या लोकांना सर्वांच्या बरोबर आणण्यासाठी आरक्षण असले पाहिजे.याठिकाणी सातत्याने उल्लेख केला जातो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 10 वर्षे आरक्षण ठेवण्यात यावे असे सांगितले आहे. मला असे वाटते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अशा प्रकारे 10 वर्षाची मुदत घालून दिलेली नाही. पण माझे असे मत आहे की, आपण जो पर्यंत या देशामध्ये समता प्रस्थापित करु शकत नाही तोपर्यंत या देशामध्ये आरक्षण राहिले पाहिजे.

सभापती महोदय, आता खरे म्हणजे ग्लोबलायझेशन झालेले आहे.याबाबतीत आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी साहेबांनी सांगितले की,आता सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण खूप कमी झाले आहे. जेव्हा आपण शिक्षणाच्या माध्यमातून सर्व वर्गाचे सबलीकरण केले तर आरक्षणाचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे . . ..

मुद्दा समाजाच्या दृष्टीकोनातून निश्चितपणे कमी महत्वाचा होईल असे मला वाटते. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे साहेबांनी उपस्थित केलेल्या चर्चेला समर्थन देत असताना जे मागासवर्गीय आहेत,जे आदिवासी आहे, जे भटक्या विमुक्त जातीचे आहेत त्यांचे आरक्षण कायम ठेऊन, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना आरक्षण दिले पाहिजे. विशेषत: मराठा समाजाच्या बाबतीत सुध्दा सांगितले पाहिजे की, महात्मा ज्योतिराव फुले यांनी त्यांचा कुणबी असा उल्लेख केला आहे, मराठा हे खऱ्या अर्थाने प्रादेशिक नाव आहे, ते काही जातीचे नाव नाही. खऱ्या अर्थाने कुणबी ही जात आहे. जे शेती करणारे आहेत, कुणबी आहेत. त्यांची अवस्था आजही अत्यंत वाईट आहे. त्यांना सुध्दा आरक्षण मिळाले पाहिजे आणि तशा प्रकारचे आरक्षण आहे.अशा वेळी या लोकांना कुणबी या जातीचे सर्टीफीकेट मिळण्याच्या बाबतीत सुलभता आणली तर निश्चितपणे या लोकांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटू शकतो असे मला वाटते. सभापती महोदय, आपण मला माझे विचार मांडण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो व माझे भाषण संपवितो.

. . . .यु-3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, आमचे परम मित्र आणि मराठा महासंघाचे नेते माननीय श्री.विनायक मेटे यांनी जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे, तिला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, 52 टक्क्याला कुठेही स्पर्श करणार नाही हे त्यांनी सुरुवातीला कबूल केलेले आहे. माझे आडनाव चव्हाण आहे आणि मी स्वत:ला मराठा समजतो. माझे मराठा समजातील मित्र जास्त आहेत. मी जरी दलित असलो तरी जातीचे भांडवल करीत नाही. मला सन्माननीय सदस्य श्री.पाटील साहेबांचे विचार फार आवडले. मी माजी मुख्यमंत्री माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्याबरोबर वावरलो आहे.मला त्यांचा बराच सहवास मिळालेला आहे आणि ते कधीही जातीय विषमतेचा वास आणत नाहीत.परंतु शाहू महाराजांनी 1902 मध्ये उपेक्षित समाजातील ज्या जाती नोंदविल्या, ज्यांना रिझर्वेशन दिले.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ....

श्री. सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर ती नावे परत अर्थसंकल्पात टाकली. जर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला नसता तर दलित कधीही या राज्याचा मुख्यमंत्री झाला नसता. त्यांच्या निमित्ताने त्यांना तो न्याय मिळाला. परंतु आम्ही त्याचे भांडवल केलेले नाही. पण या सभागृहात मला खरी सामाजिक क्रांती दिसली. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे साहेब स्वत: इंदू मिलच्या जागेसाठी भांडले. मिडियामध्ये त्यांच्या संदर्भात घरचा अहेर असे छापून आले. अर्थसंकल्पात जर तरतूद नसेल आणि ते सांगितले तर तो घरचा अहेर होईल का ? ते आमच्यासाठी भांडतात मग आम्ही त्यांच्यासाठी भांडावयास नको का ? सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी काल मागासवर्गीयांच्या संदर्भात चर्चा उपस्थित केली. सामाजिक न्यायाची ती पहिली चर्चा होती. म्हणजे जे सवर्ण आहेत ते या ठिकाणी आमच्यासाठी भांडतात मग जे आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत, जे दुर्बल घटक आहेत त्यांचा सुध्दा विचार केला पाहिजे. मी स्वत: माझे शिक्षण फी भरुन घेतलेले आहे. माझ्या मुलांचेही शिक्षण फी भरुन केलेले आहे. माझा जो नातू आहे त्याचीही स्कॉलरशीप घेत नाही.

सभापती महोदय, आता औद्योगिक क्रांती हाही एक विषय आहे. जोपर्यंत आम्ही लोक श्रीमंत होत नाही तोपर्यंत सामाजिक विषमता नष्ट होणार नाही. औद्योगिक क्रांती झाल्याशिवाय सामाजिक विषमता नष्ट होणार नाही. राज्यपालांव्दारे नियुक्त केलेल्या सदस्यांची जी यादी येते त्यामध्ये प्रत्येक समाजातील एक सदस्य असतो. त्यामध्ये एक सदस्य दलित घेतला जातो, एक सदस्य मुस्लीम घेतला जातो, एक ओबीसी सदस्य घेतला जातो. एक उच्चवर्णीय मराठा सदस्य घेतला जातो. हा सर्व जातीवर आधारीत राज्य कारभार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे आज आम्ही या ठिकाणी उभे आहोत आणि भाष्य करीत आहोत. मी मोठे भाषण करणार नाही परंतु 52 टक्क्याला स्पर्श करणार नाही असे कबूल केलेले आहे यासाठी न करता आम्ही त्यांना पाठिंबा दिलेला आहे. आम्ही त्यांच्या बरोबर आहोत. त्यांनी सामाजिक समतेसाठी हा विषय मांडलेला आहे. त्याला माझा संपूर्ण पाठिंबा आहे. हा विषय मांडण्यासाठी आम्ही दोघांनी माननीय सभापतींकडे प्रयत्न केले. मी पूर्णपणे त्यांच्या बाजूने आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

जोपर्यंत आमच्यातील मतभेद नष्ट होत नाहीत तोपर्यंत जातीयता आणि विषमता नष्ट होणार नाही. आम्ही जरी दलित असलो तरी जातीचे भांडवल सतत करीत नाही. सभागृहात आपला हक्क मागावयाचा. मी दलित आहे मला सवलत मिळाली पाहिजे यासाठी आम्ही भांडले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेमध्ये जे आरक्षण दिलेले आहे ते आम्हाला मिळावे यासाठी आम्ही भांडले पाहिजे पण त्याचे अतिभांडवल करु नका अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते) : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण बोलतील. वेळेची मर्यादा लक्षात घेता त्यांनी आपले भाषण दोन तीन मिनिटात संपवावे.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, प्रत्येक वेळी असे होते आम्ही जेव्हा बोलण्यासाठी उभे राहतो तेव्हा तीन मिनिटे सुध्दा मिळत नाहीत आणि हा विषय दोन तीन मिनिटांत मांडून होणार नाही तरी सुध्दा आपण मला पाच मिनिटांचा वेळ द्यावा अशी विनंती करते.

सभापती महोदय, नियम 97 अन्वये जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्यामध्ये 48 टक्के खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक व नोकरीमध्ये काही टक्के आरक्षण ठेवावे ही मागणी अतिशय योग्य आहे. मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना नेहमीच विरोध केला जातो परंतु शेवटी असे वाटते की, ते जी मागणी करतात ती योग्यच होती. मग तो शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा वाद असो, स्मारकाचा विषय असो किंवा आरक्षणाचा विषय असो. मला असे सांगावयाचे आहे की, समाजामध्ये वर्षानुवर्षे दुर्बल घटकांच्या उद्धारासाठी घटनेमध्ये तरतुदी केल्या. त्यावेळी सामाजिक स्तरावर दुर्बल असलेल्या घटकांना आरक्षण देण्यात आले आणि ते खरोखरच न्याय होते, या विषयी कोणाचेही दुमत नाही. परंतु 1990 नंतर देशामध्ये जे जागतिकीकरण आले, आर्थिक परिस्थितीमध्ये जे बदल झाले त्यामध्ये जे श्रीमंत होते ते अधिक श्रीमंत झाले आणि जे गरीब होते ते आणखी गरीब झाले. समाजातील सर्वच घटक त्यामध्ये आलेले आहेत. त्यामध्ये उच्चवर्णीय किंवा मागासवर्गीय असा वर्णभेद आता राहिलेला नाही. या आर्थिक स्थित्यंतरानंतर समाजात सद्यस्थितीत असलेले जे आरक्षण दलित आणि मागासवर्गीय समाजाला मिळत आहे ते आवश्यक आहे. परंतु उच्चवर्णीय समाजामध्ये जे गरीब लोक आहेत त्यांच्या उद्धारासाठी त्यांनाही आर्थिक निकषावर आरक्षण देणे ही आजची गरज आहे.

आज आपण दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे जर निकाल बघितले तर ज्यांचे आई-वडील आपल्या पाल्याला चांगल्या क्लासेसमध्ये घालू शकतात म्हणजे 35-40 हजार रुपये फी भरु शकतात त्यांना उच्चतम गुण मिळतात. अशा लोकांची मुले परीक्षेमध्ये हुशार विद्यार्थी ठरतात आणि त्यांना चांगले पर्सेंटेज मिळतात. ते चांगला स्कोअर करतात परंतु ते विद्यार्थी खरोखरच विद्वान आहेत का ? या बाबतीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्रीमती विद्या चव्हाण ....

सुध्दा शंका आहे. जे खरोखर गरिबांमधील विद्वान विद्यार्थी आहेत, ज्यांना क्लासेसची फी भरणे अशक्य आहे ते बिचारे मागे राहतात आणि त्यांच्यावर अन्याय होतो. गरिबीत जन्म घेतला म्हणून त्यांच्यामध्ये कोठे तरी न्यूनगंड निर्माण होतो की, आमचे आई-वडील फी भरु शकत नाहीत म्हणून आम्ही मागे राहिलो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

आमचे आई-वडील शिकले नाही म्हणून आम्ही मागे राहिलो किंवा मागासवर्गीय समाजामध्ये जन्माला आलो म्हणून आम्ही मागे राहिलो. समाजात विद्वान मुले आहेत परंतु ती निराश होत चालली आहेत. ते आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळे ते सोयी सवलतींपासून वंचित राहत आहेत. त्यामुळे राष्ट्राचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. अशा बुध्दिमान मुलांना मग ती कोणत्याही समाजातील असोत, उच्चवर्णीयातील असोत की मागासवर्गीयातील असोत त्या मुलांना खऱ्या अर्थाने संधी मिळण्यासाठी, त्यांच्या विद्वत्तेला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी आरक्षण देण्याची आवश्यकता आहे. मी त्याच्याही पुढे जाऊन असे म्हणेन की, याबाबत सर्वांनी सखोल विचार केला पाहिजे.

देशाला स्वातंत्र्य मिळून 64 वर्षे झालेली आहेत. या कालावधीत अनेक मागासवर्गीय श्रीमंत झालेले आहेत. त्या लोकांनाच आरक्षण देणार आहोत काय ? मागासवर्गीयांमध्ये जे गरीब आहेत, ज्यांना आरक्षणाची खरोखर गरज आहे, अशा लोकांना आरक्षण दिले पाहिजे. मग ते कोणत्याही समाजातील लोक असो. म्हणून आर्थिक निकष लावण्याची गरज आहे असे मला वाटते. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानते आणि माझे मनोगत पूर्ण करते.

यानंतर श्री.देवदत्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापति : माननीय मंत्री महोदया.....

श्री एस. क्यू. ज़मा सभापति महोदय, आपने मुझे बोलने का मौका नहीं दिया. इसलिए मैं यहां पर प्रोटेस्ट करना चाहता हूं. मैं यहां पर एक घंटे से बैठा हुआ हूं, इस चर्चा में मेरा नाम भी है, यहां पर हाथ उठाकर मैं आपसे बोलने की अनुमति भी मांग रहा हूं, फिर भी मुझे यहां पर बोलने का मौका नहीं मिल रहा है, इसलिए मैं वाक-आउट कर दूंगा.

तालिका सभापति : ठीक है, ज़मा साहब आप बोलिए.

श्री एस. क्यू. ज़मा : नहीं, मैं नहीं बोलूंगा. लेकिन मुझे न बोलने देने के लिए मैं यहा पर प्रोटेस्ट करता हूं.

तालिका सभापति : ज़मा साहब आप बोलिए. मंत्री महोदया, आप कृपया रुकिए.

श्री एस. क्यू. ज़मा : सभापति महोदय, बहुत सोच-समझ कर मैंने इस चर्चा के लिए हस्ताक्षर किए हैं.

तालिका सभापति : ज़मा साहब, आप बोलिए .

श्री एस. क्यू. ज़मा सभापति महोदय, अभी दस मिनट का समय भी नहीं बचा है. मैंने बहुत सोच-समझ कर इस प्चर्चा के लिए हस्ताक्षर किए हैं....

तालिका सभापति : ठीक है, ज़मा साहब अब आपको बोलने का मौका दिया है, इसलिए अब आप अपना भाषण शुरु कीजिए. अब आप विषय पर आइए.

श्री एस. क्यू. ज़मा : (विधानसभा द्वारा निर्वाचित) यह विषय बहुत ही सेंसिटिव है, फिर भी मैंने बहुत सोच-समझकर इस पर दस्तखत किए हैं. मैं कहना चाहता हूं कि माननीय सदस्य श्री विनायक मेटे तथा अन्य माननीय सदस्यों ने जो विषय यहां पर चर्चा के लिए रखा है, उस को मेरा पूरा समर्थन है. यहां पर बाकी सदस्यों ने जो बातें कहीं हैं, उन बातों को मैं यहां पंर रिपीट नहीं करना चाहूंगा . मुझे मालूम है कि रिजर्वेशन का विषय पूरे समाज और पूरे देश में विवादित विषय है. समाज का एक पक्ष रिजर्वेशन देने की वकालत करता है और दूसरा एक पक्ष ऐसा भी है, जिसका कहना है कि समाज में रिजर्वेशन देने की आवश्यकता नहीं है.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. ज़मा .....

लेकिन सभापति महोदय, मैं उन लोगों में से हूं जो यह मानते हैं कि हमारे संविधान के द्वारा जिन लोगों को रिजर्वेशन पाने का अधिकार दिया गया है, वह फायदा समाज के उन लोगों को मिलना ही चाहिए. रिजर्वेशन देने से बहुत लोगों को फायदा हुआ है. रिजर्वेशन देने से समाज के उपेक्षित वर्ग को आगे आने में बहुत सहायता मिली है. इसलिए हम रिजर्वेशन देने के पक्षधर हैं. जो लोग रिजर्वेशन का विरोध करते हैं या संविधान के आर्टिकल का उदाहरण देते हैं या सुप्रीम कोर्ट के निर्णय का उदाहरण देते हैं, अपना तर्क देते समय वे लोग इस बात को भूल जाते हैं कि आर्टिकल 16 में इकॉनामिकल वीकर सेक्शन को रिजर्वेशन देने का प्रावधान नहीं है.

सुप्रीम कोर्ट ने भी निर्णय दिया है कि 50 प्रतिशत से ज्यादा रिजर्वेशन नहीं होना चाहिए, लेकिन ऐसा निर्णय सुप्रीम कोर्ट का होते हुए भी कई राज्यों ने 50 प्रतिशत से ज्यादा रिजर्वेशन समाज के विभिन्न वर्गों को दिया है. कई राज्यों ने क्वान्टीफायएबल डेटा कलेक्ट करने के बाद सभी जातियों के इकॉनामिकली बॅकवर्ड लोगों को रिजर्वेशन दिया है. आंध्र प्रदेश और केरल में हमारे मुस्लिम समाज को रिजर्वेशन दिया गया है. 5 प्रतिशत रिजर्वेशन जब आंध्र प्रदेश में दिया गया तो सुप्रीम कोर्ट ने उसको स्ट्राइक डाउन किया. लेकिन 4 परसेंट रिजर्वेशन देने का निर्णय वहा पर अभी भी है. इसलिए मेरा कहना है कि हमारा जो क्वांटीफायएबल डेटा है, उसकी स्टडी होनी चाहिए. उसके आधार पर रिजर्वेशन देने के लिए कोई संवैधानिक अड़चन हमारे यहा पर नहीं है.

सभापति महोदय यहां पर यह प्रस्ताव इकॉनामिकली बैकवर्ड क्लास के लिए लाया गया है, फिर वह व्यक्ति चाहे किसी भी जाति का हो, वह रिजर्वेशन उसको मिलना चाहिए. माननीय सदस्य श्री गुजराथी साहब ने भी यहां पर कहा कि सरकारी नौकरी मिलने की संभावना तो अब खत्म हो गयी है. लेकिन हमारे देश में एम्पलॉयमेंट कम्पलसरी नोटिफिकेशन एक्ट है. उस एक्ट के अंतर्गत प्राइवेट कंपनियों पर भी रिजर्वेशन के आधार पर नौकरी देने का दबाव डाला जा सकता है ताकि प्राइवेट कंपनियों में भी नौकरी पाने का फायदा गरीब लोगों को मिल सके.

सभापति महोदय, मैं कहना चाहूंगा कि सच्चर कमीशन ने अल्पसंख्यकों के बारे में या रंगनाथ मिश्रा कमीशन ने जो 15 प्रतिशत रिजर्वेशन की बात कही है उसके बारे में यूपीए...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. ज़मा.....

सरकार विचार कर रही है कि यह काम संविधान के दायरे में रह कर कैसे किया जा सकता है. लेकिन जब तक उस बारे में कोई निर्णय नही होता है तब तक हमारा कहना है कि यह काम शेडयुल 9 के तहत हो सकता है या आर्टिकल 340 के अंतर्गत हो सकता है तथा इकॉनामिकली वीकर सेक्शन के लोगों को 48 परसेंट रिजर्वेशन के अंतर्गत रिजर्वेशन मिल सकता है. हमारा कहना है कि इस बारे में महाराष्ट्र सरकार को स्पष्ट नीति बनाकर कोई उचित निर्णय लेना आवश्यक है. इतना कहते हुए मैं इस प्रस्ताव का समर्थन करता हूं और अपनी बात यहीं पर समाप्त करता हूं. धन्यवाद.

तालिका सभापति : सम्माननीय सदस्य श्री ज़मा साहब आपने कहा कि "आप मुझे बोलने दीजिए नहीं तो मैं वाक-आउट कर दूंगा". आपकी यह बात अच्छी नहीं थी.

-0-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकात पाटील : सभापती महोदय, या विषयाची व्याप्ती मोठी असून या बाबतीत शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले तर ते अधिक चांगले होईल.

तालिका सभापती : माननीय राज्यमंत्री महोदया उत्तर देण्यास सक्षम आहेत.

श्री. विनायक मेटे : या अल्पकालीन चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन अतिशय चांगली चर्चा केली. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन दोन्ही बाजूच्या 25 सन्माननीय सदस्यांच्या सह्यांचे एक निवेदन माननीय मुख्यमंत्री महोदयांना दिलेले आहे. माननीय राज्यमंत्री महोदया उत्तर देण्यास सक्षम आहेत, त्याबाबतीत शंका घेण्याचे कारण नाही. परंतु हा विषय मोठा आहे. धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे त्यामुळे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले तर चांगले होईल.

श्री एस. क्यू. ज़मा : सभापति महोदय, यह बात सही है कि माननीय राज्य मंत्री महोदय, इस विषय का उत्तर देने के लिए पूरी तरह से सक्षम हैं. मुझे मालूम है कि उन्होंने इस विषय का अच्छी तरह से अध्ययन किया है. माननीय मंत्री महोदया हमारे ही समाज की हैं. मुझ से ज्यादा जानकारी माननीय मंत्री महोदया को है. लेकिन सभी माननीय सदस्यों का यह कहना है कि यदि माननीय राज्यमंत्री महोदया ने यहां पर इस विषय का उत्तर दे दिया तो फिर इस विषय पर माननीय मुख्यमंत्री का उत्तर हमको नहीं मिल सकेगा. इसलिए हम सभी माननीय सदस्य आपसे रिक्वेस्ट करते हैं कि माननीय मुख्यमंत्री यहां पर उत्तर दें तो ज्यादा अच्छा होगा. करीब 25 माननीय सदस्यों ने हस्ताक्षर करके माननीय मुख्ययमंत्री महोदय को एक निवेदन भी दिया है. हमारा यही कहना है कि इस विषय की गंभीरता बरकरार रहनी चाहिए.

तालिका सभापती : विशिष्ट मंत्र्यांनीच उत्तर दिले पाहिजे असा आग्रह सन्माननीय सदस्यांना धरता येणार नाही.

श्री. अरुण गुजराथी : या विषयाला सन्माननीय राज्यमंत्री महोदया उत्तर देऊ शकतात. त्या सक्षम आहेत. या चर्चेवरील उत्तर दुपारनंतर ठेवावे. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले तर उत्तम आहे. माननीय राज्यमंत्री देखील सभागृहामध्ये चांगले उत्तर देऊ शकतात. तेव्हा या चर्चेवरील उत्तर दुपारनंतर ठेवावे अशी माझी आपणास विनंती आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या चर्चेला माननीय राज्यमंत्री महोदय उत्तर देऊ शकणार नाहीत असे कोणाचेही म्हणणे नाही. परंतु हा विषय वेगळा आहे. याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे.

नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

या ठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदयाकडून कोठल्या पॅटर्नमध्ये उत्तर दिले जाईल याची आम्हाला पूर्णपणे कल्पना आहे. यासंदर्भात शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. म्हणून यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात विचार मांडले तर आम्हाला काही तरी डायरेक्शन्स् मिळतील. या प्रश्नावर केवळ थातूर मातूर उत्तर नको आहे. आम्हाला तशा उत्तराची गरज नाही. या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊ शकतो की नाही, पूर्ण राज्याचा, केंद्र शासनाचा, घटनेचा विचार करुन याबाबतीत आम्हाला उत्तर मिळणार आहे की नाही हा खरा आमचा प्रश्न आहे. सन्माननीय मंत्री महोदया हया काय उत्तर देणार आहेत, हे आम्ही या ठिकाणी बसून सांगू शकतो.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : सन्माननीय सदस्यांनी जी चर्चा उपस्थित केली. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यावर आपले विचार व्यक्त केलेले आहेत. त्या अनुषंगाने आणि एकूणच शासनाचे धोरण...

श्रीमती शोभा फडणवीस : आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांचेच उत्तर हवे आहे.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : एखाद्या विशिष्ट विषयाचे उत्तर एखाद्या विशिष्ट मंत्र्यांनीच दिले पाहिजे असा आपल्याला आग्रह धरता येणार नाही.

(गोंधळ)

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, सभागृहाच्या भावनांचा आदर करावा.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : आपल्याला असा आग्रह धरता येणार नाही. आपल्याला उत्तर हवे आहे की नाही ?

श्री.सय्यद पाशा पाटील : सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांच्या सूचनेचा आदर करण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या विषयाच्या उत्तरा संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांच्या भावना आपण ऐकून घेतलेल्या आहेत. विशिष्ट मंत्र्यांनीच उत्तर दिले पाहिजे असा आग्रह धरता येणार नसला तरी आपण सभागृहाची भावना लक्षात घेणार आहात की नाही, विषयाचे गांभीर्य पाहणार आहात की नाही ? आमची सर्वांची आपणास विनंती आहे. या सभागृहातील ज्येष्ठ सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी सुध्दा विनंती केली आहे आणि पर्याय सुचविला आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

आपण मुख्यमंत्री महोदयांना विनंती करा. या विषयाच्या बाबतीत त्यांनी दुपारी उत्तर दिले तर ठीक आहे. ते उत्तर देणार नसतील तर आम्ही माननीय राज्यमंत्र्यांचे उत्तर ऐकून घेऊ. यात काहीच अडचण नाही.

उप सभापती : विषय अत्यंत महत्वाचा आहे. अत्यंत प्रतिष्ठेचा आहे या सर्व गोष्टी मला मान्य आहेत. राज्यमंत्री शासनाचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असतात. या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांकडून जे उत्तर दिले जाणार आहे, ते शासनाच्या वतीनेच दिले जाणार आहे. या प्रश्नाचे गांभीर्य जेवढे आपल्याला आहे, तेवढेच गांभीर्य शासनाला देखील आहे. म्हणून मी माननीय राज्यमंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी आपले उत्तराचे भाषण सुरु करावे. सर्व सन्माननीय सदस्य आपले उत्तराचे भाषण शांतपणे ऐकतील. (अडथळा) मी माझा निर्णय दिलेला आहे.

श्री.केशवराव मानकर : यासंदर्भात शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे.

श्री. विनायक मेटे : आपण माननीय मुख्यमंत्र्यांना विचारुन घ्यावे.

श्री. सुभाष साळुंखे : महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी थातूर मातूर असा शब्दप्रयोग केलेला आहे, तो रेकॉर्डमधून वगळण्यात यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

उप सभापती : माननीय राज्यमंत्री अतिशय जबाबदारीने उत्तर देतात. त्यांच्या उत्तराच्या बाबतीत थातूर मातूर शब्द म्हटला असेल तो रेकॉर्डमधून काढून टाकण्यात येईल. आपण म्हणता त्याप्रमाणे मी माननीय मुख्यमंत्र्यांना स्वत: भेटतो. परंतु त्यांनी राज्यमंत्रीच उत्तर देतील असे त्यांनी सांगितले तर आपल्याला विनंती आहे की, माननीय राज्यमंत्र्यांचे उत्तर आपणास ऐकून घ्यावे लागेल. सभागृहाची बैठक मी पाच मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.04 ते 12.09 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

उप सभापती : मी सभागृहाच्या विनंतीनुसार सन्माननीय मुख्यमंत्र्यांना स्वत: भेटलो, माझ्या समवेत सभागृहाचे माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हेही होते. सन्माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहाच्या भावना कळविण्यात आल्या आहेत. त्यांनी एवढेच सांगितले की, मी नजिकच्या काळात सर्व संबंधितांची माझ्या दालनात एक बैठक आयोजित करतो. या विषयावर सांगोपांग चर्चा करुन निश्चितपणे या संदर्भातील पुढील पाऊल टाकण्यात येईल.

तोपर्यंत शासनाच्या प्रतिनिधी म्हणून माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान चर्चेला उत्तर देतील. ते उत्तर आपण शांतपणे ऐकून घ्यावे अशी मी सभागृहाला विनम्रपणे विनंती करतो.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे.

उप सभापती : माननीय राज्यमंत्र्यांचे उत्तराचे भाषण संपल्यानंतर प्रश्नोत्तराचा तास सुरु होईल.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्य मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी सभागृहात अतिशय महत्वाच्या मुद्यावर चर्चा उपस्थित केली असून या चर्चेच्या अनुषंगाने अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगले मुद्दे उपस्थित केले आहेत.

महोदय, जसा हा विषय संवेदनशील आणि महत्वाचा आहे त्याला माननीय मुख्यमंत्र्यांकडूनच उत्तर मिळावे असा सभागृहातील बहुतांशी सदस्यांचा आग्रह होता. पण यासंबंधी शासनाचे धोरण आणि मर्यादा काय आहेत याबाबतीत कॉम्प्लीकेशन्स काय आहेत हे सभागृहाला अवगत करणे आवश्यक आहे. येथे शासनाच्या धोरणाप्रमाणे दोन प्रकारच्या सुविधा आपण देत असतो व त्या अनुषंगानेच सभागृहात चर्चा झालेली आहे. सामाजिक आरक्षण आणि आर्थिक निकषांवर आरक्षण अशा दोन प्रकारे चर्चा सभागृहात करण्यात आली आहे. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, सामाजिक समतेवर झालेली चर्चा तर काहींच्या मते आरक्षणामुळे सामाजिक विषमता व जातीयवाद अधिक निर्माण होण्याची शक्यता असते अशा दोन प्रकारच्या भावना सभागृहात व्यक्त करण्यात आल्या. या चर्चेत सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांच्यासोबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, प्रा. सुरेश नवले, प्रा. चंद्रकांत पाटील, सन्माननीय श्री. अरुण गुजराथी, डॉ. नीलम गोऱ्हे, ॲड. उषाताई दराडे, श्री. हेमंत टकले, श्री. पाशा पटेल, श्रीमती विद्याताई चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ. सुधीर तांबे आणि सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा अशा अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.

महोदय, आपल्या राज्यात ज्या पध्दतीने आरक्षण लागू करण्यात येते त्यात सरळ सेवेसाठी आणि पदोन्नतीसाठी अशा दोन प्रकारे लागू केले जाते. तसेच हे व्हर्टिकल आणि होरिझोंटल अशा स्वरुपाचे असून एकूण हे आरक्षण 52 टक्के एवढे आहे. या शिवाय खुल्या प्रवर्गाचा विचार केला तर प्रॅक्टिकली 14 टक्के सुध्दा आरक्षणाची सुविधा या वर्गाला मिळत नाही. समजा 100 पदांची जाहिरात आली तर त्यातील 14 पदे खुल्या प्रवर्गासाठी असतात. तसेच 52 टक्के प्रत्यक्ष आरक्षण वगळले तर 48 टक्के खुल्या प्रवर्गाच्या आरक्षित कोट्यातून 70 टक्के आरक्षण हे समांतर आरक्षण असते. त्यात महिला, प्रकल्पग्रस्त वगैरेंचा समावेश असतो. यातून खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांनाही सुविधा मिळाव्यात अशी रास्त भावना अनेक सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे. अशा वर्गाला सुविधा देण्यासाठी शासन नेहमीच प्रो-ॲक्टीव्हली

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान .....

समोर आले आहे. जे दुर्बल घटक असतील किंवा आर्थिक व सामाजिक दृष्ट्या दुर्बल असतील त्यांना सुविधा देणे, त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना तयार करणे, त्यांच्यासाठी सवलती देणे अशा गोष्टींची पूर्तता करण्याचा प्रयत्न शासनाने नेहमीच केलेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ....

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी 1979 मध्ये 80 टक्के पदे राखून ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता व त्यामध्ये सामाजिक आरक्षण अंतर्भूत होते. परंतु त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी आरक्षण ठेवण्यास संविधानिक आधार नसल्याचे स्पष्ट केले होते व त्यामुळे 1987 रोजी यासंदर्भात जो शासन निर्णय काढण्यात आला होता तो रद्द करण्यात आला. त्यानंतर केंद्र शासनाने 1991 मध्ये 10 टक्के पदे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी आरक्षित करण्याच्या संदर्भात आदेश निर्गमित केले होते. परंतु सर्वोच्च न्यायालयात इंदिरा सहानी व्हर्सेस केंद्र शासनाचे जे प्रकरण होते त्यात आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचे आरक्षण रद्द करण्यात आले होते. 52 टक्के आरक्षण देणे ही संविधानिक प्रोव्हीजन आहे. त्यामुळे शासनाचे यासंदर्भात जे निर्णय होते ते निर्णय जी.आर.काढून रद्द करावे लागले होते. केंद्र शासनाने आर्थिक दृष्टया मागासलेल्या वर्गाला शिक्षण व शासकीय नोकऱ्या उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत जुलै 2006 मध्ये मेजर जनरल एस.आर.सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला व आयोगाचे मेंबर सेक्रेटरी महेंद्र सिंग हे आयएएस अधिकारी असून नरेंद्र कुमार सदस्य आहेत. या आयोगाच्या कार्यकक्षेत आर्थिकदृष्ट्या निकष सुचविणे,राज्य शासन, केंद्र शासन तसेच केंद्र शासित प्रदेशाकडून यासंदर्भात मते प्राप्त करुन घेणे, संबंधित आरक्षण किती असावे, किती टक्के आरक्षण लागू करावे यासंबंधी या आयोगाची निर्मिती करण्यात आली होती. दिनांक 22 जुलै, 2010 रोजी आयोगाने शासनाला अहवाल सादर केला असून यामध्ये राज्य शासनाने आपली सर्व माहिती आयोगाला दिलेली आहे. आरक्षणाच्या संदर्भात केंद्र शासनाचा जेव्हा निर्णय होईल तेव्हाच या देशामध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी आरक्षण देता येईल किंवा नाही याबाबत निर्णय घेता येईल व तोपर्यंत आपल्याला थांबावे लागेल असे वाटते.

अनेक न्यायालयीन निकालाच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख करण्यात आलेला आहे. सुप्रीम कोर्टामध्ये इंदिरा सहानी व्हर्सेस केंद्र शासनाच्या संदर्भात जो प्रश्न होता त्यामध्ये 50 टक्क्यापर्यंत आरक्षण असावे असा कोर्टाचा निर्णय होता परंतु सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी एस.व्ही. जोशी व्हर्सेस कर्नाटकचा उल्लेख केला असून दि.13 जुलै,2010 मध्ये क्वान्टीफायएबल डेटा जोपर्यंत उपलब्ध होत नाही तोपर्यंत 50 टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देता येते किंवा नाही हे स्पष्ट होत नाही. क्वान्टीफायएबल डेटाच्या आधारावरच हे स्पष्ट होऊ शकते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ....

तसेच ज्या राज्यांनी आरक्षण दिले होते त्यामध्ये केरळ व तामिळनाडू या राज्यांना एक वर्षाच्या अवधीमध्ये क्वान्टीफायएबल डेटा सबमिट करुन देण्यास सांगितले होते व या राज्यांनी क्वान्टीफायएबल डेटा दिल्यानंतर सुप्रीम कोर्ट, आरक्षण देता येते की, नाही याबाबत आपले जजमेंट देणार होते. राजस्थान, कर्नाटक व केरळ या राज्यांमध्ये म्हणजे जेथे जेथे आरक्षण देण्यात आलेले आहे तेथे आरक्षण कॉन्स्टीटयूशनल होऊ शकते किंवा नाही याबाबत सुप्रीम कोर्ट ठाम भूमिका घेत नाही तोपर्यंत आपल्याला यामध्ये काही करता येणार नाही.

यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

हे मॅटर सबज्युडिस असल्यामुळे त्याचा निकाल लागल्यानंतर राज्य सरकारला निर्णय घेता येईल. याबाबतची शासनाची भूमिका सकारात्मक आहे हे मी आपल्याला अगोदरच सांगितले आहे. त्यामुळे या बाबतीत थोडा वेळ वाट पाहून निर्णय घ्यावा लागणार आहे.

मराठा आरक्षण लागू करण्याकरिता बॅकवर्ड कमिशनला डेटा जमा करण्याचे काम दिले आहे. त्याचप्रमाणे दुसऱ्या समाजाकडून निवेदन आले असून त्यांच्या बाबतीत देखील डेटा जमा करण्याचे काम बॅकवर्ड कमिशनकडे सोपविण्यात आले आहे. सभापती महोदय, समाजाच्या प्रत्येक घटकांच्या विकासासाठी शासनाने अनेक योजना हाती घेतल्या आहेत. त्याचा उल्लेख माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी केला आहे. राईट टू एज्युकेशन ॲक्टमध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक शाळेमध्ये 25 टक्के आरक्षण हे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी ठेवण्यात आले आहे. अशा सर्व संस्थांमध्ये त्यांना प्रवेश देणे बंधनकारक करण्यात आले आहे. हा एक अतिशय चांगल्या प्रकारचा कायदा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत सांगू इच्छितो की, बीपीएलमध्ये जे लोक येतात त्यांच्याकरिता शासनाकडे अनेक योजना आहेत. त्यामध्ये अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत अंत्योदय योजना आहे, या घटकातील लोकांना कमी दरामध्ये रेशन देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे संजय गांधी निराधार योजना लागू केली आहे. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना रुग्णालयामध्ये आरोग्याच्या मोफत सुविधा पुरविण्यात येत आहेत, राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये आपण उत्पन्नाची मर्यादा वाढविली आहे त्यामुळे आपली 80 टक्के लोकसंख्या कव्हर होत आहे. आरोग्याच्या सुविधांबाबत 952 प्रकारच्या आजारामध्ये शस्त्रक्रिया करावयाची असेल तर 1 लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या लोकांना त्याचा लाभ देता येईल. ही योजना आठ जिल्ह्यामध्ये सुरु करण्यात आली असून त्यानंतर संपूर्ण राज्यामध्ये राबविणार आहोत. त्याचबरोबर इयत्ता दहावीपर्यन्त मुलांना मोफत शिक्षणायी सोय करण्यात आली आहे. त्याकरिता अनेक संस्थांना अनुदान दिले जात आहे. त्याचप्रमाणे मुलींना 12 वीपर्यन्त मोफत शिक्षण देण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारले आहे. त्याचप्रमाणे इंदिरा आवास योजना, राजीव गांधी निवारा योजना किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळामार्फत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील लोकांना घरकुले देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अनेक शाळांमध्ये मुलांना उपस्थिती भत्ता देण्यासाठी शिक्षण विभागाच्या माध्यमातून 130 कोटी रुपयांची तरतूद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान....

करण्यात आली. त्याचप्रमाणे शालेय शिक्षण विभागामार्फत ईबीसीना शिष्यवृत्तीकरिता सन 2012-13 करिता 4.33 कोटी आणि सन 2012 मध्ये 43 कोटीपर्यन्त तरतूद केली आहे. त्याचप्रमाणे अल्पसंख्यांक विभागाच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक सुविधा देण्यात येतात.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाची ही अतिशय चांगली योजना असून त्यासाठी शासनाने 2 हजार कोटींची तरतूद केली आहे. प्रोफेशनल एज्युकेशनकरिता एस.सी.एस.टी. आणि व्ही.जे.एन.टी. च्या लोकांसाठी सामाजिक न्याय विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या माध्यमातून 100 टक्के प्रतिपूर्ती करणारी योजना राबविली जात आहे.

(यांनतर श्री. भारवि)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान..

ओबीसीसाठी 50 टक्के आणि इबीसीसाठी 50 टक्के फी प्रतिपूर्तीची योजना आहे. आर्थिक दुर्बल घटकांसाठी 2000 कोटी रूपये देऊन शासन असे उपक्रम राबविते. विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा उल्लेख झाला आहे. सन 2011 मध्ये पाच कोटी रूपये, 2012-13 मध्ये सहा कोटी रूपये देऊन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक सुविधा देण्यासाठी....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा निधी आरक्षणातील नाही. हा निधी विदर्भ पॅकेजमधील आहे. त्यामुळे या दोन्ही विभिन्न गोष्टी आहेत.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, दुर्बल घटकांतील लोकांना सुविधा मिळावी या भूमिकेतून शासन काम करीत आहे हा माझा सांगण्यामागचा हेतू होता. सुप्रीम कोर्टाचे जजमेंट येईपर्यंत, इबीसीबाबत आयोगाचा अहवाल येईपर्यंत आम्ही गप्प बसलेलो नाही. आपल्या अनेक योजना आहेत. त्या योजनेच्या माध्यमातून शासन आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी काही तरी करण्याचा प्रयत्न करीत आहे. शिक्षण असो, आरोग्य असो, निवारा असो, अन्य समस्या असो शासन वेल्फेअर योजनेच्या माध्यमातून....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मघा पासून माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकत आहे. आरक्षणासंबंधी त्या सर्व काही सांगत आहेत. त्यांनी महाराष्ट्रातील लोकसंख्येचा, त्यांच्या भाषेत पॉप्युलेशनचा उल्लेख केला आहे. तो ठीक आहे. ओबीसीमध्ये मुस्लीम समाजाला साडेचार टक्के आरक्षण द्यायचे असा मध्यंतरी मुद्दा आला होता. त्यासंबंधी आपण अजून खुलासा केलेला नाही. या आरक्षणामध्ये महाराष्ट्रातील मुस्लीम समाज कुठे आहे ते ही आपण सांगावे. कारण आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या विषयाला देखील आता स्पर्श केला आहे. त्यामुळे आम्हाला ते ही कळवण्याची आवश्यकता आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सर्व समाजाला एकच न्याय राहणार आहे. त्यामुळे क्वांटीफायबल डेटा उपलब्ध करून त्या आधारे आरक्षण देण्याची भूमिका शासनाची राहणार आहे. सामाजिक आरक्षण लागू करण्यासंबंधी बॅकवर्ड कमिशन आहे. जो पर्यंत बॅकवर्ड कमिशनचा अहवाल येत नाही तो पर्यंत काहीही करता येणार नाही. बॅकवर्ड कमिशनकडे मुस्लीम समाजची नव्हे तर अनेक समाजाने रिप्रेझेंटेशन दिले आहे. मराठा समाजाने देखील रिप्रेझेंटेशन दिले आहे. जो पर्यंत निश्चित आकडेवारी समोर येत नाही तो पर्यंत काहीही करता ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करता येणार नाही. सुप्रीम कोर्टाचा आदेश आहे. त्याचे पालन करायचे असेल तर क्वांटीफायबल डेटा आपल्याला देणे गरजेचे राहणार आहे. या बाबत धोरणात्मक निर्णय घेऊन आपण आजच्या घडली काही तरी करू शकू असे मला वाटत नाही.

येथे दुसरे सुद्धा प्रश्न उपस्थित झाले आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी पद भरतो पण त्याची आकडेवारी आमच्या समोर येत नाही असा उल्लेख केला आहे. मागच्या वर्षी आपण मागासवर्गीयांची विशेष भरती मोहीम राबविली आहे. या मोहिमेला आपण मार्च 2013 मुदतवाढ दिलेली आहे. आजच्या घडीला माझ्याकडे आकडेवारी नाही. पण पुढच्या अधिवेशनात अनुशेष भरती अंतर्गत किती पदे भरू शकलो ही आकडेवारी मी आपल्या समोर ठेवू शकते. यासाठी शासनाने मोठी मोहीम घेतली आहे.

मुंबई-पुणे येथे काम करण्याची सर्वांची इच्छा असते असा देखील मुद्दा येथे उपस्थित करण्यात आला होता. आता आपण डीव्हीजन केडर निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक अधिकाऱ्याने तेथे 6 वर्षे काम करणे गरजेचे आहे. अशा पद्धतीचा शासनाचा निर्णय आहे.

या चर्चेच्या अनुषंगाने अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . . .

पण मुख्य बाब अशी आहे की, केंद्र शासनाने जो आयोग नेमला होता, त्यांनी 2010 मध्ये केंद्र शासनाकडे अहवाल सबमिट केला आहे. पण जोपर्यंत केंद्र शासनाचा निर्णय होत नाही तोपर्यंत आपल्याला याबाबतीत पुढे जाणे योग्य नाही एवढेच सांगून मी आपली रजा घेते.

. . . .2 ई -2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, याठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले त्याबद्दल आम्ही कोणीच फारसे काही बोललो नाही. परंतु याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केल्यानंतर माननीय राज्यमंत्र्यांचे उत्तर हे संपूर्ण निराशाजनक आणि सरकारला याबाबत काही करण्याची इच्छा नाही हेच दर्शविणारे आहे. यापेक्षा दुसरे काही नाही. मुळामध्ये दोन-तीन विषय होते.त्यांनी असे सांगितले की, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या बाबतीत 1987 मध्ये निर्णय घेतला होता आणि 1992 मध्ये सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला होता.पण मंडल आयोगाच्या वेळेस ती बाब आर्थिक निकषावर फेटाळण्यात आली. त्यानंतर मी एक उल्लेख केला आहे आणि आपणही केला आहे की, एस.व्ही.जोशी विरुध्द कर्नाटक राज्य याबाबतीत तुम्ही ते करु शकता. त्याला काही बंधन नाही. बाकीच्या राज्यांनीही केले आहे, त्यामुळे तुम्हाला काहीही अडचण नाही. पण जर ते करावयाचे नसेल तर 9 शेड्युल आहे, त्या अंतर्गत करु शकता पण तेही करीत नाही. अशा प्रकारे शासन तेही करीत नाही आणि हेही करीत नाही आणि माननीय मंत्री महोदया सरळ सांगत आहेत की, आपण 2010 मध्ये आयोग स्थापन केला. माझे असे म्हणणे आहे की, याबाबतीत केंद्र शासन करील किंवा करणार नाही पण म्हणून राज्य शासनाने याबाबतीत काही करावयाचे नाही असे काही आहे काय? यादृष्टीने विचार करावा. त्यानंतर तुम्ही 9 शेड्युल प्रमाणे करा किंवा सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार करा.

सभापती महोदय, तिसरी सगळयात महत्वाची गोष्ट ही आहे की, जर तसे करावयाचे नसेल तर सगळया ओपन कास्टमधील सगळया समाजाचा डाटा एकत्र करण्याकरता नवीन एखादी समिती किंवा आयोग गठीत करणार आहात काय ? जेणेकरुन नंतर शासनाला निर्णय घेणे सुकर होईल. तशा प्रकारचा तरी डाटा तयार करावा. तेव्हा या चर्चेच्या माध्यमातून शासनाने एकतरी मागणी मान्य करावी.परंतु आपण काहीच मान्य करीत नाही आणि मग मघाशी माननीय सभापती जो आग्रह धरत होते तो चुकीचा नव्हता असे तरी आपण सिध्द करु नका. यातील दोन-तीन विषय महत्वाचे आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आर्थिकदृष्ट्या मागास समाजाच्या आरक्षणाच्या विषया बाबत या सदनामध्ये दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी जी अल्पकालीन चर्चा उपस्थित आहे आणि ती तेवढीच महत्वाची आहे.आमची अशी अपेक्षा होती की, या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी येथे उपस्थित रहावे.पण त्यांच्या काही अडचणी आहेत,आपण समजू शकतो.सभापती महोदय,ज्यावेळी आपण माननीय मुख्यमंत्री महोदयांना सदनामध्ये येण्याच्या संबंधात विचारण्यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गेला होता, त्यावेळी येथे झालेल्या चर्चेतील मुद्दे माननीय राज्यमंत्री महोदयांच्या नजरेस आणून त्याबाबत धोरणात्मकदृष्ट्या काय करता येईल याबाबत चर्चा करता आली असती. मात्र आता याठिकाणी दिलेले उत्तर ऐकल्यानंतर असे वाटते की, शासनाला सुप्रीम कोर्टाची ढाल पुढे करुन मागास समाजाला काही द्यावयाचे नाही आणि जर या राज्य सरकारचे आर्थिकदृष्टया मागासलेल्या समाजाला काही देण्याचे धोरण नसेल तर मग आम्ही येथे कशासाठी उपस्थित रहावे? त्यांना आपण काही देणार आहात काय? नुसता शब्दच्छल होत आहे. दर वेळेला नवीन मुख्यमंत्री आल्यानंतर आश्वासने दिली जातात. यापूर्वी मराठा समाजाचे आंदोलन झाले तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले आणि त्यातून हा विषय पुढे आला. परंतु आर्थिकदृष्टया मागास समाजाला काहीही देण्याची या सरकारची मानसिकता दिसत नाही आणि शासनाकडून जे उत्तर देण्यात आले आहे, त्याबाबत आम्ही पूर्णपणे नाराज आहोत म्हणून या शासनाचा निषेध केला पाहिजे आणि शासनाचे हे धोरण आम्हाला मान्य नाही हे दाखवून दिले पाहिजे.

(यानंतर विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

उप सभापती : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. आता सभागृहाची बैठक मी दुपारी 12.50 वाजेपर्यंत स्थगित करतो. 12.50 वाजता प्रश्नोत्तराचा तास सुरु होईल.

(यानंतर सभागृहाची बैठक 12 वाजून 39 मिनिटांनी, 12 वाजून 50 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पण आपण जोपर्यंत केंद्राचा जो आयोग आहे, त्याच्यासाठी 2010 मध्ये आयोगाने केंद्र शासनाकडे अहवाल सबमिट केलेला आहे. पण जोपर्यंत केंद्र शासनाचा निर्णय होत नाही, तोपर्यंत आपल्याला पुढे जाणे योग्य नाही एवढेच सांगून मी आपली रजा घेते.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी.: लेखी उत्तरे

उप सभापती : आता दिनांक 17 एप्रिल 2012 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील सार्वजनिक अरोग्य व कुटुंबकल्याण विभागाकडे वर्ग करण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक 26641 चर्चेला घेण्यात येईल

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुटुंबांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना व जननी शिशू सुरक्षा योजनेचा लाभ देण्याबाबत

(६) * २६६४१ श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर , श्री.रामनाथ मोते , श्री.चंद्रकांत पाटील : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत दारिद्रय रेषेखालील कुटुंबे म्हणून अधिकृतपणे नोंद झालेली किती कुटुंबे आहेत व ज्यांची अधिकृतपणे नोंद झाली नाही असे अर्ज प्राप्त झालेली किती कुटुंबे प्रतीक्षाधीन आहेत,

(२) असल्यास, दारिद्रय रेषेखालील कुटुंब ठरविताना कोणकोणते निकष कोणकोणत्या यंत्रणाकडून वा अधिकाऱ्यांकडून तपासण्यात आले होते,

(३) असल्यास, दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जी कुटुंबे दारिद्रय रेषेखालील कुटुंबे म्हणून गणली गेली आहेत त्यातील अनुक्रमे किती कुटुंबांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना व जननी शिशू सुरक्षा कार्यक्रमाअंतर्गत शासकीय सुविधांचा लाभ देण्यात आला आहे,

(४) अद्याप, किती कुटुंबांना या दोन योजनातंर्गत लाभ मिळणे बाकी आहे व तो त्यांना केव्हा देण्यात येणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : (१) दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची गणना २००२-२००७ नुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यात दि.३१ डिसेंबर, २०११ पर्यंत ७१,३८६ एवढी दारिद्रय रेषेखालील कुटुंबे आहेत. तसेच ज्यांची अधिकृतपणे नोंद झाली नाही असे अर्ज प्राप्त झालेली प्रतीक्षाधीन कुटुंबे नाहीत.

(२) दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची गणना २००२ करिता केंद्र शासनाने खालील प्रमाणे १३ निकष ठरविलेले आहेत.

१) कसणाऱ्या जमिनीच्या गटाचा आकार, २) घराचा प्रकार, ३) सरासरी कपडे परीधान उपलब्धता (प्रती व्यक्ती कपडे संख्या), ४) अन्न सुरक्षा, ५) स्वच्छता, ६) उपभोग्य टीकाऊ वस्तूंची मालकी ७) घरातील जास्तीत जास्त शिकलेल्या व्यक्तींचे साक्षरता प्रमाण. ८) कुटुंबाच्या मजूर शक्तीचा दर्जा. ९) उपजीविकेचे साधन. १०) ५ ते १४ वयोगटातील मुलांचा शैक्षणिक दर्जा. ११) कर्जबाजारीपणाचा प्रकार. १२) घरातून स्थलांतराचे कारण १३) सहाय्याची पसंती/आवड

उपरोक्त निकषानुसार नियुक्त प्रगणकांकडून सर्वेक्षण करण्यात आलेले आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(३) व (४) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अद्याप चालू केलेली नाही. या जिल्ह्यात १ लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेली २,०३,२५० एवढी लाभार्थी कुटुंबे आहेत. जेव्हा पुढील टप्प्यांमध्ये या जिल्ह्यांचा समावेश होईल तेव्हा या लाभार्थींना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा फायदा मिळेल.

जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत शासकीय संस्थेत प्रसूत झालेल्या सर्व थरातील मातांना व त्यांच्या बालकांना लाभ देण्यात येतो. त्यानुसार या योजने अंतर्गत दि. ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत १३१८ लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, परवा हा प्रश्न ग्रामविकास खात्याकडे गेला होता आणि आपण हा प्रश्न राखून ठेवला होता. आज माननीय आरोग्य मंत्री या ठिकाणी उत्तर देण्यासाठी आलेले आहेत. परवा आम्ही प्रश्न विचारला होता की, जे जिल्हे यामध्ये निवडलेले आहेत त्यामध्ये मुंबई शहर आणि मुंबई उपनगर हे जिल्हे आहेत परंतु कोकणातील सिंधुदुर्गसारखा जिल्हा, ज्या ठिकाणी त्याची जास्त खरी गरज आहे त्या जिल्ह्याचा समावेश त्यामध्ये नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा त्यामध्ये समावेश करणार का ? आपला जो जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम आहे त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती आणि वस्त्यांची रचना जर माननीय मंत्री महोदयांनी जाऊन पाहिली असेल तर आपण जरी प्रवासाचा खर्च दिला तरी सुध्दा वेगवेगळ्या प्रकारच्या गावांमधून, डोंगराळ भागातून सरकारी वाहनाने जाऊन डिलिव्हरी करणे शक्य नसते त्यामुळे जवळपासचा जो डॉक्टर असेल त्या ठिकाणी जाऊन ते डिलिव्हरी करता येते. त्यामुळे आपण हा निकष जर सिंधुदुर्ग जिल्ह्याला लावला तर सिंधुदुर्ग जिल्हा त्या निकषामध्ये बसू शकणार नाही. कारण त्या ठिकाणी गावे दूरदूर आहेत. दऱ्यांमध्ये गावे असतात. त्या ठिकाणी जाण्यासाठी आणि येण्यासाठी एवढा वेळ लागतो की तोपर्यंत मुलगा शाळेच्या ॲडमिशनसाठी येईल. त्यामुळे हा निकष सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी शिथिल करुन तेथील लाभार्थी वाढविणार का ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी पहिला जो प्रश्न विचारला तो राजीव गांधी जीवनदायी योजनेसंबंधी आहे. पहिल्या टप्प्यामध्ये 8 जिल्हे घेण्याचा निर्णय दीड वर्षापूर्वी तत्कालीन सन्माननीय मुख्यमंत्री असताना झाला होता. त्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. २६६४१ ..... श्री. सुरेश शेट्टी ....

ज्या आठ जिल्ह्यांची निवड केली होती त्या ठिकाणी आता कार्ड वाटपाचा कार्यक्रम जोरात चालू आहे आणि मे महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यामध्ये जीवनदायी योजना त्या आठ जिल्ह्यात लाँच करणार आहोत. दुसऱ्या टप्प्यामध्ये परत 8 जिल्हे घेण्याचा निर्णय झालेला आहे. परंतु त्या आठ जिल्ह्यांची निवड अजून झालेली नाही. राजीव गांधी जीवनदायी योजना सोसायटीचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री आहेत आणि माननीय उप मुख्यमंत्री हे उपाध्यक्ष आहेत. कोणत्या आठ जिल्ह्यांची निवड करावयाची याचा निर्णय त्या कमिटीमध्ये घेण्यात येतो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांची अशी मागणी आहे की, सिंधुदुर्ग जिल्ह्याचा समावेश दुसऱ्या टप्प्यामध्ये करावा. माननीय उप मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेतच. माननीय मुख्यमंत्री महोदयांना आपल्या भावना कळविण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न जननी शिशू सुरक्षा कार्यक्रमाच्या संदर्भात विचारला. हा कार्यक्रम 7 ऑक्टोबर, 2011 ला आपल्या राज्यामध्ये राबविण्याचा निर्णय घेतला. हा केंद्र सरकारचा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमामध्ये प्रत्येक गर्भवती महिलांसाठी 102 हा टोल फ्री नंबर संपूर्ण राज्यातील ग्रामीण भागासाठी सुरु केलेला आहे. हा 102 क्रमांक फिरविला की शासकीय रुग्णालयातून त्या ठिकाणी वाहतुकीची व्यवस्था करतो. कोणत्याही गावामध्ये किंवा खेड्यामध्ये असो त्यांना आपण वाहतुकीची व्यवस्था करतो. त्यांना हॉस्पिटलमध्ये घेऊन जातो आणि त्यांची डिलिव्हरी, त्यांची औषधे आणि जे काही डायग्नोस्टिक करावयाचे असेल ते आपण मोफत करतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3 दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवून पुन्हा शासकीय वाहनातून त्यांना घरी नेण्यात येते. एखाद्या केसमध्ये सिझरीन झाले असेल तर त्या महिलेला 7 दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवल्यानंतर घरी नेले जाते. त्यानंतर फॉलोअप करण्यासाठी सुध्दा शासकीय वाहनाची व्यवस्था मोफत केली जाते. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे कोणतेही गाव कोठेही असो 102 नंबर डायल केल्यावर वाहन पुरविण्याचा प्रयत्न केला जातो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, दारिद्र्य रेषेखालील कुटुंब ठरविताना कोणकोणते निकष तपासण्यात आले, असे मी दुसऱ्या प्रश्नात विचारले होते. शासनाने जे 13 निकष ठरविलेले आहेत त्यामध्ये सरासरी कपडे परिधान उपलब्धता, प्रती व्यक्ती कपडे संख्या असे नमूद केलेले आहे. वापरले जाणारे कपडे हा निकष असू शकतो काय ? ही बाब हरकत घेण्यासारखी आहे. कपड्याचा दर्जा, त्यांच्या अंगावर कपडे आहेत की नाही हे निकष होऊ शकत नसल्यामुळे यामध्ये शासन बदल करणार आहे काय ? जे उर्वरित 12 निकष आहेत ते देखील योग्य नाहीत असे माझे मत आहे. या निकषाच्या आधारावर बी.पी.एल.ची लोकसंख्या ठरविता येणार नाही. दुसरे असे की, जननी सुरक्षा योजनेंतर्गत गर्भवती महिलांसाठी कोणीही कोठूनही 102 नंबर डायल केल्यास फोन करणाऱ्या व्यक्तीच्या घरी गाडी येईल असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. राज्यातील सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये दूरध्वनीची व्यवस्था आहे काय त्याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे. त्याचप्रमाणे जननी सुरक्षा योजनेमध्ये प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रातील लाभार्थ्यांची यादी शासनाजवळ उपलब्ध आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यातील पहिल्या व दुसऱ्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी यापूर्वीच उत्तर दिलेले आहे. परंतु तिसऱ्या व चौथ्या प्रश्नासाठी हा प्रश्न राखून ठेवला होता. शासनाकडे पुरेशा प्रमाणात गाड्या आहेत काय असे या ठिकाणी विचारण्यात आले आहे. जननी सुरक्षा योजनेंतर्गत कोणीही 102 नंबर फिरविल्यानंतर गाडी उपलब्ध होऊ शकते. सर्व जिल्ह्यांमध्ये गाड्या उपलब्ध आहेत. मी नुकताच सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये जाऊन आलो आहे. तेथे या संदर्भात एक बैठक घेतलेली आहे. तेथेही ॲम्ब्युलन्सची व्यवस्था आहे. चालक देखील आहेत. ज्या ठिकाणी गाडी नसेल तेथे रुग्ण कल्याण समितीला खाजगी गाडी भाड्याने घेण्याची शासनाने परवानगी दिली आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26641....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझ्या तालुक्यातील आरोग्य खात्याच्या गाड्यांचे चालक तालुक्याच्या ठिकाणी राहतात. राज्यातील बहुतेक आरोग्य खात्याच्या गाड्यांचे चालक गावामध्ये राहत नाहीत. मी हे पुराव्यानिशी बोलत आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माझ्याकडे सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील लाभार्थ्यांची माहिती आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात 1318 लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे. या योजनेमध्ये जर त्रुटी असेल तर त्याबाबत चर्चा करुन ती दूर करता येईल. परंतु हा कार्यक्रम नीट चालू नाही असे म्हणता येणार नाही. राज्यामध्ये 50 हजार महिलांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतलेला आहे हे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/ D/ KTG/

मुंबई महानगर विभागातील सुरु असलेल्या इलेक्ट्रोप्लेटिंग कारखान्याद्वारे होणारे प्रदूषण कमी करण्यासंदर्भात

(1) * 25806 श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर , डॉ.रणजित पाटील , श्री.रामनाथ मोते : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई महानगर विभागात सुरु असलेल्या 117 इलेक्ट्रोप्लेटिंग कारखान्यांपैकी 77 कारखान्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या संदर्भात मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असताना मा.उच्च न्यायालयाने दिनांक 29 फेब्रुवारी, 2012 पर्यंत या कारखान्यांना जलप्रदूषण व वायू प्रदूषण यंत्रणा उभारण्यासाठी मुदत दिली आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, किती कारखान्यांनी या इलेक्ट्रोप्लेटिंग यंत्रणा उभारल्या आहेत,

(4) नसल्यास, त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे ?

श्री.सचिन अहिर,श्री.संजय देवतळे यांच्याकरिता : (1) सर्वेक्षणात 140 पैकी 77 कारखान्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही.

(2) होय, खरे आहे.

(3) वरील पैकी 24 कारखान्यांनी जल व वायू प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविलेली आहे. तसेच 10 कारखान्यांमध्ये जल व वायु प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्याचे काम चालू आहे.

(4) जल व हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविलेल्या नाहीत अशा 43 कारखान्यांना उत्पादन बंद चे निर्देश देण्यात आले आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी हा प्रश्न विचारल्यानंतर राज्याच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाची धावपळ सुरु झाली आहे. मुंबईमध्ये दिवसेंदिवस प्रदूषण वाढत चालले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये फुफ्फुसाचे आजार वाढत चालले आहेत. ही वस्तुस्थिती असताना प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आम्ही प्रदूषण रोखण्यासाठी काय काय करीत आहोत त्याची जाहिरात केली जाते. जोपर्यंत प्रदूषण नियंत्रण मंडळातील प्रदूषण थांबणार नाही तोपर्यंत मुंबईतील प्रदूषण थांबणार नाही. काल मुंबईत जी घटना घडली आहे त्यावरुन हे दिसून आले आहे. मी हा प्रश्न दिल्यानंतर ज्या कारखान्यांनी इटीपी बसविलेले नाहीत त्यांना ताबडतोब बंदीच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

त्या नोटीसा दिल्यानंतर पुढच्या तीन दिवसात वीज पुरवठा, पाणी पुरवठा यासंबंधीचा अहवाल आल्यानंतर ते कारखाने बंद केले जातात. प्रश्न पाठविण्यापूर्वी हे कारखाने चालू होते. त्याकडे लक्ष नव्हते. सभागृहामध्ये प्रश्नाला उत्तर द्यायचे म्हणून त्या कारखान्यांना नोटीसा दिल्या. 3 दिवसामध्ये जे कम्प्लायन्स करायचे असते ते होत नाही. याचे कारण यामध्ये आर्थिक लांगेबांधे असतात. माझा प्रश्न असा आहे की, हे इलेक्ट्रोप्लेटिंगचे कारखाने एवढ्या मोठ्या संख्येने चालू असताना, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत असताना ते प्रदूषण न थांबविणारे जे कोणी प्रादेशिक अधिकारी किंवा उप प्रादेशिक अधिकारी असतील त्यांचे याबाबतीत आर्थिक संबंध आहेत असे माझे म्हणणे आहे. तेव्हा याबाबतीत चौकशी करुन संबंधितावर कारवाई करण्यात येणार आहे काय आणि प्रदूषण करणारे कारखाने बंद करणार काय ?

श्री. सचिन अहिर : होय.

श्री. भाई जगताप : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी "होय" असे उत्तर दिलेले आहे. ते उत्तर सकारात्मक आहे. उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर सर्व जागरुक झालेले आहेत. हे त्यांनी स्वत:हून केलेले नाही. उच्च न्यायालयाने याची दखल घेतल्यानंतर याबाबतीत धावपळ झालेली आहे. जल व हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविलेल्या नाहीत अशा 43 कारखान्यांना उत्पादन बंदचे निर्देश देण्यात आले आहेत असे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. या निर्देशांची अंमलबजावणी झालेली आहे की नाही हे पुन्हा तपासण्यात येईल काय? असे प्रदूषण करणारे कारखाने बंद करुन त्याची यादी सभागृहाला सादर केली जाईल काय ?

श्री. सचिन अहिर : माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे आणि सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यानी जे प्रश्न विचारले त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की हे व्यवसाय 10x10च्या खोल्यांमध्ये केले जातात. हे कारखाने चौकशी करुन बंद करण्याचे आदेश दिल्यानंतर आणि महानगरपालिकेने वीज आणि पाणी पुरवठा बंद केल्यानंतर बॅटरीवर हे ऑपरेट करण्याचे प्रयत्न होतात. तसेच छोट्या बादलीमध्ये पाणी आणून, जे कुठेही मिळू शकते, हे व्यवसाय केले जातात. हे व्यवसाय वेळोवेळी बंद केल्यानंतर ते पुन्हा पुन्हा चालू करण्याचा प्रयत्न होतो. जे व्यवसाय चालू असतात त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम आर.ओ. करतात. या बाबतीत पहाणी करण्याचे काम केले जाईल, मोका तपासणीची भूमिका घेतली जाईल, योग्य ती कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील सर्व वीज ग्राहकांना समान दराने वीजदेयके देण्यात येत असल्याबाबत

(२) * २५२१६ श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीजवहन आणि वीज वितरणातील गळती प्रत्येक जिल्हयात आणि विभागात वेगवेगळी असते मात्र, वीजग्राहकांना बिले देताना सरासरी गृहित धरुन अथवा गळतीचा एकत्रित हिशेब करुन राज्यातील सर्व ग्राहकांना समान दराने वीज बील आकारणी केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांमधील वीज बिलाबाबतची विषमता दूर करण्याची मागणी राज्य नियामक आयोगाकडे महाराष्ट्र वीजग्राहक संघटनेने दिनांक ७ जानेवारी, २०१२ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत राज्य सरकार वीज ग्राहकांच्या हितासाठी काय निर्णय घेणार आहे,

(४) नसल्यास, या प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक,श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) वीज वहन व वितरणखालील हानी वेगवेगळी असण्याची अनेक कारणे असून या सर्व कारणांचा सर्वकष विचार करता सर्व परिमंडळांची व मंडळांची सरासरी गृहीत धरुन ग्राहकांचे वीज दर आकारण्याची पध्दत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : वीज ग्राहकांच्या दृष्टीने हा अतिशय चिंताजनक विषयक आहे. वीज वहन आणि वीज वितरण यामधील गळती संबंधीचा हा विषय आहे. ही गळती विविध भागामध्ये विविध प्रकारची आहे. असे असताना संपूर्ण राज्यातील वीज गळती एकत्रित करुन सर्वांना समान चार्जेस लावले जातात. अशा प्रकारे वीज वहन आणि वीज वितरणातील गळतीचा भार ग्राहकांवर का टाकता ?

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील...

वीज वहन आणि गळती ज्या ज्या ठिकाणी आहेत, त्या भागातील अधिकाऱ्यांवर यासंबंधात जबाबदारी फिक्स करुन त्यांचेवर कारवाई करावी असे सिंघल समितीने म्हटले आहे. त्याप्रमाणे त्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल काय ?

श्री. राजेंद्र मुळक : राज्यातील वीज ग्राहकांचे दर ठरविण्याचे अधिकार एम.ई.आर.सी.ला आहेत. आयोगाने ठरविलेल्या दरानुसारच संपूर्ण राज्यातील वीज ग्राहकांवर वर्गनिहाय समान वीज दर आकारणी करण्यात येते. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी ज्या गोष्टीचा उल्लेख केला त्याबाबतीत सांगू इच्छितो की, प्रत्येक जिल्हयात अथवा विभागात वितरण हानी वेगवेगळी असली तरी उच्च दाब व लघु दाब यांचा रेश्यो कॅलक्युलेट करुनच आकारणी होते. वर्गवारीनिहाय ग्राहकांची संख्या यामध्ये लक्षात घेतली जाते. औद्योगिक आणि कृषि ग्राहकांची संख्या व त्यांच्या विजेच्या वापरावर या सर्व गोष्टी अवलंबून असतात. भूमिगत पध्दतीने आणि खांबाच्या वरुन वीज वितरण करतो. असे दोन प्रकार वीज वितरण प्रणालीचे आहेत. भूमिगत वीज वितरणातून लॉसेस कमी प्रमाणात होतात. खांबावरुन वीज वितरण करीत असताना लॉसेस जास्त प्रमाणात होतात. खांबावरुन वीज वितरण करीत असताना त्याची तार तुटली तर त्यास आपण क्लिपींग करतो. त्यामुळे देखील लॉसेस होत असतात. साधारणत: कमर्शियल लॉसेस तीन पध्दतीने होतात. टेक्निकल अडचणीमुळे लॉसेस होतात, वीज चोरीमुळे लॉसेस होतात, संपूर्ण बील दिल्यानंतर समोरच्या पार्टीने अर्धवट बील भरल्यामुळे देखील लॉसेस होतात. ए.बी.सी.डी. आणि ई अशी कॅटेगरी आपण ठरविलेली आहे. ए.बी.आणि सी कॅटेगरीमध्ये आपण लोडशेडींगचे प्रमाण कमी ठेवलेले आहे. तेथे लॉसेस कमी आहेत. बिले देखील वेळेवर भरली जातात. त्यामुळे संपूर्ण राज्यामध्ये एकाच पध्दतीने दराची आकारणी होत असते.

श्री. राजन तेली : कोकणातील तिन्ही जिल्हयांची भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. वीज लॉसेस जुन्या यंत्रणेमुळे होत आहेत. आता आपण नवीन पोल बदलण्याचे काम हाती घेतलेले, त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. महाराष्ट्रात सगळयात जास्त विजेच्या बिलाची वसुली सिधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयात होते. या दोन्ही जिल्हयामध्ये वीज चोरीचे प्रकार अजिबात नाहीत. सिंधुदुर्ग जिल्हयात 60 मे.वॅ.वीज वापरली जाते. सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा आहे. तेथील भारनियमन कायम स्वरुपी बंद करण्यासंबंधीची तरतूद आपणाकडून करण्यात येईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : आपण ए.बी.आणि सी. अशी कॅटेगरी केलेली आहे. जेथे लॉसेस कमी आहेत, जेथे वीज बिलांचा भरणा शंभर टक्के होतो. त्या भागांमध्ये अशा प्रकारची आकारणी करीत नाही. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयाची माहिती दिली. ते जिल्हे ए.बी.आणि सी.या कॅटेगरीत येत असतील तर तसे करण्यात अडचण येणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : वीज चोरी होते, त्याची भरपाई आपण ग्राहकांकडून घेण्याचा प्रयत्न करता. तालुका हा घटक धरुन तुम्ही वीज बिलींग करता. एखाद्या तालुक्यात 100 मे.वॅ.वीज गळती वा वीज चोरी झाली असेल तर ती ग्राहकांकडून थोडी थोडी वसूल करता. हा वसुलीचा प्रकार शासनाकडून थांबविण्याचे काम करण्यात येईल काय ?

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25216.....

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मागील काळात राज्यामध्ये ठराविक भागात खूप मोठया प्रमाणावर वीज गळती होत असे. आपल्याला भिवंडीचे उदाहरण देता येईल. त्या ठिकाणी आपण फ्रेंचायझी सुरु केली. त्या फ्रेंचायझी कंपनीला परवडत असेल, परंतु महावितरण कंपनीला त्याचे चांगले रिझल्ट मिळाल्यानंतर आता नागपूर, जळगाव व औरंगाबाद येथील देखील तो प्रयोग सुरु झाला आहे. "गळती" हा शब्द व्यवस्थित असला तरी खरा शब्द "चोरी" हाच असू शकतो. ज्या भागात वीज चोरीचे प्रमाण जास्त होते, वीज गळती जास्त होत होती ते प्रमाण कमी करण्यास जी काही काटेकोर अंमलबजावणी करावयाची होती ती तीनही कंपन्यांनी केल्यामुळे पूर्वीपेक्षा ट्रान्समिशन लॉसेस कमी करण्यामध्ये आपण यशस्वी झालेलो आहोत. एमईआरसी त्यामध्ये लक्ष देत असते.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी तालुकानिहाय विचार करावा असे सुचविले आहे. आपण डिव्हीजननिहाय ग्रूप पाडले आहेत. त्यामध्ये ए,बी,सी,डी,ई व एफ असे वर्ग केले आहेत. सध्या महाराष्ट्रात उद्योगाकरिता कुठेही भारनियमन ठेवलेले नाही. उद्योगाकरिता 24 तास व आठवड्याचे 7 दिवस 100 टक्के वीज देत आहोत. टप्प्याटप्प्याने पुढे चाललो आहोत. आता आम्ही जे डिव्हीजन अ, ब व क मध्ये मोडतात त्याची वर्गवारी केली आहे. अ मध्ये 0 ते 18 टक्के लॉसेस असणारे विभाग मोडतात. ब मध्ये 18 ते 26 टक्के लॉसेस असणारे विभाग मोडतात आणि क मध्ये 26 ते 42 टक्के लॉसेस असणारे विभाग मोडतात. या अ, ब व क डिव्हीजनमध्ये आपण भारनियमन बंद करण्याचे ठरविले आहे. डी, ई व एफ डिव्हीजनमध्ये भारनियमन चालू ठेवणार आहोत.

सभापती महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, 50 टक्क्यापेक्षा जास्त लॉसेस आहेत असे विभाग एफ डिव्हीजनमध्ये मोडतात. ई डिव्हीजनमध्ये 42 ते 50 टक्के लॉसेस आहेत आणि 34 ते 42 टक्के लॉसेस डी डिव्हीजनमध्ये आहेत. कोणकोणते विभाग ए डिव्हीजनमध्ये मोडतात त्याची माझ्याकडे यादी आहे ती मी पटलावर ठेवतो. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी प्रश्न उपस्थित केल्याप्रमाणे रत्नागिरी जिल्हा अ डिव्हीजनमध्ये मोडतो. तेथे भारनियमनाचा प्रश्न नाही. सिंधुदुर्ग जिल्हा अ व ब मध्ये मोडतो, तेथे कोणतीही अडचण नाही. रायगड जिल्हा अ, ब व क मध्ये असल्यामुळे तेथेही कोणती अडचण नाही. आता ए, बी व सी या तीन डिव्हीजनमध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भारनियमन कमी करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. डी, ई व एफ डिव्हीजनमध्ये भारनियमन वाढविणार आहोत. जेथे गळतीचे प्रमाण जास्त आहे त्या त्या भागातील लोकप्रतिनिधींनी देखील आमच्या तेथील अधिकारी व कर्मचाऱ्यांना भारनियमन कमी करण्याच्या दृष्टीने गळती कमी करण्यास सहकार्य केले पाहिजे, तरच भारनियमन कमी होईल. जे लोक चांगल्या पध्दतीने वीज वापरतात, योग्य वेळी विजेची बिले भरतात त्यांना योग्य पध्दतीने वीज मिळेल. काही भाग मोठ्या प्रमाणात गळती करतात, आपल्याला आश्चर्य वाटेल, इ व एफ डिव्हीजनमध्ये वीज दिल्यानंतर आमच्या विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांचा खर्च देखील त्यातून वसूल होत नाही, इतकी गंभीर परिस्थिती आहे. त्यामुळे उदाहरण म्हणून सांगायचे झाले तर भांडुप हा भाग ए डिव्हीजनमध्ये असेल आणि त्याच्या शेजारीला भाग एफ डिव्हीजनमध्ये असेल तर भांडुपला भारनियमन होणार नाही, परंतु शेजारच्या एफ डिव्हीजनमध्ये 24 तासातील काही तास भारनियमन सुरु राहील. अशी एक नवीन पध्दत ऊर्जा विभागाने सुरु केली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, ज्यांच्याकडे जास्त गळती होते त्याचा भूर्दंड इतरांवर का टाकण्यात यावा? या दृष्टीने ही नवीन पध्दत अंमलात आणल्यानंतर त्यांनाही वाटेल की, गळती करु नये, अन्यथा वीज मिळणार नाही. त्यामुळे बऱ्याच अंशी सुधारणा झालेले चित्र पहावयास मिळेल.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25216.....

श्री विनोद तावडे : महोदय, ज्याप्रमाणे वीज गळती थांबविण्यासाठी चांगला निर्णय घेऊन मंत्री महोदय प्रयत्न करीत आहेत त्याचप्रमाणे राज्यातील चार लाख शेती पंपांचे कनेक्शन्स आजच्या परिस्थितीत बंद आहेत व त्यापोटी 450 कोटीची सबसिडी शासन घेत आहे. तसेच माननीय शिक्षण मंत्री श्री. राजेंद्र दर्डा यांनी पट पडताळणी करुन अनेक शाळांवर कारवाई केली त्याच धर्तीवर आपण या वीज पंपांचे कनेक्शन्सचा राज्यभर सर्व्हे करुन प्रत्यक्षात किती पंप चालतात, किती दाखविण्यात आले आणि वस्तुस्थिती काय आहे हे पाहून अवैध कनेक्शन्स असतील तर संबंधितांवर कारवाई करण्याची शासनाची मानसिकता आहे काय ?

श्री. अजित पवार : महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या विषयाच्या संदर्भात विचार करण्याची वेळ आता आलेली आहे, त्याचा विचार भविष्यात उर्जा विभागाला करावाच लागणार आहे. कारण सन 2005-06 मध्ये विद्युत वितरणाची हानी 32 टक्के होती, सन 2007-08 मध्ये 29 टक्क्यावर आली, त्यानंतरच्या वर्षात सन 2008-09 ती 23 टक्के, 2009-10 मध्ये 17 टक्के, 2010-11 मध्ये 15.5 आणि यावर्षी 2011-12 मध्ये ती 11 टक्क्यावर आली आहे. याचे कारण एमईआरसीने सांगितले होते की, विजेची हानी कमी करावी लागेल. त्याचबरोबर इन्फ्रास्ट्रक्चर आणि गावठाण फिडर सेपरेशनचा कार्यक्रम असेल याबाबतीत देखील आपण प्रयत्न करीत आहोतच. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी शेती पंपांसाठी वीज घेतली जाते आणि त्यातूनच ही गळती होते अशा प्रकारे दाखविले जाते असा मुद्दा उपस्थित केला. म्हणूनच या परिस्थितीत सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. सुरुवातीलाच मी सांगितले की, यामध्ये आपण ए-बी-सी-डी-ई-एफ अशा सहा कॅटेगरीज केल्या त्याच पध्दतीने ज्या भागात अशा गळतीचे प्रकार जास्त प्रमाणात चालतात त्यांचाही विचार सुरु आहे. तसेच घरगुती वापरासाठी लागणाऱ्या विजेच्या बाबतीत आपण फ्रंचाईजी सुरु केली आहे. काल मी एक आढावा घेत असताना असे आढळून आले की, राज्यात असे काही शेतकरी आहेत की, त्यांना विजेचे कनेक्शन दिल्यापासून त्यांनी त्याचे बिलच भरले नाही. त्यात प्रामुख्याने जालना, बीड आणि परभणी या तीन चार जिल्ह्यांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. यासंदर्भात मी त्या त्या जिल्ह्यांच्या पालक मंत्र्यांशी आणि त्या भागातील सन्माननीय सदस्यांशी देखील चर्चा केली व त्यांना आकडेवारीनिशी दाखवून दिले की, यामध्ये

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25216..... श्री. अजित पवार .....

आपल्याला दुरुस्ती करावीच लागणार आहे. तरी देखील या भागात तातडीचे कनेक्शन आवश्यक असतील तर महावितरण असे कनेक्शन देण्यास तयार आहे. तसेच इतर काही बाबी मग त्यात ट्रान्सफार्मर्स, सब स्टेशन्स पाहिजे असतील ते देखील सर्व करुन देण्यास विभाग तयार आहे. पण वापरलेल्या विजेचे बिल भरण्याची मानसिकता मात्र बदलावी लागेल यादृष्टीने शासनाचे प्रयत्न चालू आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, वीज गळती रोखण्यासाठी शासन अनेक उपाययोजना करीत असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. पण ज्या भागात वारंवार गळती होत असते अशा भागात काही वेळा अधिकारी व ग्राहकांच्या संगनमताने सुध्दा अशी गळती होत असते. अशा ठिकाणी विभागाच्या वतीने कोणती दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, तसेच बऱ्याच वेळा असे होते की, सब ऑर्डिनेट अधिकाऱ्याचा अशा केसमध्ये बळी नेहमीच जात असतो म्हणून खरोखरच ज्याची चूकी झाली त्यांनाच जबाबदार धरुन शिक्षा होईल असा प्रयत्न शासन करणार काय ? त्याचबरोबर आणखी एक प्रश्न असा आहे की, यासंदर्भात शुंगलू समितीने काही शिफारशी केल्या आहेत काय ?

श्री. अजित पवार : महोदय, शुंगलू समितीने काही शिफारशी केलेल्या आहेत. पण काही नवीन टेक्नॉलॉजी मार्केटमध्ये येत असतात. आपणास माहितच आहे की, अलिकडच्या काळात तर अशी यंत्रणा कार्यान्वित झालेली आहे की, वीज मंडळाचे एखादे मोठे ग्राहक त्याच्या कंपनीत अथवा कारखान्यात विजेचा वापर करीत असताना त्याने मीटरमध्ये काही गडबड केली तरी प्रकाशगड येथील कार्यालयात ती समजते, अशी व्यवस्था आपण केलेली आहे. जेणेकरुन अशा प्रकारे कुरघोडी करुन कोणी आकडा टाकून वीज चोरी करण्याचा प्रयत्न केला अथवा मीटर बंद करण्याचाही प्रयत्न केला ते देखील आम्हाला समजते. पूर्वीच्या काळात जुने मीटर वितळून टाकत होते, अशा कामांना आमच्या विभागांना अग्रक्रम दिला आणि आता नवीन मीटर्स तयार केले आहेत. बाकीचे जे कमी युनिट वीज वापरणारे आहेत .....

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 25216.....

श्री. अजित पवार .....

जे उद्योजक कमी वीज वापरतात त्यांचाही यामध्ये विचार केला गेलेला आहे. परंतु कोटयावधी रुपयांची ज्यांची बिले येतात त्यांचा अग्रक्रमाने विचार केलेला असून यामधून खूप चांगले रिझल्ट मिळत आहेत व त्यामुळेच आपले टोटल लॉसेस 15.5 टक्क्यापेक्षाही खाली आलेले आहेत. मधल्या काळात विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री. अशिष जयस्वाल यांनी एक रिमोट दाखवला होता. त्यांनी सांगितले होते की, गोंदिया जिल्हयात माझ्या एका मित्राकडे मी गेलो होतो त्या मित्राच्या हातात रिमोट होता व त्या रिमोटने माझा मित्र विजेचे मीटर बंद-सुरु करीत होता. चेकींगसाठी कोणी आले की, रिमोटने मीटर सुरु करीत होता. यासंदर्भात आम्ही खोलात गेलो तेव्हा मध्यप्रदेशामध्ये अशा रितीने रिमोट विकसित केले जात असल्याचे आम्हाला आढळून आले होते. या सर्व गोष्टी बंद व्हाव्यात यासाठी आम्ही कसोशीने प्रयत्न केलेले आहेत. ज्या विभागात गळती जास्त होते त्याचा बोजा सर्वांना विभागून दिला जात असतो परंतु यापुढे असे होऊ नये यासाठी प्रयत्न केले जात आहे. जो व्यवस्थित वीज वापरतो त्याला त्याचा भुर्दंड बसू नये, तो जेवढी वीज वापरतो तेवढयाच विजेचे त्याला बील यावे यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत तसेच जे चुकीचे काम करीत असतील त्यांना शासन व्हावे यासाठी ऊर्जा विभागाचे काम सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(३) * २५७०१ श्री.सतीश चव्हाण , श्री.एम.एम.शेख , श्री.विक्रम काळे , श्रीमती शोभा फडणवीस , डॉ.रणजित पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.वसंतराव खोटरे , डॉ.नीलम गोऱ्हे , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.राजन तेली , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.जयप्रकाश छाजेड : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील नागरिकांना अत्याधुनिक आरोग्यसुविधा मिळाव्यात म्हणून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातंर्गत (एन.आर.एच.एम.) आयुष योजनेतंर्गत केंद्र शासनाने राज्य शासनाला सन २०१०-११ या वर्षासाठी सुमारे ६ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी निधीच्या वापरासाठी नियोजन न केल्यामुळे तब्ब्ल ३ कोटी ५८ लाख रुपये इतकी रक्कम केंद्र शासनास परत गेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेसाठी सन २०११-१२ या वर्षासाठी केंद्र शासनाने राज्य शासनास दिलेल्या १३ कोटी ९४ लाख रुपयांच्या निधी पैकी २३ टक्के म्हणजे शासनास दिलेल्या १३ कोटी ९४ लाख रुपयांच्या निधी पैकी २३ टक्के म्हणजे केवळ ३ कोटी ३३ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निधी खर्च करणाऱ्या संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, उक्त प्रकरणी चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुरेश शेट्टी : (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

तथापि, माहे फेब्रुवारी, २०१२ अखेर रु.७ कोटी ७३ लाख खर्च झाला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सन 2010-2011 मध्ये केंद्र शासनाकडून आयुष योजनेअंतर्गत निधी मिळाला होता त्यातील 56 टक्के निधी परत गेला आहे हे खरे आहे काय, सन 2011-2012 या संपलेल्या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून आयुषसाठी किती निधी प्राप्त इ ाला व मिळालेला निधी पूर्णपणे खर्च झाला काय, महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे जादा निधीची मागणी केलेली आहे काय ?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, एनआरएचएम अंतर्गत केंद्र शासनाकडून महाराष्ट्र शासनाला निधी उपलब्ध होत असतो. या योजनेअंतर्गत येणारा निधी परत जात नाही. केंद्र शासन आपल्याला जे काही पीआयपी देत असते ते पैसे खर्च झाले नाही तर सदर निधी पुढील वर्षासाठी कॅरीफॉरवर्ड केला जात असतो. सन 2009-2010,2010-2011,2011-2012 या वर्षात आपल्याकडे जे पैसे शिल्लक होते त्याचे कारण म्हणजे सन 2008-2009 या वर्षात आयुष योजना केंद्र शासनाने सुर केली होती. आयुष व एनआरएचएम हे दोन वेगवेगळे विभाग आहेत. आयुषसाठी सन 2008-2009 मध्ये तरतूद करण्यात आली होती परंतु त्यावर्षी केंद्र शासनाने एक रुपया सुध्दा दिला नव्हता. सन 2009-2010, 2010-2011 मध्ये आपण आयुषचा कार्यक्रम सुरु केला होता. परंतु यासंदर्भातील पीआयपीच्या हेड अंतर्गत जे पैसे होते ते पैसे आपण पगार, प्रशिक्षण व जाहिरातीसाठी वापरत होतो.

परंतु सन 2010-2011 मध्ये कळविले होते की, पीआयपीचे पैसे आयुषसाठी वापरु नका. आयुषचा कार्यक्रम आपण 101 केंद्रामध्ये सुरु केला होता तो बंद करण्याचा निर्णय घेतला आणि तीन महिन्यानंतर यासंदर्भातील धोरण पुन्हा बदलले. त्यामुळे डॅक्टरांच्या तीन महिन्यांच्या पगाराचे पैसे आपल्याला अकाऊंटमध्ये दिसतात. सदर पगाराचे पैसे परत जाणार नाहीत. सन 2011-2012 मध्ये 1394.8 कोटी रुपये केंद्रशासनाकडून उपलब्ध झाले असून त्या पैशाचा आपण चांगल्या प्रकारे विनियोग केलेला आहे. सन 2012-2013 मध्ये औषधासांठी आयुष विभागाकडून पैसे मिळणार आहेत. आयुषने असा निर्णय घेतला आहे की, पगार, प्रशिक्षण व जाहिरातीचा कार्यक्रम एनआरएचएम मधून करण्यात यावा. आता एनआरएचएम व आयुष या विभागामध्ये एकमत झालेले आहे. यासंदर्भातील क्लिअर नॉर्म्स केंद्र शासनाने दिलेले आहेत. पहिल्यांदाच आपण एनआरएचएममधील 95 टक्के निधीचा विनियोग केलेला आहे. त्याप्रमाणे पुढील वर्षी जास्त फंड मंजूर होईल व चांगल्या प्रकारे पुढेही काम होईल असे मी आश्वासन देतो.

यानंतर श्री. सरफरे...

अशुद्धित प्रत / मुद्रणासाठी नाही

विविध क्षेत्रातील विभागीय अनुशेष निश्चित करुन तो दूर करण्यासाठी स्थापन केलेल्या सत्यशोधक समितीच्या अहवालाबाबत

(४) * २६४९१ श्री.राजन तेली , प्रा.सुरेश नवले , श्री.एम.एम.शेख , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :

सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने माहे ऑगस्ट, १९८३ मध्ये विकासाच्या विविध क्षेत्रातील विभागीय अनुशेष निश्चित करण्यासाठी व तो दूर करण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी एक सत्यशोधन समिती स्थापन केली असून सत्यशोधन समितीने माहे जून, १९८४ मध्ये आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सत्यशोधन समितीने आपल्या अहवालात ९ विकास क्षेत्रात भौतिक अनुशेषाशी अनुक्रमे पाटबंधारे आरोग्य पाणी पुरवठा व तांत्रिक शिक्षण या विभागांनी मतभिन्नता दर्शविली आहे, हे खरे आहे काय,

(३) मा. राज्यपालांनी निर्देशांक व अनुशेष समितीचे पुर्नगठन करुन पाटबंधारे (कडा), आरोग्य, पाणीपुरवठा व तांत्रिक शिक्षण या विभागांनी निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालातील संबंधित विषयावर दिलेले अभिप्राय विचारात घेऊन विकास क्षेत्रात भौतिक व आर्थिक अनुशेष निश्चित करणे हे समितीचे कार्य विचारात घेऊन त्याचा विकास क्षेत्रनिहाय आणि विकास क्षेत्राचा मूळ निर्देशांक व अनुशेष शासनाने दूर करण्यासाठी तरतूद करण्यात येत आहे वा करण्यात आली आहे काय,

(४) अद्याप, या प्रकरणी निर्णय प्रलंबितावस्थेत असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अनुशेष व निर्देशांक समितीने निश्चित केलेल्या भौतिक अनुशेषाशी पाटबंधारे (कडा), आरोग्य, पाणी पुरवठा व तांत्रिक शिक्षण या विभागानी मतभिन्नता दर्शविल्यामुळे मा.राज्यपालांनी निर्देशांक व अनुशेष समितीचे पुर्नगठन केले. निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालातील संबंधित विषयावर विभागानी दिलेले अभिप्राय विचारात घेऊन व संबंधित विभागाशी चर्चा करून या विकास क्षेत्रात ३१ मार्च, १९९४ रोजीचा भौतिक व आर्थिक अनुशेष निश्चित करणे हे या पुनर्गठीत समितीचे कार्य ठरविण्यात आले. पुनर्गठीत समितीने या विभागांचे अभिप्राय विचारात घेऊन ३१ मार्च, १९९४ रोजीचा अनुशेष रू.१४००६.५७ कोटी असा निर्धारित केला. मा.राज्यपालांनी निर्देशांक व अनुशेष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २६४९१....

श्री. अजित पवार...

समितीने दर्शविलेल्या अनुशेषापैकी दिनांक १.४.२००० रोजीचा शिल्लक भौतिक अनुशेष व त्यांची किंमत निश्चित करण्याबाबत सूचित केल्यानुसार वार्षिक योजना १९९४-९५ ते १९९९-२००० पर्यंत झालेल्या खर्चातून समितीने दर्शविलेल्या अनुशेषापैकी दूर झालेला भौतिक अनुशेष व त्याची दिनांक १.४.२००० च्या मापदंडानुसार किंमत याबाबतची माहिती मा.राज्यपालाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली होती. सदर अनुशेषास मान्यता देताना मा.राज्यपालानी दिनांक १.४.२००० रोजीचा एकूण शिल्लक अनुशेष रू. ११९७४.४४ कोटी असल्याचे कळविले. या अनुशेषानुसार सन २०००-०१ पासून अनुशेष दूर करण्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, शासनाने १९८३ मध्ये वेगवेगळया विभागातील अनुशेष निश्चित करण्यासाठी एक सत्यशोधन समिती निर्माण केली होती. त्या समितीने दिलेला अहवाल शासनाने स्वीकारला. त्यानंतर दिनांक १ एप्रिल २०००रोजी माननीय राज्यपालांनी ११ हजार ९७४ कोटी ४४ लाखाचा अनुशेष असल्याचे कळविले असून आजची स्थिती काय आहे याची आम्हाला माहिती मिळाली पाहिजे. सभापती महोदय, सन २००१ ते २०११-१२ पर्यन्त १६ हजार २९ कोटी ७०लाख एवढी तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी १२ वर्षात ६ हजार २२ कोटी ७१ लाख एवढी रक्कम खर्च झाली.म्हणजे एकूण ३७.५७ टक्के एवढा खर्च झाला ही गोष्ट खरी आहे काय? हा विभागीय अनुशेष आपण केव्हा पूर्ण करणार आहात? दुसरा प्रश्न असा की, केळकर समितीचा अहवाल अजून आलेला नाही तो केव्हा येणार आहे? आणि शेवटचा प्रश्न असा की, महाराष्ट्रामध्ये प्रति हेक्टर ४ लाख १८ हजार ९१४ एवढा सिंचनावरील खर्च दाखविण्यात आला दाखविला आहे.सन २०११-१२ मध्ये कोकणामध्ये प्रति हेक्टरी खर्च २२ लाख २२ हजार एवढा आहे यापैकी नक्की खरे काय आहे? त्यावर आपण कोणती उपाय योजना करणार आहात. महाराष्ट्रामध्ये एक आणि कोकणामध्ये हा फरक ठेवण्याचे कारण काय, त्यासाठी आपण तरतूद केव्हा करणार आहात

श्री. अजित पवार : सभापती महोदय, या प्रश्नाची व्याप्ती मोठी असून आपल्या दृष्टीने तो महत्वाचा आहे. आपल्याला आठवत असेल की, ३ ऑगस्ट १९८३ रोजी शासनाने निर्णय घेऊन विकासाच्या विविध क्षेत्रातील अनुशेष निश्चित करण्यासाठी डॉ. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २६४९१....

श्री. अजित पवार...

सत्यशोधन समिती स्थापन केली होती. त्या समितीने आपला अहवाल १९८४ मध्ये शासनाला सादर केला. त्यानंतरच्या काळात ३ हजार १८६.७८ कोटींचा अनुशेष निश्चित करण्यात आला. त्यावेळी सर्व कामे चालू होती त्या वेळी आपल्याकडे काही लोकांनी वेगळी भूमिका मांडली. त्यानंतर नोव्हेंबर १९९५ मध्ये निर्देशांक व अनुशेष समितीची स्थापना झाली. स्थापन करण्यात आलेल्या समितीमधील एक सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब या ठिकाणी बसले आहेत. त्याचप्रमाणे श्री. अरुण अडसड आणि श्री. माधव जोग यांनाही त्या समितीवर स्थान देण्यात आले होते. त्या समितीने आपला अहवाल ११ जुलै १९९७ रोजी सादर केला. सत्यशोधन समितीने ९ विकास क्षेत्रांचा अनुशेष काढला होता. त्या क्षेत्राची मार्च १९९४ पर्यंत झालेली प्रगती विचारात घेऊन या समितीने १५ हजार ३५५ कोटींचा अनुशेष निश्चित केला. परंतु त्यामध्ये जलसंपदा, आरोग्य, पाणीपुरवठा व तांत्रिक शिक्षण या विभागांनी समितीने निश्चित केलेल्या भौतिक अनुशेषामध्ये मतभिन्नता दर्शविली म्हणून माननीय राज्यपालांनी त्या समितीचे पुनर्गठन केले. त्यानंतर १५ हजार ३५५ कोटींचा अनुशेष १४ हजार ६ कोटी ५७ लाखापर्यन्त आला असून मार्च १९९४ पर्यन्त तो निश्चित केला आहे.

सभापती महोदय, हे सर्व करीत असतांना माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार वेगवेगळया विभागाला जो काही निधी द्यावयाचा होता त्याप्रमाणे निधी देण्याचे काम चालू होते त्यावेळी अनेक बाबतीत असलेला अनुशेष दूर करण्याचे काम झाले आहे. परंतु जलसंपदा विभागाचा अनुशेष राहिला होता. आता मधल्या काळात जल संपदा विभागाचा आर्थिक अनुशेष जवळ जवळ पूर्ण केला आहे त्या संदर्भात चर्चा देखील झाली आहे.परंतु बऱ्याच जणांचे असे म्हणणे आहे की, वित्तीय अनुशेष भरुन काढला असला तरी परंतु भौतिक अनुशेषाच्या संदर्भात वेगवेगळया विभागाच्या माननीय सदस्यांचे वेगवेगळे मत आहे.

(यानंतर श्री. भारवि)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26491...

श्री.अजित पवार...

त्यामुळे अनेक वेगवेगळे मुद्दे पुढे आले आहेत. दोन्ही सभागृहामध्ये चर्चा झाली. त्यावेळी प्रत्येक सन्माननीय सदस्यांने आपली भूमिका मांडली. सन्माननीय सदस्य माननीय राज्यपाल महोदयांना जाऊन भेटले. माननीय राज्यपाल यांच्या निदेशानुसार राज्य सरकारने तज्ज्ञांची समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेतला.

दिनांक 31 मे 2011 रोजी डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समिती नियुक्त करण्यात आली आहे. या समितीला मे 2012 पर्यंत समितीला मुदतवाढ देण्यात आली आहे. समितीने आता पर्यंत 9 बैठका घेतल्या आहेत. नागपूर, औरंगाबाद, अमरावती या महसुली विभागांचे दौरे देखील केले आहेत. सन्माननीय सदस्य कदाचित आपले मते मांडण्यासाठी या समितीला भेटले असण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. या उच्चस्तरीय समितीची कार्यकक्षा ठरविली आहे. हा असमतोल दूर होण्यासाठी उपाययोजना सुचविणे व त्या अनुषंगाने विकासात्मक निधीच्या वाटपाचे सूत्र ठरविणे, भविष्यात पुन्हा असमतोल निर्माण होऊ नये म्हणून उपाय सुचविणे, त्या अनुषंगाने वैधानिक विकास मंडळाच्या भूमिकेबाबत सूचना करणे, या त्यातल्या महत्वाच्या बाबी आहेत. इतर विकासांचा क्षेत्रीय असमतोलचा अंदाज घेण्यासाठी इंडिकेटर ठरविणे, सन 2010 अखेर अगदी अलीकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे महाराष्ट्राच्या सरासरी संदर्भात विकासाचा असमतोल निश्चित करणे, हे करीत असताना राज्य शासनाची थेट गुंतवणूक किंवा खर्च राज्य व केंद्र शासनाच्या मदतीने खाजगी औद्योगिक क्षेत्रात झालेली गुंतवणूक याचा देखील आपण विचार करायला सांगितला आहे. निश्चित केलेल्या इंडिकेटर पैकी प्राधान्याने कोणत्या इंडिकेटरवर कार्यवाही होऊ शकेल ही देखील मर्यादा ठरविली आहे.

मला सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांना सांगावयाचे आहे की, पूर्वीच्या काळात पर हेक्टरी जलसंपदा विभागाची कामे करण्याकरिता अडीच लाख, साडेतीन लाख रूपये खर्च वाढला. ही देखील तफावत झालेली आहे. त्यामुळे देखील काही भागांवर अन्याय होऊ शकतो. त्यामुळे ह्या सर्व बाबींचा विचार करून आघाडी सरकारची हीच भूमिका आहे की, कुठेही असमतोल राहता कामा नये. सगळया भागांना व्यवस्थितपणे न्याय मिळाला पाहिजे. डॉ.विजय केळकर यांच्या समितीमध्ये अर्थशास्त्रज्ञांसह त्या त्या विभागातील तज्ज्ञ सदस्य म्हणून आहेत. त्यामुळे ही समिती अत्यंत बारकाईने सर्व गोष्टींचा अभ्यास करीत आहे. अभ्यास केल्यानंतर त्यांचा जो काही ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अहवाल असेल तो माननीय राज्यपाल महोदयांना सादर करण्यात येईल. विदर्भ, मराठवाडा,उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, कोकणातील जे सन्माननीय सदस्य आहेत त्यांच्या मनामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या शंका कुशंका निर्माण झाल्या आहेत. एका भागातील माननीय सदस्य माननीय राज्यपालांना भेटून आल्यानंतर दुसऱ्या भागातील सन्माननीय सदस्य माननीय राज्यपाल महोदयांना जाऊन भेटतात. अशा प्रकारे प्रत्येक जण आपापल्या परीने जाऊन माननीय राज्यपाल महोदयांना भेटून आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न करतात. लोकशाही मध्ये प्रत्येकाला आपली भूमिका मांडण्याचा अधिकार आहेच, त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. माननीय राज्यपाल महोदयांना सर्वाधिकार दिलेले आहेत. त्यामुळे तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण, सार्वजनिक आरोग्य विभाग, जलसंपदा इत्यादी विभागांमध्ये अनुशेष राहू नये, अशा पद्धतींचे त्यांचे काम चालले आहे. त्यांच्या सूचनेप्रमाणे राज्य सरकार आणि राज्य सरकारचा नियोजन विभाग काम करीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अनुशेषासंबंधातील पूर्व पीठिका आणि आताची परिस्थिती याबाबत सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी विस्तृत भूमिका मांडली आहे. मी त्याच्यावर चर्चा करीत नाही. कारण त्यांना मान्य आहे की, भौतिक अनुशेष राहिलेला आहे. आर्थिक अनुशेष दर वाढल्यामुळे वाढला आहे.

सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी केळकर समितीचा उल्लेख केला आहे. म्हणून आपल्या एक गोष्ट निदशास आणून द्यायची आहे की, केळकर समिती न्याय देऊन वागत नाही अशी आज परिस्थिती आहे. अमरावती विभागामध्ये त्यांच्यावर पूर्ण बहिष्कार टाकण्यात आला होता. मराठवाड्यामध्ये कमिटी गेली तेव्हा श्री.भुजंगराव कुलकर्णी यांच्या सारख्या व्यक्तिला ते भेटले होते.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

ता.प्र.क्र.46491 . . . .

श्री.दिवाकर रावते . . . .

या सर्व मंडळींना समोर बसविले होते आणि अडीच तासामध्ये प्रश्न संपवावेत. त्यापुढे एक मिनिट बोलावयाचे नाही अशा प्रकारे तेथे सांगण्यात आले. शेवटी तेथे वादावादी झाली. अशा प्रकारे जर केळकर समिती काम करणार असेल तर ते बरोबर नाही. त्यांनी तालुका निहाय काम करावे असे निर्देश आहेत. खरे म्हणजे 371 (2)प्रमाणे वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून जिल्हा निहाय अनुशेष काढावयाचा आहे.पण त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील जे काही तालुके आहेत, त्यांनाही न्याय मिळाला पाहिजे ही सर्वांचीच भूमिका आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही शेतकऱ्याला पाणी मिळाले पाहिजे ही सर्वांची भूमिका आहे. परंतु त्यावेळी अनुशेष वाढेल असे काही होता कामा नये तर तो कमी होईल असे पाहिले पाहिजे.पूर्वी अर्थ खात्याकडून माननीय राज्यपालांचे निर्देश पाळले जात नसत, ते धुडकावले जात असत. शेवटी कडक समज देण्यात आल्यानंतर अर्थ खात्याने ते स्वीकारण्यास सुरुवात केली. माझी भूमिका अशी आहे की, केळकर समितीच्या माध्यमातून आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, अमरावती डिव्हीजनमध्ये एक सन्माननीय सदस्य श्री.बच्चू कडू सोडले तर सर्वांनी समितीवर बहिष्कारच टाकला.

सभापती महोदय, मी स्वत: परवा मराठवाड्यामध्ये होतो.त्यावेळी मला सन्माननीय ज्येष्ठांनी जे सांगितले ते अत्यंत व्यथित करणारे आहे.एकेका जिल्ह्यामध्ये गेला तर अडीच तास लागतील अशी परिस्थिती आहे आणि महाराष्ट्रामध्ये हे सिध्द झाले आहे की, मराठवाड्यातील सर्वच्या सर्व 8 जिल्हे, विदर्भातील 5 जिल्हे हे कायम स्वरुपी अनुशेषांतर्गत आज अत्यंत निम्न स्तरावर आहेत असे असताना अडीच तासामध्ये अनुशेषाच्या बाबतीत तुमचे जे काही म्हणणे आहे ते मांडावे अशा प्रकारचे कोणी आव्हान देणार असतील तर ती गंभीर बाब आहे हे मी या निमित्ताने सन्माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणत आहे आणि आम्ही माननीय राज्यपालांकडे याबाबतीत जात आहोत, तो अधिकार आहे, मागावयाचा हक्क आहे आणि महाराष्ट्रातील शेतकरी तहानलेला असेल तर त्याला पाणी मिळाले पाहिजे हे बरोबर आहे. परंतु मी केळकर समितीच्या बाबतीत जी भूमिका मांडत आहे, ती जर त्या-त्या भागातील लोकांना अन्यायाची वाटत असेल तर त्याबाबतीत देखील माननीय राज्यपाल महोदयांनी विचार करावा असे मी आपल्या माध्यमातून, सरकारच्या माध्यमातून निदर्शनास आणून देत आहे. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी येथे एक मुद्दा उपस्थित केला आहे.जरुर या संदर्भात सरकारच्यावतीने 13 व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष आणि त्यांची जी समिती आहे, त्यांच्या कानावर ही गोष्ट घालण्यात येईल की, सदनामध्ये एका विषयाच्या बद्दल चर्चा होत असताना ज्यांचा या विषयाबाबत खूप गाढा अभ्यास आहे अशा सन्माननीय सदस्यांनी ही भूमिका मांडलेली आहे आणि आम्ही माननीय राज्यपाल महोदयांबरोबर वेगवेगळया विषयावर चर्चा करतो. कारण शेवटी प्रत्येक भागाला असे वाटत असते की, आपल्यावर अन्याय होऊ नये. काही भागाला असे वाटत असते की, जर जिल्हा बेस धरला तर आपल्यावर अन्याय होतो म्हणून तालुका बेस धरावा. काही ठिकाणी तालुका बेस धरला तर काही ठिकाणी मुळातच जिल्हा बेस धरुन अनुशेष काढण्यात आला तेथे आजही अनुशेष आहे अशा प्रकारची भावना त्या-त्या भागातील लोकप्रतिनिधींची आहे, त्या भागातील शेतकऱ्यांची आहे किंवा जनतेची आहे ही देखील वस्तुस्थिती आहे. त्यामुळे एकंदरीत हे सर्व काम करीत असताना कुठेही कोणालाही आमच्यावर अन्याय झाला आहे अशा प्रकारची भावना निर्माण होता कामा नये अशा प्रकारची खबरदारी या समितीने घ्यावी अशा सूचना करण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, जल संपदाच्या बाबतीत खर्च वाढत आहे. त्यामुळे यासाठी जो निधी देण्यात आलेला आहे, तो अपुरा पडत आहे. जल संपदा विभागामध्ये आज ठरलेल्या एस्टीमेट पेक्षा सहा महिन्यामध्ये दुप्पट, तिप्पट एस्टीमेट वाढविण्याची जी स्पर्धा लागलेली आहे त्याबाबतीत अर्थ विभाग काही लक्ष देणार आहे की नाही ? तसेच अर्थ विभाग यावर काही अंकुश ठेवणार आहे की नाही ? त्यामुळे सदरहू निधी एकाच योजनेवर जास्त प्रमाणात खर्च होत असल्याने अशा प्रकारे हे पैसे वाया जात आहेत. म्हणून याठिकाणी ज्यापध्दतीने एस्टीमेट वाढविण्याचे सत्र सुरु आहे त्यावर अंकुश ठेवण्याचे काम अर्थ खाते करणार आहे काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांनी जे सांगितले त्या प्रमाणे असे कोणत्याही बाबतीत घडता कामा नये. कारण शेवटी निधी हा जो कररुपाने जमा झालेल्या पैशातून दिला जातो.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26491 ..... श्री. अजित पवार ...

त्यामुळे ही जी काही चर्चा अलीकडच्या काळामध्ये सातत्याने सुरु झालेली आहे त्याकरिता मी माझ्या वित्त व नियोजन या दोन्ही विभागांच्या प्रधान सचिवांना सूचना दिलेल्या आहेत की, या सगळ्या बाबी बारकाईने तपासाव्यात. कोणत्याही परिस्थितीमध्ये हे जे काही सांगितले जाते त्यामध्ये तथ्य असेल तर जे कोणी अधिकारी यामध्ये दोषी असतील तर त्यांच्या संदर्भातील कारवाई झाली पाहिजे. जर तथ्य नसेल तर तेही समोर आले पाहिजे की, यामध्ये तथ्य नाही. परंतु वस्तुस्थिती मात्र सर्वांना समजली पाहिजे अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना मी दिलेल्या आहेत.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, माननीय राज्यपाल महोदय ने जो निदेश क्लॉज 7 के अंतर्गत दिया है और माननीय उप मुख्यमंत्री महोदय ने भी जैसा कहा कि जब तक डॉ. विजय केळकर की रिपोर्ट नहीं आती तब तक राज्यपाल महोदय ने जो आदेश दिया है और जो उन्होंने विदर्भ इरीगेशन डॅवलपमेंट कारपोरेशन के द्वारा 8305 करोड़ रुपए का जो प्रोजेक्शन पांच सालों में बैकलॉग दूर करने के लिए किया है, क्या वह निधि शासन उपलब्ध कराएगा ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि गोसीखुर्द योजना के लिए शासन ने जो पैसा ईअरमार्क किया है, क्या वह पूरा फंड भी गोसीखुर्द योजना के लिए शासन के द्वारा उपलब्ध कराया जाएगा ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आमचा प्रयत्न हा अनुशेष लवकरात लवकर निघावा असाच आहे. परंतु काही अडचणी अशा येऊ लागल्या की, गोसीखूर्द प्रकल्पाच्या संदर्भामध्ये विदर्भातील काही लोकप्रतिनिधी सातत्याने नियोजन विभागाला आणि वित्त विभागाला सूचना देतात की, तुम्ही त्या ठिकाणी अजिबात निधी देऊ नका, त्या ठिकाणी चौकशी करा, अमुक करा, तमुक करा. याकरिता सातत्याने चर्चा केली जाते. विधानसभेतील दोन सन्माननीय सदस्य तशा प्रकारचे रेकॉर्ड तयार करीत आहेत, पत्र देत आहेत. मधल्या काळामध्ये दोन वर्षापूर्वी या संदर्भामध्ये एकसदस्यीय वडनेरे कमिटी नेमलेली होती. त्यांनी त्या संदर्भामध्ये सगळी चौकशी केली. त्यांचाही अहवाल आपल्याकडे आलेला आहे. त्यामध्ये कोण संबंधित दोषी आहेत, कोणकोणते अधिकारी दोषी आहेत, त्यांच्यावर काय कारवाई केली गेली पाहिजे याबद्दलच्या सूचना सुध्दा दिल्या गेल्या आहेत. हा गोसीखूर्द प्रकल्प आपल्या विदर्भाला आणि विशेषत: नागपूर जिल्ह्याचा काही भाग तसेच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26491 ..... श्री. अजित पवार ...

चंद्रपूर जिल्हा, भंडारा जिल्हा या सर्व भागाला वरदान ठरणारा आहे. अडीच लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणारा हा प्रकल्प आहे.

मी दोन तीन दिवसांपूर्वी काही कामाच्या निमित्ताने काटोलला गेलो होतो त्यावेळी मला असे समजले की, श्री. प्रफुल्लभाई पटेल स्वत: त्या प्रकल्पाला भेट देण्यासाठी गेले होते आणि त्यांच्याबरोबर राज्य सरकारचे मंत्री आणि अधिकारीवर्ग सुध्दा होते. सांगायचे तात्पर्य एवढेच आहे की, केंद्र सरकारने फक्त आपल्या राज्यातील प्रकल्प असताना देखील त्या प्रकल्पाला राष्ट्रीय प्रकल्प म्हणून मान्यता दिली. वास्तविक दोन राज्याशी संबंधित प्रकल्प असल्यानंतर त्याला राष्ट्रीय प्रकल्प म्हणून मान्यता देतात. स्व. राजीवजी गांधी यांनी या प्रकल्पाचे भूमिपूजन केले होते. त्यामुळे शासनालाही असे वाटते की, हा प्रकल्प लवकर मार्गी लागावा. त्यामध्ये माजी मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण साहेबांनी सुध्दा लक्ष घातले होते आणि एक पॅकेज दिलेले होते. आताही गेल्या महिन्यातच आमची एक बैठक माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांच्या उपस्थितीत झाली. अजूनही तेथील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबद्दल काही प्रश्न आहेत. त्यांच्या ज्या अडचणी होत्या त्याही दूर करण्याकरिता आम्ही अधिकची मदत करण्याची भूमिका घेतलेली आहे. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, जर काही चुकीचे झाले असेल तर चुकीच्या बाबीचे समर्थन करण्याचे काही कारण नाही. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. परंतु हा प्रकल्प सुध्दा लवकर मार्गी लागण्याच्या दृष्टीकोनातून ज्यांना ज्यांना ज्या ज्या ठिकाणी मदत करता येईल ती मदत त्यांनी करावी. राज्य सरकारची मदत करण्याची भूमिका आहेच.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांना मी धन्यवाद देतो. त्यांनी गोसीखूर्द प्रकल्पाच्या संदर्भात विस्तृतपणे मांडले. गोसीखूर्द प्रकल्पाला राष्ट्रीय प्रकल्पाचा दर्जा देऊन महाराष्ट्राच्या प्रकल्पाचा देश पातळीवर सन्मान केला हेही बरोबर आहे. 2 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर झाले होते. त्यातील 1300 कोटी रुपये आले परंतु 700 कोटी रुपये आलेले नाहीत. गोसीखूर्द प्रकल्पाच्या संदर्भात आपल्याकडून केंद्राकडे मोठ्या प्रमाणावर तक्रारी गेल्यामुळे ते 700 कोटी रुपये राहिलेले आहेत अशा प्रकारची जी चर्चा त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26491 ..... श्री.दिवाकर रावते ....

ठिकाणी आहे ती बरोबर आहे का ? अशा कोणत्या स्वरुपाच्या तक्रारी गेलेल्या आहेत आणि त्या बाबतीत राज्य सरकारकडून नक्की काय निराकरण होणार आहे ? ते 700 कोटी रुपये तातडीने येऊन गोसीखूर्द प्रकल्प आपण सांगितल्याप्रमाणे अडीच लाख हेक्टर सिंचनाचा असल्यामुळे तो तातडीने व्हावा अशी जी इच्छा आपण व्यक्त केलेली आहे त्याबद्दल आनंद व्यक्त करीत असताना हे 700 कोटी रुपये तातडीने कसे येतील या बाबतीत आपण कोणती उपायोजना केलेली आहे ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, हा प्रकल्प एआयबीपीमध्ये घातलेला आहे. महाराष्ट्र सरकारने अनेकदा पाठपुरावा करुन केंद्र सरकारमध्ये असलेल्या अनेक मंत्री महोदयांशी संपर्क साधला आणि एआयबीपीचा जास्तीत जास्त निधी आपल्या राज्याला मिळावा म्हणून प्रयत्न केला आणि सुदैवाने देशात एआयबीपीचा सर्वात जास्त निधी आपल्या महाराष्ट्राला मिळतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26491... श्री.अजित पवार...

मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, हा निधी येत असताना त्याबाबत तक्रारी करण्यात आल्या होत्या. या योजनेमध्ये केंद्र सरकारची 90 टक्के व राज्य सरकारची 10 टक्के रक्कम आहे. केंद्र सरकारची मोठी रक्कम असल्यामुळे त्यांच्याकडे या संदर्भात तक्रारी गेल्यानंतर त्यांनी एका समितीला पाहणीसाठी पाठविले होते. त्या समितीने त्याची पाहणी केली आहे. पाहणी केल्यानंतर त्यांना जे योग्य वाटले आहे त्याबाबत त्या समितीने केंद्र सरकारच्या संबंधित विभागाला अहवाल सादर केलेला आहे. या सगळ्या गोष्टी झाल्यानंतर आता मात्र त्यांच्याकडून निधी येऊ लागला आहे.

मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, यामध्ये जर काही चुकीचे झाले असेल, ज्यांनी चुकीचे केलेले असेल त्यांना शासन झाले पाहिजे. त्यांना पाठीशी घालण्याचे कारण नाही. परंतु एका चांगल्या प्रकल्पाच्या दृष्टीने सातत्याने तक्रारी करणे, गेल्या 2-3 वर्षांपासून काही सन्माननीय सदस्य मोठ्या प्रमाणावर लेखी तक्रारी करीत आहेत. मी व माननीय राज्यमंत्री ब्रिफिंग घेत होतो त्यावेळी वित्त व नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांनी असे सांगितले आहे की, प्रत्येक महिन्याला तक्रारीचे एक पत्र येत असते. तक्रार आल्यानंतर त्या तक्रारीची चौकशी केली जाते. या संदर्भात एक सदस्यीय समिती नेमण्यात आली होती. त्यांनीही त्याबाबतचा अहवाल सभागृहाला सादर केलेला आहे. त्यांनी अहवाल सादर केला नसेल तर सादर करण्याच्या सूचना विभागाला देण्यात येतील. हे काम लवकर व्हावे असाच शासनाचा प्रयत्न आहे. माझ्या माहितीप्रमाणे 700 कोटी रुपये बाकी होते. त्या संदर्भात राज्याचे माननीय जलसंपदा मंत्री व या विभागाचे सचिव केंद्र सरकारकडे गेले होते. केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनाही ते भेटले आहेत. त्याचप्रमाणे या विषयाशी संबंधित असलेल्या मंत्री महोदयांना सुध्दा भेटलेले आहेत. 2-3 दिवसांपूर्वी माननीय केंद्रीय मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल यांनी बावनथडी, गोसीखूर्द व इतर दोन प्रकल्पांची पाहणी केलेली आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात बालकांचे कुपोषणामुळे होणारे मृत्यू कमी करण्यासाठी करावयाची कार्यवाही

(5) * 25263 श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात गत् वर्षी 17,700 बालकांचा कुपोषणाने मृत्यू झाल्याचे दिनांक 16 डिसेंबर, 2011 रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्यात वाढत असलेले कुपोषणामुळे होणारे मृत्यू कमी करणेबाबत शासनमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.वर्षा गायकवाड : (1) माहे डिसेंबर, 2011 अखेर राज्यामध्ये एकूण 20104 अर्भक मृत्यू (0 ते 1 वयोगट) आणि 4261 बालमृत्यू (1 ते 5 वयोगट) झालेले आहेत. सदरचे बालमृत्यू कुपोषणाने झाले नसून विविध आजार व संसर्ग आजार उदा. जन्मत: कमी वजन, लवकर प्रसूती, जन्मत: व्यंग, ॲनिमिया, न्यूमोनिया, श्वसनाचे विकार, डायरिया, अपघात, सर्पदंश, श्वानदंश, दमा, जुळी मुले, हृदयविकार, डिसेंट्री एपिलेप्सी इ.कारणामुळे झालेले आहेत.

(2) राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

कुपोषणाला आळा घालण्याकरिता राज्यात राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशनची स्थापना करण्यात आलेली असून याद्वारे कुपोषणाला आळा घालण्यासंबंधी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहे. तसेच VCDC/CTC द्वारे कुपोषित बालकाना आवश्यक सुविधा व उपचार पुरविण्यात येऊन कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडयातील लाभार्थ्यांकरीता हर्बोझोल सिरप, कॅल्शिअम सिरप, मल्टीविटॅमिन सिरप, स्प्रिंकल, गुळ, शेंगदाणा चिक्की, आयुर्वेदिक पौष्टिक बिस्किटे इत्यादी बाबी शासनाद्वारे पुरविण्यात आलेल्या आहेत. आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या प्रकल्पातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषणमुल्य असणारा आहार पुरविण्यात येत आहे. अंगणवाडीतील बालकांना आवश्यक आरोग्य सेवा पुरविण्याकरिता आरोग्य विभागाशी आवश्यक समन्वय साधण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. याप्रकारे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याकरिता शासनाद्वारे आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

याशिवाय कुपोषण दूर करण्याकरिता शासनाकडून खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

(1) पूरक पोषण आहार दोन वेळा विभागून देण्यात येतो, त्या शिवाय THR देण्यात येतो.

(2) जनजागृती करण्याकरिता अंगणवाडी स्तरावर दरमहा माता बैठकींचे आयोजन केले जाते.

(3) समुदाय वृध्दीपत्रकाद्वारे बालकांच्या वाढीचे सामाजिक लेखापरीक्षण करणे.

(4) नवजात बालकाला एका तासाचे आत स्तनपान देण्याकरिता जनजागृती केली जाते तसेच सहा महिनेपर्यंत बाळाला निव्वळ स्तनपान देण्याकरिता आरोग्य शिक्षण दिले जाते.

(5) वयोगटानुसार लसीकरण करुन बालकांचे आजारापासून संरक्षण करणे.

(6) योग्य मात्रेनुसार जंतनाशक औषधीचे वाटप करणे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड...

(7) स्नेह, अपनालय, लाईफ ट्रस्ट स्वयंसेवी संस्थेमार्फत आहार व आरोग्यसंबंधी प्रकल्प राबविण्यात येतात.

(8) तीव्र कमी वजनाच्या बालकांची तसेच योग्य वजनवाढ नसलेल्या बालकांची नियमित आरोग्य तपासणी करणे.

कुपोषण दूर करण्याकरिता शासन स्तरावरुन सातत्याने प्रयत्न करण्यात येत असल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होत आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विद्या चव्हाण : सभापती महोदय, मी राज्यातील बालकांच्या कुपोषणाचा प्रश्न विचारला होता. या उत्तरामध्ये "सदरचे बालमृत्यू कुपोषणाने झाले नसून विविध आजार व संसर्ग आजार उदा.जन्मत: कमी वजन, लवकर प्रसूती, जन्मत: व्यंग, ॲनिमिया, न्यूमोनिया, श्वसनाचे विकार, डायरिया, अपघात, सर्पदंश, श्वानदंश, दमा, जुळी मुले, हृदयविकार, डिसेंट्री एपिलेप्सी इ.कारणामुळे झाल्याचे नमूद केलेले आहे. हे उत्तर हास्यास्पद आहे. माझ्याकडे असलेल्या अहवालात महाराष्ट्रातील कुपोषणाची सद्य:स्थिती दिलेली आहे. त्यानुसार सन 2009-10 मध्ये 38.5 टक्के व आदिवासी क्षेत्रात 51.7 टक्के बालके कुपोषित आढळलेली आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या डिसेंबर, 2011 पर्यंतच्या त्रैमासिक अहवालामध्ये सन 2010-11 मध्ये कुपोषणातील मॅम प्रकारात मोडणाऱ्या मुलांची संख्या 2,62,601 आणि सॅम प्रकारातील मुलांची संख्या 42,911 नमूद केलेली आहे. तसेच आदिवासी भागातील बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी राज्य शासनातर्फे जी नवसंजीवनी योजना राबविली जाते. हे उत्तर योग्य नाही. आदिवासी भागात इतर कारणांनी बाल मृत्यू होतातच. या उत्तरामध्ये कुपोषणामुळे बालमृत्यू होतात हे नाकारण्यात आले आहे. हे उत्तर चुकीचे आहे की त्यामध्ये काही घोटाळा झाला आहे ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत या विभागाकडे माहिती दिलेली आहे. अर्भक मृत्यू व बालमृत्यू कोणत्या कारणामुळे होतात त्याची माहिती या लेखी उत्तरात दिलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. हेमंत टकले : कुपोषणाच्या बाबतीत राज्याने एकूणच आजपर्यन्त जी कामगिरी केलेली आहे त्या कामगिरीवर एक प्रश्नचिन्ह उभे राहिलेले आहे. मृत्यू झालेले आहेत हे आपण मान्य करता आणि ते कुपोषणाने झालेले नाही असे उपचार म्हणून सांगता. जन्म झाल्यानंतर 0 ते 5 वयोगटातील कुपोषण कमी करण्याच्या दृष्टीने ज्या योजना राबविल्या जातात त्या योग्य आहेत. या संदर्भातील मूळ प्रश्न कुपोषणाचा नसला तरी हे बालमृत्यू मोठ्या प्रमाणावर होण्याची जी कारणे दिलेली आहेत त्या कारणामुळे कुपोषणामध्ये जाणा-या बालकांची संख्या वाढत आहे. म्हणजे जेथून सुरुवात होते ते आपण थांबवू शकलो नाही तर कुपोषित होणा-यांची संख्या वाढत जाईल आणि कुपोषण रोखण्यासाठी यंत्रणा पुरेशी पडणार नाही आणि कुपोषित बालकांचा प्रश्न तसाच कायम राहील. म्हणून या प्रश्नाच्या बाबतीत महिला व बालविकास विभाग आणि आरोग्य विभाग यांनी एकत्र येऊन उपाययोजना करण्याची गरज आहे. बालमृत्यू रोखण्यामध्ये आरोग्य विभाग कमी पडत असेल तर, एखादा आजार राहून गेला असेल, व्यंग राहून गेले असेल, शारीरिक बिघाड राहिला असेल तर कुपोषण दूर करण्याच्या कितीही योजना आखल्या, पोषण आहार, पूरक आहार दिले तरी बालक कुपोषित राहील. तेव्हा या मूळ मुद्याला आरोग्य विभाग आणि महिला व बालविकास विभाग एकत्रितपणे सामोरे जाऊन उपाययोजना करणार आहे काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : या कुपोषणाच्या संदर्भात श्वेतपत्रिका काढत असताना त्या विषयाशी संबंधित अशा 23 विभागांचा आम्ही अभ्यास केला. सार्वजनिक आरोग्य विभाग आणि महिला व बालविकास विभाग एकत्र येऊन काम करणार काय असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण अभियान मार्फत आम्ही एकत्रितपणे काम केलेले आहे. आमच्या विभागाचे सीडीपीओ तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी या सर्वांनी एकत्रितपणे मोहीम राबविण्याचे काम केलेले आहे. हे अभियान केल्यानंतर मार्च 2012 पर्यन्तची माहिती अशी आहे की सॅम, मॅम तसेच एसयूडब्ल्यू आणि एमयूडब्ल्यू मिळून 4852 गावे कुपोषण मुक्त केलेली आहेत. आवश्यकता असेल तर त्या गावांची नावे देखील मी पटलावर ठेवीन. तसेच सॅम,मॅम, एसयूडब्ल्यू आणि एमयूडब्ल्यू मिळून एकूण 10978 अंगणवाड्या कुपोषण मुक्त झालेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कुपोषण नाहीसे करण्यासाठी आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहोत. राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन मार्फत ग्रामीण भागात कुपोषण दूर करण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न असून त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे.

श्री. विनोद तावडे : परवा गोवंडीला कुपोषणामुळे मृत्यू झाल्यानंतर मी माननीय मंत्री महोदयांसमवेत एक बैठक घेतली. कुपोषणामुळे मृत्यू होत असला तरी तो कोणत्या तरी आजारामुळे होतो आणि आजार का होतो तर तो कुपोषणामुळे होतो. हे वास्तव लक्षात घेतले तर कुपोषणाच्या संदर्भात केलेल्या उपाययोजना कशा तुटपुंज्या आहेत हे आपणा समोर येते. कुपोषण कमी करण्यासाठी राज्य शासनाच्या महिला बचत गटामार्फत पोषण आहाराचा पुरवठा केला जातो. पण त्याची बिले महिला बचत गटांना वेळेवर मिळत नाहीत. ते आहार देणे बंद करतात. माननीय उप मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25263....

श्री.विनोद तावडे....

ट्रेझरी कार्यालयाकडून प्राधान्याने ही बिले दिली गेली पाहिजे असा आग्रह नियोजन विभागाकडे धरणार काय ? बचत गटाकडून जो पुरवठा केला जातो तो बंद पडणार याची देखील काळजी घेण्यात येईल काय ? महिला सबलीकरण योजना आहे, त्यातून 11 जिल्हयांना पूरक आहाराचे वाटप केले जाते. ती योजना संपूर्ण राज्यासाठी लागू करणार आहात काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : पहिल्या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे आणि दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर राजीव गांधी महिला सबलीकरण योजना आहे, ती योजना महाराष्ट्रातील 11 जिल्हयांमध्ये सुरु आहे. ही केंद्र शासनाची योजना आहे. ही योजना संपूर्ण राज्यासाठी लागू करावी म्हणून केंद्र सरकारकडे अगोदरच विनंती केलेली आहे. केंद्र सरकारने मान्य केल्यास ही योजना संपूर्ण राज्यासाठी लागू करण्यात येईल.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी</u>

उप सभापती : आज सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री प्रीतमकुमार शेगांवकर, चंद्रकांत पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर,केशवराव मानकर, रामनाथ मोते, सय्यद पाशा पटेल, डॉ.रणजित पाटील यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सूचनेतील विषय नियम 289 चा कसा होऊ शकतो याबाबतीत सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. मुंबईचे मंत्री माननीय श्री.सचिन अहिर, प्रा.वर्षा गायकवाड हे देखील उपस्थित आहेत. काल मुंबईमध्ये रेल्वेचा प्रश्न निर्माण झाला होता. रेल्वेचा प्रॉब्लेम हा राज्य सरकारचा नाही एवढे आम्हाला कळते. सु-मोटो राज्य सरकारने यामध्ये काही तरी उपाययोजना करावयास पाहिजे होती, परंतु ती केली नाही. म्हणून काल आम्ही हा विषय सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदय हे सभागृहात उपस्थित होते. बदलापूर, कल्याण, कर्जत, ठाणे येथून येणाऱ्या लोकांसाठी मोठी अडचण निर्माण झाली होती. त्यावेळी आम्ही राज्य सरकारला सुचविले होते की, आपण थोडया एस.टी.बसेस रायगड, नाशिक येथून आणून त्या कर्जत, कसारा, बदलापूर या ठिकाणाहून मुंबईच्या दिशेने सोडण्यात याव्यात. आम्ही असेही सुचविले होते की, पुणे शहराकडून मुंबईकडे येणारे ट्रॉफिक बी.पी.टी.च्या रस्त्यावरुन आणावे. त्या ठिकाणी अधिकचे वाहतूक पोलीस ठेवले जावेत, काल ॲटोरिक्षा, टॅक्सी यांनी नागरिकांकडून फार मोठी लूट केली.

महोदय,मुंबई शहरात विधिमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. सगळे मंत्री मुंबईत आहेत. परंतु राज्य सरकारने तातडीची एकही बैठक घेतली नाही. मी माननीय मंत्री श्री. राजेश टोपे आणि कुलगुरुंना भेटलो. विद्यार्थ्यांच्या परीक्षे संदर्भात तात्पुरते सोल्यूशन काढले. आज नाहूर (मुलुंड) येथे श्री.जितेंद्र वाड हा तरुण गर्दीमुळे रेल्वेतून पडून मृत झाला. दुसरा एक श्री. प्रतीक नावाचा तरुण देखील रेल्वेतील गर्दीमुळे खाली पडून मृत झाला. 13 व्यक्ती जखमी झाल्या आहेत. मुंबई शहरातील सव्वा कोटी लोकांचा प्रश्न निर्माण झाला होता. शासनाच्या आपद्ग्रस्त यंत्रणेने

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

कोणत्याही प्रकारची मदत काल केली नाही. तसेच शासनाने एकही तातडीची बैठक घेतली नाही. शासनाने काहीच उपाययोजना केली नाही. राज्य शासन काल काय करीत होते? काल सरकारने खूपच हलगर्जीपणा दाखविला आहे, तो निषेध करण्यासारखा आहे. मुंबईतील प्रवाशांचे काल खूप हाल झाले, खरे तर राज्य शासनाने मुंबईकरांकडे दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. शासनाने काय उपाययोजना केली होती, कोणती उपाययोजना करणे आवश्यक होते, यासंबंधीची राज्यातील जनतेला माहिती मिळावी म्हणून नियम मी 289 अन्वये प्रस्तावाची जी सूचना दिलेली आहे, त्यावर सभागृहात तातडीने चर्चा झाली पाहिजे पाहिजे अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्या सूचनेला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यातील वाहतुकीची संपूर्ण यंत्रणा कार्यरत ठेवण्याचे काम राज्य सरकारकडून केले जाते. शहरातील लोकल ट्रेनचा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारितील असला तरी मुंबई शहराचे महत्व लक्षात घेऊन राज्य सरकारने आपल्या अर्थसंकल्पात रेल्वे वाहतुकीसाठी तरतूद केलेली आहे. त्यासाठी कर्जाची उभारणी देखील केली आहे. काल मध्यरात्री कुर्ला येथील रेल्वेच्या सिग्नल यंत्रणेमध्ये बिघाड झाला, तेव्हापासून आतापर्यंत राज्य सरकारने कोणतीही दखल घेतलेली दिसत नाही. राज्य सरकारच्या कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी किंवा मंत्री महोदयांनी माध्यमांसमोर येऊन जनतेला उद्देशून कोणते निवेदन केलेले नाही. या घटनेची दखल घेऊन आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून या प्रस्तावावरील चर्चा सुरु करावी आणि मुंबई शहरातील 1.25 कोटी जनतेला दिलासा द्यावा अशी मी विनंती करतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे आणि गटनेते श्री.दिवाकर रावते आणि आम्ही मिळून नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. मागील हिवाळी अधिवेशनाच्या काळात मुंबई शहरात रेल्वे मोटारमनचा संप झाला होता. सर्व आमदार, सर्व मंत्री, शासनाचे वरिष्ठ अधिकारी अधिवेशनानिमित्त नागपूर येथे होते. मुंबईमध्ये हाहाकार माजला होता. तेव्हा असे सांगण्यात आले की, प्रशासन नागपूरमध्ये होते. काल मुंबई शहरात दिवसभर लोकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. अनेक ठिकाणी अपघात झाले आहेत. विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी काल हा मुद्दा औचित्याच्या मुद्याद्वारे मांडला होता. परंतु दिवसभरात शासनाकडून कोणतीही कारवाई झालेली नाही.

सभापती महोदय, ग्रामीण भागातून आम्ही विधिमंडळात येत असतो. मुंबई शहरातील चाकरमानी यांच्याबद्दल सरकारचे उत्तरदायित्व आहे की नाही? कालच्या परिस्थितीमुळे या शहरातील नागरिकांना प्रचंड हालअपेष्टांना सामोरे जावे लागले. अजूनही परिस्थिती निवळलेली नाही. रेल्वेच्या सिग्नल यंत्रणेतील बिघाडामुळे ट्रॅफिक जाम झाल्याने लोक वेगवेगळ्या ठिकाणी अडकून पडले. कर्मचाऱ्यांना आपापल्या कार्यालयात वेळेवर पोहोचता आलेले नाही. आम्ही सभागृहात आक्रोश केल्याशिवाय सरकार स्वत:हून काही कारवाई करणार नाही का? सरकारला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

आमच्याबद्दल काय वाटते, सरकारने आमच्याबद्दल काय उपाययोजना केली असे प्रश्न शहरातील नागरिकांच्या मनात निर्माण झाले आहेत. बाहेरगावाहून येणाऱ्या ट्रेनमध्ये लोक अडकून पडले आहेत. त्या लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय कोण करणार आहे? पुढील दोन तासात योग्य ती अंमलबजावणी होऊन तातडीने पावले उचलली जावीत या दृष्टीने आपण शासनाला आदेश द्यावेत आणि सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून या प्रस्तावावरील चर्चा सुरु करावी अशी मी विनंती करते.

श्री.एस.क्यू.ज़मा : सभापति महोदय, नियम 289 का प्रस्ताव हमारे विरोधी पक्ष नेता माननीय तावडे जी ने सदन के सामने रखा है. यह बात बिल्कुल सही है कि कल से बहुत ही गंभीर परिस्थिति मुंबई में बनी हुई है. कुर्ला में हुई आग की घटना के बाद टीवी और अखबारों में आयी खबरों से लोगों को होने वाली तकलीफ का अंदाज लगाया जा सकता है. माननीय विरोधी पक्ष नेता ने कल भी सरकार का ध्यान इस ओर आकर्षित किया था. इसलिए हम जानना चाहते हैं कि लोगों की तकलीफ दूर करने के लिए कल से अब तक हमारी सरकार ने क्या व्यवस्था की है तथा आज भी लोगों को तकलीफ न होने पाये इस संबंध ने सरकार ने और क्या तैयारी की है. मेरा कहना है कि इस बारे में सरकार की ओर से निवेदन किया जाना चाहिए. इसलिए सभापति महोदय, आप से मेरी विनती है कि आप इस घटना से संबंधित निवेदन करने के लिए सरकार को निदेश दें.

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, या विषयावर माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे यांनी खालच्या सभागृहात निवेदन केले आहे. तेच निवेदन या सभागृहात केले जाईल. शासनाने या संदर्भात सहानुभूतीने विचार केला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शासनाने कोणती कृती केली हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबई शहर आणि मुंबई उपनगरच्या पालकमंत्र्यांना सभागृहात उपस्थित राहण्यास सांगावे.

नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी सभागृहात शांतता ठेवावी.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मुंबई व उपनगरातील दोन्ही पालक मंत्र्यांना हटवावे अशी आमची मागणी आहे...

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : महोदय, सभागृहात चाललेल्या चर्चेसंबंधीची माहिती घेत असतांना मी ही चर्चा देखील ऐकत होतो. मध्य रेल्वेच्या कुर्ला-विद्याविहार दरम्यान अपघात होऊन उपनगरी गाड्यांच्या वाहतुकीसंबंधी जी परिस्थिती निर्माण झाली त्यासंबंधीची माहिती घेण्याचा प्रयत्न करीत होतो, त्याचबरोबर यावर उपाययोजना करण्यासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न चालू आहेत. मी त्यासंदर्भात थोडक्यात माहिती देऊ इच्छितो की मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन काही तासापूर्वी शेवटची माहिती मला मिळाली त्यानुसार उपनगरीय लोकल गाड्या 18 ते 22 मिनिटांपर्यंत विलंबाने धावत आहेत. आतापर्यंत लोकल गाड्यांची यातायात 67 टक्के सुरु झालेली असून आज रात्री हे प्रमाण 85 टक्के एवढे होणार आणि उद्या रात्रीपर्यंत पूर्ववत सेवा सुरु होईल. तसेच वाहतुकीची सुविधा म्हणून आतापर्यंत बेस्टच्या 215 एक्स्ट्रा बसेस दि. 18.4.2012 पासून सोडण्यात आल्या असून उद्याही या जादा बसेस सोडण्यात येतील. त्याचबरोबर जादा एस.टी. बसेस पालघर, पनवेल, ठाणे वगैरे ठिकाणाहून सोडण्यात आल्या आणि दादर येथूनही 23 जादा बसेस सोडल्या आहेत. टीएमटी व नवी मुंबई ट्रान्सपोर्ट सर्व्हिस यांच्याकडूनही जादा बसेस सोडलेल्या आहेत. त्याचबरोबर खाजगी बसेस, स्कूल बसेस आणि टेम्पो अशा वाहनांमधून प्रवासी वाहतूक करण्याची परवानगी मोटर वाहन अधिनियमाच्या अंतर्गत देण्यात आली असून तसे परिपत्रक दि. 18.4.2010 रोजी काढलेले आहे. त्यानुसार अशी खाजगी वाहने व सर्व प्रकारची प्रवासी वाहने यातूनही प्रवासी वाहतूक करण्याची परवानगी दि. 20.4.2012 पर्यंतच्या कालावधीसाठी देण्यात आली आहे. त्यानंतर मुंबई महापालिकेच्या इमर्जन्सी कंट्रोल रुममध्ये बेस्टचे अधिकारी नेमून नियंत्रण कक्षात नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारीतून मार्ग काढण्याच्या दृष्टीने सूचना देण्यात आलेल्या आहेत. असे वेगवेगळे प्रयत्न केले असून आज रात्री 12 वाजेपर्यंत 85 टक्के लोकल गाड्या पूर्ववत होतील व उद्या रात्रीपर्यंत 100 टक्के वाहतूक नियमित होईल. या क्षणाला 18 ते 22 मिनिटे इतकाच उशीर लोकल गाड्यांना होत आहे पण

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

आपण वेगवेगळ्या प्रकारे वाहनांना वाहतूक करण्याची परवानगी दिली असल्याने यातूनच पूर्ववत सेवा लवकरच सुरु होईल. हा एक अपघात असून त्यातून मध्य रेल्वेचे प्रयत्न युध्द पातळीवर सुरु असून ती लवकरच पूर्ववत करीत आहोत. एवढे मी सांगू इच्छितो तसेच सन्माननीय सदस्यांना आणखी काही सुचवावयाचे असेल ते देखील त्यांनी सुचवावे.

श्री. विनोद तावडे : महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले त्यावरुन टीका-टिप्पणी सुरु झाल्यानंतर माहिती गोळा केली व त्यानुसार माहिती दिली असे दिसते. यासंदर्भात मी कालच औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने सभागृहात मुद्दा उपस्थित केला होता. वास्तविक आम्हाला अशी अपेक्षा होती की, माननीय पालक मंत्र्यांनी प्रत्यक्ष फिल्डमध्ये जाऊन जनतेला टी.व्ही. चॅनेल्सच्या माध्यमातून दिलासा देणे आवश्यक होते. काल बोलताना येथे बोलले गेले की, रस्त्यावर ट्रॅफिक हवालदारांची संख्या वाढविण्याची गरज आहे. पण यातून मार्ग काढण्यासाठी किती जादा बसेस सोडण्यात आल्या, कोणाला काय काम दिले याची माहिती मात्र दिली नाही. तसेच यातून कायदा व सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो इतके भयानक स्वरुप या अपघातामुळे येऊ शकते.

यानंतर श्री. जुन्नरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

हा प्रकार परवा रात्री 12.30 वाजता घडला होता व पहाटे 3.00 पर्यंत या प्रकाराची भयानकता लक्षात आली होती. सभागृहात या विषयाच्या संदर्भात मी काल दुपारी 1.30,2.00 वाजता बोलावयास उभा राहिलो होतो तोपर्यंत या विषयाच्या संदर्भातील काहीही माहिती शासनाकडून देण्यात आली नव्हती. काल स्वत: मी माननीय मंत्री श्री. राजेश टोपे साहेबांकडे जाऊन कुलगुरुंना भेटलो व त्यावेळी हे झाले. मा. मंत्रीमहोदयांना मी सांगितले की, या विषयाची माहिती तुम्ही द्या परंतु माननीय मंत्रीमहोदयांनी तसेच कुलगुरुंनी सुध्दा यासंदर्भातील माहिती दिली नाही. अशा प्रकारचा निर्णय मी सांगितल्यानतर कुलगुरुंनी यासंदर्भातील माहिती दिली.

सभापती महोदय, आपत्कालीन व्यवस्था म्हणून मुंबईसाठी दोन पालक मंत्री आहेत असे असतांना संबंधित विभागांना काहीही सूचना दिल्या गेल्या नाहीत. मुंबई पोर्ट ट्रस्टचा रस्ता काल इतर वाहनांसाठी खुला केला असता तर बाकीची ट्रॅफिक त्या रस्त्यावरुन गेली असती व ट्रॅफिक जाम झाली नसती. आपत्कालीन मॅनेजमेंटमध्ये आम्ही सुचवल्यानंतर सुध्दा सरकार काहीही करीत नव्हते याचे आम्हाला वाईट वाटते. काल मुंबईतील चाकरमान्यांना आपण भगवान भरोसे आहोत असे वाटू लागले होते. आम्ही रायगड, नाशिक, पालघर या ठिकाणावरुन बसेस आणल्या, या या ठिकाणी आम्ही काम करीत आहोत अशी काहीही आकडेवारी शासनाकडून दिली गेली नाही कारण तशी आकडेवारी शासनाकडे उपलब्धच नाही तसेच यासंदर्भात बैठकाही झालेल्या नाहीत. ट्रेनमधून जी 16 मुले पडली आहेत त्यांचे मृतदेह राजावाडी हॉस्पीटलमध्ये ठेवलेले आहेत. जनतेला सरकार म्हणून संबोधीत केले जात नाही. जनतेला मुख्य सचिव, मंत्री, आयुक्त कोणीही माहिती देत नाही. या घटनेमध्ये चोऱ्या माऱ्या होणार नाहीत याची विशेष दक्षता घेतलेली आहे असा कॉन्फीडन्स जनतेत वाढविला गेला पाहिजे तो वाढविला जात नाही त्यामुळे कन्सर्न आहे अशी कोणतीही काळजी सरकारने घेतलेली नसल्यामुळे सरकारने दिलगिरी व्यक्त केली तर काय फरक पडणार आहे. चुकले असेल तर चुकले म्हणा. अधिवेशनाच्या धावपळीत होतो त्यामुळे अशी काळजी आमच्याकडून घेतली गेली नाही, आता आम्ही या या गोष्टी करीत आहोत असे सरकारने जनतेला सांगितले पाहिजे व त्यासाठीच आम्ही हा विषय उपस्थित केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार : सभापती महोदय, हा प्रकार घडल्यानंतर सरकारने हा विषय गांभीर्याने घेतलेला आहे. सरकार काही करत नाही, सरकार काही करत नाही असे जे सारखे काही सांगितले जाते त्यामध्ये अजिबात तथ्य नाही. आज सकाळी 10.00,10.30 वाजता मुख्यमंत्र्यांनी बेस्टचे एम.डी.श्री. ओ.पी.गुप्ता यांना सांगितले होते की, बेस्टच्या जास्ती जास्त गाडया सोडण्यात याव्यात. गाडया सोडतांना अडचण येत असेल तर ती अडचण तेथल्या तेथे दूर केली जाईल. काल सुध्दा त्यांना यासंदर्भात सांगितले होते. माझ्याजवळ यासंदर्भातील 18 तारखेचा आदेश आहे. माननीय तावडे साहेबांना मुंबईची माहिती आहे. परंतु आघाडी सरकारने तसेच माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयात जेव्हा घटना घडली तेव्हा पासून लक्ष घातलेले आहे. मी जेव्हा या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना माहिती द्यावयास गेलो होतो तेव्हा परिवहन खात्याचे सचिव,परिवहन खात्याचे आयुक्त माननीय मुख्यमंत्र्यांना या घटनेच्या संदर्भात ब्रिफिंग देत होते. आजू बाजूची जी एस.टी.महामंडळाची आगारे आहेत तेथून ज्या बसेस मिळाल्या आहेत त्यातून भागत नसेल तर पुणे, पश्चिम महाराष्ट्रातून बसेस आणण्याची गरज आहे का याबाबत सरकार सातत्याने माहिती घेऊन सूचना देत आहे.

ही आकस्मिक परिस्थिती निर्माण झालेली आहे, मुंबईवर ज्या ज्यावेळेस अशा प्रकारची परिस्थिती ओढवते त्या त्या वेळेस मुंबईकरांनी सहकार्यच केलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी कालच्या परिस्थितीच्या संदर्भात सविस्तर माहिती दिलेली आहे. तसेच या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचाही आदर केला जाईल व मुंबईतील जनतेला त्रास होणार नाही याची खबरदारी राज्य सरकार घेत आहे. टी.व्ही. वर गेले म्हणजे कळते अशातला काही भाग नाही. शासनाच्या संदर्भात दोन्ही बाजूने बोलले जाते. आम्ही टीव्ही वर गेलो तर तुम्ही टीव्हीवरच दिसता, काहीच कामे होत नाहीत. टीव्ही पुढे गेलो नाही आणि कृती केली तर टीव्ही पुढे जातच नाही, जनतेला कसे कळणार अशा प्रकारे दोन्ही बाजूने बोलले जाते.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

या शहरामध्ये सर्व काही व्यवस्थित सुरु आहे, लोकांमध्ये कोणत्याही प्रकारचे भीतीचे वातावरण नाही. काल या शहरामध्ये घडलेली घटना ही केवळ अपघातामधून घडली आहे. त्या बाबतीत हे शासन डोळयात तेल घालून त्या दृष्टीने मार्ग काढीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तरांची एकविसावी आणि बावीसावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची एकविसावी आणि बाविसावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : अतारांकित प्रश्नोत्तरांची एकविसावी आणि बाविसावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "ठाणे जिल्ह्यातील गोदामात जवळपास दीड लाख क्विंटल तांदूळ दोन वर्षापासून सडत असल्याबाबत" या विषयावरील श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 25267 ला दिनांक 11 एप्रिल, 2012 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

प्रा. (श्रीमती) फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र माहितीचा अधिकार (दुसरी सुधारणा) नियम, 2012 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक केमाअ.2008/1010/प्र.क्र.356/सहा, दिनांकित 31 जानेवारी 2012 सभागृहासमोर ठेवते.

उप सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

प्रा. (श्रीमती) फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम, 2012 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक केमाअ.2009/प्र.क्र.398/09/सहा, दिनांकित 16 जानेवारी 2012 सभागृहासमोर ठेवते.

उप सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

प्रा.(श्रीमती) फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा सन 2011 चा सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

प्रा. (श्रीमती) फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन 2010-2011 या वर्षाचा नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचा सन 2009-2010 या वर्षाचा वार्षिक लेखा व लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक लेखा व लेखा परिक्षण अहवाल सभगृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन 2010-2011 या वर्षाचा सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन 2010-2011 या वर्षाचा सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन 2010-2011 या वर्षाचा सहावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र सागरी मंडळ यांचा सन 2008-2009 यावर्षाचा प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. डी. पी. सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई विद्यापीठाचा सन 2009-2010 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. डी. पी. सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षाचा वार्षिक लेखे संविधानिक लेखा परिक्षकांचा लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक लेखे संविधानिक लेखा परिक्षकांचा लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

(यानंतर श्री भारवि)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत (उच्च शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांचे सन 2010-2011 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहा समोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक लेखे सभागृहा समोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.डी.पी.सावंत (उच्च शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन 2009-2010 या वर्षाचा वार्षिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.डी.पी.सावंत (उच्च शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक लेखे अहवाल सभागृहा समोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक लेखे अहवाल सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

श्री.चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 20 एप्रिल 2012 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरूवार, दिनांक 19 एप्रिल 2012 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. विधान परिषदेकडे एकूण सहा अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थ आहे. त्यास 20 मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 130 मिनिटांचा वेळ खालीलप्रमाणे अशासकीय विधेयकांना देण्यात यावा.

1	सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 8-महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक,2011,श्री दिवाकर रावते,वि.प.स.यांचे	35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2	सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 13-महाराष्ट्र सहायक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक,2011 श्री.विनोद तावडे,वि.प.स.यांचे	35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3	सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 9 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक,2011.श्री.विजय सावंत,वि.प.स.	30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
4	सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 4 - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,2011.श्री.विनोद तावडे,वि.प.स.यांचे - चर्चा अपूर्णावस्थेत.	30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री.चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) :सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत झाला आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील काही गावातील डोंगर मायनिंगमुळे नष्ट होणे याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सचिन अहिर (खनिकर्म राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 6 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, जनसुनावणीला स्थगित मिळावी म्हणून 20 गावातील ग्रामस्थ जिल्हाधिकारी यांना भेटले होते. त्याचा उल्लेख उत्तरामध्ये नाही. उच्च न्यायालयामध्ये आवाज फाऊंडेशनने याचिका दाखल केली होती. त्यासंबंधी 10 एप्रिल रोजी निर्णय झाला. त्यानुसार या जनसुनावणीस स्थगिती मिळाली हे खरे आहे काय ? गाडगीळ समितीच्या अहवालामध्ये जनसुनावणीचा विषय नमूद केला आहे काय, तेथील झाडे तोडू नये असे आदेश माननीय उच्च न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत हे खरे आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, नियम 93 ची सूचना आल्यानंतर माननीय उच्च न्यायालयाने शासनाला काही निदेश दिले आहेत. पर्यावरणासंबंधातील जनसुनावणी होती. त्याला स्थगिती देण्याचे काम केले आहे. तशी स्थगिती देण्याचे काम राज्य शासनाच्या माध्यमातून केले गेले आहे. दुसरा विषय त्यांनी झाडे तोडू नये या संबंधातील सांगितला आहे. पर्यावरणाच्या सुनावणीला स्थगिती दिल्या मुळे पुढचा प्रश्न आज उद्भवत नाही. तसा निर्णय झाला असेल तर माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: पुणे हडपसर येथील बीआरटीच्या मार्गावर सातत्याने होत असलेले अपघात याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : माझे म्हणणे हडपसर बीआरटी मार्गावर सातत्याने जे अपघात होत आहेत त्या संबंधातील होते. येथे लोकांनी आंदोलन देखील केले आहे. पुणे शहरात जेथे बीआरटी सेवा आहे तेथे आपण सीसीटीव्ही बसविले आहेत. त्यामुळे या मार्गावरून वेगाने बस जात असताना लोक कसे बळी पडत आहेत या संबंधातील अहवाल आपल्याला दोन महिन्यात मिळू शकेल. हडपसर भागात अपघातजन्य बीआरटी बससेवा झाली आहे. हडपसर भागात एका वर्षात 76 लोक दगावले आहेत. ही बीआरटी सेवा अधिक सुरक्षित कशी करता येईल हे पहावे लागेल. येथे जे दुभाजक उभारण्यात आले आहेत त्यामुळे अपघात होत आहेत. त्यामुळे या बीआरटीचे सामान्य बससेवेमध्ये परिवर्तन करून अपघातजन्यता कमी होते आहे काय हे आपण पहावे.

यानंतर सौ.रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे . . . .

या संदर्भात आपण पहाणीची मोहीम हाती घेऊन आवश्यकता पडली तर यामध्ये बदल करु शकाल काय? हा माझा पहिला प्रश्न आहे आणि दुसरा प्रश्न असा की, दुभाजकांच्या बरोबर स्पीड ब्रेकर्सच्या बाबतीत पुणे मिररने मोहीम घेतली आहे आणि 50-60 ठिकाणी असे प्रचंड ऊंच स्पीड ब्रेकर्स आहेत की, ज्याबाबत उच्च न्यायालयाने बंदी घातलेली आहे. त्यांनी असे सांगितले आहे की, स्पीड ब्रेकर्स्ची ऊंची नॉर्मल ठेवण्यात यावी. तेव्हा पुणे शहरामध्ये जे दुभाजक आहेत तसेच स्पीड ब्रेकर्स् आहेत त्यामध्ये विवक्षित ऊंची पेक्षा जास्त असणाऱ्या स्पीड ब्रेकर्स्च्या बाबतीत ताबडतोब मोहीम हातामध्ये घेऊन त्याची ऊंची कमी करणे किंवा ते हटविणे या संदर्भात पावले उचलणार आहात काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, बी.आर.टी.करीत असताना दुभाजक हा अत्यंत महत्वाचा घटक आहे आणि एकदा आपण महानगरपालिकेच्या माध्यमातून ती प्रणाली स्वीकारलेली आहे. पण पुणे शहरामध्ये 51 स्पॉट असे आहेत की, जे अपघातजन्य आहेत. याबाबतीत कोणत्या उपाययोजना कराव्यात याबद्दल अहवाल तयार केलेला आहे.मग महापालिका, कॅन्टोनमेंट बोर्ड, पिंपरी-चिंचवड महापालिका या सर्वांना कळविले आहे. याठिकाणी काय उपाय योजना केल्या पाहिजेत याबाबतीत सर्व्हे केलेला आहे आणि त्याबाबतही सूचना करीत आहोत. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी स्पीड ब्रेकर बाबत सांगितले त्याप्रमाणे निश्चितपणे तपास केला जाईल आणि याबाबतीत उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत.त्यामुळे ते जेथे-जेथे असतील त्याबाबतीत निर्णय घेतला जाईल.प्रत्येक महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषदेमध्ये ट्रॅफीक हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. त्याकडे महानगरपालिका, नगरपालिका सातत्याने दुर्लक्षच करतात आणि नागरी सुविधांवर भर देत असतात. म्हणून आपण नगरविकास विभागाच्या माध्यमातून एक नवीन जी.आर.काढला की, आता रस्त्याच्या कामासाठी अनुदान दिल्यानंतर नगरविकास विभागाचा, महानगरपालिकेचा, नगरपालिकेचा दहा टक्के निधी हा दुभाजकासाठी असेल आणि तो खर्च केलाच पाहिजे अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे.

उप सभापती : याबाबतचा अहवाल पटलावर ठेवावा.

. . . .2 वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./ मु.शी.: म्हैसगाव, ता.राहुरी येथील लिलावातील वाळू भरलेला ट्रक घराबाहेर झोपलेल्या तरुणाच्या अंगावरुन गेल्याने त्याचा झालेला मृत्यू याबाबत सर्वश्री.जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.जयंत प्र.पाटील यांनी "म्हैसगाव, ता.राहुरी येथील लिलावातील वाळू भरलेला ट्रक घराबाहेर झोपलेल्या तरुणाच्या अंगावरुन गेल्याने झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 वाय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, त्याठिकाणी सदर वाळूचा ट्रक जात होता, त्याचा लिलाव कोणी घेतला होता आणि संबंधितांनी वाळूची रॉयल्टी भरली होती काय ? तसेच ट्रक भरधाव वेगाने चालविल्यामुळे संबंधिताचा मृत्यू झालेला आहे, त्या संबंधित व्यक्तीला जामीन मिळण्यासाठी पोलीस यंत्रणेने खबरदारी घेतली ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, हा वाळूचा ट्रक अधिकृत होता. श्री.शशिकांत गायकवाड यांच्या माध्यमातूनच काळभैरवनाथ सप्लायर्स् यांच्याकडे ठेका होता आणि त्यामधून वाळूचा सप्लाय केला जात होता. तसेच पोलीस विभागातर्फे संबंधितांना जामीन मिळावा यादृष्टीने मदत करण्यात आलेली नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, संबंधितांना ताबडतोब जामीन मिळालेला आहे. सन्माननीय मुख्यमंत्री सदनामध्ये आहेत. मला असे सांगावयाचे आहे की, वाळूच्या अवैध वाहतुकीमुळे राज्यात मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. राज्य शासन याबाबतीत कधी धोरण ठरविणार आहे ते कधी ठरविण्यात येणार आहे? किती लोकांचे मृत्यू झाल्यानंतर ठरविणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री महोदयांनी जाहीर केलेले आहे की, वाळूच्या अवैध वाहतुकीच्या बाबतीत लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

. . . .2 वाय-4

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जळगाव जिल्ह्यात ऑनर किलींगची घडलेली घटना या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 वाय-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-04-2012 (असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही) 2 वाय-5

APR 2.25

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, जळगाव जिल्ह्यामध्ये ऑनर किलींगमुळे एका मुलीची हत्या झाली. यासंबंधातील हे निवेदन आहे आणि ज्यांचा आवाज येथपर्यंत पोहोचत नाही त्यांचा

आवाज मी आपल्या सहकार्याने आणि आपल्या मार्गदर्शनानुसार पोहोचविण्याचा प्रयत्न करते त्याबद्दलचे हे निवेदन आहे.माझा प्रश्न असा आहे की, ही एक सामाजिक समस्या आहे.परंतु अनेक जिल्ह्यांमध्ये म्हणजे सातारा व जळगाव जिल्ह्यामध्ये अशा पध्दतीने आंतरजातीय विवाहाला विरोध झाल्यामुळे मुलीचा खून तिच्या वडिलांनीच केलेला आहे. अशा घटना घडलेल्या आहेत. याबाबतीत समाजकल्याण विभाग लोकांचे प्रबोधन करणार आहे की नाही याबाबतीत एक प्रश्नचिन्ह आहे. परंतु आपण महिला दक्षता कमिट्या, महिला तक्रार निवारण कक्ष जिल्ह्याच्या ठिकाणी नेमलेले आहेत. समजा एखाद्या सज्ञान असलेल्या मुलीला असे वाटत असेल की, तिचा छळ होत आहे किंवा जबरदस्ती होत आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

त्यामुळे तिला अडचण येते त्यामुळे तिला सुरक्षितता देण्याच्या संदर्भात प्रत्येक आयुक्त कार्यालयातील आणि पोलीस अधीक्षक कार्यालयातील या तक्रार निवारण सेलला खास सूचना देणार का ? उदा. पंजाबमध्ये ऑनर किलिंग घडल्यानंतर स्वत: मुख्यमंत्री पदाच्या जवळपास असणारी कॅबिनेट मंत्री पदी असलेली महिला ऑनर किलिंगच्या विषयावरुन जेलमध्ये आहे. त्यामुळे या संदर्भात कायदा करुन जर काही परिणाम होत असेल तर तसा कायदा करण्याचा शासन विचार करील का जेणेकरुन ऑनर किलिंग रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करता येतील ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, प्रत्येक जिल्हा स्तरावर, शहर स्तरावर 103 नंबर ही लाईन दिलेली आहे. महिला पोलीस अधिकारी त्या ठिकाणी महिलांच्या तक्रारी निश्चितपणे दाखल करुन घेत असतात. सध्याच्या कायद्यामध्ये तरतुदी आहेत परंतु ही बाब देखील निश्चितपणे तपासून पाहिली जाईल.

श्री. एस. क्यू. जमा : सभापति महोदय, ऑनर किलिंग एक नया कॉंसेप्ट है जो दूसरे राज्यों में बहुत ज्यादा है. माननीय नीलम ताई ने पूछा है कि क्या इस बारे में कोई विशेष कानून बनाने की योजना सरकार की है. क्योंकि कब कौन क्या करेगा, इस बारे में पहले से कल्पना करना बहुत कठिन है. हम जानना चाहते हैं कि क्या इस संबंध में सख्त कानून बनाने के बारे में कोई कदम सरकार उठाएगी ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, या संदर्भात केंद्र सरकारकडे विचार चालू आहे. त्यामुळे आता त्यावर बोलणे योग्य होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु.शी./ मु.शी : चेंबूर येथे रेशनकार्ड बनविण्यासाठी फेऱ्या मारणाऱ्या महिलेवर एजंटने बलात्कार करण्याची घडलेली घटना याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये चार वेगवेगळ्या घटना आहेत. खरे तर प्रत्येक घटनेच्या बाबतीत स्वतंत्र निवेदन होऊ शकते. परंतु आपल्या कामाच्या पध्दतीमध्ये मी सर्व विषयांना एकत्र कोंबलेले आहे. यामध्ये मी नांदेडच्या घटनेचा उल्लेख करीन. हे निवेदन वाचल्यानंतर आश्चर्य वाटते. यामध्ये गृह विभागाचा संबंध आहे परंतु मुदतपूर्व प्रसूती झाल्यामुळे आरोग्य विभागाकडे हा विषय जावयास पाहिजे होता. त्या ठिकाणी छोट्या बालकाचा संशयास्पद मृत्यू झालेला आहे. माझे असे म्हणणे आहे की, नांदेडच्या घटनेतील हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांची सीआयडी चौकशी केली पाहिजे. याचे कारण असे की, छोटे मूलं आजारी आहे, माता बाळंत होऊन दोन दिवस सुध्दा झालेले नाहीत आणि या ठिकाणी खुशाल असे उत्तर देत आहेत की, ती व्हरांड्यामध्ये झोपली होती आणि व्हारांड्यात झोपल्यामुळे तिला उपचार मिळाले नाहीत. या उत्तराला काही अर्थ नाही. इतक्या बेपर्वा वृत्तीने सरकारी रुग्णालयातील लोक वागणार असतील तर ते योग्य नाही. तिचा मृत्यू झाल्यानंतर पोलिसांकडे चौकशी दिली. त्यामुळे नांदेडच्या घटनेची सीआयडी चौकशी करावी अशी मी मागणी करते. सेवानिवृत्त न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या समितीचा निवेदनामध्ये उल्लेख केलेला आहे. त्या समितीमध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस तसेच विधानसभेचे अनेक सन्माननीय सदस्य आहेत. या समितीचे अंतिम इतिवृत्त तयार होऊन एक वर्ष होऊन गेलेले आहेत. त्या समितीच्या शिफारशी अंमलात आणण्यामध्ये प्रत्यक्षात काय अडचण आहे ? इन्स्पेक्टर माणगावकर यांच्या संदर्भात तक्रार झाली. त्या संदर्भात पुढे कारवाई केलेली आहे. परंतु विशाखा प्रकरणाच्या निकालपत्रानुसार महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी अशा समित्या पोलीस स्टेशनच्या अखत्यारीत आपण केलेल्या आहेत का ? जर केल्या नसतील तर त्या कधी करणार ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नांदेडच्या प्रकरणाच्या संदर्भात प्रश्न विचारला. त्या ठिकाणी त्या महिलेची कोठेही तक्रार नाही तरी देखील हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर आपण चौकशी केली. त्या महिलेला भेटून चौकशी करुन त्यामध्ये डॉक्टरांचा हलगर्जीपणा झाला असेल तर निश्चितपणे त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. न्यायमूर्ती धर्माधिकारी यांच्या समितीचा अंतरिम अहवाल शासनाकडे आलेला आहे. त्यातील अनेक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ...

शिफारशींची अंमलबजावणी शासनाने केलेली आहे. अहवाल आल्यानंतर मघाशी सांगितल्याप्रमाणे समुपदेशन केंद्र असेल किंवा आमची हेल्पलाईन असेल अशा वेगवेगळ्या गोष्टी स्वतंत्रपणे प्रत्येक ठिकाणी अंमलात आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचबरोबर या अहवालामध्ये महिला व बालविकास खाते असेल, विधी विभाग असेल किंवा इतर विभागांकडून ज्या अपेक्षा आहेत त्या देखील पूर्ण करण्याची कार्यवाही चालू आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर निश्चितपणे त्या संदर्भात एक बैठक घेतली जाईल आणि त्यामध्ये या अहवालाच्या अंमलबजावणीच्या संदर्भात आणखी काही प्रश्न राहिले असतील तर त्या दृष्टीने विचार केला जाईल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, दोन्ही घटनेतील आरोपी फरार आहेत, त्यांना लवकरात लवकर पकडण्याची पावले केव्हा उचलली जाणार आहेत ? एक आरोपी फरार आहे आणि एका आरोपीचा तपास चालू आहे असे निवेदनात नमूद केलेले आहे. पहिल्या दोन घटनांबाबत संबंधितांबाबत केव्हा कारवाई होणार आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, पहिल्या घटनेतील मुख्य आरोपी अटकेत आहे. त्यांना मदत करणाऱ्या महिलेचे नाव निश्चित होत नाही. तिचा तपास चालू आहे. दुसऱ्या घटनेचे त्यांनी विश्लेषण केलेले नाही. त्या ठिकाणी संबंधित मुलीची बिल्डिंगमध्ये येणाऱ्यांशी ओळख परेड करण्यात आली. परंतु त्या मुलीने कोणालाही ओळखलेले नाही. तरीही याबाबत तपास चालू असून आरोपींना निश्चितपणे अटक केली जाईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

पृ.शी./मु.शी.: शासकीय तसेच निमशासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या वैद्यकीय प्राध्यापकांनी खाजगी वैद्यकीय व्यवसाय न केल्यास 35 टक्के दराने व्यवसाय रोध भत्ता मंजूर करण्याची केलेली मागणी याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 3...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, राज्य शासनाच्या शासकीय तसेच निमशासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यकीय प्राध्यापकांनी खाजगी वैद्यकीय व्यवसाय न केल्यास त्यांना 35 टक्क्यांऐवजी 25 टक्के व्यवसाय रोध भत्ता निश्चित केला आहे. त्यामुळे त्यांनी आम्ही परीक्षेचे पेपर्स तपासणार नाही, परीक्षा प्रक्रियेवर बहिष्कार घालू असे जाहीर केले आहे. त्याबाबत शासनाकडे त्यांनी निवेदनही दिलेले आहे. गेल्या वर्षी मी या संदर्भात औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्याला मंत्री महोदयांकडून असे उत्तर आले आहे की, सदर प्रश्न वित्त विभागाकडे प्रलंबित आहे. त्यावर निर्णय झालेला नाही.

सभापती महोदय, मी याबाबत केवळ दोनच प्रश्न विचारणार आहे. पहिला प्रश्न असा आहे की, जे वैद्यकीय प्राध्यापक खाजगी व्यवसाय करतात त्यांना शासन हा भत्ता देत नाही, हे बरोबर आहे. या निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, "अंबाजोगाई, यवतमाळ, धुळे व नांदेड येथे मूळ वेतनाच्या 50 टक्के दराने आणि अन्य ठिकाणी 35 टक्के दराने मूळ वेतनाची रक्कम अधिक मूळ वेतनात विलीन झालेल्या महागाई वेतनाची रक्कम दिली जाते. त्यामुळे बाकीच्या ठिकाणी 35 टक्क्यांऐवजी 25 टक्के भत्ता का दिला जातो ? या निवेदनामध्ये शेवटी असे नमूद केलेले आहे की, "विभागाने दि.20.5.2010 रोजी मंत्रिमंडळाच्या निर्णयार्थ प्रस्ताव सादर केला होता. त्यावर प्रस्ताव पुन्हा सादर करण्याचे निदेश दिल्यानुसार व्यवसाय रोध भत्त्याबाबतचा फेरप्रस्ताव दि.4.2.2012 रोजी वित्त विभागास सादर करण्यात आला आहे. त्यानंतर अद्याप निर्णय झालेला नाही. या प्राध्यापकांना 35 टक्क्यांप्रमाणे व्यवसाय अवरोध भत्ता देण्याबाबतचा निर्णय केव्हा होणार आहे, या प्रस्तावाला माननीय अर्थ मंत्री मंजुरी देणार आहेत की नाहीत, या डॉक्टर्सची शिक्षणासाठी आणि वैद्यकीय महाविद्यालये चालविण्यासाठी आवश्यकता आहे. त्यांच्याबाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करुन हा भत्ता दिला जाईल काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी महत्वाचा प्रश्न विचारला आहे. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांची राज्याला मोठ्या प्रमाणावर उणीव भासत आहे. म्हणून मधल्या काळामध्ये त्यांना 35 टक्के व ग्रामीण भागातील महाविद्यालयातील प्राध्यापकांना 50 टक्के व्यवसाय अवरोध भत्ता देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु सहाव्या वेतन

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.विजयकुमार गावित....

आयोगाच्या अहवालानुसार केंद्र सरकारने 25 टक्क्याचा स्लॅब घातलेला आहे. तसेच 85 हजाराच्या वर जाता येत नाही. पूर्वीच्या निकषानुसार त्यांना भत्ता दिला जात होता ते निकष थोडेसे शिथिल करण्यासाठी विभागाने वित्त विभागाबरोबर चर्चा केलेली आहे. वित्त विभागाने यातील अर्ध्या विषयाबाबत सकारात्मक भूमिका स्वीकारलेली आहे. वित्त विभागाचा 25 टक्के भता देण्याचा आग्रह आहे परंतु वैद्यकीय शिक्षण विभागाचा 35 व 50 टक्के भत्ता द्यावा असा आग्रह आहे. त्यामुळे त्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर मांडण्यात येणार आहे. मला असे वाटते की, मंत्रिमंडळामध्ये लवकरात लवकर निर्णय होईल अशी अपेक्षा आहे.

5....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

पृ.शी. / मु.शी.:राज्यात कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाची अंमलबजावणी परिणामकारकरित्या राबविण्यात न येणे याबाबत डॉ.दीपक सावंत वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 7 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : महाराष्ट्रामध्ये कुष्ठरुग्णांची संख्या वाढत असून हा सर्वांसाठी चिंतेचा विषय आहे. क्रियाशील रुग्णांच्या संख्येमध्ये 2009-10 ते 2011-12 या काळात निश्चितच वाढ झालेली आहे. 2009-10मध्ये या रुग्णांची संख्या 9948 होती, 2010-11मध्ये 10,433 आणि 2011-12 या वर्षातील जानेवारीच्या अखेरपर्यन्त ही संख्या 13026 इतकी झालेली आहे. या रुग्णांची संख्या कमी करण्यासाठी, त्यांना आजारातून मोकळे करण्यासाठी, त्यांच्यावर शस्त्रक्रिया करुन त्यांना नवे जीवन देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत ? या कुष्ठ रुग्णांच्या काही मागण्या आहेत. त्यांच्या मुलांना रिक्षाचे परवाने द्यावेत, पालिकेमध्ये आरक्षण ठेवावे, संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत पालकांना 2500 ते 3000 रुपये मिळावेत, दारिद्रय रषेखालील लोकांना ज्या प्रमाणे पिवळे कार्ड देण्यात येते तसे पिवळे कार्ड दिले जावे, या त्यांच्या मागण्या शासन मान्य करणार काय ? हे लोक समाजाच्या बाहेर रहातात, त्यांच्या ठराविक वस्त्या आहेत. समाज त्यांना जवळ घेत नाही. त्यांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. तेव्हा त्यांच्या मागण्यांचा शासन सहानुभूतीपूर्वक विचार करणार काय ? तसेच अस्थिव्यंग सर्जरीसाठी काय उपाययोजना करण्यात येणार आहे ?

प्रा. फौजिया खान : कुष्ठरुग्णांची संख्या वाढलेली आहे. आपण या संदर्भात शोध मोहीम घेतली होती. राज्यातील 19 जिल्ह्यामध्ये ही शोध मोहीम घेण्याची परवानगी केन्द्र शासनाने दिली आणि केन्द्रशासनाने त्यासाठी 84 लाखाचा निधी देखील दिला. या वर्षी सुध्दा निधी दिला जाणार आहे. या शोध मोहिमेमध्ये 2593 इतके रुग्ण आढळले. हा बरा होणारा आजार आहे. या रुग्णांना क्युरेटिव्ह मेझर्स देण्यात येतात. तसेच त्यांच्यावर पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया करण्यात येते, वर्णोपचार करण्यात येतो, भौतिकोपचार करण्यात येतो, एमसीआरची चप्पल देण्यात येते, गॉगल्स देण्यात येतात. दारिद्र्य रेषेखालील रुग्णाला रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरीसाठी 5 हजार रुपये देण्यात येतात. एनजीओला देण्यात येणारी मदत देखील वाढविण्यात आलेली आहे. ड्रेसरच्या मानधनामध्ये वाढ केलेली आहे. 2005मध्ये हा कुष्ठरोग महाराष्ट्रातून नष्ट झाला होता. हजारामागे 1 रुग्ण असेल तर हा रोग नाहीसा झालेला आहे असे समजण्यात येते. परंतु हे प्रमाण वाढून 1.17 असे झालेले आहे. शोध मोहिमेमध्ये रुग्ण आढळला तर त्याला क्युरेटिव्ह मेझर्स देण्यात येतात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : खेड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) जगबुडी नदीमध्ये बोटिंग सुरु करण्याची परवानगी मिळण्याबाबत

मु. शी. : खेड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) जगबुडी नदीमध्ये बोटिंग सुरु करण्याची परवानगी मिळण्याबाबत सर्वश्री रामदास कदम व परशुराम उपरकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील जगबुडी नदीमध्ये पर्यटनासाठी बोटिंग सुरु करणे तसेच विश्रामगृहाची सोय करणे याकरिता मंजुरी देण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांना वारंवार देण्यात आलेली निवेदने, या ठिकाणी बोटिंगची सुविधा केल्यास या माध्यमातून स्थानिकांना रोजगार निर्माण होणे, तसेच पर्यटकही या ठिकाणी आकृष्ट होण्यास मदत होणे, याकरिता या ठिकाणी बोटिंग सुरु करण्याबाबत शासनाने मंजुरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : ही जगबुडी नदी मुंबई-गोवा रस्त्यापासून 200 मीटरवर आहे. सन 2009मध्ये बोटिंगसाठी नगरपालिकेकडून प्रस्ताव दिलेला आहे. सन 2010मध्ये माननीय मंत्री महोदय यांनी हे प्रकरण मंजुरीसाठी पाठविलेले आहे असे उत्तर दिलेले होते. आता 2012 या वर्षातील एप्रिल महिना सुरु आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात आराखडा करण्यात आलेला आहे काय ? यासाठी किती निधी लागणार आहे ? त्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

कोकणामध्ये मुंबई-गोवा रस्त्यावर चांगले पर्यटन स्थळ होण्यासारखे आहे. या ठिकाणी किती दिवसात पर्यटन स्थळ विकसित होईल व त्यासाठी किती तरतूद करण्यात आलेली आहे ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, खेड शहरालगत असलेल्या जगबुडी नदीमध्ये नगरपरिषदेच्या माध्यमातून बोटींग व्यवसाय सुरु करण्याकरिता अनेक दिवसापासून प्रयत्न चाललेले आहेत. दिनांक 16 जुलै, 2009 रोजी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड यांच्याकडे नगरपरिषदेकडून प्रस्ताव पाठविण्यात आला. त्यानंतर मेरिटाईम बोर्डाकडून जागेची पाहणी करण्यात आली. मेरिटाईम बोर्डाने 16 मार्च, 2011 रोजी विस्तृत असा डी.पी.आर.करण्याची विनंती केलेली आहे. माझी माहिती अशी आहे की, डी.पी.आर.करण्याचे काम झालेले आहे. नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे हा विषय ठेऊन नंतर तो शासनाकडे येईल. या विषयाकडे अतिशय सकारात्मक दृष्टीने पाहिले जाईल. हा प्रस्ताव शासनाकडे अजून आलेला नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : पिंपरी -चिंचवड जि.पुणे येथील यशवंतराव चव्हाण रुग्णालयात निवासी वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक करणे

मु.शी : पिंपरी -चिंचवड जि.पुणे येथील यशवंतराव चव्हाण रुग्णालयात निवासी वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक करणे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पिंपरी-चिंचवड, जि.पुणे येथे यशवंतराव चव्हाण रुग्णालयात रात्रीच्या वेळी रुग्णालयाचे कामकाज जबाबदारीने पाहण्याकरिता निवासी वैद्यकीय अधिकारी असावा, यादृष्टीने त्या पदाचा प्रस्ताव तयार करण्यात येणे, अद्यापही या प्रस्तावावर कोणताच निर्णय न झाल्याने दिवसभराचे काम उरकल्यानंतर पुन्हा रात्रपाळी करण्याची सक्तीची ड्युटी 34 डॉक्टरांना करावी लागणे, राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच रस्त्यावर व औद्योगिक क्षेत्रामध्ये होणाऱ्या अपघातातील रुग्ण, अत्यवस्थ अवस्थेतील रुग्ण या रुग्णालयात उपचारासाठी येत असतांना रात्रीच्या वेळी सेवाज्येष्ठ वेद्यकिय अधिकारी नसल्याने रुग्णांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागणे, परिणामी रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये वेळेवर योग्य ते उपचार मिळत नसल्याने निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पिंपरी-चिंचवड येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासबंधी ही लक्षवेधी सूचना आहे. सर्जिकल, मेडीकल आणि विविध प्रकारच्या सेवा घेण्यासाठी लोकांना रात्री-अपरात्री जाण्याची वेळ येते. विशेषत: पिंपरी-चिंचवड परिसरात असलेल्या या रुग्णालयाला चांगला दर्जा देण्यात आलेला आहे. या रुग्णालयात मोठया प्रमाणात अनियमितता आहेत, त्यामुळे रात्रीच्या वेळेला रुग्णांनी डॉक्टरांना मारहाण केली, रुग्ण आणि सेवकवर्ग यांच्यात मारामारी झाली अशा घटना सातत्याने या रुग्णालयात घडत असतात. यास महत्वाचे कारण असे आहे की, तेथे निवासी वैद्यकीय अधिकारीच उपलब्ध नाहीत. दिवसा जे वैद्यकीय अधिकारी काम करतात, त्यांच्या पाळीपाळीने रात्री सेवा लावल्या जातात. चार-पाच वर्षापासून जाहीर होते आहे की, आम्ही निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे राज्य शासनाने आकृतीबंध केल्यावर लागलीच भरु. परंतु अद्यापपर्यंत निवासी वैद्यकीय अधिकारी नेमले गेलेले नाहीत. या लक्षवेधी सूचनेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. एक अधीक्षक आणि दोन निवासी वैद्यकीय अधिकारी अशी तीन पदे त्या ठिकाणी आवश्यक आहेत. ती कधीपर्यंत भरण्यात येतील ? यशवंतराव चव्हाण रुग्णालयामध्ये कॅथलॅब आऊट सोर्सींग करण्यात आलेले आहे.त्याच्यामध्ये सुध्दा बऱ्याचशा अनियमितता आहेत. जनतेला त्याचा त्रास होतो आहे. कॅटरॅक मधील व इतर ज्या अनियमितता झालेल्या आहेत,त्याची चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, पिंपरी-चिंचवड या परिसरामध्ये यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे एकमेव संदर्भ सेवा व सामान्य सेवा देणारे रुग्णालय आहे. त्या परिसरामध्ये एकूण आठ रुग्णालये आहेत आणि इतर 25 दवाखाने आहेत. 1989 साली हे रुग्णालय 250 खाटांचे होते. त्यावेळी हा कर्मचारीवृंद मान्य करण्यात आला होता. सुरुवातीला वर्ग-1 ची 23 पदे, वर्ग-2 ची 20 पदे एवढया पदांना मान्यता देण्यात आली होती. परंतु हळूहळू त्याचे रुपांतर 750 खाटांमध्ये झालेले आहे. परंतु त्या ठिकाणी नवीन कर्मचारीवृंद नेमला गेलेला नाही. त्या ठिकाणी कार्यरत असलेला कर्मचारीवृंद आणि मानधनावर नेमलेले वर्ग-1 व वर्ग-2 चे 41 वैद्यकीय अधिकरी यांच्या माध्यमातून काम चाललेले आहे. त्या ठिकाणची परिस्थिती समाधानकारक नाही ही गोष्ट मान्यच केली पाहिजे.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1..... श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

त्यामुळे रात्रीची सेवा देण्याकरिता कॅज्युअल मेडिकल ऑफिसरांची ओढाताण होते. आता दोन कॅज्युअल मेडिकल ऑफिसर कार्यरत आहेत. त्याचबरोबर आणखी तीन रजा राखीव आणि एक कॅज्युअल मेडिकल ऑफिसर यांची मानधनावर सोय केलेली आहे. म्हणजे तेथे सध्या सहा मेडिकल ऑफिसर काम पहात आहेत. त्यांनाही पूर्ण काम करता येत नाही म्हणून एकूण 34 ज्येष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तेथे महिन्यातून एकदा दोन दिवस रात्रपाळी करायची आणि एक दिवस सुट्टी घ्यायची अशी व्यवस्था केली आहे. 34 वैद्यकीय अधिकाऱ्यांना आळीपाळीने रात्रपाळी देण्यात आली आहे.

सभापती महोदय, 750 खाटांच्या रुग्णालयाकरिता नवीन आकृतीबंध निर्माण करण्याचे काम सुरु आहे. माझ्या माहितीप्रमाणे ते काम पूर्ण होत आले आहे. त्या आकृतीबंधाला अद्याप महापालिकेची मान्यता मिळालेली नाही. महापालिकेने मान्यता घेऊन प्रस्ताव शासनाकडे सादर केल्यास त्या प्रस्तावाला त्वरित मान्यता दिली जाईल. सध्या प्रत्येक वैद्यकीय अधिकाऱ्याला महिन्यातून दोन दिवस रात्रपाळी करावी लागते. नवीन आकृतीबंध अंमलात आल्यानंतर परिस्थिती पूर्वपदावर येईल. कॅथलॅबच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. त्याची माहिती आता उपलब्ध नाही, तो देता येईल. परंतु 250 खाटांच्या रुग्णालयाकरिता मान्यता असलेला आकृतीबंध 750 खाटांचे रुग्णालय झाले तरी बदललेला नाही. पुन्हा एकदा ही प्रक्रिया लवकर करुन महापालिकेने त्या आकृतीबंधाला मान्यता द्यावी आणि तो प्रस्ताव शासनाकडे आल्यानंतर त्वरित मंजुरी देण्यात येईल. तोपर्यंत मानधनावर कॅज्युअल मेडिकल ऑफिसर नेमले आहेत. त्यांच्यामार्फत काम चाललेले आहे. माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे त्याचा विचार करुन निश्चितपणे लवकर निर्णय घेण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी अत्यंत तळमळीने उत्तर दिले आहे. त्या रुग्णालयामध्ये डॉक्टरांचा ग्रूप आहे. नवीन डॉक्टर रुग्णालय सेवेत येणे त्यांना मान्य नाही. आकृतीबंध मान्य झाला तरी महापालिकेकडून सातत्याने त्यात बदल करण्यासाठी दिरंगाई होणार आहे. 2000 सालापासून हा प्रस्ताव प्रलंबित आहे. हा प्रस्ताव महापालिकेने किती दिवसात शासनाला सादर करावा याची कालमर्यादा निश्चित करण्यात येईल काय?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने अद्याप नवीन आकृतीबंध शासनाकडे पाठविलेला नाही. महापालिकेला पुन्हा आठवण करुन देण्यात येईल. तो आकृतीबंध तयार झाला आहे अशी माहिती आहे. महापालिकेने आमसभेची मंजुरी घेऊन शासनाकडे प्रस्ताव पाठवावा, त्याबाबत लवकर कारवाई करण्याचे आदेश देण्यात येतील. प्रस्ताव शासनाकडे आल्यानंतर त्वरित मंजुरी देण्यात येईल. 750 खाटांचे रुग्णालय आहे त्यासाठी जे वैद्यकीय अधिकारी नियुक्त करावे लागतील ते निश्चितपणे नियुक्त केले जातील.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वाहन चोरी पकडण्यास सहाय्यभूत होण्यासाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेटची अंमलबजावणी करणे

मु. शी. : वाहन चोरी पकडण्यास सहाय्यभूत होण्यासाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेटची अंमलबजावणी करणे यासंबंधी सर्वश्री विनायक मेटे, सुभाष चव्हाण, हेमंत टकले, विक्रम काळे, जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"भारत सरकार सेंट्रल मोटर ॲक्ट सन १९८९ मध्ये सुधारणा करुन मोठया प्रमाणात होत असलेली वाहन चोरी, सदर वाहने पकडण्यास सहाय्यभूत होण्याच्या दृष्टीने हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट करण्याबाबत केंद्र सरकारने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे सर्व राज्यांना सूचना दिल्या असणे, परंतु महाराष्ट्र राज्यामध्ये अजून याबाबतची कोणतीही कार्यवाही झाली नसणे, तथापि, "उत्सव" या नंबर प्लेट बनवणाऱ्या कंपनीमार्फत मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर या ठिकाणी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेटच्या नावाखाली बनावट प्लेट तयार करणे, एका गाडीच्या प्लेटकरिता रु.१,५०० ते २,०००/- रुपये इतकी रक्कम वसूल करणे, याप्रमाणे २०११ पासून ते आजतागायत पर्यंत किमान १०० ते १५० कोटी रुपयांचा अपहार होणे, याप्रकरणी शासनाने कोणतीही दखल न घेणे, यामुळे गाडीधारकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष याविषयी शासनाने त्वरेने दखल घेऊन करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.3....

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, निवेदनामध्ये मूळ प्रश्नाला उत्तर दिलेले नाही. सध्या नवीन वाहन खरेदी केल्यानंतर नंबर प्लेट लावली जाते त्याऐवजी हाय सिक्युरिटी ॲलर्ट प्लेट बसविण्याबाबत सुप्रीम कोर्टाने आणि केंद्र सरकारने गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. त्याबद्दल कोणतीही कारवाई आजतागायत केलेली नाही. त्याची अंमलबजावणी केव्हा करणार आहात? एप्रिल अखेर निर्णय घेऊन अंमलबजावणी करावयाची आहे. दोन-तीन वर्षात शासनाकडून कोणताही निर्णय झालेला नसताना बनावट प्लेट तयार करुन वाहनधारकांना गंडविण्याचे काम उत्सव कंपनीकडून आणि अधिकारी वर्गाकडून केले जात आहे.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

अशा प्रकारे जवळपास 100 ते 150 कोटी रुपयाचे नुकसान ग्राहकांच्या खिशातून काढून केले आहे. त्यामुळे या उत्सव कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई शासन करणार काय, तसेच त्या कंपनीवरुन गुन्हा दाखल करणार काय ? या उत्सव कंपनीने गोव्यात देखील असा प्रयत्न केला आणि मला स्वत:लाही तसा अनुभव आला आहे. म्हणून शासनाने अशा प्रकारची कोणतीही नंबर प्लेट अधिकृत न करता किंवा तसे धोरण ठरविता बनावट नंबर प्लेट्स तयार करुन चोरी करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. हे प्रोत्साहन आरटीओ कडून देखील मिळते की आपण अर्धे-अर्धे वाटून घेऊ अशा प्रकारचे प्रयत्न होतात, हे शोधून शासन संबंधित कंपनी व यात जे अधिकारी सामील असतील त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, केंद्र शासनाने नियमात बदल करुन हाय सिक्युरिटी नंबर प्लेट्स लावण्याची तरतूद केली आहे. त्याच पध्दतीने सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांना सूचना केल्या आहेत की, प्रत्येक राज्यात अशी व्यवस्था करावी. त्यानुसार प्रत्येक राज्याने निविदा काढून अशा प्रकारच्या नंबर प्लेट्स तयार करण्याचे काम सुरु केले होते. पण महाराष्ट्रात आपण एक जास्तीची सुविधा करण्याची सूचना केली होती ती म्हणजे आरएफआयडी ही तरतूद करण्याची सूचना केली व त्याला उच्च न्यायालयाने मान्यता दिली होती. पण त्याला केंद्र शासनाने हरकत घेतली आणि सांगितले की, अशा प्रकारची व्यवस्था आपल्या राज्यात आपल्याला करता येणार नाही. सर्व राज्यांना ज्याप्रमाणे सूचना केल्या आहेत तशीच व्यवस्था आपल्या राज्यात सुध्दा करावी. या सर्व गोष्टींची दुरुस्ती करण्यात आतापर्यंतचा कालावधी गेला. सध्याच्या परिस्थितीत ही बाब न्यायप्रविष्ट असून यानंतर राज्य शासनाने केंद्राला सांगितले की, आमची तरतूद आम्ही मागे घेतो. असे सांगून केंद्र शासनाने आपल्या विरोधात दाखल केलेले पिटीशन मागे घेणार असल्याचेही सांगितले. त्यानंतर राज्य सरकार देखील केंद्राच्या सूचनेप्रमाणे निविदा काढणार आहे. कोर्टातून हे पिटीशन मागे घेतल्यानंतर पुढील कारवाई ताबडतोब करण्यात येईल.

सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न उत्सव कंपनीच्या संदर्भात विचारला होता. त्या अनुषंगाने मला सांगावयाचे की, हे काम उत्सव कंपनीच नव्हे तर कोणत्याही कंपनीला दिलेले नाही त्यामुळे अशा प्रकारच्या डुप्लीकेट नंबर प्लेट्स बनविण्याचा प्रश्नच उद्भवत नाही म्हणून राज्यात नंबर प्लेट्स बनविणारे जे उद्योग असतील .....

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या डुप्लीकेट नंबर प्लेट्स इश्यू केल्या आहेत व त्यासंबंधीचे पुरावे देखील त्यांच्याकडे आहेत. अशा प्रकारच्या बनावट प्लेट बनविल्या जात असतील तर काय कारवाई करणार हा प्रश्न आहे.

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, अशा नंबर प्लेट्स इश्यू केल्या असतील तर .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, निवेदनामध्ये मा.मंत्री महोदय वेगळी माहिती दिली असून या ठिकाणी ते वेगळीच माहिती देत आहेत. लक्षवधी सूचनेच्या निवेदनातील चौथ्या पॅरामध्ये असे म्हटले आहे की, "राज्यात हाय सिक्युरिटी नंबर प्लेट सदृश नंबर प्लेट विकण्याचा व्यवसाय मे. उत्सव सिक्युरिटी सिस्टीम लि., दिल्ली ही संस्था करीत असल्याची तक्रार परिवहन आयुक्त कार्यालयास दिनांक 10.2.2009 रोजी प्राप्त झाली असता चौकशी अंती या संस्थेद्वारा नियुक्त नंबर प्लेट विक्रेत्यांना कामकाज बंद करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. मे. उत्सव सिक्युरिटी सिस्टिम्स लि. दिल्ली यांना सदर विक्री तत्काळ बंद करण्याबाबत दिनांक 2.7.2010 रोजी नोटीस बजावण्यात आली असून अनधिकृत नंबर प्लेट विक्रेत्यांपासून सावध राहण्याबाबत वर्तमानपत्रातून बातम्या देण्यात आलेल्या आहेत." असे असतांना तुम्ही सांगता नंबर प्लेट भेटल्या नाहीत. हा प्रकार गेल्या दोन तीन वर्षापासून सुरु आहे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना यासंदर्भात शंका येण्यास वाव आहे. मी ब्रिफींग घेत असतांना मला सुध्दा ही शंका आली होती की, एका बाजूने आपण सांगतो आहोत की, नंबर प्लेट बनविणे बंद करा व दुसऱ्या बाजूला म्हणतो की, "त्याला काही बंधन नाही". आमचे अधिकारी नंबर प्लेट बनविणाऱ्यांकडे गेले तेव्हा उत्सव कंपनीने सांगितले की, "आम्ही यापुढे अशा नंबर प्लेट बनविणार नाही. एजन्सी म्हणून आम्ही तुमचे काम करण्यास तयार नाही". या कंपनीने नंबर प्लेट बनविण्याचे काम बंद केलेले आहे. परंतु नंबर प्लेट कोणत्या स्वरुपाची, कोणत्या दुकानदाराकडून घ्यावी याबाबत काहीही बंधन नाही. हाय सिक्युरीटी नंबर प्लेटचे टेंडर कोणत्याही संस्थेला आपण आतापर्यंत दिलेले नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, नंबर प्लेटच्या संदर्भात आपल्या समोर सर्व कारभार आलेला आहे. परिवहन खात्यातील अधिकारी सांगतात की, तुम्ही अशा प्रकारची नंबर प्लेट लावली पाहिजे व ही नंबर प्लेट या दुकानातून घ्या. हा व्यवहार सर्रासपणे सुरु असून लोकांना नंबर प्लेट लावण्याची सक्ती केली जात आहे. सुप्रीम कोर्टात हा विषय सुरु असतांना असे प्रकार नंबर प्लेटच्या बाबतीत घडत असतील तर या घटनेची नोंद घेऊन संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. उत्तरात म्हटले आहे की, "कन्सेन्ट टर्म" दाखल केले आहे त्यामुळे आपण कोणत्या कन्सेन्ट टर्म दाखल केलेल्या आहेत ? हाय सिक्युरीटी नंबर प्लेट लावण्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

संदर्भात कन्सेन्ट टर्म देण्यास इतका विलंब का होत आहे? हा प्रश्न लोकांच्या वाहतुकीशी, सुरक्षिततेशी व जीवनाशी निगडित आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात शासन इतका हलगर्जीपणा का करीत आहे याची चौकशी केली जाणार आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, कोणती नंबर प्लेट लावावी असे बंधन कोणताही अधिकारी घालणार नाही. जर असे कोणी सांगत असेल तर संबंधितांवर कारवाई केली जाईल परंतु माझ्या माहिती प्रमाणे कोणती नंबर प्लेट लावली पाहिजे अशा पध्दतीचे बंधन संपूर्ण राज्यात घेतले जाणार नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे की, यासंदर्भात विलंब का होत आहे ? यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आरआयबीची सुविधा राज्य सरकारच्या माध्यमातून केली गेली होती परंतु केंद्र शासनाने यास आक्षेप घेतला होता. केंद्र सरकार राज्य सरकारच्या विरोधात कोर्टात गेले व त्यांनी पीटीशन दाखल केले होते. त्यामुळे या सर्व गोष्टीला विलंब झालेला आहे. आता हे पिटीशन केंद्र सरकार लवकरच मागे घेणार असून यासंदर्भात लवकरात लवकर टेंडर काढले जाणार आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, एका बाजूला तुम्ही बनावट नंबर प्लेट बनविणाऱ्या कंपनीला नोटीस देत आहात असे उत्तरात सांगितले आहे व येथेही सांगितले आहे. बनावट नंबर प्लेट तयार केल्या जातात हे मंत्री महोदय मान्य करतात. त्यामुळे अवैध रित्या जे काम करतात त्यांच्यावर गुन्हे दाखल का केले जात नाही ? या सर्व प्रकरणात तुमचे अधिकारी गुंतलेले आहेत. लाखो लोकांनी नंबर प्लेट विकत घेतलेल्या आहेत. या प्रकरणामध्ये जवळपास 100 ते 150 कोटी रुपयांचा फ्रॉड झालेला आहे. त्यामुळे परिवहन खात्याच्या अधिकाऱ्यांना मा. मंत्री महोदय पाठीशी का घालीत आहे ? यापुढे बनावट नंबर प्लेट मिळणार नाही व अधिकृत नंबर प्लेट मिळण्याच्या संदर्भात शासन काय उपाययोजना करणार आहे ?

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : हा जो काही सर्व प्रकार सुरु आहे त्यामध्ये माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे 150 कोटींचा भ्रष्टाचार झाला असेल तर मंत्री महोदयांनी हे प्रकरण तातडीने अँटीकरप्शन ब्युरोकडे सुपूर्द करावे. आणि यामध्ये जबाबदार असलेल्या लोकांवर योग्य ती कारवाई करावी अशाप्रकारचे निर्देश देतो.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, आपण निदेश दिल्यानंतर त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे मला भाग पडेल परंतु हे बरोबर नाही. आपण दिलेला निर्णय योग्य होणार नाही, आपण आदेश दिल्यामुळे मला "होय" म्हणावे लागेल. यामध्ये 150 ते 200 कोटींचा भ्रष्टाचार झालेला नाही. यामध्ये अतिशय पारदर्शकता आहे, कुठेही गोंधळ नाही. या ठिकाणी तशाप्रकारचे वेगळे चित्र निर्माण केले जात आहे. या कामाचे टेंडर आपण कुणालाही दिले नाही त्यामुळे यामध्ये 100 ते 200 कोटींचा भ्रष्टाचार होण्याचा प्रश्न येत नाही. आपण सांगाल त्याप्रमाणे या संदर्भात आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत उच्च स्तरीय चौकशी समिती नियुक्त करुन या बाबतची चौकशी केली जाईल.

उप सभापती : ठीक आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय,आपण निर्देश दिल्यानंतर...

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन जर माननीय सभापतींनी मंत्री महोदयांना निर्देश दिले असतील तर ते मंत्री महोदयांवर बंधनकारक असले पाहिजेत. तसे काही घडलेले नाही वगैरे कसे सांगता येईल.

(गोंधळ)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सभापतींनी एकदा निर्देश दिल्यानंतर मंत्री महोदयांना "नाही" म्हणता येणार नाही.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना वेगळया दिशेने जात होत्या. साहजिकच एवढा उठाव झाल्यानंतर आणि 100 ते 200 कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे असे म्हटल्यानंतर माननीय सभापतींनी साहजिकच या प्रकरणाची अँटी करप्शन ब्युरोमार्फत चौकशी करावी असे निर्देश दिले. परंतु यामधील वस्तुस्थिती सांगणे हे माझे काम आहे. यामध्ये सी.आय.डी. किंवा सी.बी.आय. ची चौकशी लावून अधिकाऱ्यांना आणि जनतेला वेठीला धरणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर...

बरोबर होणार नाही. म्हणून या प्रकरणामधील सत्यता सांगण्याचे काम मी केले आहे. या व्यतिरिक्त उच्च स्तरीय चौकशी नियुक्त करण्यास माझी तयारी आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, या ठिकाणी सरळ सरळ अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा हा उद्योग आहे. आपल्याला चौकशी करण्यामध्ये अडचण काय आहे, ती होऊन जाऊ द्या.

(गोंधळ)

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्देशाचा अवमान केला जात असल्यामुळे आपण मंत्री महोदयांना ताकीद दिली पाहिजे.

(अनेक माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. विनोद तावडे : माननीय सभापतींनी दिलेले निर्देश पाळले जाणार नसतील तर आम्ही काय बोलणार?....

(गोंधळ)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

उप सभापती : मंत्री महोदयांनी निर्देश नाकारले नाहीत तेव्हा आपण कृपया शांतपणे खाली बसावे. मंत्री महोदय, या विषयासंदर्भात निर्देश देण्याची पाळी एकाच गोष्टीमुळे माझ्यावर आली ती म्हणजे या प्रकरणाबद्दल संपूर्ण सभागृहाने साशंकता व्यक्त केली आहे आणि आपल्या उत्तराने सभागृहाचे समाधानही होत नाही त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्यापेक्षा त्याची तड लागावी या करिता मी सांगितले आहे. यामध्ये जर खरोखर काही नसेल तर " दूध का दूध, पानी का पानी" होईल. त्यामुळे या ठिकाणी चौकशीचे निर्देश मी आकसबुध्दीने दिलेले नाहीत. माननीय सदस्यांच्या प्रश्नांना न्याय मिळण्यासाठी मी हे सूचित केले आहे. त्याबाबत काय करावे हे आपण निश्चितपणे ठरवावे. शेवटी आपण शासनाचे प्रतिनिधी आहात.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, होय.

(यानंतर श्री. भारवि)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : दहावी-बारावी परीक्षेचे पेपर तपासण्या संबंधात राज्य शिक्षक परिषदेने परीक्षा बोर्डाकडे केलेल्या विविध मागण्या

मु. शी. : . दहावी-बारावी परीक्षेचे पेपर तपासण्या संबंधात राज्य शिक्षक परिषदेने परीक्षा बोर्डाकडे केलेल्या विविध मागण्या यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे,संजय केळकर,चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते,भगवान साळुंखे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"यावर्षी दहावी-बारावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने प्रत्यक्ष परीक्षकांकडे 250 ऐवजी 350 पेपर तपासणीसाठी येण्याची शक्यता, एकीकडे विद्यार्थी संख्या वाढलेली असताना मुंबई बोर्डाने विनाअनुदानित शाळांमधील सुमारे 1074 शिक्षकांना परीक्षकांच्या कामातून वगळणे, तपासणीसाठी येणारे 350 पेपर दहा दिवसात पूर्ण करावे लागणार असल्यामुळे त्या कालावधीत शिक्षकांना इतर जबाबदाऱ्यातून मुक्त करावे अशी मागणी राज्य शिक्षक परिषदेने बोर्डाच्या अध्यक्षांकडे करणे, पेपर तपासणीसाठी मिळणारे मानधनही अत्यल्प असल्याने ते वाढविण्याबाबतची मागणीही दीर्घकाळ प्रलंबित असल्यामुळे शिक्षक वर्गात असलेली प्रचंड नाराजी व याबाबतची शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, दहावी-बारावीच्या पेपर संबंधातील लक्षवेधी सूचना मी उपस्थित केली आहे. लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, विद्यार्थी संख्या व परीक्षकांची उपलब्धता यांच्या प्रमाणात उत्तरपत्रिका तपासणीसाठी दिलेल्या आहेत. तेव्हा हे प्रमाण काय आहे ? काल ज्यावेळी विद्यार्थ्यांच्या परीक्षा बुडत होत्या त्यावेळी शिक्षक आमदार काहीच बोलले नाहीत. त्यामुळे आम्हालाच बोलावे लागले. हे मी माहिती म्हणून सांगत आहे. तेव्हा तंतोतंत प्रमाणे काय आहे हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे. मानधन वाढविण्याची मागणी मान्य करण्यात आली आहे. तेव्हा त्यांची मागणी काय होती व काय मान्य केले आहे, हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे मग पुढेच उप प्रश्न विचारता येतील.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, उत्तर पत्रिका तपासण्याचे प्रमाण नसते. एका दिवसात 25 ते 30 पेपर एका व्यक्तीला तपासता येतात. त्याप्रमाणे काम देण्यात येते. अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित शाळा व महाविद्यालयाकडून प्रमाणित करून आलेल्या पात्र शिक्षकांना पेपर तपासण्याचे काम देण्यात येते. येथे कोणत्या मागण्या आहेत यासंबंधी देखील विचारणा करण्यात आली आहे. परीक्षकांना 200 पेक्षा अधिक पेपर तपासायला देऊ नये अशी मागणी आहे. पेपर तपासणीसाठी 10 दिवसां ऐवजी 20 दिवसांची मुदत द्यावी. मानधन प्रती पेपर रूपये सहा एवढे द्यावे. अशा प्रकारे तीन मागण्या करण्यात आल्या आहेत. 200 हून अधिक पेपर तपासण्यासाठी देऊ नये ही मागणी मान्य करता येणार नाही. कारण या वर्षी विद्यार्थ्यांची संख्या खूप वाढली आहे. मागील वर्षी पेक्षा दहावीचे विद्यार्थी 18 हजाराने वाढले आहेत तर बारावीचे विद्यार्थी 11 हजाराने वाढले आहेत. या बरोबरच आपण परीक्षकांची देखील संख्या वाढविली आहे. पूर्वी दहावीसाठी 62315 परीक्षक होते ते आता 64496 केले आहेत. बारावीसाठी 32215 परीक्षक होते ते आता 33343 केले आहेत. 200 पेपर ऐवजी आपण 250 पेपर देतो. पण काही विषयाचे जास्त पेपर देणे गरजेचे असते. सायन्स स्ट्रीममध्ये, गणित किंवा कॉमर्स स्ट्रीमध्ये गणित विषय असतो. अशा विषयाचे पेपर आपण जास्त देतो. ही संख्या या वर्षीच वाढली असे नाही. दहा दिवसांऐवजी 20 दिवसांची मुदत पेपर तपासणीसाठी द्यावी अशी मागणी आहे. हे पण शक्य नाही. कारण सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे की, 10जून पर्यंत निकाल लावणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

निकाल लवकर लावायचा असेल तर 10 दिवसांच्या अवधी शिवाय पर्याय नाही. त्यामुळे या दोन मागण्या मान्य करता येणार नाहीत. आपण 2008 मध्येच मानधन 66 टक्के वाढवलेले आहे. याची आपणास आकडेवारी पाहिजे असल्यास ती देखील मी द्यायला तयार आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे की, 10 दिवसांपेक्षा अधिक कालावधी आम्हाला देता येणार नाही. मूळात हे उत्तरच हरकत घेण्यासारखे आहे. दहावी आणि बारावीचे पेपर असतात. ते पेपर अत्यंत बारकाईने, काटेकोरपणे डोके शांत ठेवून तपासावे लागतात. आता RTEA आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्याला आपला पेपर पहायला मिळणार आहे. त्यामुळे हे काम अत्यंत व्यवस्थित होण्यासाठी त्या शिक्षकाला पुरेसा वेळ मिळाला पाहिजे. एका बाजूला पेपर व्यवस्थित तपासायला पाहिजे आणि दुसऱ्या बाजूला कमीतकमी वेळेमध्ये पेपर तपासून द्यावेत असे आपण सांगत आहात. आता पेपरचा गठ्ठा देखील जास्त संख्येचा राहणार आहे. त्यामुळे हे काही बरोबर वाटत नाही.

श्रीमती रणदिवे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून यासाठी शिक्षकांना एका दिवसात पेपर तपासण्यासाठी साधारणत: किती वेळ लागतो आणि किती पेपर तपासले जाऊ शकतात आणि एकंदर दिलेल्या पेपरची संख्या याप्रमाणात आपण त्यांना वेळ दिला पाहिजे, तसा तो देण्यात येणार आहे काय? हे शिक्षक नियमित शाळेत काम करणारे आहेत. एका बाजूला त्यांना दहावी-बारावीचे पेपर तपासावे लागतात. शाळेतील कामही करावे लागते.बोर्डाने असे म्हटले आहे की, शक्यतो त्यांना शाळेचे काम देऊ नये.पण त्यांना शाळेच्या कामातून सूट मिळतच नाही. म्हणून जे शिक्षक दहावी-बारावीचे पेपर तपासण्याचे काम करतात त्यांच्यावर एका दिवसामध्ये किती पेपर तपासावयाचे आणि संपूर्ण पेपर किती दिवसामध्ये तपासावयाचे याबाबत बंधन टाकलेले आहे हे विचारात घेता, तुम्ही त्यांना जो दहा-बारा दिवसाच्या कालावधी देत आहात, त्या काळामध्ये त्यांना पेपर तपासण्याशिवाय अन्य कामे देण्यात येऊ नयेत अशा प्रकारच्या सक्त सूचना शाळांना देणार आहात काय?

सभापती महोदय, आता 18 हजार विद्यार्थी वाढले. त्यादृष्टीने किती शिक्षक वाढले, किती परीक्षक आणि नियामक वाढले? तर ती संख्या फार कमी आहे. एवढी काही त्यांची संख्या वाढलेली नाही आणि जर वाढली असेल तर माझा प्रश्न असा आहे की, आपण या परीक्षकांची आणि नियामकांची नियुक्ती करताना सर्व शाळांना त्यामध्ये घेत नाही. मुंबई विभागामध्ये शासनमान्य अनुदानित, विना-अनुदानित, कायम विना-अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या किती आहे आणि तुम्हाला दरवर्षी दहावी व बारावीचे पेपर तपासण्यासाठी किती शिक्षक लागतात याचे जर प्रमाण काढले तर ती प्रचंड संख्या आहे आणि प्रत्यक्षात शिक्षक मात्र कमी आहेत.काही शाळांमधून 12-12 शिक्षक घेतले जातात आणि काही शाळा अशा आहेत की,तेथील एकही शिक्षक पेपर तपासण्यासाठी घेतला जात नाही.याबाबत चौकशी करुन सर्व शाळांना पेपर तपासणीच्या कामामध्ये समाविष्ट करुन घेणार आहात काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय,मी सन्माननीय सदस्यांना हेच सांगू इच्छिते की, शासनाकडून क्वालिटी ऑफ ॲसेसमेंट आणि टीचर्स एक्झामिनरची संख्या वाढविण्यासाठी जे काही शक्य आहे ते आम्ही सगळे पर्याय वापरण्यात येतील आणि यासाठी प्रयत्न करण्यात येतील.तसेच दुसरे म्हणजे त्यांच्या मानधन वाढीच्या संदर्भातील मुद्दा शासनाच्या विचाराधीन आहे.सन्माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा असा मांडला आहे की,शिक्षकांना जास्तीची कामे देऊ नयेत. परंतु शिक्षकांना दुसरे काही कामच देऊ नये असे काही करता येणार नाही. पण आपण यापूर्वी सर्व शाळांना .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . . .

सांगितले आहे आणि पुन्हा सांगण्यात येईल की, शिक्षकांना पेपर तपासणीचे काम करण्यासाठी जास्तीतजास्त वेळ देण्यात यावा. जर खूप काही गरजेचे असेल तरच त्यांनी शाळेचे काम करावे. तसेच सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली की, सर्व शाळांच्या शिक्षकांना पेपर तपासणीसाठी घेण्यात येत नाही. याबाबतीत सुध्दा आदेश देण्यात येतील.

. . . .3आय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नोन-युज या खाजगी बियाणे कंपनीने शेतकऱ्यांना पुरविलेले सदोष बियाणे

मु.शी. : नोन-युज या खाजगी बियाणे कंपनीने शेतकऱ्यांना पुरविलले सदोष बियाणे यासंबंधी श्री.विक्रम काळे, ॲड.उषाताई दराडे,सर्वश्री रमेश शेंडगे, हेमंत टकले वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीन सन्माननीय फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"मौजे पळसप (ता.,जि.उस्मानाबाद) येथील शेतकऱ्यांनी कमी पाण्यावर आणि अल्प कालावधीत येणारे पीक म्हणून नोन-युज या खाजगी बियाणे कंपनीच्या कुंदन (F-1) या संकरीत खरबुजाची केलेली लागवड, तथापि, सदर बियाणे सदोष असल्याने वेळोवेळी कीड व बुरशीनाशक फवारण्या करुनही सदर पिकावर पडलेले रोग आटोक्यात न येणे, यामुळे शेतकऱ्यांचे एकरी अडीच ते तीन लाखाचे नुकसान झालेले, परिणामी सदर पिकाचे पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याची तसेच सदर कंपनीवर कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.विजयकुमार गावित (फलोत्पादन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

. . . .3 आय-4

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यात अशा प्रकारच्या अनेक घटना घडत आहेत. अनेक वेळा शेतकऱ्यांना बोगस बियाणे दिल्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. परिणामी पिके वाया जातात आणि त्यातलाच हा प्रकार मौजे कोळशेत, ता.जि.उस्मानाबाद येथे घडलेला आहे. खरबूजाचे बियाणे ज्या कंपनीने दिले होते, ती खाजगी कंपनी आहे.त्या कंपनीने बोगस बियाणे दिल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे आणि नुकसानीचा आकडा कितीतरी लाखामध्ये जाऊ शकतो.म्हणून शेतकऱ्यांनी शेतकी अधिकाऱ्याकडे देखील तक्रार केली होती.कृषी अधिकाऱ्यांनी तेथे जाऊन पंचनामा देखील केलेला आहे.सदरहू अधिकारी गावामध्ये आले असताना एकदा मी स्वत: तेथे उपस्थित होतो.त्यावेळी खुद्द कृषी अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, बियाणे खराब असल्यामुळेच नुकसान झालेले आहे आणि याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, यामध्ये काही दोष नाही.अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी कोणाकडे दाद मागावयाची.शेवटी या खाजगी कंपन्या आहेत, मग तुम्ही शासनातर्फेच विक्री करावी.याबाबतीत शासनाने काही कायदा केलेला आहे काय?जर खाजगी कंपनीने चुकीचे बियाणे विकले तर त्यांच्यावर कारवाई करण्या साठी आपल्याकडे कायदा आहे काय? तसेच या शे्तकऱ्यांना जी झळ पोहोचली आहे,त्यांचे जे नुकसान झालेले आहे त्याबाबतीत शासन त्यांना आर्थिक मदत करणार आहे काय आणि जर करणार नसेल तर सदरहू कंपनीने नुकसान भरपाई द्यावी यासाठी काही प्रयत्न करणार आहे काय?

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, उस्मानाबाद जिल्ह्यातील सात शेतकऱ्यांनी जे बियाणे घेतले होते त्या बियाणाच्या बाबतीत चांगल्या प्रकारचे उत्पन्न आलेले नाही म्हणून त्यांनी कृषी अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. ती तक्रार केल्यानंतर 26 मार्च, 2012 रोजी तक्रार निवारण समितीने त्या ठिकाणी भेट दिली. त्यांच्या अगोदर 25.2.2012 आणि 15.3.2012 रोजी त्या ठिकाणी शास्त्रज्ञ आणि अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या. त्या भेटी दिल्यानंतर शास्त्रज्ञांनी असे सांगितले की, हे बियाणामुळे झालेले नाही तर त्या ठिकाणी जे रोग पडले त्या रोगांमुळे हे नुकसान झालेले आहे. अशा प्रकारचा रिपोर्ट त्यांनी तपासणीनंतर दिला. त्यामध्ये प्रामुख्याने बुरी आणि दावणी या रोगांचा प्रादु
र्भाव त्या ठिकाणी झालेला आढळला. त्यासाठी त्यांनी औषधे वगैरे सुचविलेली होती. ते बियाणे सर्वसाधारणपणे 12 जिल्ह्यांमध्ये वापरलेले आहे. त्यापैकी या जिल्ह्यातील सात शेतकऱ्यांच्या शेतामध्ये रोगामुळे हे नुकसान झालेले आहे. सर्वसाधारणपणे आपण रोग वगैरे पडले तर मार्गदर्शन करतो आणि औषध वगैरे फवारणीसाठी कृषी विभागामार्फत मदत करीत असतो. त्यामुळे त्या ठिकाणी नुकसान भरपाई देण्याचा किंवा त्या कंपनीवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, सगळेच बियाणे चांगले असते असे नाही. त्यांचे नुकसान झालेले आहे. संपूर्ण शेत काळे पडलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या सात शेतकऱ्यांचे वर्ष वाया गेले त्यांनी आता जगावे की मरावे ? त्यांनी जर जगावयाचे असेल तर हक्काचे पीक गेल्यानंतर कोणी तरी सांगत असतील की, दावणी रोग पडल्यामुळे हे झाले आहे तर ते बरोबर नाही. खरी परिस्थिती अशी आहे की, ते बियाणेच चुकीचे आहे. बियाणे चुकीचे असताना शेतकऱ्यांवर अन्याय कशासाठी ? आपण किती दिवस कंपन्यांना अशा प्रकारे अंगावर सोडणार ? यामध्ये शेतकऱ्यांचे खऱ्या अर्थाने नुकसान झालेले आहे, एक वर्ष वाया गेलेले आहे. शासनाकडे पैसे नसतील, शासनाला द्यावयाचे नसतील तर जाऊ द्या पण जी कंपनी कोट्यवधी रुपये नफा कमावते त्या कंपनीने शेत काळे पडल्यामुळे जेवढा नफा मिळणार होता तेवढी रक्कम दिली पाहिजे अशा पध्दतीचा दंड त्या कंपनीला लावणार का, त्यांना आदेश देणार का, असा कायदा करणार का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, त्या ठिकाणी शास्त्रज्ञ गेले, अधिकारी गेले. त्यांनी त्या ठिकाणी तपासणी केली. तपासणी केल्यानंतर त्यांनी अहवाल दिलेला आहे. त्या अहवालात स्पष्ट म्हटले आहे की, जे बियाणे घेतले होते त्यामुळे नुकसान झालेले नाही तर तेथील हवामानामध्ये जो बदल झाला किंवा उशिरा लावणी केली त्यामुळे त्यावर रोग पडला आणि रोगामुळे नुकसान झाले असल्यामुळे मदत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, या ठिकाणी नुकसान झाल्यानंतर चौकशी झालेली आहे. त्यावेळी जे हवामान होते त्यामुळे बियाणाचे नुकसान झाले हे त्यांना कसे कळले ? त्यांनी कशा प्रकारचे ॲन्टिसिपेशन केले ? त्यांनी काय चौकशी केली ? या ठिकाणी दिलेले उत्तर चुकीचे आहे. हे उत्तर दुरुस्त करावे. या कंपनीकडे आता असणाऱ्या बियाणांची शासन चौकशी करणार का ? कोणत्याही परिस्थितीमध्ये त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासन पावले उचलणार का ? या दृष्टीने शासनाने सकारात्मक विचार करणे गरजेचे आहे.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, या कंपनीने या वाणाचा 12 जिल्ह्यांमध्ये पुरवठा केलेला आहे. उस्मानाबादमध्ये 7 शेतकऱ्यांनी तक्रार केलेली आहे. त्या ठिकाणी कोणीतरी जाऊन बघितले असे नाही तर शास्त्रज्ञांनी जाऊन बघितले आहे. शास्त्रज्ञांनी जाऊन पाहणी करुन अहवाल दिलेला आहे. सर्वसाधारणपणे जेव्हा रोगामुळे नुकसान होते तेव्हा फवारणी वगैरे करण्यासाठी त्यांना मदत करतो. त्या पध्दतीने शास्त्रज्ञांनी आणि अधिकाऱ्यांनी जाऊन सर्व गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर त्या ठिकाणी जी तक्रार निवारण समिती आहे त्या समितीने जाऊन निष्कर्ष काढले. त्यामुळे त्यांना मदत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यांना मार्गदर्शन करुन पुढच्या काळात त्या भागात अशा पध्दतीचे रोग होत असतील तर त्यांना कृषी विभागामार्फत फवारणीसाठी सबसिडीच्या बेसवर औषधे पुरवण्याच्या बाबतीत आदेश दिले जातील

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अमरावती तहसील कार्यालयातून संजय गांधी, श्रावण बाळ, इंदिरा गांधी अर्थसहाय्य योजनेतील लाभार्थ्यांचे अर्ज गहाळ होणे

मु. शी. : अमरावती तहसील कार्यालयातून संजय गांधी, श्रावण बाळ, इंदिरा गांधी अर्थसहाय्य योजनेतील लाभार्थ्यांचे अर्ज गहाळ होणे यासंबंधी प्रा. सुरेश नवले, सर्वश्री राजन तेली, सतीश चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री मोहन जोशी, उल्हास पवार, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री अमरनाथ राजूरकर, जयप्रकाश छाजेड, एस क्यू ज़मा, सुभाष चव्हाण, जैनुद्दीन जव्हेरी, नितीन गडकरी, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार, अशोक ऊर्फ भाई जगताप,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय विशेष सहाय्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" अमरावती तहसील कार्यालयांतर्गत राबविण्यात येत असलेल्या संजय गांधी, श्रावण बाळ, इंदिरा गांधी अर्थसहाय्य योजनांमध्ये गेल्या दोन वर्षापासून अंजनगावबारी येथील 300 पात्र लाभार्थ्यांचे अर्ज तहसील कार्यालयातून गहाळ होणे, यामुळे लाभार्थी या योजनांपासून वंचित असणे, तर सांगली जिल्हयात या योजनांबाबतच्या शोध मोहिमेअंतर्गत सुमारे 18 हजार अपात्र लाभार्थी असल्याचे निदर्शनास येणे, प्रशासनाच्या अशा प्रकारच्या वेळकाढूपणा व हलगर्जीपणामुळे गरीब निराधार निकषांतर्गत पात्र दारिद्रयरेषेखालील कुटुंबाना शासकीय योजनेच्या लाभांपासून नाहक वंचित रहावे लागणे, तर बोगस अपात्र लाभार्थींमुळे कोट्यवधी रुपयांचे होत असलेले नुकसान यामुळे या पात्र लाभार्थ्यांमध्ये पसरलेली नाराजी व संतापाची भावना यासंदर्भात शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.हसन मुश्रीफ (विशेष सहाय्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, वयाचा दाखला नसणे, रहिवास दाखला नसणे, उत्पन्नाचा दाखला नसणे अशा प्रकारची कारणे या निवेदनामध्ये दिलेली आहेत. या कारणांमुळे जवळजवळ 108 प्रकरणे प्रलंबित आहेत. मंत्री महोदयांना मी वस्तुस्थिती सांगतो. त्या ठिकाणचे कारकून उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडलेले असले तरी ते काढून टाकतात. आणखी एखादे प्रमाणपत्र काढून टाकतात. लाभधारकांकडून चिरीमरी दिल्यानंतर त्यांची प्रकरणे मंजूर केली जातात. म्हणून प्रलंबित असलेल्या 108 प्रकरणांची कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन त्यांच्या प्रकरणांना ताबडतोब मंजुरी देण्याचा आदेश शासन देईल काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, बीडमध्ये बायोमेट्रिक सिस्टिम सुरु केलेली आहे. सज्जाच्या ठिकाणी तलाठी मशिन घेऊन जातात. त्या मशिनमध्ये स्मार्ट कार्ड घातले जाते. 7-8 कि.मी.परिसरातील वृध्द सज्जाच्या ठिकाणी आल्यावर त्यांना पैसे दिले जातात. माझे असे म्हणणे आहे की, पूर्वीची पध्दत चांगली होती. त्यांच्या खात्यामध्ये सरळ पैसे जमा होत होते. म्हणून पूर्वीची सुलभ पध्दत पुन्हा सुरु करण्याबाबत शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या अर्जदारांकडे वयाचे दाखला नसणे, रहिवास दाखला नसणे, उत्पन्नाचा दाखला नसणे अशा प्रकारच्या त्रुटींमुळे 108 अर्ज प्रलंबित ठेवलेले आहेत. परंतु संबंधितांकडून सर्व त्रुटींची पूर्तता करुन एक महिन्याच्या आत सर्व अर्ज निकाली काढण्याचे शासनाने आदेश दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी बायोमेट्रिक पध्दतीबाबत तक्रार केली आहे ते खरे आहे. शासनाला देखील तशा प्रकारची उदाहरणे पहावयास मिळाली आहेत. त्यामुळे शासन त्याबाबत ताबडतोब फेरविचार करीत आहे. गावामध्ये जाऊन या योजनेतील पैशांचे वाटप करण्यासाठी योग्य त्या सूचना दिल्या जाणार आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

विशेष उल्लेख

पृ.शी./मु.शी.: ग्रामसेवा केंद्रात मिळणारी 201 प्रकारची प्रमाणपत्रे देण्याचा पॅटर्न राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये राबविण्याबाबत श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यात ग्रामसेवा केंद्रात मिळणारी 201 प्रकारची प्रमाणपत्रे देण्याचा प्रथम जालना जिल्ह्यात शासनाने घेतलेला पॅटर्न यशस्वीरित्या ग्रामसेवा केंद्रात राबवून नागरिकांना सहज आणि सुलभतेने प्रमाणपत्रे मिळण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत नागरिकांकडून होत असलेली मागणी, तसेच सदर योजना यशस्वीरित्या राज्यातील 27 हजार ग्रामपंचायतीत राबविण्यात यावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

पृ.शी./मु.शी.: पुणे महानगरपालिकेने सर्व सामान्य माणसांच्या सोयी-सुविधांच्या प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत श्री.मोहन जोशी, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"पुणे महानगरपालिकेने पुणे परिसरातील सर्वसामान्य माणसांच्या सोयी-सुविधांकरिता तातडीने मान्यता देणे आवश्यक आहे असे प्रस्ताव मागील 2 ते 4 वर्षांपासून शासनाने प्रलंबित ठेवले आहेत. त्यावर शासनाने तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. पुणे मनपाचे विविध प्रकल्प जसे कचरा डेपो, पाणीपुरवठा प्रकल्प, जकात नाके इ.करिता भूसंपादन करताना जमीन मालक तयार होत नाहीत. या जमीन मालकांच्या एका पात्र वारसास मनपा आस्थापनेवरील रिक्त पदी नेमणूक करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने अद्यापही निर्णय घेतलेला नाही. तसेच अतिक्रमण विभागातील विविध 677 पदांना मंजुरी देणे, सन 2004 पासून 2012 पर्यंतच्या सेवक वर्ग फेरफार तक्त्यास मान्यता देणे, पुणे मनपाकडे प्रतिनियुक्तीकरिता मुख्य सभेच्या मान्यतेचा ठराव विखंडित करणे, मुख्य अग्निशामक अधिकारी पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी नियुक्त करुन मिळणे, हिवताप निर्मूलन योजनेतील फिल्ड वर्क/सुपिरीयर फिल्ड वर्कर या पदांना आरोग्य विभाग, मंत्रालय यांची मंजुरी देणे, प्रत्यक्ष घाणीत काम करणाऱ्या विजतंत्री सेवकांना लाड समितीच्या शिफारशी लागू करणे, वनसेवेतील विशेष कार्य अधिकारी, डायरेक्टर (ज्यू) वर्ग (1), क्युरेटर (वर्ग-2) वृक्ष अधिकारी (वर्ग-1) यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करुन मिळणेबाबत अशा अनेक प्रस्तावांना गेल्या 2 ते 4 वर्षात शासनाने मंजुरी दिलेली नाही ती मंजुरी तातडीने द्यावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : ई कच-याची विल्हेवाट लावण्याबाबत
श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचा वापर मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे व ह्या वस्तू वेगाने कालबाह्य होत असल्याने ई कच-याची निर्माण झालेली नवीन समस्या, संगणक, मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तू दिवसेंदिवस अद्ययावत होत असल्यामुळे वर्षभर वापरलेली वस्तू कचऱ्यात फेकण्याची निर्माण झालेली प्रवृत्ती, त्यामुळे पर्यावरण संरक्षणात ई- कचऱ्याचा मोठा अडसर निर्माण होणे, शहरी भागात प्रत्येकी एक लाख लोकसंख्येमागे दरवर्षी 100 टन ई कचरा तयार होत असल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या सर्वेक्षणातून समोर येणे, केन्द्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाने इलेक्ट्रॉनिक्स कच-यासंबंधी एक अधिसूचना जारी केली असून त्यातील नियमानुसार दिनांक 1 मे 2012 पासून देशभरात ई कच-याची सुरक्षित विल्हेवाट लावणे बंधनकारक करण्यात येणे, ही जबाबदारी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळावर सोपविण्यात आली असल्याने ई कच-याबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्य शासनाने कार्यवाही करावी,अशी शिफारस मी या विशेष उललेखाद्वारे करीत आहे."

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे निकालात काढण्यासाठी करावयाची उपाययोजना याबाबत श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था हा राज्य शासनातील सर्वात महत्वाचा भाग आहे. सर्वसामान्यांच्या हितासाठी आणि संरक्षणासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये बदल करणे तसेच गरजेचे नवीन कायदे करणे आवश्यक असते. तसेच सर्व बाबतीत शासनाच्या वतीने सरकारी वकिलांची नेमणूक करावी लागते. एकूण प्रकरणांचा लागलेला निकाल पहाता त्यात अनेक त्रुटी राहिल्याने न्यायालयाकडून गंभीर ताशेरे ओढले जातात. विधी खात्याकडे ह्यासाठी संशोधन व्यवस्था निर्माण होण्याची नितांत आवश्यकता आहे. ह्या संशोधन विभागात तज्ज्ञ सल्लागारांची एक समिती गठीत करुन ह्या एकूण प्रक्रियेची पुनर्रचना करावी. कारण

महाराष्ट्र राज्याचे 584 कायदे आहेत. तर केंद्र शासनाचे 1126 कायदे अस्तित्वात आहेत. केंद्राच्या 172 कायद्यांना राज्य शासनाने सुधारणा केल्या आहेत. राज्यातील मुंबई, नागपूर व औरंगाबाद उच्च न्यायालयात सन 2010-11 या वर्षात 1 लाख 35 हजार 500 प्रकरणे निकालात निघाली आहेत तर अद्याप 3 लाख 62 हजार 885 केसेस प्रलंबित आहेत. या शिवाय नगरसत्र न्यायालयात 39 हजार 646, जिल्हासत्र न्यायालयात 25 लाख 58 हजार 169, लघु न्यायालयात 29 हजार 549, महानगर दंडाधिकारी न्यायालयात 4 लाख 71 हजार 49 तर कुटुंब न्यायालयात 11 हजार 712 केसेस आजही प्रलंबित आहेत. त्यामुळे या केसेस अधिक काळ प्रलंबित न ठेवता त्या तातडीने निकालात काढण्यासाठी न्यायालयांनी एक कालबध्द धोरण ठरविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

एकंदरीत राज्य शासनाच्या धोरणांविरोधात वा निर्णयाविरोधात न्यायालयात दाखल होणा-या केसेसचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यात अनेक प्रकरणात न्यायालयात शासनाची बाजू व्यवस्थित

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

न मांडल्यामुळे न्यायालयाने शासनाच्या कारभारावर व धोणांवर तसेच निर्णयावर अनेक वेळा ताशेरे ओढले आहेत. त्यामुळे न्यायालयाच्या शासन विरोधी निर्णयामुळे शासनाची जनमाणसात प्रतिमा मलीन होते. ही बाब चिंतनीय आहे. त्यामुळे सरकारी वकिलांना कोणत्याही केसेसची बाजू व्यवस्थित मांडता यावी यासाठी मंत्रालय व राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात विधी रिसर्च विंग म्हणजे कायदा संशोधन कक्ष स्वतंत्रपणे स्थापन करावा, त्यात उच्च न्यायालयाचे व सत्र न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश तसेच सिव्हिल, क्रिमिनल मधील विधीज्ञ यांची नियुक्ती करावी. या स्वतंत्र कक्षाकडे शासन विरोधात दाखल केलेल्या कसेसची छाननी करुन आवश्यक ते नियम, कायदे तपासून योग्य कागदपत्रांची पूर्तता करुन सदरच्या केसेस सरकारी वकिलांकडे सोपवाव्यात यासाठी राज्यात स्वतंत्र अशी विधी रिसर्च विंग तयार करावी यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत.

--

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : शिवाजीनगर (जि.पुणे) येथील साखर संकुलाची होत असलेली दूरवस्था याबाबत श्री. अनिल भोसले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"पुणे जिल्ह्यातील शिवाजीनगरमधील साखर संकुल हे जिल्ह्यातील महत्वाचे कार्यालय असून सदर कार्यालयाच्या इमारतीची देखभाली अभावी होत असलेली दूरवस्था, या कार्यालयाच्या पार्किंगमध्ये भंगाराची वाहने, इमारतीच्या तळमजल्यावर फाईलचे गठ्ठे, मैदानातील पोडियमची दूरवस्था, उद्यानामध्ये नित्यनेमाने जाळला जाणारा कचरा, इमारतीच्या आवाराभोवती नसलेले संरक्षक कठडे, इमारतीच्या तुटलेल्या काचा, देखभालीच्या अभावामुळे साखर संकुल कार्यालयाची दूरवस्था होत असताना त्याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने पाहणी करुन कार्यवाही करण्याची मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

--

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : आयुर्वेद व युनानी महाविद्यालय व संलग्न रुग्णालयातील कर्मचा-यांना सेवा निवृत्ती व उपदान योजना लागू करणे

याबाबत डॉ. सुधीर तांबे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ. सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यातील सर्व अनुदानित विद्यालये आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील कर्मचा-यांना शासनाने सेवानिवृत्ती व उपदान योजना लागू केलेली आहे. तथापि वरील निर्णय घेताना वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारित असलेल्या व संख्येने अत्यल्प असलेल्या 16 अनुदानित आयुर्वेद व 7 युनानी महाविद्यालय व संलग्न रुग्णालयातील कर्मचा-यांना मात्र सेवानिवृत्ती व उपदान योजना लागू करण्यास शासन मान्यता देत नाही. 1989 पासून अनेकदा ही मागणी संबंधित कर्मचारी करीत असतात. अनेकदा आंदोलनेदेखील झालेली आहेत. हा सरळपणे पक्षपातीपणा आहे व शासन याची दखल घेत नाही. तरी शासनाने आयुर्वेद व युनानी अनुदानित महाविद्यालयातील कर्मचा-यांची मागणी त्वरित मान्य करावी, अशी मागणी या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे."

सभापती महोदय, महाराष्ट्रातील आयुर्वेद आणि अनुदानित युनानी महाविद्यालयातील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचा-यांना सेवानिवृत्ती व उपदान सुविधा उपलब्ध नाहीत. महाराष्ट्रामध्ये केवळ 16 आयुर्वेद आणि 7 युनानी महाविद्यालये आहेत. राज्यातील सर्व अनुदानित शैक्षणिक संस्थांना पेन्शन व अन्य सवलती लागू आहेत. आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दुजाभावाची वागणूक मिळते. अनेक वर्षे मागणी करुन देखील त्यांना सेवानिवृत्ती योजना लागू होत नाही. त्यातील अनेक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आता निवृत्त होत आहेत. त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायामुळे त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झालेला आहे. तेव्हा अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील अध्यापक व शिक्षकेतर कर्मचा-यांवरील अन्याय दूर करावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे.

--

..6..

पृ. शी./मु. शी. : विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली अमरावती व नागपूर जिल्हयातील शेतक-यांच्या शेतात उच्च दाबाचे टॉवर उभारले जाणे याबाबत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, नागपूर जिल्ह्यात शेतक-यांच्या शेतातून म.रा.वि.वि. कंपनीच्या पारेषण विभागाअंतर्गत अती उच्च दाबाचे टॉवर उभरण्याचे काम सुरु करणे, सदर टॉवर उभारतांना शेतकऱ्यांची कोणतीही परवानगी न घेता व माहिती न देता कामे सुरु करणे, त्यामुळे शेतक-यांच्या उभ्या पिकांचे होणारे नुकसान व सदर टॉवरमध्ये जागा गुंतल्याने शेतकऱ्यांचे होणारे नुकसान, शिवाय शेतक-यांना कोणतीही भरपाई न मिळणे, त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांमध्ये म.रा.वि.वि. कंपनी विरुध्द निर्माण झालेली चीड, शासनाने शेतक-यांना भरपाई देण्याची आणि त्यांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता व शासनाने यावर करावयाची कारवाई, यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे."

...नंतर श्री. गिते..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी

प्रा.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एक पॉईंट ऑफ इन्फर्मेशन उपस्थित करु इच्छितो. मागासवर्गीय अनुदानित आश्रमशाळांचे कर्मचारी दिनांक 16 एप्रिल 2012 पासून माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे यांच्या राहत्या घरासमोर उपोषणाला बसले आहेत. कायम वेतनश्रेणी लागू करण्यात यावी म्हणून गेल्या 15 वर्षापासून ते मागणी करीत आहेत. उपाषेणाला बसलेल्या कर्मचाऱ्यांमधील 25 कर्मचारी रुग्णालयात दाखल झालेले आहेत. आई-वडील,मुले यांना घेऊन ते उपोषणाला बसलेले आहेत. यासंदर्भात शासनाने ताबडतोब निर्णय घ्यावा अशी माझी शासनास विनंती आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये गिरणी कामगारांच्या घराच्या संदर्भात चर्चा झाली, त्यावेळी शासनाच्या वतीने असे घोषित करण्यात आले की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी गिरणी कामगारांच्या घरांच्या किंमती बाबत शासन निवेदन करील. उद्या अधिवेशन संपत आहे. गिरणी कामगारांच्या घरांच्या किंमती संदर्भातील जे काही निवेदन करणार होते ते आज किंवा उद्या किमान यावे अशी अपेक्षा आहे.

श्री. विक्रम काळे : मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल प्रथम आपणास मी धन्यवाद देतो. संपूर्ण राज्यामध्ये पट पडताळणीची चर्चा झाली. काल मंत्रिमंडळाच्या बैठकीत पट पडताळणीच्या अहवालास मान्यता दिल्याची बातमी मी वृत्तपत्रात वाचली. त्या माध्यमातून संस्था चालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करणार, शिक्षकांना काढून टाकणार अशा प्रकारचे वृत्त छापून आलेले असल्यामुळे शिक्षण संस्था चालक आणि शिक्षक भयभीत झालेले आहेत. अधिवेशन सुरु आहे. यासंदर्भात शासनाने निवेदन करावे अथवा तो अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवावा अशी माझी शासनास विनंती आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याचा मुद्दा

श्री. केशवराव मानकर : सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक 9.12.2005 च्या आदेशान्वये कृषी उत्पन्न समिती, गोदिया संचालकांची निवडणूक पुढील आदेश होईपर्यंत स्थगित केली होती. महाराष्ट्र राज्यात निवडणुक कायदा झाल्याने दिनांक 9.10.2011 रोजी स्थगिती उठविण्यात येणे. परंतु जिल्हा उप निबंधक, गोंदिया यांच्या दिरंगाईमुळे आणि प्रशासक मंडळाच्या संगनमताने निवडणुक लावण्यात न येणे, त्यामुळे स्थगिती उठविल्यापासून सहा महिन्यांचा कालावधी लोटलेला असणे, सदर बाजार समितीकडून नियमबाहय कामे होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होणे, त्यामुळे नियमबाहय कामांना आळा घालण्यासाठी सदर बाजार समितीच्या वर्तमान प्रशासक मंडळास बरखास्त करुन नवीन शासकीय अधिकाऱ्याची तत्काळ नियुक्ती करणे, सदर बाजार समितीची निवडणूक तातडीने जाहीर करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. हा विषय मी औचित्याच्या मुद्याव्दारे उपस्थित केला आहे.

उप सभापती : आता सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 15 मिनिटांपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.38 ते 4.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

सभापतीस्थानी माननीय उप सभापती

पृ.शी./मु.शी.: गिरणी कामगारांच्या घराबाबत जागा उपलब्ध करणे व उपलब्ध असलेल्या घरांच्या किंमती निश्चित करणे याबाबत नेमण्यात यावयाच्या समित्यांचा अहवाल सभागृहात सादर करणे यासंबंधी श्री.दिवाकर रावते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न सातत्याने आणि सतत सभागृहात उपस्थित होणे आणि त्यावर सरकारकडून थातूरमातूर उत्तरे देणे हा नित्याचा क्रम झालेला आहे. त्या संदर्भात ठोस निर्णय होत नाही. गिरणी कामगारांच्या घरांसंबंधी या सभागृहात चर्चा झाली. मुख्यमंत्री महोदयांनी वारंवार त्या संदर्भात भूमिका मांडली. 1.40 लाख गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी जमिनी कशी उपलब्ध होईल आणि बांधलेल्या घरांची किंमत किती असावी याबाबत समिती नेमण्यात येईल तसेच या दोन्ही समित्यांचा अहवाल एका आठवड्यात सभागृहापुढे मांडण्यात येईल असे सांगितले होते. गिरणी कामगारांच्या घरांच्या किंमतीबाबतचा निर्णय जाहीर केला जावा. आज वृत्तपत्रात अशी बातमी प्रसिध्द झाली आहे की, म्हाडाने जी 7 ते 8 हजार घरे बांधली आहेत त्याची लॉटरी पध्दत तयार केली आहे. परंतु किंमतीबाबत शासनाकडून काहीच निर्णय झालेला नसल्यामुळे काम खोळंबले आहे. आम्हाला अपेक्षा होती की, जमीन कशी उपलब्ध करावी आणि घरांची किंमत किती असावी या संदर्भातील दोन्ही समित्यांचे अहवाल सभागृहात मांडले जातील. लॉटरी पध्दत तयार झाली असून मे महिन्यात घरांचे वाटप होईल अशी बातमी प्रसिध्द झाल्यानंतर अधिवेशन संपत आले तरी शासनाकडून निर्णय झालेला नाही. उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. मी आपल्या माध्यमातून विशेष उल्लेखाद्वारे मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो की, तातडीने या संदर्भातील निर्णय आज किंवा उद्यापर्यंत जाहीर करावा. घरांच्या किंमतीबाबत गिरणी कामगारांना कोणता दिलासा देणार हे सभागृहात सांगावे. जमीन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

उपलब्धीच्या संदर्भात समिती नेमून तिचा अहवाल एका आठवड्यात सादर केला जाणार होता. त्या समितीचा अहवाल सभागृहात मांडण्यात आला तर भविष्यात किती गिरणी कामगारांना घरे मिळू शकतील याचाही आराखडा ढोबळमानाने लोकांसमोर येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयक

मु.शी.: L.A. BILL NO XLII OF 2009

(A BILL TO FACILITATE AND ENSURE SUSTAINABLE, EQUITABLE AND ADEQUATE SUPPLY OF GROUNDWATER OF PRESCRIBED QUALITY, FOR VARIOUS CATEGORY OF USERS, THROUGH SUPPLY AND DEMAND MANAGEMENT MEASURES, PROTECTING PUBLIC DRINKING WATER SOURCES AND TO ESTABLISH THE STATE GROUNDWATER AUTHORITY AND DISTRICT LEVEL AUTHORITIES TO MANAGE AND TO REGULATE, WITH COMMUNITY PARTICIPATION, THE EXPLOITATION OF GROUNDWATER WITHIN THE STATE OF MAHARASHTRA; AND MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे (पाणीपुरवठा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 42 पुरवठा व मागणी व्यवस्थापन उपाययोजनांमार्फत वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गाकरिता विहित दर्जाच्या भूजलाचा कायम, समन्यायी आणि पुरेसा पुरवठा सुकर करणे आणि त्याची खातरजमा करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे जतन करणे आणि महाराष्ट्र राज्यात भूजलाच्या समुपयोजनांचे सामूहिक सहभागने व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी राज्य भूजल प्राधिकरण आणि जिल्हा स्तरीय प्राधिकरणे स्थापन करणे; आणि त्याच्याशी संबंधित व आनुषंगिक बाबींची तरतूद करणे यासाठी विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे : सभापती महोदय, सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 42 पुरवठा व मागणी व्यवस्थापन उपाययोजनांमार्फत वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गाकरिता विहित दर्जाच्या भूजलाचा कायम, समन्यायी आणि पुरेसा पुरवठा सुकर करणे आणि त्याची खातरजमा करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे जतन करणे आणि महाराष्ट्र राज्यात भूजलाच्या समुपयोजनांचे सामूहिक सहभागने व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी राज्य भूजल प्राधिकरण आणि जिल्हा स्तरीय प्राधिकरणे स्थापन करणे; आणि त्याच्याशी संबंधित व आनुषंगिक बाबींची तरतूद करणे यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मणराव ढोबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : महोदय, विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडत असताना मला मनापासून आनंद होतो. त्याचे एकमेव कारण म्हणजे विधानसभेत हे विधेयक मांडण्यापूर्वी या विधेयकासंबंधी संयुक्त समिती स्थापन केली होती त्या समितीतील सर्वपक्षीय आमदारांनी राज्यातील प्रमुख विभागांचा दौरा केला. त्यात नागपूर, नाशिक, अमरावती, ठाणे या ठिकाणी जाऊन सन्माननीय सदस्यांनी अभ्यासपूर्ण चर्चा केली व बैठका सुध्दा घेतल्या. तसेच स्थानिक आमदारांनी त्या त्या भागातील पाण्याची व्यथा व भेगाळलेली जमीन अश अनेक अडचणी समितीसमोर मांडल्या. जमिनीतून पाण्याचा अती उपसा झाल्यानंतर जे क्षेत्र निर्माण होते ते कोरडे क्षेत्र हे उद्याच्या भविष्यात कसे अडचणीचे आहे आणि त्यावर नियंत्रण आणणे कसे शक्य आहे याबद्दल समितीच्या बैठकांमध्ये चर्चा करण्यात आली. तसेच संबंधित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, विषय समित्यांचे सभापती तसेच लोक प्रतिनिधी या सर्व मान्यवरांनी विभागीय पातळीवर चर्चा केली. अशा प्रकारे हे विधेयक विधानसभेने एकमताने पारित करुन वरिष्ठ सभागृहाकडे मान्यतेसाठी पाठविलेले आहे.

महोदय, राज्यातील पाहणीचा विचार करता अमरावती विभागातील वरुड आणि मोर्शी या दोन तालुक्यात प्रामुख्याने ही अती उपशाची अडचण आहे. नागपूर विभागामध्ये अती उपसा या व्याख्येत बसण्याइतकी परिस्थिती निर्माण झालेली नाही त्यामुळे नागपूर विभागात तशी अडचण नाही. पुणे विभागात पुरंदर आणि माळशिरस या भागात पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे त्यावर पाण्याचे उदरभरण करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील व तशा सूचना विभागाला दिलेल्या आहेत. कोकणातील ठाणे जिल्ह्यात फारशी अडचण नाही. नाशिक विभागातील जळगांव जिल्हा, या जिल्ह्यातील यावल तालुका आणि नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुका या दोन तालुक्यात देखील ही पाण्याच्या अती उपशाची अडचण निर्माण झालेली आहे.

महोदय, या विधेयकाच्या संदर्भात थोडक्यात ब्रीफ व्हावे म्हणून मी काही मुद्दे मांडू इच्छितो. त्यात प्रामुख्याने शोषित तालुक्यांमध्ये नगर जिल्ह्यातील राहाता तालुका, अमरावती मधील दर्यापूर, वरुड आणि मोर्शी हे तीन तालुके, बुलढाणा जिल्ह्यातील जळगांव-जामोद, जळगांव जिल्ह्यातील रावेर आणि यावल अशा 7 तालुक्यांचा समावेश होत असून या भागातील अती उपशामुळे पाण्याची पातळी खाली गेलेली आहे. यानंतर धोक्याची सूचना देणारे म्हणजे पाण्याचा आणखी थोडा अधिक

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मणराव ढोबळे .....

उपसा झाला तर त्या रेंजमध्ये आल्यामुळे किंवा येऊ शकणारे म्हणजेच अंशत: शोषित असे राज्यात एकूण 21 तालुके आहेत. तसेच नगर जिल्ह्यातील 5 तालुके, बुलढाणा जिल्ह्यात 2 तालुके, जळगांव जिल्ह्यात 4 तालुके, लातूर मध्ये 1 तालुका, नाशिकमधील 3 तालुके, पुण्यात 2 तालुके, सांगली जिल्ह्यात 2 तालुके, सातारा आणि सोलापूर मधील प्रत्येक 1-1 तालुका असे अंशत: शोषितच्या रेंजमध्ये येणाऱ्या तालुक्यांचा समावेश असून ही वस्तुस्थिती मी सभागृहासमोर ठेवली आहे.

महोदय, जयपूर सारख्या ठिकाणी जाऊन माननीय खासदार श्री. मनिष शिसोदीया यांनी पाण्याबद्दल खूप माहिती घेतली व अभ्यासही केला आहे म्हणून त्यांनी केलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करुन आपल्या राज्यातील पाण्याची पातळी वर आणण्यासाठी काही उपाययोजना करता येतील काय असा प्रयत्न देखील आपण केला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मण ढोबळे ....

याबद्दलची माहिती घेण्यासाठी समितीने राजस्थानचा दौरा केला होता व त्या दौऱ्यात 8 सन्माननीय आमदारांनी भाग घेतला होता व त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख, सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मन लावून काम केलेले आहे.

संयुक्त समितीने शिफारस केलेल्या सर्व शिफारसींचा उल्लेख या विधेयकामध्ये करण्यात आलेला आहे. संयुक्त समितीच्या 100 टक्के शिफारसी विधेयकामध्ये घेतलेल्या आहेत. डॉ. घाडे पासून ते अण्णा हजारे पर्यंत व पोपटराव पवारांपासून ते माधवराव पाटील यांच्या पर्यंत तसेच मृदसंधारणाच्या आणि पर्यावरणाच्या पाण्याच्या स्वच्छतेसंबंधात काम करणारे जे विचारवंत आहेत यांच्याकडून मोठया प्रमाणात लेखी स्वरुपात माहिती घेतलेली आहे. या राज्यातील विद्यापीठाच्या कृषी विभागाकडून मोठया प्रमाणात पाण्याबद्दलची माहिती, पाणी तज्ज्ञांकडून माहिती व सूचना घेतल्या असून त्यांचा या विधेयकात समावेश करण्यात आलेला आहे. एकंदरीत वस्तुस्थितीचा विचार करता राज्यस्तरावर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नियंत्रण समिती राहणार आहे व तशा प्रकारची तरतूद या विधेयकात करण्यात आलेली आहे. या विधेयकाचे वैशिष्टय असे आहे की, तहसीलदार, कलेक्टर किंवा फौजदाराच्या मनात आले आणि अमुक ठिकाणी पाण्याची विहीर पाडण्यासाठी अनुमती नाकारली असा विषय या विधेयकामध्ये नाही. या विधेयकाचे वैशिष्टय असे आहे की, गावाची ग्राम समिती ही त्या गावाच्या कार्यक्षेत्रामध्ये आपले नियंत्रण करणार आहे. या समितीचा अंमल जेथे पाण्याचा जास्त उपसा झाला आहे त्या ठिकाणची पाण्याची पातळी वर आणण्यासाठी या समितीला काम करावे लागणार आहे. अशा ठिकाणी ग्राम समिती सूचना देईन किंवा विहीर पाडतांना त्यांची अनुमती घेऊनच पिण्याच्या पाण्याची विहीर करता येणार आहे. या विहिरीजवळ विहीर घेतांना 1 कि.मी. चे अंतर अतंर्भूत करण्यात आलेले आहे. त्याच बरोबर राज्यस्तरावर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पाणलोट समिती असणार आहे. या समितीने पाण्याच्या स्त्रोताच्या बळकटीकरणासाठी कार्यक्रम राबवायचा आहे व त्यासाठी जे अनुदान लागेल त्या अनुदानाची व्यवस्था राज्याच्या पातळीवर, जिल्हयाच्या पातळीवर करावयाची आहे. राज्यस्तरावर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक शक्ती प्रदान समिती असणार आहे. ही समिती पाण्याचे विनियमन उत्तम रित्या करण्याबद्दल विचार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मण ढोबळे ....

करणार आहे. राज्याच्या पातळीवर राज्य भूजल प्राधिकरण म्हणून जिल्हा स्तरावर पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असणार आहे. जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असणार आहे. सभापतीची समिती तालुक्याच्या पातळीवर असणार आहे. गाव पातळीवरील ग्राम समिती काम पाहणार आहे. त्याच बरोबर जिल्हा परिषदेचे सदस्य या समितीमध्ये सदस्य म्हणून राहणार आहेत. अशा परिस्थितीत जलव्यवस्थापनासाठी पाणलोटस्तर, जिल्हास्तर, राज्य स्तर त्या त्या पातळीवर वेगवेगळया पध्दतीने पाणी जिरविणे व पाणी भूगर्भात साठविण्यासाठी प्रयत्न करणे अशी या विधेयकाची खरी भूमिका आहे. विंधण विहिरीला 60 मीटरचे बंधन घातलेले आहे. या बिलामध्ये 60 मीटरच्या खाली विंधन विहीर नेता येणार नाही. पाण्याचे दुर्भिक्ष असेल किंवा शेवटचा पर्याय म्हणून एखादा हपसा घ्यावा लागणार असेल व तो 60 मीटरच्या खाली जाणार असेल तर जिल्हाधिकाऱ्यांची त्यासाठी परवानगी लागणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय 60 मीटरपेक्षा खाली विधंन विहीर नेता येणार नाही अशी तरतूद या विधेयकात करण्यात आलेली आहे. आपण 60 मीटरच्या खाली गेलो तर ते पाणी आपल्या आजोबा, पणजोबांच्या काळातील असून ते पाणी झिरपण्यासाठी 70 ते 100 वर्षे लागतात. असे असतांना ते पाणी ऊस, कापूस, संत्री पिकासाठी काढून घेतले जात आहे.

60 मीटरच्या खालचे पाणी साठविण्याची प्रक्रिया आपण पाहिजे तितक्या काळजीपूर्वक करीत नाहीत असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

iप्रा. लक्ष्मणराव ढोबळे...

किंवा शहरामध्ये आपल्या बंगल्यावर पावसाचे पडणारे पडणारी जमिनीमध्ये जिरविण्यासाठी शिवकालीन योजना राबवावयाची किंवा सिमेंटचे बंधारे बांधून जागो जागी पाण्याचे स्त्रोत बळकट करावयाचे आहेत त्या संबंधी या विधेयकामध्ये विषय अंतर्भूत केला आहे. पावसाच्या पाण्याचे संवर्धन करणे या विधेयकात अनिवार्य करण्यात आले आहे.अधिसूचित क्षेत्रातील शहरी भाग असेल त्यामध्ये देखील शिवकालीन योजनेचा उपयोग करुन त्या ठिक्राणी पाणी जिरविण्याबद्दल व ही योजना राबविण्याबद्दल काळजीपूर्वक प्रयत्न करावयाचे आहेत. अधिसूचित क्षेत्रातील भू जल वापर विचारात घेऊन एक आराखडा तयार करुन भुसार पिकाला जे पाणी लागत असेल त्याच्या पाच पट पाणी ऊसाला लागते.म्हणून जादा पाण्याच्या बाबतीत रिजनवाईज 10 तालुके किंवा 12 तालुके मिळून 60 तालुके विचारात घेतले तर त्या ठिकाणी पाण्याची पातळी खाली गेली आहे त्यामुळे त्या भागातील पाण्याच्या वापरावर बंधने आणावयाची आहेत. म्हणजेच माझ्या गावातील माझ्या पाण्याच्या वापरावर गावानेच बंधने आणावयाची आहेत,त्यामध्ये अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपाला वाव ठेवलेला नाही हे देखील मला या ठिक्राणी नमूद करावयाचे आहे.

सभापती महोदय, प्रदूषणाच्या समस्या असलेले क्षेत्र अधिसूचित करुन शेतकऱ्यांना सुयोग्य पिक पध्दतीसाठी प्रोत्साहित करुन पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता राखण्यासाठी प्रबोधन करणे आणि अनधिसूचित क्षेत्रामध्ये बोअर घेण्यासाठी 60 मीटरची परवानगी आहे त्यांना कृत्रिम पुर्नभरणाची योजना अनिवार्य करण्याबद्दल प्रयत्न करणे. या सर्व तरतुदींचे उल्लंघन झाल्यास 10 हजारावरुन 25 हजार रुपये दंडाची तरतूद या विधेयकामध्ये केली आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्यांकडून देखील सूचना मागविल्या होत्या, विचारवंतांकडून सूचना मागविल्या होत्या,श्री. राजेंद्र सिंह यांच्याकडे जाऊन त्यांच्याकडून सूचना घेण्यात आल्या.त्याचप्रमाणे वाळू काढण्यावर प्रतिबंध असला पाहिजे. सर्वांनी एकत्रितपणे पाणलोट क्षेत्रामध्ये काही उपाय योजना करुन चांगल्या प्रकारचे नियोजन किंवा पाण्याचे नियमन करणे ही अत्यावश्यक बाब झाल्यामुळे या प्रकारचे विधेयक सभागृहासमोर आणले आहे. या विधेयकामध्ये देण्यात आलेले पाणी अमान न मोजता उचललेले किंवा खूप मोठया प्रमाणात पाण्याचा उपसा केल्यानंतर पिण्याच्या पाण्याची पातळी खाली गेल्यानंतर ती वॉटर टेबल आपल्याला कशी रोखता येईल आणि ते पिण्याचे पाणी वर कसे आणता येईल या बद्दल विचार करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मणराव ढोबळे.....

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या भूगर्भातील खडक बेसॉल्ट,काळा असल्यामुळे पाणी वरुन ठिबकत राहिले किंवा वरुन पाणी पडत राहिले तरी ते जिरविण्याचा वेग किंवा पाणी ॲब्सॉर्ब करुन घेण्याची मातीची क्षमता आहे तिचा विचार करता काळया कठीण अशा खडकाच्या आतमध्ये पाणी जाणे हे फार कठीण अशाप्रकारचे काम आहे. परंतु अलीकडच्या काळात वेगवेगळया प्रकारे पाणी मुरविण्याबाबतच्या सूचना विचारात घेऊन त्या माध्यमातून अधिकाधिक पाणी मुरविणे, पाण्याचा स्त्रोत मजबूत करुन शुध्द आणि स्वच्छ, चांगले पाणी पिण्यासाठी उपलब्ध करणे यासाठी आणि केवळ पिण्यासाठी नव्हेतर महाराष्ट्राच्या जमिनीच्या भूपृष्ठावर पडणारे पाण्याचे व्यवस्थितपणे नियतन करणारे राज्य हे एकमेव राज्य म्हणून न म्हणता या राज्याने पहिल्या प्रथम हे विधेयक आणले आहे. अशाप्रकारे सर्वस्पर्शी असे शेतकऱ्यांना आणि पिण्यासाठी पाणी देणारे महत्वपूर्ण आणि ऐतिहासिक विधेयक आहे. कै. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जन्मशताब्दी निमित्ताने ते आपल्यासमोर येत आहे त्या बद्दल मला मनापासून आनंद होत आहे.

(यानंतर श्री. भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मण ढोबळे...

भेगाळलेली जमीन आकाशातून पडणाऱ्या पावसाची वाट पाहते. तशाच पद्धतीने तुमच्या माझ्या कष्टाने वाढवलेली शेती पाण्याची वाट पहात आहे. शेतीतून उत्पादन घेत असताना मिळेल तेथून पाणी उपसण्याची हाव अधिक झाल्यामुळे आपण ते संयमित करू शकलो नाही. त्यामुळे फार मोठे नुकसान महाराष्ट्राच्या जमिनीचे, पर्यावरणाचे आणि पिण्याच्या पाण्याचे देखील झाले आहे. आपण तीर्थ म्हणून पाणी हातात घ्यायचो. आचमनासाठी पाणी हातात घ्यायचो. अर्ध्य देण्यासाठी ओंजळीत पाणी घ्यायचो तसे पाणी कुठल्याही नदीत जाऊन घ्यावे अशा प्रकारची परिस्थिती महाराष्ट्रात राहिलेली नाही. आंघोळीसाठी लागणारे पाणी आज आपल्याकडे उपलब्ध नाही. पूजेसाठी तर विषयच काढू नये. अशा प्रकारची पाण्याची अवस्था झाली आहे. आहे ते पाणी कसे राखता येईल आणि भविष्यातील पिढीला कसे देता येईल यासाठी मी थोडक्यात माझी भूमिका मांडली आहे.

पाण्याशी, शेतीशी फारसा संबंध नसताना देखील माझ्यावर नेमलेली जबाबदारी आपल्या समोर फार मोठ्या कष्टाने ठेवलेली आहे. आजोबा म्हणून आंब्याचे झाड शेतात लावताना त्याचे फळ आपल्या नातवाला मिळावे म्हणून तो प्रयत्न करीत असतो. तसेच शुद्ध पाणी आणि शुद्ध स्वास्थ्य माझ्या नातवाला मिळावे म्हणून ते कुठल्या बँकेत डिपॉझिट करायचे हा आजच्या आजोबां समोर फार मोठा प्रश्न आहे. भावी पिढीला मदत व्हावी म्हणून स्वच्छ पाणी कसे जपून ठेवावे या दृष्टीने आपण सर्वजण मिळून प्रयत्न करू या. याकडे नवा उपक्रम म्हणून बघितले जावे. आपण आपल्या घरा पासून, तालुक्यापासून सुरूवात केली तर बरे होईल. हे पाणी जपण्यासाठी कडक धोरण घेऊ शकलो तरच ह्या गोष्टी शक्य आहे. राज्याचा महसूल विभाग, राज्याचा गृह विभाग, मृदसंधारण व जलसंधारण विभाग अशा 4-5 विभागांनी एकत्र येऊन पाणी जतन केल्याशिवाय पाणी अबाधित राहणार नाही. आज पाणी सुरक्षित राहण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. म्हणूनच मी आपल्या समोर ही भूमिका मांडली आहे.

सिंगापूर,मलेशिया,जर्मनी येथे पाणी योजना कशी राबविली जाते हे पाहण्याची संधी मला आपल्यामुळे मिळाली. मलेशिया येथून सिंगापूरला पाणी येते. तेथे मासे ठेवलेले आहेत. त्या माशांचे कल्ले जास्त वेगाने उघडझाप व्हायला लागले तर पाण्यामध्ये ऑक्सिजन कमी आहे असा विचार केला जातो. मलेशिया येथून पाणी येत असल्यामुळे ते सुरक्षित आहे किंवा नाही हे देखील सिंगापूरवासीय तपासून घेतात. आज आपल्याकडची उघडी धरणे, मुंबई शहराला मिळणारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मण ढोबळे...

पाणी हे सगळे सुरक्षित आहे काय ? अशा अनेक समस्या पाण्याच्या निमित्ताने आपल्या समोर आलेल्या आहेत. खालच्या सभागृहाने हे विधेयक एक मताने मान्य केले आहे. तसे या ही सभागृहाने मान्य करावे अशी मी विनंती करतो. या बिलाच्या अनुषंगाने आपण जरूर सूचना कराव्यात.

राजस्थानचे मॅगेसेस पुरस्कार विजेते श्री.राजेंद्र सिंह यांनी आमची राजस्थानला दोन दिवस व्यवस्था केली होती. त्यांनी पाणी कशा पद्धतीने वाचवले हे दाखवून दिले. जी नदी कोरडी होती ती आता वहायला लागली आहे. नदी वहायला लागल्या नंतर शासनाने मासेमारीचे टेंडर काढले. पाणी नव्हते तेव्हा शासन फिरकले नाही. पाणी आम्ही निर्माण केल्यानंतर मासेमारीचे टेंडर शासन काढणार. ते आम्हाला चालणार नाही. मासेमारीचे टेंडर देखील आम्हीच देणार अशी भूमिका तेथील लोकांनी घेतली. त्यांनी तेथे लोकसंसद निर्माण केली आहे. त्या माध्यमातून पाण्याचे संयमन करण्याचे काम, पाणी उपलब्ध करण्याचे काम करण्यात येते. लोकसंसद वर्षातून दोनदा भरते. त्यात ते निर्णय घेतात की, कोणते पीक लावायचे, कोणत्या पिकावर खर्च करायचा. पाण्याचा बोअर कुठे घ्यायचा. उत्तम असे मार्गदर्शन आम्हाला त्या निमित्ताने मिळाले. माझ्या खात्याचे सचिव, माझ्या खात्याचे अधिकारी, जीएसडीएसचे संचालक या सर्वांनी मोठ्या कष्टाने हे बिल तयार केले पण आपल्या समोर यायला दीड वर्षाचा कालावधी लागला. माननीय सभापती महोदयांच्या समोर मी ही वस्तुस्थिती सादर करीत आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर सौ.रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आज या ठिकाणी सदनामध्ये भू-जल सर्वेक्षणाचे बिल आणलेले आहे.खऱ्या अर्थाने विचार केला तर हे विधेयक उशिराच आालेले आहे.कारण असे की, नेहमी शास्त्रज्ञ म्हणतात की, पुढचे युध्द हे पाण्यासाठी होणार आहे असे सर्वांचे मत आहे.आता पाण्याचे संवर्धन आणि संरक्षण करणे ही काळाची गरज झालेली आहे आणि त्यासाठी याठिकाणी विधेयक आणलेले आहे.परंतु एकूणच महाराष्ट्राची स्थिती पाहिली तर आपण ज्याला काळा दगड म्हणतो तो सर्व ठिकाणी नाही. काही ठिकाणी रेतीचा दगड आहे आणि त्याठिकाणी पाणी धरुन ठेवण्याची क्षमता नसते. त्यामुळे विदर्भात तशा प्रकारची दगड असल्यामुळे नद्यांमध्ये 15 टक्के पाणी टिकत नाही. त्यामुळे उन्हाळ्यामध्ये या नद्या कोरड्या पडतात. परंतु एक गोष्ट अभिमानाने सांगावीशी वाटते की, विदर्भात पाण्याची पातळी खाली गेलेली नाही. याचे कारण नद्या आहेत असे नाही तर याठिकाणी मोठ्या प्रमाणात सिंचनाच्या विहिरी झाल्या नाहीत म्हणून आम्ही पाण्याची पातळी राखून ठेवलेली आहे. ज्या जिल्ह्यामध्ये म्हणजे सोलापूर, कोल्हापूर, पुणे, नाशिक येथे सिंचन विहिरी आणि पश्चिम महाराष्ट्रातील जे मोठे जिल्हे आहेत तेथे एक ते दीड लाख पर्यंत सिंचन विहिरी झालेल्या आहेत आणि त्याच्या भरवशावर शेती केली जाते. अशी तेथील परिस्थिती असल्यामुळे दिवसेंदिवस तेथील पाण्याची पातळी खाली गेलेली आहे. अमरावती विभागाचा जो पश्चिम भाग आहे तेथे बगिचे वाढविण्यासाठी विहिरी झाल्यामुळे पाण्याची पातळी खाली गेली आहे. तसेच याठिकाणी सदरहू विधेयक आणताना काही अटी घातलेल्या आहेत.

उप सभापती : आपल्याला अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला घ्यावयाचा आहे काय ?

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, भू-जलाचे पाणी वापरत असताना राज्य प्राधिकरणाच्या सल्ल्यानुसार कमी पाण्याची पिके म्हणजे कोणती तर ज्वारीचे पीक लावावयाचे काय? आपले खरिपाचे पीक पाण्यावर असते, कापसासाठी कमी पाणी लागत असले तरी सर्वच ठिकाणी पिकाच्या बाबतीत सारखी परिस्थिती नाही. त्यामुळे ज्याठिकाणी ज्या पध्दतीची पिकाची प्रतवारी असेल त्याठिकाणी त्यापध्दतीने आपल्याला पाण्याचा वापर करावा लागतो. याठिकाणी आपण काही तालुक्यांचा उल्लेख केला आणि त्याठिकाणी पाण्याची पातळी कमी झाली आहे असे म्हटलेले आहे. अशा वेळी पाण्याचा उपसा कमी करण्यासाठी, वाहत्या पाण्यासाठी आणि पाणी भूगर्भामध्ये परत जाण्यासाठी आपण प्रयत्न करणे अतिशय गरजेचे आहे आणि ही अगोदरची स्थिती आता 60 वर्षा- नंतर नव्याने सुरु करीत आहात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

या ठिकाणी एक गोष्ट प्रामुख्याने सांगावीशी वाटते की, आपण या करिता आता भूजल सर्वेक्षण विभाग जिल्हा स्तरावर आणि राज्य स्तरावर मोठ्या प्रमाणात निर्माण केलेले नाहीत. त्यामुळे आम्हाला जर वॉटर सोर्सेसचा रिपोर्ट घ्यावयाचा असेल तर केंद्राकडून घ्यावा लागतो. केंद्राची जी समिती आहे, केंद्राचे जे अधिकारी आहेत त्यांच्याकडून आम्हाला तो रिपोर्ट घ्यावा लागतो. आपल्याकडे मात्र ती सोय नाही. एका कामासाठी मी वॉटर सोर्सेसची माहिती घेतली तेव्हा मला सांगण्यात आले की, महाराष्ट्र स्तरावर फक्त नाशिक येथे आपले बोर्ड आहे त्या ठिकाणी ती घ्यावी लागते. त्या ठिकाणी जेव्हा मी चौकशी केली त्यांनी मला एवढा मोठा खर्च सांगितला की वॉटर सोर्सेसचा रिपोर्ट घेण्यापेक्षा तिथून निघून जाणे मला योग्य वाटले. आपल्याला जर माहिती हवी असेल तर 2 हजार रुपये भरुन सदस्य व्हावे लागते. तुम्हाला किती वर्षाचा आराखडा पाहिजे. त्यानुसार प्रत्येक वर्षाच्या आराखड्यासाठी 1 हजार रुपये भरावे लागतात. जर आपल्याला पूर्ण पाच वर्षाचा आराखडा पाहिजे असेल तर 10 हजार रुपये भरावे लागतात. असे करता करता जेव्हा मी वर्धा नदीच्या पाण्याचा हिशेब करावयास गेले तेव्हा मला त्यासाठी त्या ठिकाणी कमीतकमी 50 हजार रुपये खर्च येणार होता. म्हणून मी महाराष्ट्र सरकारच्या बोर्डाकडून वॉटर सोर्सेसची माहिती घेण्यापेक्षा केंद्रीय वॉटर सोर्सेसकडे गेले आणि त्या ठिकाणी मला 100 रुपयात सगळा आराखडा मिळाला. कोठे किती पाणी आहे याचा हिशेब महाराष्ट्र सरकारने ठेवत असताना त्याचा खऱ्या अर्थाने अभ्यास होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी आपल्याला एक उदाहरण देते. वर्धा जिल्ह्यात वर्धा नदी वाहते. पुढे ती नदी चंदपूरवरुन वाहते. त्या नदीवर आपण सहा ठिकाणी पावर प्रोजेक्ट मंजूर केले. या ठिकाणी मात्र आपण शेतकऱ्यांना अडवितो, पिण्याच्या पाण्यासाठी अडवितो. पण उद्योजकांच्या बाबतीत काय परिस्थिती आहे ? आजपर्यंत कोणत्याही पध्दतीने नदीच्या आत रेती-दगड फोडून विहीर खोदण्याची पध्दत नव्हती. पण त्या ठिकाणी आपण धारिवाल कंपनीला 600 मेगावॉट वीज तयार करण्यासाठी वर्धा नदीचे पाणी घेण्यास परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी 34 फूट लांब विहीर खोदण्यास परवानगी दिली. आठ मीटर रेतीच्या आत आणि तीन मीटर दगड फोडून पाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

घेण्याची परवानगी दिली. पंधरा पाईप लावून आणि वर 150 अश्वशक्तीचे तीन पंप बसवून ते जमिनीतील सर्व पाणी ओढून घेणार. ती परवानगी आपण त्यांना दिलेली आहे. या बिलाचा त्या परवानगीवर काही परिणाम होणार आहे का ? कारण जर त्या नदीचे पाणी उपसले तर त्या 15 किलोमीटरमध्ये जेवढी गावे असतील ती एकदम कोरडी होणार आहेत. त्या लोकांना पिण्यासाठी एक थेंब सुध्दा पाणी राहणार नाही. कारण ही कंपनी दररोज 52 हजार 790 क्युबिक मीटर पाणी उचलणार आहे आणि एका वर्षात 19.27 द.ल.घ.मी. पाणी उचलणार आहेत. या बिलाप्रमाणे आपण शेतकऱ्यांना परवानगी देणार नाही. आमची विहीर ज्या ठिकाणी असेल तेथून 500 मीटर पर्यंत कोणालाही विहीर घेता येणार नाही. आम्हाला कोणालाही पाणी देता येणार नाही, पाणी विकता येणार नाही. जास्तीचे पाणी लागत असेल तर शासनाची परवानगी घ्यावी लागणार आहे. अशा पध्दतीने सगळ्या बाजूने आपण शेतकऱ्यांसमोर अडचण निर्माण केलेली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी उदाहरण द्यावयाचे झाले तर पूर्व विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर जंगल आहे. त्यामुळे त्या ठिकाणी प्रकल्प होणार नाहीत. आता आमचा सिंचन विहिरी हा एकमेव सोर्स आहे. त्या ठिकाणी आम्हाला या भूजल कायद्यामुळे अडचण येणार आहे. मग शेतकऱ्यांनी कसे जगावे याचा सुध्दा आपण विचार करण्याची आवश्यकता आहे. मला आठवते की, एकदा भारतीय जनता पक्षाचा मुंबईमध्ये मोर्चा आला होता तेव्हा मी त्या मोर्चासाठी या ठिकाणी आले होते. आम्ही खेड्यातील लोक आहोत. आम्हाला तोंड धुण्यासाठी एक लोटा पाणी लागते. आंधोळ करण्यासाठी दोन बादल्या पाणी लागते. हात धुण्यासाठी लोटाभर पाणी पाहिजे. या ठिकाणी आल्यानंतर आम्हाला सांगितले की, एक लोटा पाण्यामध्ये हात, पाय, तोंड धुवून झाले पाहिजे. आम्हाला ती सवय नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

त्यामुळे शासनाने ही अट शिथिल करावी असे मला सांगावयाचे आहे.

या विधेयकामध्ये "राज्य प्राधिकरण, कृषी किंवा औद्योगिक वापरासाठी अधिसूचित आणि अधिसूचित नसलेल्या क्षेत्राच्या आत खोल विहिरी खोदण्यास प्रतिबंध करील." पिण्याच्या पाण्याबाबत मला काही म्हणावयाचे नाही. पिण्याचे पाणी ही जीवनावश्यक गोष्ट आहे. ती लोकांची गरज आहे. पण आतापर्यंत उद्योगासाठी भूजलातून पाणी उपसण्याची अनेक ठिकाणी दिलेली आहे. ती रद्द केली जाणार आहे काय, याचाही उल्लेख होणे आवश्यक होते. भूजल प्राधिकरणास विचारल्याशिवाय कोणालाही विहिरी खोदता येणार नाहीत. कारण रेतीमध्ये किती पाणी आहे हे सांगण्याचा अधिकार पाटबंधारे विभागाला नाही. भूजलला तो अधिकार आहे. त्या ठिकाणी पाणी किती आहे, उन्हाळ्यामध्ये किती पाणी उपलब्ध असेल, पावसाळ्यात किती पाणी राहील आणि उन्हाळ्यातील शेवटच्या 4 महिन्यात किती पाणी असेल हे ते सांगू शकतात. दगडाच्या आत गेल्यावर किती पाणी मिळू शकते याबाबत ते माहिती देऊ शकतात. मी सांगितल्या प्रमाणे पाटबंधारे खात्याने परवानगी दिलेली आहे. या खात्याला अधिकारच नाही. पण मनाला वाटेल त्याप्रमाणे उद्योजकांना पाणी उपसण्याची परवानगी दिली जात आहे. पण या कायद्यातील तरतुदीनुसार आपल्या शेतात विहीर खोदावयाची असेल तर भूजल प्राधिकरणाची परवानगी घ्यावी लागेल. त्यामुळे शासन उद्योजकांच्या पाठीशी आहे की सामान्य माणसांच्या पाठीशी आहे असा मला प्रश्न विचारावासा वाटतो. यावर शासनाने जरुर विचार करावा.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये "राज्य प्राधिकरण, विहिरींच्या सर्व मालकांची नोंदणी इ ाल्याविषयीची खातरजमा करील." असे नमूद केलेले आहे. म्हणजे आता सर्व विहीर मालकांच्या विहिरींची नोंदणी केली जाणार आहे. त्याचप्रमाणे पुढे असेही नमूद केलेले आहे की, "राज्य प्राधिकरण, अधिसूचित क्षेत्राच्या आत कोणत्याही कारणाने, खोल विहिरींसहित अन्य विहिरींचे बांधकाम करण्यावर पूर्णपणे बंदी घालून त्याचे विनियमन करील." खोल विहिरींसहित अन्य विहिरींचे बांधकाम करण्यास बंदी राहील असे म्हटलेले असल्यामुळे लोकांनी आता काय करावयाचे ? याबाबतही विचार करण्याची आवश्यकता आहे. दोन विहिरींच्या अंतरासाठी 500

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्रीमती शोभा फडणवीस.....

मीटरचा नियम केला आहे. परंतु माझे शेत एका ठिकाणी असेल आणि 500 मीटर अंतरावर दुसऱ्याचे शेत असेल तर तो काही माझ्या विहिरीचे पाणी घेऊ शकणार नाही. कारण त्याच्यावर शासनाने बंदी आणलेली आहे. त्यामुळे त्याला पाणी विकता येणार नाही. दुसऱ्या शेताच्या मालकाला विहीर खोदता येत नसेल तर त्याच्यासाठी पाण्याची सोय कोठून केली जाणार आहे ? शेतकऱ्यावर पूर्णत: बंदी आलेली आहे, पिण्याच्या पाण्यावर बंदी आणलेली आहे फक्त उद्योजकांवर बंदी आणलेली नाही. शासन उद्योजकांच्या बाजूचे आहे, शेतकऱ्यांच्या बाजूचे नाही हे सिध्द होत आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

सभापती महोदय, या विधेयकाच्या पृष्ठ क्र.4 वर पुढे असेही नमूद केलेले आहे की, "अधिसूचित क्षेत्रात साठ मीटर किंवा त्याहून अधिक खोल असलेल्या खोल विहिरींमधून पंपाच्या सहाय्याने भूजल काढून घेण्यावर पूर्ण मनाई करण्याचा जिल्हा प्राधिकरणाला निदेश देईल." मग विहिरीवर पंप लावावयाचे नाही तर शेतकऱ्यांनी पाणी कसे उपसायचे, विहिरीतून पाणीच उपसावयाचे नाही तर विहीर तरी कशासाठी खोदावयाची, जिल्हा प्राधिकरण सांगेल तेव्हा शेतकऱ्यांनी पाणी उपसायचे काय ? म्हणजे शेतकऱ्यांना 10 कि.मी., 30 कि.मी.अंतरावर असलेल्या प्राधिकरणाकडे जाण्याचे बंधनकारक केले आहे. त्यांनी परवानगी दिली नाही तर शेतकऱ्यांनी काय करावयाचे ? शासन लोकांना विकासाच्या दिशेने नेत आहे की पारंपरिक पध्दतीकडे नेत आहे, विहिरींवर पंप बसविता येत नसेल तर त्यांनी मोट लावून पाणी उपसायचे काय ? शेतीसाठी पाणी देणार आहे, वीज देणार आहे, शासन शेतकऱ्यांचा विकास करणार आहे, आपल्याला खूप काही मिळणार आहे, या भ्रमामध्ये राहून शेतकरी खूष होते. त्यामुळे ही तरतूद शेतकऱ्यांच्या विरोधातील आहे असे माझे मत आहे. ज्या ठिकाणी शेतकऱ्यांना पाण्याची आवश्यकता आहे, जेथे पिण्याचा प्रश्न आहे त्या भागासाठी ही तरतूद शिथिल करावी अशी मी सूचना करीत आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "कोणतीही व्यक्ती किंवा कोणताही भूजल वापरकर्ता, विहित करण्यात येईल अशारितीने, जिल्हा प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेतल्याखेरीज अधिसूचित क्षेत्राच्या आतील भूजलाची विक्री करणार नाही." समजा शेजारच्या माणसांना पाण्याची गरज असेल तर त्याला आम्ही पाणी देऊ शकणार नाही.

यानंतर श्री.शिगम....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

राज्य शासन व राज्य प्राधिकरण, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती व पंचायती यांच्याशी विचारविनिमय करुन एकात्मिकृत पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजनेची अंमलबजावणी झाली असल्याची खात्री करील. राज्य शासन, प्राथम्याने अधिसूचित क्षेत्रांमध्ये भूजलाच्या कृत्रिम पुनर्भरणाकरिता एकात्मिकृत पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजनेची अंमलबजावणी करेल.

सभापती महोदय, हे एकात्मिकृत पाणलोट क्षेत्र पुनर्भरणाकरिता आताच सुरुवात झाली का ? गेली 10 वर्षे हा कार्यक्रम आपण राबवित आहोत. 10 वर्षे कार्यक्रम राबवून देखील जमिनीमध्ये पाणी मुरवण्यामध्ये आपण कमजोर पडलो आहोत असे आपल्याला वाटत नाही काय? आपण शिवकालीन योजना सांगितली. पावसाचे छतावर पडलेले पाणी पाईपाने जमिनीमध्ये मुरविण्याची ही योजना आहे. ही योजना अतिशय चांगली आहे. परंतु ही योजना ज्यांच्याकडून आपण राबवितो ते ती कशा प्रकारे राबवितात याचा कधी विचार केलेला आहे काय ? ही योजना मी आमच्या ग्रामीण भागामध्ये सुरु केली. ज्या ठेकेदाराने हे काम केले त्याने आऊटलेट दिला. पण जमिनीमध्ये पाणी मुरविण्याची काही सोय केली नाही. तो ठेकेदार पैसे घेऊन निघून गेला. त्याच्यावर केस झाली. कारवाई झाली, सर्वकाही झाले. पण योजना फेल झाली. म्हणून या योजना चांगल्या रीतीने राबविल्या असत्या तर त्याचे रिझल्ट निश्चितच चांगले आले असते. ही योजना चांगल्या प्रकारे आपल्याला राबविता आली नाही. योजना राबवित असताना जो प्रत्यक्षात कृती करणारा असतो तो ती कशा प्रकारे करतो यावर योजनेचे यश अवलंबून असते.

सभापती महोदय, कमी पाणी लागणारी पिके लावण्याचा सल्ला आपण दिलेला आहे. ही पिके कोणती असावीत हे सांगितलेले नाही. माझा भागामध्ये प्रचंड पाऊस पडतो. तेथे धान पिक प्रामुख्याने घेतले जाते. पण त्या धानाला विहिरीचे पाणी लागते, नद्यांचे पाणी लागते, तलावाचे पाणी लागते. कारण ही शंभर टक्के पाण्याची पिके आहेत. उद्या आपण ऊसा ऐवजी ज्वारीचे पीक घ्या असे सांगितले तर कोणी ऐकेल का ? भौगालिक परिस्थिती नुसार आपण पिके घेतो. म्हणून कायदा करीत असताना भौगोलिक परिस्थिती विचारात घ्यावी लागते. महाराष्ट्र एकच पीक घेणारे राज्य नाही, या राज्यात सर्वत्र पाण्याची परिस्थिती सारखी नाही. येथे असे म्हटलेले आहे की, "राज्य प्राधिकरणाच्या सुरक्षिततेकरिता समूचित सावधगिरीच्या उपाययोजना हाती घेण्याकरिता संबंधित शासकीय प्राधिकरणांना मार्गदर्शक तत्वे निर्गमित करील, क्षेत्रातील पंचायत व नागरिक स्थानिक संस्था यांचे संनियंत्रण करील.. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सन्माननीय सदस्यांनी विधेयक व्यवस्थित वाचलेले आहे. त्या व्यवस्थित त्यांचे विचार मांडत आहेत. चर्चा जरा दुसरीकडे जात आहे असे वाटले म्हणून मी मध्ये हस्तक्षेप करीत आहे. ज्या जमिनीवर निर्बंध आहेत, जेथे अतिउपसा झालेला आहे, अधिसूचित क्षेत्रे म्हणून ज्या क्षेत्रांवर निर्बंध आहेत तेवढ्याच क्षेत्रापुरते मर्यादित असे हे विधेयक आहे. सन्माननीय सदस्यांनी आता वर्धा जिल्ह्याचा उल्लेख केला. वर्धा जिल्ह्यामध्ये कोणत्याही प्रकारचे निर्बंध नाहीत. निर्बंध असलेली 66 क्षेत्रे आहेत. तेवढ्या पुरतेच मर्यादित असलेले हे विधेयक आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : अधिसूचित क्षेत्रे कोणती आहेत ?

श्री. दिवाकर रावते : निर्बंधित क्षेत्रे म्हणजे काय याची व्याख्या विधेयकामध्ये नाही. निर्बंध केलेली क्षेत्रे कोणती ?

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

हे विधेयक आणण्याकरिता ज्या निर्बंध नसलेल्या क्षेत्राने तुम्हाला प्रवृत्त केले. ती क्षेत्रे आम्हाला सांगा.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय,यहां पर एक बात क्लियर है. मेरा कहना है कि इस बिल का नाम दिया गया है Maharashtra Groundwater Development and Management Act 2009 and it is applicable to the whole state of Maharashtra. यह पूरे महाराष्ट्र के लिए है. दूसरी बात मुझे यह कहनी है कि वाटर रिर्सोसेज एक्ट अलग है, जिसके लिए स्टेट लेवल की कमेटी होती है, बॉडी होती है. उस कमेटी का नाम इस में एक्सपर्ट कमेटी के नाम से दिया गया है. हमारा कहना है कि आप यह बात क्लियर कर दीजिए कि यह पूरे महाराष्ट्र के लिए है या किस जगह के लिए है ?

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझे म्हणणे असे आहे की, जेथे खड्डयात पाणी गेले तेथे निर्बंध लावणार. परंतु तेथे पाणी जाऊ नये म्हणून काही बंधने घालत असताना तेथील लोकांना विश्वासात घेऊन नंतर ते बंधन घातले पाहिजे. या विधेयकामध्ये कोठेही म्हटलेले नाही की हे ठराविक क्षेत्राला लागू आहे. हे विधेयक मंजूर झाले तर तो कायदा संपूर्ण राज्याला लागू होणार आहे. तुमचे यासंबंधी आदेश निघून जातील, परंतु आम्हाला तेथील लोक विचारणा करतील हे विधेयक मंजूर होताना तुम्ही काय केले. ज्या ठिकाणी पाणी नाही, त्या ठिकाणी पाणी वाचवा, त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : कोणते क्षेत्र यामध्ये समाविष्ट केलेले आहे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाच्या पटलावर ठेवली पाहिजे. त्या माहितीच्या आधारे आम्ही आमची मते मांडू शकतो. कोणकोणत्या ठिकाणच्या क्षेत्रावर निर्बंध घातले आहेत ते आम्हाला कळले पाहिजे. परंतु त्याबाबतीत आजोबा काहीच बोलत नाही. आजोबा दुसऱ्याच गोष्टी आम्हाला सांगता आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : आजच्या घडीला कोणती क्षेत्रे समाविष्ट आहेत याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला दिली पाहिजे. माननीय मंत्री महोदय हे मागितल्या नंतर माहिती देत आहेत हे बरोबर नाही. विधेयक आणतांना त्यांनी संपूर्ण यादीसह विधेयक आणावयास पाहिजे होते. आम्हाला ती क्षेत्रे कळली तर आम्हाला आमचे विचार मांडता येतील.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे : यासंबंधीची माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना वितरित करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, ज्या कारणासाठी हे विधेयक आणले आहे, त्या ठिकाणी दीड लाख सिंचन विहिरी करीत असताना हा विषय माननीय मंत्री महोदयांना का आठवला नाही. आपण एवढया मोठया प्रमाणात सिंचन विहिरी देतो आहोत. ऊसाची पिके घेत आहोत, फळबागाची लागवड करतो आहोत, या सर्व गोष्टी सिंचन विहिरीच्या आधारेच करीत आहोत. पूर्वीच याबाबतचा विचार केला असता आणि एवढया सिंचन विहिरीचे खोदकाम केले नसते, पंप बसविले नसते तर आज हा विषय चर्चेला आला नसता असे माझे म्हणणे आहे. आता तुम्ही सिंचन विहिरीवरील पंप बंद करणार काय ? त्या विहिरीचे पाणी कोणाला देता येणार नाही, कोणाला ते विकता येणार नाही. त्या पाण्याच्या वापरावर देखील बंदी येणार आहे. त्यांचे पंप देखील बंद करणार आहात. तुम्ही कोल्हापूर, सोलापूर, येवला बऱ्यांच गावांची नावे सांगितली. त्या एरियामध्ये लोकांनी पाणी कसे उपसावयाचे, पाणी कसे न्यावयाचे याचा देखील आपण विचार केला पाहिजे. काय करावयाचे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी देणे आवश्यक आहे. आता आपण म्हटल्या प्रमाणे निर्बंधासंबंधीची यादी वेगळी दिली आहे.हे विधेयक त्या गावांकरिता बंधनकारक आहे असे आपण म्हटलेले आहे. परंतु या विधेयकात राज्याचा उल्लेख केलेला आहे. राज्याच्या ठिकाणी हे विधेयक तयार करुन पाठविणार आहात, त्यावेळी यादी स्वतंत्रपणे देणार आहात काय या गोष्टीचा खुलासा केला गेला पाहिजे.

महोदय, हे विधेयक जसे तयार केले आहे तसेच महाराष्ट्रात पाठविणार आहात काय ? आपण ठराविक क्षेत्रावर निर्बंध घातले आहेत, परंतु हा कायदा संपूर्ण महाराष्ट्राला लागू झाला तर त्याची जबादारी कोण घेणार ? विधेयक आणताना ते व्यवस्थितपणे आणले पाहिजे होते. किती क्षेत्रासाठी लागू होणार आहे...

यानंतर श्री. भोगले..

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

या ठिकाणी वेगळी यादी दिली आहे. अशी वेगळी यादी करता येत नाही. ज्या काही कंपन्यांना, उद्योजकांना, शहरांना बंधने घातली आहेत त्यामधून कोणावरही अन्याय होणार नाही याची खबरदारी शासनाने घ्यावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 42 वर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहातील सदस्य नेहमी भाषण करीत असताना मी "स्पेसिफिक बोलतो", "स्पेसिफिक बोलतो" असे म्हणत असतात. त्याऐवजी मुद्याचे बोलतो, मुद्देसूद बोलतो असे म्हटले पाहिजे. मंत्री महोदयांनी देखील उभे राहून हे "बिल मांडले" असे म्हटले. त्या ऐवजी विधेयक मांडले असे म्हटले पाहिजे होते. राज्यकर्त्यांनी भाषेचा योग्य वापर केला तर त्याचे दृश्य परिणाम आपल्याला राज्यात दिसून येतील. प्राध्यापकांकडून आम्ही तेवढी अपेक्षा करतो. मंत्री महोदय हे संत प्राध्यापक आहेत. माननीय सदस्यांनी सुध्दा बिल ऐवजी विधेयक म्हणावे अशी माझी प्रेमाची सूचना आहे. कोणी काय बोलावे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, हे विधेयक सभागृहापुढे आलेले आहे ते अतिशय महत्वाचे होते म्हणून 2009 साली दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते. हे विधेयक विचारात घेत असताना केवळ संयुक्त समितीमध्ये चर्चा करुन मंजूर केलेले नाही. समितीने प्रत्यक्षात राज्याबाहेर दौरे करुन अनुभव घेतले आणि नक्की काय करण्याची गरज आहे हे लक्षात घेऊन विधेयकात कोणती दुरुस्ती केली हे दिसून आले नाही. मला समितीचा तो अहवाल सापडला नाही. या विधेयकासोबत तो अहवाल दिला असता तर कोणत्या दुरुस्त्या सुचविल्या हे कळले असते आणि मग भाष्य कमी होते. काही मूलभूत प्रश्न या विधेयकातून निर्माण होतात. पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे. पाणी कमी आहे ते वाढवायचे कसे आणि ते पुरवायचे कसे एवढया सोप्या भाषेत मला समजलेले हे विधेयक आहे. पाणी पुरवायचे असेल तर निर्बंध निर्माण करावे लागतील. ज्याला आज एक लोटा पाणी मिळते त्याने सहा बादल्या पाणी उपसायचे याऐवजी एक लोटा पाणी मिळते त्याने एक बादली पाणी वापरायचे असे पाण्याचे नियोजन करणारे हे विधेयक आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

महोदय, यात सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दिलेले असून "राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण विनिर्दिष्ट करील असे कोणतेही प्राधिकरण लोकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करील अशा विहिरी, त्यात विंधण विहिर किंवा कूप नलिका जिल्हा प्राधिकरण अधिसूचित करील" असे विधेयकाच्या सुरुवातीलाच म्हटले आहे. शहरी भागातील पाणी पुरवठ्याच्या संदर्भातील विषय या विधेयकात नाही तर ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्याबाबतचेच सांगितले आहे असे मला वाटते. त्यामुळे शहरात लागणाऱ्या पाण्याची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे व या निमित्ताने मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सध्या शहरातील पाणी पुरवठ्याची जी परिस्थिती आहे ती दिवसेदिवस गंभीर होत चालली व भविष्यात आणखी गंभीर होत जाणार आहे. मुंबईपासून ठाणे, डोंबिवली व कल्याणपर्यंतची मोठी शहरे तसेच नवी मुंबईपर्यंतचा दूर्मिळ असा ग्रामीण भाग आणि संपूर्ण शहरी भाग या सर्वच भागात ही समस्या जाणवणार आहे. या परिस्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील ठाणे शहराचा नागरिकरण वाढीचा वेग प्रचंड आहे तो मुंबईपेक्षा कित्येक पटीनी जास्त आहे. जनगणनेच्या आकडेवारीवरुन देशातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला जिल्हा म्हणून ठाणे जिल्ह्याची नोंद झालेली आहे. त्याचा परिणाम असा होतो की, ठाणे, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, अंबरनाथ, बदलापूर, मीरा-भाईंदर या शहरांमध्ये भविष्यात पाण्याची तीव्र टंचाई भासणार आहे.

ठाणे जिल्ह्यात एकूण मागणीच्या 507 दशलक्ष लिटर एवढा कमी पाणीपुरवठा होत असल्याने फेब्रूवारी, 2012 मध्ये 7 टक्के पाणी कपात करावे लागले. ठाण्यातील महापालिका क्षेत्रात प्रतिदिन 2492 हजार दशलक्षच्या वर पाणी पुरवठा आवश्यक असून प्रत्यक्षात 1986 दशलक्ष लिटर इतकाच पाणीपुरवठा होतो. सन 2016 मध्ये मागणीपेक्षा 1140 दशलक्ष लिटर इतका प्रतिदिन पाण्याचा तुटवडा भासणार आहे. तसेच सन 2031 मध्ये सध्याच्या दुप्पट 4631 दशलक्ष पाण्याची आवश्यकता भासणार आहे. मुंबई व्यतिरिक्त हे पाणी कोठून आणणार आहे ते ठाण्यात तर निर्माण होणार नाही ना ? शासनाने जे विधेयक आणलेले आहे ते ग्रामीण भागाच्या पाणीपुरवठ्या आरक्षणापासून विंधण विहिरीपासून नाल्यापर्यंत, तिकडे पडणाऱ्या पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात धरणात अडविल्यानंतर पाणीपुरवठा करणे मात्र कठीण होणार आहे. आपण येथे

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

कौतुकाने सांगितले की, आपण राजस्थानमध्ये गेला होता आणि तेथे सुकलेल्या नद्या वाहत्या केल्याची उदाहरणे पाहिली. सुकलेल्या नद्या वाहत्या करणे हे सर्व ठीक आहे पण असे करावयाचे असेल तर हे पाणी जे अडविले जाणार आहे त्या पाण्याचा अनेक खेड्यांपर्यंतचा प्रश्न निर्माण होऊन पुन्हा त्या पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होणार आहे, म्हणून या विधेयकात ज्या तरतुदी दाखविल्या आहेत, त्याची प्रतिपूर्ती शेकडो किलोमीटरचे पाण्याचे पट्टे अशा पाण्याच्या विहिरी वाहत्या करण्यासाठी कशा पुरे पडतील याबाबत मात्र विधेयकात कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही.

महोदय, कोकण परिसरातील पाण्याची परिस्थिती तर अत्यंत कठीण आहे. कोकणात 4 ते 6 हजार मिलिमीटर एवढा पाऊस पडतो तरी देखील उन्हाळ्यात टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. हे विधेयक वाचत असताना कोकणच्या संदर्भात अशा प्रकारे पाणी अडविणे, ते थांबविणे आणि जिरविणे अशा प्रकारे भविष्यासाठी व्यापक कार्यक्रम करुन नातवंडांसाठी आंबे मिळण्यासाठी, आंब्याच्या फळबागा फुलविण्यासाठी कसा वापर करता येईल, तसेच माननीय विरोधी पक्षनेते हे दरवर्षी आंबा महोत्सव भरवित असतात तो त्यांना पुढेही भरवावयाचा असेल तर त्यासाठी पाण्याची आवश्यकता आहे. पण रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडूनही टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो, अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत प्रत / परिशुद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सिंधुदुर्ग जिल्हयात 271 गावे व 615 वाडयांना पाण्याची टंचाई जाणवते आहे. कोकणातील सर्व नद्यांचे पाणी अरबी समुद्राला मिळते. कोकणातील जमीन पाणी साठविण्यासाठी अनुकूल नाही त्यामुळे कोकणात दुर्भिक्ष्य जाणवते असा उल्लेख आहे. माझ्याकडे जी यादी मा.मंत्रीमहोदयांनी दिलेली आहे त्यामध्ये कोकणाचा काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, उत्तर महाराष्ट्रात एकंदर 40 धरणे असून हा भाग पाण्याच्या बाबतीत तसा श्रीमंत भाग आहे. मा. खडसे साहेब तापी महामंडळात होते त्यावेळेस तापी पाटबंधाऱ्याला कमी पैसे लागत होते. उत्तर महाराष्ट्राचा पाण्याचा जेवढा कोटा आहे तेवढे पाणी त्यांना मिळते व बाकीचे पाणी पुढे जाते. उत्तर महाराष्ट्रात पाणी भरपूर असले तरी उन्हाळयात पाणी टंचाई सुरु होते.

सभापती महोदय, यादीमध्ये नाशिक जिल्हयाचा समावेश करण्यात आलेला आहे. नाशिकमध्ये 29 गावे, 73 पाडयांना आता सुध्दा टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. मांजरपाडा व गंगापूर धरणाचे पाणी भरपूर असल्यामुळे नाशिक जिल्हयातील धरणातील पाणी मुंबईसाठी दिले जाणार आहे. नाशिकमधील पाण्याची काय हालत केलेली आहे याची मला सर्व माहिती आहे. या ठिकाणी अतिरिक्त धरणे कशी बांधली आहेत, शेतीकरता पाणी पुरवठा कसा उपलब्ध करुन घेण्यात आलेला आहे, दुसऱ्याचे ओरबडून स्वत:ची भरभराट कशी करुन घ्यावयाची याबाबतीतही मला माहिती आहे. आज सकाळच्या प्रश्नोत्तराच्या तासाला चर्चेचे स्वरुप आले होते. ऊणे दुणे न काढता मराठवाडा व विदर्भ पाण्यापासून वंचित आहे हे माननीय मंत्रीमहोदयांनी मान्य देखील केलेले आहे. केळकर समितीच्या संदर्भात मी ज्या भावना व्यक्त केल्या होत्या त्या भावना संबंधितांपर्यंत पोहचविण्याची व्यवस्था मा.अजित दादांनी केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रात देखील दर वर्षी प्रमाणे या वर्षीही पाणी टंचाईचा प्रश्न निर्माण झालेला आहे. पश्चिम महाराष्ट्रात 5 तालुक्यांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. यादीमध्ये सांगली, सातारा या जिल्हयांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. याच सभागृहात काही दिवसापूर्वी हे विधेयक आणण्यापूर्वी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

दि.21 मार्च रोजी अशी माहिती दिली होती की, "राज्यातील जनतेला स्वच्छ पिण्याचे पाणी देण्याच्या दृष्टीने 3391 ग्रामपंचायतींची जलस्वराज्य प्रकल्पासाठी निवड करण्यात आली. मात्र गावातील तंटे ग्रामपंचायतींचा धिमा प्रतिसाद, गावकऱ्यांची उदासीनता आदी कारणामुळे 394 गावांना प्रकल्पातून वगळण्यात आल्याचे तसेच जलस्वराज्य योजनेचा सन 2010 पर्यंत 115.34 कोटी रुपये खर्च केल्यानंतर राज्यात बराच ग्रामीण भाग या योजनेपासून वंचित आहे". हिरवे बाजार गावांचा आपण आदर्श सांगतो व एवढे पैसे खर्च करुन अशी परिस्थिती निर्माण होत असेल तर भव्य सरपंच परिषदा घेऊन त्याचा परिणाम किती साधेल असा प्रश्न आता निर्माण झालेला आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आणि मग हे मिटविता येईल काय? असा आपल्याला प्रश्न पडला. हे विधेयक त्यामधून मार्ग काढील काय हा या विधेयकावरील चर्चेचा केंद्रबिंदू आहे. आपण या ठिकाणी विवंचना आणि वंचना देखील मांडली. कृतीशील नसणाऱ्या लोकांचे कर्तृत्वही नाही. सरपंचाच्या जबाबदारीबाबत सभागृहामध्ये बोलत असतांना आपण 31 मार्चला या सभागृहामध्ये ही परिस्थिती मांडली. कोणती परिस्थिती निर्माण झाली? महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणी अहवालामध्ये जे निष्पन्न झाले ते आमच्यापुढे आले आहे. त्याला हे विधेयक कितपत पुरेसे पडणार आहे? शासनाकडे पैसे आहेत परंतु काम होत नाही अशी स्थिती प्रत्येक विभागाच्या बाबतीत आहे.

सिंचनाच्या विकासासाठी शासनाने 70 हजार कोटी रुपये खर्च केल्यानंतर संपूर्ण देशामध्ये 8.7 टक्के म्हणजे फक्त 0.1 टक्क्याने सिंचन वाढले. याचा अर्थ मोठया प्रमाणावर पैसे खर्च करुन सुध्दा पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. याबाबतीत माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी केलेल्या सूचनेवर मी येणार आहे. तेव्हा या विधेयकाच्या माध्यमातून हे कसे साध्य होईल हा माझा प्रश्न आहे? या विधेयकाच्या उद्देशामध्ये काय म्हटले आहे हे 15 मिनिटे सांगणारे आपण पहिले मंत्री आहात. इतर वेळी आम्ही हे विधेयक कशासाठी आणले आहे असे शासनाला विचारतो. त्यावेळी उभे राहून अधिकाऱ्यांनी दिलेले कागद वाचून मंत्री महोदय खाली बसतात. मी याठिकाणी विधेयकांवरील चर्चेच्या निमित्ताने नेहमी बोलत असतो की, या राज्यामध्ये आणलेले विधेयक कशासाठी आहे, त्याचे पुढे परिणाम काय होणार आहेत, हा कायदा अंमलात आणल्यानंतर काय परिस्थिती निर्माण होईल, त्यामध्ये जनतेचा किती लाभ होईल, त्यातील अनिश्चितता कधी संपेल? सभागृहापुढे विधेयक आणतांना हे सांगितले पाहिजे. परंतु अशाप्रकारे कधीही मांडले जात नाही. मंत्री महोदयांनी पहिल्यांदा या विधेयकावर त्यांचे म्हणणे व्यवस्थितपणे मांडले आहे. या सदनाच्या माध्यमातून आपल्याला अभिप्रेत असलेले सांगण्याचा आपण प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणीमध्ये टंचाई निवारण कार्यक्रम, महाराष्ट्र भू जल अभियान, शिवकालीन पाणी पुरवठा योजना, जलस्वराज्य योजना, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, एकात्मिक पाणी व्यवस्थापन अशा विविध योजना राबविल्यानंतर काय निर्माण झाले? त्याची आकडेवारी या ठिकाणी देण्यात आली असून ती फार विचित्र आहे. ही आकडेवारी पाहिल्यानंतर या योजनांच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. या योजनेमध्ये वाडया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

आणि गावे यांचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे, त्यामध्ये तफावत आढळून येते. सन 2009-10 मध्ये एकूण लक्ष्य 11 हजार 639 गाव आणि वाडयांचे होते. परंतु 7 हजार 465 गाव आणि वाडयांपर्यंत या योजना पोहोचल्या. बाकीच्या साडे पाच हजार गाव आणि वाडया वंचित राहिल्या. त्यानंतर सन 2011-12 मध्ये 9 हजार 735 गाव आणि वाडयांचे लक्ष्य होते त्यापैकी 8 हजार गाव आणि वाडयांपर्यंत योजना पोहोचू शकल्या. सन 2010-11 मध्ये 894 नी लक्ष्य कमी झाले. ज्यावेळी हे शासन पाणी पोहोचविण्याचे लक्ष्य निर्धारित करते त्यावेळी हे लक्ष्य एवढया मोठया प्रमाणात न पोहोचविण्याची क्षमता या खात्यामध्ये निर्माण झाली तर त्या बाबत प्रशासकीय जाब विचारणारी तरतूद या विधेयकामध्ये नाही.

पाणी वापरण्याच्या पध्दतीबद्दल दंड व शिक्षा ठेवण्यात आली आहे. परंतु जर योग्य पध्दतीने योजना राबविली गेली नाही तर त्याची प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कोणती जबाबदारी आहे या बाबत या विधेयकात कुठेच तरतूद करण्यात आलेली नाही.

(यांनतर श्री. भारवि)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

योजना असफल झाली तर मग त्याची जबाबदारी आपण कोणावर टाकणार आहात ? सरकार आपल्या निर्धारातून धोरण निर्माण करते आणि ते योग्यरितीने राबविले गेले नाही तर त्याची जबाबदारी कोणावरच टाकत नाही. त्यात यश आणि अपयश हे दोन्ही सरकारचेच असते. पैसा मंत्र्याने खायचा आणि ही योजना अपयशी करणाऱ्या यंत्रणेला मुक्त सोडायचे हे धोरण बरोबर नाही. त्यामुळे जबाबदारीची तरतूद या विधेयकामध्ये असेल आणि ती आपण मला दाखविली तर मला आनंद होईल. कदाचित ते माझ्या वाचनात आले नसेल.

पैसे किती खर्च केले ? या संबंधातील आकडेवारी धक्कादायक आहे. 6502 वस्त्यांपैकी ऑक्टोबर 2011 पर्यंत फक्त 1931 म्हणजे 29 टक्के वस्त्यांपर्यंत ही योजना पोचली. ती सफल झाली की नाही हे सांगता येत नाही. अशा आव्हानात्मक परिस्थिती आहे. प्रचंड मोठी आकडेवारी माझ्याकडे आहे. ती वाचण्यात मी वेळ घालवत नाही. धोरणात्मक दृष्ट्या आकडेवारी मांडणे मला आवश्यक वाटत होते. म्हणून मी ती मांडण्याचा प्रयत्न केला. पान क्र.4 वरील (वीस) मधील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच स्रोत मी वाचला. आता मी पान क्र.4 वरील (एकवीस) वाचतो. यात नमूद केले आहे की, "सार्वजनिक पाणी पुरवठा यंत्रणा" याचा अर्थ ज्याद्वारे पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी पाण्याचा पुरवठा करण्यात येतो अशी सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोताशी संबंधित असलेली बांधकामे व यात जलवाहिन्या, साठवण जलाशय, नळखांब, टाक्या, हातपंप, विजेवर चालणारे पंप व त्यांच्याशी संबंधित इतर सर्व सामग्री यांचा समावेश होतो. "पावसाचे पाणी" याचा अर्थ, पृष्ठभागावर किंवा भूपृष्ठाखालील जलप्रस्तरामध्ये किंवा इतर संरचनेमध्ये पावसाचे पाणी गोळा करण्याचे आणि साठवण्याचे तंत्र असा आहे. हे नवीन आहे काय ? हे विधेयकामध्ये आणण्याचे कारण काय आहे, हे मला कळले पाहिजे. रोजगार हमी योजनेसह आपण अनेक योजनांतून हे राबवित आहोत. त्यावर आज पर्यंत किती पैसा खर्च झाला. किती पाणी योजना आम्ही राबविल्या, किती फुकट गेल्या हे आम्हाला ते सांगूच शकले नाही. यातील महत्वाचा प्रश्न माननीय मंत्रिमहोदय कसा हाताळणार आहेत हा प्रश्न आहे. तो प्रश्न महसूलाच्या संबंधात येणाऱ्या नियंत्रणा संबंधीचा आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

(पंचवीस) मध्ये असे नमूद केले आहे की, "वालूका खाणकाम" याचा अर्थ नदी, नाले, सरोवर इत्यादींसह किनाऱ्यालगतच्या प्रदेशामधून तसेच समुद्रतटीय क्षेत्रामधून वाळू काढण्याची किंवा उपसण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया. मी रायगड मध्ये गेलो होतो. तेथे विचित्रच निर्माण झालेले आहे. वाळू उपसा खाली गंभीर घटना घडली आहे. उच्च व सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे की, आता वाळू पंपाने उपसायची नाही. त्यांनी सांगितले की, आम्ही हाताने वाळू काढणारे आहोत. याबाबत ते न्यायालयात गेले. उच्च न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले की, यांचा पिढ्यानपिढ्याचा धंदा आहे. त्यामुळे त्यांना वाळू उपसायला परवानगी द्यावी. शेकडो टन वाळू उपसण्याची परवानगी देण्यात आली. दुर्दैवाने आज तेथे पंपाने वाळू उपसा होत आहे. त्यामुळे आज तेथे वाळू माफिया तयार झाले आहेत. हे रायगडचे काल परवाचे उदाहरण आहे. ते सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना माहिती आहे. मी स्वत: जाऊन बघून आलो आहे. ते लायसेन्स विकतात. मी परवानाधरक असतो. माझा ठेका मी दुसऱ्याला देतो आणि घरी बसून मौजमजा करतो. बोटी कुठून आणतात काय करतात हे सर्व मी तेथे जाऊन पाहिले आहे. त्यावेळी जिल्हाधिकारी देखील होते. तेव्हा आपण यावर कायद्यानुसार निर्बंध कसे काय आणणार आहात ? आता तर प्रचंड उपसा होत आहे. प्रशासकीय यंत्रणा ते थांबवू शकत नाही. एक तर गोळ्या खायच्या, मार खायचा, फटके खायचे नाही तर मग घरी बसून तडजोडी करायच्या, अशी परिस्थतीत वाळू उपशाच्या बाबतीत झ ाले आहे. त्यामुळे ह्या कायद्याचा काय परिणाम होणार आहे हे आम्हाला कळले पाहिजे.

आपल्याकडे भूजल वापरकर्त्यासंबंधी धोरण झाले आहे. पिण्याचे पाणी पहिले, त्यानंतर शेतीसाठी पाणी व शेवटी उद्योगाला पाणी देण्याचा आपला क्रम आहे. त्याचा उल्लेख भूजल वापरकर्तामध्ये आहे. विहिरी खोदण्यासंबंधातील निर्णय तुम्ही सांगितले आहेत. त्याच्या पलीकडे जाता येणार नाही. मग आपण नक्की काय करणार आहात ? "राज्य प्राधिकरण विहित केल्याप्रमाणे जास्त पाणी लागणारी पिके घेण्याकरिता भूजलाचा वापर करणाऱ्यांना प्रोत्साहन न देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करील." हा महत्त्वाचा प्रश्न आहे. "कोणतीही व्यक्ती किंवा कोणताही

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

भूजल वापरकर्ता, विहित करण्यात येईल अशा रितीने, जिल्हा प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेतल्या खेरीज अधिसूचित क्षेत्राच्या आतील भूजलाची विक्री करणार नाही."

हे विधेयक मुंबई शहराला लागू नाही. मुंबईतील पाण्याचा टँकर हा मोठा विषय आहे. परंतु ग्रामीण भागामध्ये आता टॅन्कर माफिया निर्माण झाले आहेत. त्यांच्यावर नियंत्रण आणण्यात येणार आहे काय, हा देखील खरी प्रश्न आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु महाराष्ट्रातील ग्रामीण भागात टँकरशिवाय चालत नाही.याठिकाणी जो विषय मांडलेला आहे, तो टँकर माफियांवर निर्बंध आणणारा आहे, त्यामुळे आता त्यांना परवानगीशिवाय काही करता येणार नाही असे म्हटल्यानंतर आता येथेच भ्रष्टाचार सुरु होणार आहे.कायद्यात तरतूद करण्यात आली की, मी तुला कायद्याने बडगा दाखवू शकतो मग तशा प्रकारचा बडगा न दाखविण्याचीच किंमत वसूल केली जाते. मग किती टँकर घेतले, काय घेतले असे प्रश्न निर्माण होतात.

सभापती महोदय, पुनर्भरण क्षेत्राचा शोध घेणे ही बाब मला चांगली वाटली. कारण आपल्या कडे सध्या लाखाने विहिरी ओस पडल्या आहेत. मी स्वत:आमच्या सर्व शिवसैनिकांना बरोबर घेऊन पाच जिल्ह्यामध्ये उभे राहून दीड-दोन हजार विहिरींचे पुनर्भरण करण्याचा प्रयोग केला आहे आणि अशा प्रकारे मी एक सामाजिक प्रकल्प राबविला आहे. पुनर्भरण हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. अशा वेळी कुठेही पाणी थांबविण्यापेक्षा विहिरींचे पुनर्भरण करावयास पाहिजे. याबाबतीत मी देखील सर्व शासकीय अधिकाऱ्यांची मदत घेऊनच काम करीत असे. 5 वर्षे, 15 वर्षे, 20 वर्षे पाणी देणारी ट्युब वेल संपली. मग त्याचे पुनर्भरण संपूर्ण पावसाळ्यात झाले आणि आता लातूर येथील विहिरी पुन्हा 25 वर्षानंतर पुन्हा उपसून,उपसून रिकाम्या झाल्या.ग्रामीण शहरामध्ये ज्या विहिरी आहेत त्याचे पुनर्भरण केले तसेच विहिरी खोदल्या. पण पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे त्या ओस पडल्या, त्या साफ झाल्या. पुनर्भरण हा विषय सर्वात महत्वाचा आहे आणि त्या पाण्याचे बाष्पीभवन होत नाही म्हणजे सूर्य किरणांमुळे त्याची वाफ होऊन ते जात नाही. त्यामुळे पुनर्भरणाचे जे पाणी जमा होते त्याच्या साठ्याचा व्यय होत नाही. जेवढे पाणी भराल तेवढे वापरण्यास मिळते. ते फुकट जात नाही आणि समजा ते जर झऱ्यातून गेले तर बाजूच्या विहिरींमध्ये जाते. त्यामुळे पुनभर्रण हा सर्वात महत्वाचा प्रयोग असला पाहिजे. तलावामध्ये, विहिरीमध्ये असलेल्या पाण्याचे कुठेतरी बाष्पीभवन होतच रहाते आणि मग जर पुनर्भरणामध्ये व्यवस्थितपणे पाणी साठविले आणि ते व्यवस्थितपणे वापरले तर पुनर्भरणातील पावसाचे पाणी फार मोठ्या प्रमाणात आपल्याला भविष्या मध्ये उपलब्ध होऊ शकेल आणि ते महत्वाचे आहे.

सभापती महोदय, विधेयकातील 9 क्र.वरील मजकूरावर जर धोरणात्मक जोर दिला तर त्याचा उपयोग होऊ शकतो. महाराष्ट्रात आता सगळीकडे एवढ्या विहिरी खोदलेल्या आहेत की, पुनर्भरणाच्या माध्यमातून आपण एवढे पाणी साठवू शकतो की, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न नक्की सुटू शकेल याची मला खात्री आहे. आपल्याकडे एवढ्या विहिरी आहेत पण आपण त्याबाबतीत काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

करीत नाही. जलसंपत्ती समिती वगैरे बाबत उल्लेख आहे त्याबाबत मी बोलत नाही.कारण यावर संयुक्त समिती मध्ये चर्चा झाली असेल.या संयुक्त समितीमध्ये विधान सभेचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. गणवतराव देशमुख होते त्यामुळे त्यांनी सगळे बारकाईने पाहिले असेल असा माझा समज आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माझ्या एका प्रश्नाचे उत्तर दिले तर फार बरे होईल. या ठिकाणी असे म्हटलेले आहे की,"राज्य प्राधिकरणाने विहित केल्याप्रमाणे जास्त पाणी लागणारी पिके घेण्याकरता भूजलाचा वापर करणाऱ्यांना प्रोत्साहन न देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे"सभापती महोदय, माझ्यासाठी हा सर्वात कळीचा मुद्दा आहे. महाराष्ट्रात सिंचनाचे जेवढे पाणी उपलब्ध आहे, त्यातील 80 टक्के पाणी हे फक्त ऊसासाठी वापरले जाते आणि फक्त 20 टक्के पाण्यावर कापूस, ज्वारी, डाळी वगैरे जेवढी पिके घेतली जातात.

सभापतीस्थानी - मा.उप सभापती

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

ऊस उत्पादक 80 टक्के पाणी वापरतात.

आपण पश्चिम महाराष्ट्रात गेलात तर त्या ठिकाणी एका मागोमाग एक अशी ऊसाची शेती नसते. पहिल्या भागातील ऊस कापलेला असतो. त्याच्या बाजूच्या पट्टीत नंतर ऊस होणार असेल तर ऊस कापल्यानंतर पंधरा दिवसानंतर दुसरी लागवड होते. कारण त्या ठिकाणी पाणी तेवढे उपलब्ध आहे. त्यामुळे जास्त पाणी वापरले जाते. अहमदनगर जिल्ह्यात ऊसाचे मोठे क्षेत्र आहे. अमरावतीत जिल्ह्यात ऊसाचे क्षेत्र नाही. संभाजीनगरमध्ये ऊसाचे क्षेत्र आहे. जळगावला ऊसाचे क्षेत्र नाही. लातूर जिल्ह्यात ऊसाचे क्षेत्र आहे. नाशिकला ऊसाचे क्षेत्र आहे. पुण्याला ऊसाचे क्षेत्र आहे. सांगलीमध्ये ऊसाचे क्षेत्र आहे. सातारा जिल्ह्यात ऊसाचे क्षेत्र आहे.सोलापूर जिल्ह्यात ऊसाचे क्षेत्र आहे. या सर्व भागात ऊसाचे क्षेत्र आहे. या कायद्यात "...राज्य प्राधिकरण, विहित केल्याप्रमाणे, जास्त पाणी लागणारी पिके घेण्याकरिता..." असा उल्लेख केलेला आहे. म्हणजे जास्त पाणी लागणारी पिके इकडे आहेत. कवठेमहांकाळ तालुका घेतला तर त्या तालुक्याच्या पश्चिम भागामध्ये पाणी आहे आणि पूर्व भाग टंचाईग्रस्त आहे. म्हणजे या बाबतीत एकाच तालुक्याचे दोन भाग झाले. एकाच तालुक्यामध्ये एका भागात पाणी आहे तर दुसऱ्या भागात टंचाई आहे. आम्ही त्या ठिकाणी बघून आलेलो आहोत. माझा प्रश्न असा आहे की, "राज्य प्राधिकरण, विहित केल्याप्रमाणे, जास्त पाणी लागणारी पिके" या संदर्भात आपल्या बैठकीमध्ये काय चर्चा झाली ? कारण मला या रिपोर्टमध्ये त्याबाबत काही चर्चा बघावयास मिळाली नाही. त्याची चर्चा झाली असेल कारण चांगली चर्चा करणारे सदस्य त्या समितीमध्ये होते. यामध्ये असे म्हटले आहे की, " राज्य प्राधिकरण, विहित केल्याप्रमाणे, (जल सधन पिके) जास्त पाणी लागणारी पिके घेण्याकरिता भूजलाचा वापर करणाऱ्यांना प्रोत्साहन न देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करील." मग आपण त्या ठिकाणी कमीतकमी ऊसाची लागवड करुन राहिलेले पाणी टंचाईग्रस्त तालुक्यात पुरविण्यासाठी त्याचा उपयोग करणार का ? कारण त्याची गरज आहे.

सभापती महोदय, काल-परवा आपल्या सभागृहामध्ये टंचाईच्या संदर्भात चर्चा झाली. त्यामध्ये विदर्भ, मराठवाडा, धुळ्याचा भाग त्या ठिकाणी सुध्दा टंचाई आहे पण त्याची चर्चा झाली नाही. या ठिकाणी पश्चिम महाराष्ट्र आणि सोलापूरपर्यंतच्या तालुक्यांची चर्चा झाली. आम्हाला असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

वाटले की, नमुन्याखातर हे तालुके यामध्ये घेतलेले आहेत आणि बाकीचे लोक त्याप्रमाणे वागतील. पण आता यामुळे असा प्रश्न निर्माण झाला आहे की, हे विधेयक मंजूर झाल्यानंतर ज्या ऊस उत्पादकांच्या ठिकाणी जास्तीत जास्त पाणी वापरले जाते ते नियंत्रित करुन ते पाणी जे टंचाईग्रस्त तालुके आहेत त्यांच्या करिता कोणत्या ना कोणत्या मार्गाने देणार का ? माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या भागात जो पाच लिफ्टचा टेंभू प्रकल्प आहे त्या पध्दतीने हा कायदा मंजूर झाल्यानंतर हे पाणी नेऊन त्या तालुक्यांना आपण पाणी पुरविणार का, असा प्रश्न मला पडलेला आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, हे जे विधेयक आलेले आहे त्यामध्ये उद्देश व कारणे दिलेली नाहीत. ही त्रुटी या बिलामध्ये राहिलेली आहे. ज्यावेळी आपण विधेयक आणतो तेव्हा त्याला माननीय राज्यपालांची शिफारस आहे का, याला विधिग्राह्यता आहे का, या मागची भावना काय आहे, हे दिलेले असते. ते यामध्ये नाही. मी समितीमध्ये होतो त्यामुळे मला या बिलावर बोलता येत नाही पण ज्या त्रुटी आहेत त्या मी निदर्शनास आणून देत आहे. हे विधेयक कोणत्या भागासाठी लागू आहे त्या बाबतीत खंड 25 मध्ये उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. जमा साहेब असे म्हणाले की, हे संपूर्ण महाराष्ट्राला लागू आहे पण तसे नाही. महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्यांमध्ये पाणी टंचाईचे क्षेत्र एक जलवर्षासाठी घोषित करतील त्याला हे लागू आहे अशा प्रकारची तरतूद यामध्ये आहे. म्हणजे खंड 25 हा या विधेयकाचा गाभा आहे. संपूर्ण सभागृहाने आणि सर्व सन्माननीय सदस्यांनी जर ठरविले की, उद्देश व कारणे नसली, विधिग्राह्यता नसली, राज्यपालांची शिफारस नसली तरी आपल्याला हे विधेयक आज मंजूर करता येईल. पण यामध्ये जी त्रुटी राहिलेली आहे ती मी निदर्शनास आणून देत आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगत आहे की, हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे संपूर्ण छाननी होऊन सभागृहासमोर मांडण्यात आलेले आहे. सदर विधेयकात संयुक्त समितीने बऱ्याचशा सुधारणा केल्या आहेत व ते त्या स्वरुपात विधानसभेच्या सभागृहाने पारित केलेले आहे. त्यामुळे त्याचा मूळचा स्कोप वाढला आहे. तेव्हा सदर विधेयकाचे उद्देश व कारणे याचे निवेदन, वित्तीय ज्ञापन आणि प्रत्योयोजित विधीविधाना संबंधीचे निवेदन सुधारित स्वरुपात देण्यात आलेले नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या निवेदनाबाबत मला येथे आक्षेप नोंदवावयाचा आहे. हे विधेयक विधानसभेतून मंजूर होऊन आले आहे असे आपण म्हणाला. विधानसभेतून मंजूर होऊन आले आहे म्हणून येथे मंजूर केले पाहिजे अशातला भाग नाही.

उप सभापती : नाही.

श्री.दिवाकर रावते : विधानसभेतून मंजूर होऊन आले आहे असे आपण जे म्हटले आहे ते रेकॉर्डवर राहता कामा नये.

उप सभापती : संयुक्त समितीसमोर हे विधेयक पारित होऊन आलेले आहे. त्यामुळे उद्देश व कारणे देण्याचा संबंध आला नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या विधेयकात उद्देश व कारणे दिलेली नसल्यामुळे संयुक्त समितीने काय केले आहे ते आम्हाला समजलेले नाही. हे विधेयक तांत्रिकदृष्ट्या अपूर्ण असल्यामुळे ते मंजूर करु नये असे मला वाटते. या सभागृहाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी या विधेयकाला राज्यपालांची संमती जोडलेली नाही. उद्देश व कारणे दिलेली नाहीत असे सांगितलेले आहे. हे सर्व रेकॉर्डवर आले आहे. असे असताना हे विधेयक जर मंजूर झाले तर ते कायदेशीर होईल असे मला वाटत नाही.

उप सभापती : संयुक्त समितीचा अहवाल दिलेला आहे त्यामध्ये हे सर्व स्पष्टीकरण दिलेले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य नाही असे म्हणत असतात.)

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आता आपण निवेदनात असे सांगितले आहे की, हे विधेयक संयुक्त समितीकडे गेल्यानंतर या विधेयकाचा स्कोप वाढलेला आहे. याचा अर्थ मूळ उद्देशामध्ये सुध्दा बऱ्यापैकी विस्तारीकरण झालेले आहे. ते विस्तारीकरण जर समोर येणार नसेल तर त्यावर चर्चा करणे अवघड आहे. त्यासह हे विधेयक आले असते तर ते सयुक्तिक झाले असते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विधानसभेमध्ये जे घडत नाही ते या सभागृहात घडते मग त्या सभागृहाच्या लक्षात येते की, ते यामध्ये नाही. म्हणून तर हे उच्च सभागृह आहे. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आम्ही या विधेयकाच्या विरोधात नाही. मी माझ्या भाषणात असे म्हणालो आहे की, विधानसभेमध्ये काय झाले आहे ते आम्हाला कळत नाही. या विधेयकात त्यांनी कोणत्या सुधारणा केल्या आहेत त्याही आम्हाला कळत नाही. कोणती सुधारणा त्यांना नको झाली, ती का झाली हे आम्हाला येथे समजते. त्यामुळे मी मुद्दे मांडत होतो. या विधेयकात मूलभूत चूक असल्यामुळे याबाबत सचिवांनी मार्गदर्शन करावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, संयुक्त समितीचा अहवाल या सभागृहामध्ये पहिल्यांदाच आला आहे अशातील भाग नाही. यापूर्वीही संयुक्त चिकित्सा समितीचे अहवाल सभागृहात सादर झालेले आहेत. आपल्यापैकी अनेक सन्माननीय सदस्यांनी संयुक्त चिकित्सा समितीत काम केलेले आहे. त्या समितीमध्ये विधेयकाच्या उद्देश व कारणांवर एकमत होत असते. त्यानंतर विधेयकावर चर्चा केली जाते. शिक्षण शुल्क विधेयक असो, कोणतेही विधेयक असो त्यामध्ये उद्देश व कारणे नमूद केलेली असतात. संयुक्त समितीकडे ते विधेयक गेलेले असेल किंवा नसेल, त्यामुळे हे कारण होऊ शकत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या विधेयकावरील चर्चा थांबविण्याची आवश्यकता आहे. हे विधेयक मंजुरीसाठी उद्या ठेवण्यात यावे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकात उद्देश व कारणे दिलेली नसल्यामुळे हे विधेयक उद्या चर्चेसाठी ठेवावे. तांत्रिकदृष्ट्या हे विधेयक बरोबर नसल्यामुळे आज ही चर्चा येथेच थांबवावी.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, मेरा सिर्फ एक पाइंट यही है कि इस बिल में जो बात नहीं है, उन बातों पर सभी माननीय सदस्यों ने यहां पर चर्चा की है. ऑपशन्स लिमिटेड हैं, क्योंकि सिलेक्ट कमेटी में चर्चा होने के बाद और वह बिल विधान सभा में पास होने के बाद यह बिल यहां पर पास होने के लिए आया है.

सभापति महोदय, कल इस अधिवेशन का आखिरी दिन है. इसलिए यह बिल पास होना जरुरी है. यह एक यूनिक एक्ट है. हमारी केन्द्र सरकार और माननीय प्रधान मंत्री महोदय ने भी कहा है कि ग्राउंड वाटर का प्रॉपर प्लानिंग ऑफ डिस्ट्रीब्युशन करना पड़ेगा. इस तरह का विचार केंद्र सरकार का है. सभापति जी मेरा आपसे निवेदन है कि ....

इसके बाद श्री शिगम की टर्न...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : विधेयकाचे उद्दिष्ट एक पानी असते. ते दिलेले नाही. उद्या आम्हाला ते द्या. उद्या शेवटचा दिवस असला तरी हे विधेयक आम्ही मंजूर करु. विधेयक परिपूर्ण असले पाहिजे. विधेयकामध्ये त्रुटी असता कामा नये. ही गोष्ट माझ्या लक्षात आल्यानंतर याबाबत मी सारखी विचारणा करीत होतो की आपण आम्हाला हे समजून सांगाल का ? विधेयकावर उद्या सकाळी 10 ते 11 पर्यन्त विशेष बैठक घ्यावी. आम्ही विधेयक मंजूर करु.

श्री. एस.क्यू.जमा : माननीय सदस्य श्री रावते जी, इस बारे में मेरा एक सुझाव यह है कि जिन माननीय सदस्यों को अपने सुझाव रखने हैं उन्हें अपने सुझाव यहां पर अभी रखने का मौका देना चाहिए और.....

श्री. जयंत प्र. पाटील : आमचा या विधेयकाला विरोध नाही. विविध योजनांवर करोडा रुपये खर्च करुनही हे विधेयक आणण्याची परिस्थिती का निर्माण झाली यासंबंधीची चर्चा आम्हाला करावयाची आहे ? पैसे कुठे झिरपतात हे आम्हाला पहायला पाहिजे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी विधानसभेचा या ठिकाणी उल्लेख केला. त्या संदर्भात मी स्पष्टीकरण देतो - खालच्या सन्माननीय सभागृहामध्ये एखादे विधेयक पास झाले व तेथून ते सिलेक्ट कमिटीकडे न पाठविता या सभागृहासमोर आले तर त्या बिलासंबंधीचे स्टेटमेंट ऑफ ऑब्जेक्टस् ॲण्ड रिझन्स आणि फायनान्शियल स्टेटमेंट देणे आवश्यक असते. परंतु हे बिल संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते म्हणून या बिलासंबंधीचे स्टेटमेंट ऑफ ऑब्जेक्टस् ॲण्ड रिझन्स आणि फायनान्शियल स्टेटमेंट देण्याची आवश्यकता नाही.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय, उद्या सकाळी स्टेटमेंट ऑफ ऑब्जेक्टस् ॲण्ड रिझन्स देणार आहेत असे आम्ही गृहीत धरतो.

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सन 2009चे वि.स.वि.क्रमांक 42 या विधेयकासंबंधी संयुक्त समितीचा अहवाल दिल्यानंतर स्टेटमेंट ऑफ ऑब्जेक्टस् ॲण्ड रिझन्स देण्याची गरज नाही असे वाटले होते. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे उद्या सकाळी 10.00 वाजता ते आम्ही देतो.

उप सभापती : या विधेयकावरील चर्चा आता थांबविण्यात येत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक.

L. A. BILL NO. XLIII OF 2011

(A BILL TO PROVIDE FOR THE MAINTENANCE OF CERTAIN ESSENTIAL SERVICES AND THE NORMAL LIFE OF THE COMMUNITY; AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

(विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न पुन: प्रस्तुत करण्यात आला)

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 43- विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मागील अधिवेशनात मांडण्यात आले होते. त्यावेळी मी भाषणास सुरुवात केली होती, परंतु वेळेअभावी माझे भाषण पूर्ण करु शकलो नव्हतो. सभापती महोदय, आता मला माझे भाषण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करुन दिली, त्याबद्दल मी आपले प्रथम आभार मानतो.

सभापती महोदय, मी गेल्या वेळी बोलताना सांगितले होते की, ज्या अत्यावश्यक सेवा आहेत, त्यांना संप करण्यासाठी, टाळेबंदी करण्यासाठी या कायद्यान्वये बंदी आणली तर त्यामुळे घटनेचा फार मोठा अवमान होणार आहे. अत्यावश्यक सेवेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे जे मुलभूत हक्क आहेत, तेच हक्क या कायद्यान्वये दाबून टाकले जाणार आहेत. आपण या विधेयकात असे म्हटले आहे की, " आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अत्यावश्यक सेवेशी संबंधित असलेल्या कोणत्याही आस्थापनेतील टाळेबंदीला मनाई करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास त्यास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे तसे करता येईल." दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे या परिच्छेदाच्या पुढील परिच्छेदाच्या शेवटच्या ओळीत असे म्हटले आहे की, " राज्य शासनास जी रीत उत्तम वाटेल त्या रितीने तो प्रसिध्द

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

करण्यात येईल." राज्य शासनास जी रीत उत्तम वाटेल" म्हणजे त्याचा नेमका अर्थ काय आहे, ही संदिग्धता का राहिली आहे, या दोन्ही गोष्टींचा शासनाने खुलासा केला पाहिजे. या नंतर विधेयकातील "खंड क्र.6, (3) पोट कलम (1) अन्वये काढण्यात आलेला आदेश फक्त सहा महिन अंमलात राहील, परंतु लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, त्यास, तत्सम आदेशाव्दारे त्याची मुदत सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या आणखी मुदतीकरिता वाढविता येईल." असे म्हटलेले आहे. शासन पाहिजे तितके दिवस हा आदेश वाढवू शकते असा त्याचा अर्थ होतो. अत्यावश्यक सेवा याचा अर्थ शासनाने या विधेयकात नमूद केला आहे. (1) जिच्या संबंधात राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशी, उतारु किंवा माल, जमिनीवरुन किंवा पाण्यावरुन वाहून नेणारी कोणतीही परिवहन सेवा. म्हणजे परिवहन खाते हे अत्यावश्यक सेवेत येते. परिवहन खात्यातंर्गत काम करणारे संबंधित लोक आहेत, त्यांना संप करण्याचा अधिकार या कायद्यान्वये राहणार नाही. दूध, पाणी, वीज पुरवठा या सर्व अत्यावश्यक सेवेत येतात. त्यांना संप करता येणार नाही, मग त्यांनी मागण्या मांडावयाच्या कोणाकडे ? त्यांच्यावर होणारा अन्यायाला वाचा फोडावयाची कशी ? घटनेने त्यांना मूलभूत अधिकार दिलेले आहेत, तो अधिकार या कायद्यान्वये हे शासन काढून घेत आहे असे शासनाला वाटत नाही काय?

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

दूध कर्मचाऱ्यांनी संप केला आणि लोकांना दूध मिळाले नाही, पाणी खात्यातील कर्मचाऱ्यांनी संप केला आणि लोकांना पाणी मिळाले नाही तर त्यांना सेवेतून काढून टाकणार का? त्यांच्या संप करण्यावर बंदी घातली आहे. त्यांच्या ज्या काही मागण्या असतील त्या संदर्भात त्यांनी अनेक वर्षे लढे दिले असतील त्यांनी आता लढायचे कसे?

सभापती महोदय, शासनाने आता मोर्चे काढण्यावर बंदी घातली आहे. आंदोलने करण्यावर बंदी घातली आहे. पूर्वी मंत्रालयावर, विधानभवनावर मोर्चे येत असत. आता मोर्चे आझाद मैदानापुढे येत नाहीत. त्यामुळे आंदोलनकर्ते आडमार्गाने मंत्रालयात घुसण्याचा प्रयत्न करतात. त्यांची पोलिसांशी झटापट होते. त्यांचा जो घटनात्मक मूलभूत अधिकार आहे, आपल्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्याचा अधिकार आहे तो दाबून टाकण्याचा प्रयत्न शासन करीत आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, रुग्णालये, दवाखाने, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता राखण्यासंबंधीची कोणतीही सेवा यांचा यामध्ये समावेश केलेला आहे. राज्यात डॉक्टरांची मार्ड ही संस्था आहे. त्या मार्डचा दरवर्षी त्यांच्या मागण्यासंबंधी संप होत असतो. आता त्यांना संप करता येणार नाही. कारण त्यांची गणना अत्यावश्यक सेवेत करण्यात आली आहे. दूध टँकर हे सरकारी असतील तर त्यांना देखील संप करता येणार नाही. कारण त्यांची गणना अत्यावश्यक सेवेत झालेली आहे. राज्यातील डॉक्टरांच्या मार्ड संघटनेचा गेली अनेक दशके आपल्या मागण्यांसाठी दर दोन वर्षांनी संप करण्याचा प्रघात आहे. परिचारिका, वर्ग 3 व वर्ग 4 चे रुग्णालयीन कर्मचारी आपल्या मागण्यांसाठी संप करतात. आता त्यांच्यावर बंदी घालण्यात आली आहे. माननीय सदस्य श्री.एस.क्यू.ज़मा हे कामगार नेते आहेत, त्यांना हे पटते काय? आता त्यांनी मागण्यांसाठी कुठे जायचे? आपले विचार मांडण्याचा, आपली मते मांडण्याचा त्यांचा मूलभूत अधिकार आपण हिरावून घेत असाल तर ते योग्य नाही. हे विधेयक घटनाबाह्य आहे.

सभापती महोदय, राज्याच्या कामकाजाच्या संदर्भातील कोणतीही सरकारी सेवा, पद, नोकरी तसेच राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे सचिवालयीन कर्मचारी, पदावर नियुक्त केलेल्या व्यक्ती आणि उच्च न्यायालयाचे अधिकारी व सेवक यांचा समावेश यात केलेला आहे. म्हणजे सरकारी कर्मचाऱ्यांचा संप बेकायदेशीर ठरविला जाणार आहे. कामगार संघटनेतील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

लोकांनी काय करायचे? बोनससाठी संप करायचा नाही, बोनस मागायचा नाही, हक्काच्या रजेसाठी भांडायचे नाही, सहाव्या वेतन आयोगासाठी आंदोलन करायचे नाही. लेखणी बंद आंदोलन, काम बंद आंदोलन या बाबी आता पुस्तकात जमा होणार आहेत. या बिलामध्ये जी व्याप्ती दिलेली आहे ती जो मूलभूत अधिकार आहे त्याच्यावर गदा आणणारी आहे. काही दिवसांपूर्वी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी संप केला होता. त्यावेळी विधिमंडळाचे काही कर्मचारी त्या संपात सामील झाले होते. आता तो संप बेकायदेशीर ठरणार आहे. त्या कर्मचाऱ्यांवर कायद्याचा आसूड ओढणार आहात. कायद्यानुसार हा संप योग्य नाही असे सांगणार आहात. उच्च न्यायालयाचे कर्मचारी आणि सेवक तसेच स्थानिक प्राधिकरणाच्या कामकाजाशी संबंधित असलेली कोणतीही सेवा किंवा कोणतेही पद यातून सुटलेले नाही. या विधेयकाबाबत पुन्हा एकदा सांगोपांग विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी यापूर्वी ज्या पाच-सहा अत्यावश्यक सेवांचा उल्लेख केला त्यांचा यामध्ये समावेश केलेला आहे. समाज जीवनास अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा आणि सेवा चालू राहण्यास बाधा पोहोचेल असे म्हटले आहे. म्हणजे विजेचे भाव वाढले, पेट्रोलचे भाव वाढले म्हणून त्यांनी संप केला तरी देखील बंदी घालणार आहात काय? भाजीपाला पुरविणारे, धान्य पुरवठादार, किराणा माल पुरवठादार यांना देखील संप करण्यास बंदी आहे. त्यांनी कोणाचे दरवाजे ठोठावायचे? प्रत्येक वेळी न्यायालयात जाणे त्यांना शक्य होणार नाही. न्यायालयाकडून अधिकार प्राप्त करुन घ्यायचे का?

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

महोदय, हे सर्व माणुसकीला धरुन नसले तरी कायद्याला धरुन आहे. अत्यावश्यक सेवा देणे आवश्यक आहे हे कबूल आहे तसेच या अत्यावश्यक सेवेचे महत्व त्या त्या क्षेत्रात फार मोठे आहे हे देखील मान्य आहे पण त्यात काम करणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांच्या काही समस्या असतात हे मात्र शासन का विसरते हे मला कळत नाही. कायदा बनविणाऱ्यांनी याबाबत विचार केला आहे काय, तसा केला असता तर आज ही कलमे समोर आली नसती. एकदा कायदा पास झाल्यानंतर कोणीही आंदोलन करावयाचे नाही, मोर्चे काढावयाचे नाही, बंद करावयाचा नाही असे यात म्हटले आहे. मग या लोकांनी आपले प्रश्न व समस्या कोणाच्या समोर मांडावयाच्या हा महत्वाचा प्रश्न आहे. एखाद्या राजकीय पक्षाने तोडफोड केली तर त्यांच्याकडून दंड वसूल केला जातो, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले असेल तर ते भरुन घेतले जाते. मुंबई बंद किंवा महाराष्ट्र बंद केला तर त्या दिवसाचे जेवढे नुकसान होईल तेवढे त्या पक्षाकडून भरुन घेतात अशा प्रकारे सर्व बाजूंनीच सामान्य माणूस आणि लोक प्रतिनिधींची गळचेपी करण्याचा हा प्रश्न आहे.

महोदय, शासनाने हे विधेयक पास केल्यानंतर टॅक्सीवाल्यांनी किंवा रिक्षावाल्यांनी उद्या संप केला तर त्या सुध्दा अत्यावश्यक सेवेत येणार, त्यांच्या संपाला काय करणार, त्यांचे नेते काय करणार, त्यांना काहीच काम राहणार नाही. अशी विचित्र परिस्थिती या घटनाबाह्य विधेयकामुळे निर्माण होईल म्हणून या विधेयकावर पुन्हा सांगोपांग चर्चा करण्यासाठी संयुक्त समितीकडे पाठवून त्यातील कलमे तपासून पहावीत. तसेच कोणत्या अत्यावश्यक सेवांचे नेमके वर्गीकरण व व्याख्या कशी करावी हे देखील नव्याने करण्याची गरज आहे म्हणून हे विधेयक शासनाने मागे घ्यावे व सखोल विचार-विनिमय करण्यासाठीसंयुक्त समितीकडे पाठवावे अशी विनंती करतो, आणि माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, या विधेयकात खूप मोठी यादी दिलेली आहे. उद्देश आणि कारणे यांचे विवेचन करीत असताना मला असे म्हणावयाचे आहे की, कोणत्याही मालकाने टाळेबंदी किंवा अपरिहार्य बंदी घोषित केल्यामुळे सामाजिक जीवनावर परिणाम होऊ नये याची खातरजमा.करण्यासाठी शासनाने विवक्षित परिरक्षण सेवांसाठी सन 1981, नंतर 1994 मध्ये आणि सन 1996 मध्ये वेगवेगळ्या दुरुस्त्या व कायदे केले. ते सन 1996 मध्ये समाप्त झाल्यानंतर सन 2005 पासून पुन्हा काढलेली अधिसूचना समाप्त झाली. आता शासनाला सहाय्यभूत असणारा कोणताही कायदा अस्तित्वात नाही म्हणून हे विधेयक शासनाने सभागृहात आणले आहे. अनेक वेळा आपण पाहतो की, अत्यावश्यक सेवांमध्ये बऱ्याच वेळा दिसून येते की, मालकाने एकतर्फी टाळेबंदी करुन कामगारांना प्रत्यक्षपणे देशोधडीला लावले, इतकेच नव्हे तर त्या कामाच्या जागा तशाच ठेवून कामगारांचे काम स्थलांतरित करुन टाकण्यासारखे निर्णय खाजगी उद्योग धंदा करणारे घेत असतात.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...

काही वेळेला रुग्णालये, रिक्षा आणि टॅक्सी या सारख्या अत्यावश्यक सेवा बंद केल्या जातात तेव्हा जनता त्यांच्यावर टीका करीत असते. हुकुमशाहीची पाऊले स्पष्टपणे कशी पडत आहेत हे विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये दिसून येते. उद्देश व कारणामध्ये म्हटले आहे की, "सर्वच मागण्या मान्य करणे शासनाला शक्यत होत नाही". लोकांची मागणी मान्य करणे आज जरी शक्य झाले नाही तरी पुढील काळात त्या कशा प्रकारे पूर्ण् करता येईल यासाठी शासनाची भूमिका आणि इच्छाशक्ती असली पाहिजे. उलट जनतेच्या मागण्या कशा प्रकारे चिरडता येतील यासाठीच हे विधेयक येथे आणलेले आहे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, या विधेयकात बऱ्याच गोष्टी खटकण्यासारख्या आहेत परंतु त्यातील दोनच उदाहरणे मी या ठिकाणी देणार आहे. "विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सचिवालयीन कर्मचाऱ्यांच्या पदावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती" असा उल्लेख विधेयकामध्ये करण्यात आलेला आहे. विधिमंडळाचे कामकाज सुरु असतांना किंवा विधान मंडळाचे कामकाज सुरु नसतांना या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांनी संप किंवा मोर्चे काढलेले आहेत असे आम्ही कधीही पाहिलेले नाही. इतके जबाबदारीचे काम करतांना त्यांनी जर आंदोलनाचा पवित्रा घेतला तर त्याचे काही तरी नक्की कारण असते व ते समजण्याची संवेदनशीलता शासनामध्ये नाही याचा मला अतिशय खेद वाटतो.

उप सभापती : सभागृहाची वेळ सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माणूस म्हटला की, माणसांमध्ये वेगवेगळया प्रकारच्या प्रवृत्ती असतात. काही कर्मचारी प्रामाणिक व तळमळीने काम करीत असतात तर काही कर्मचारी वेगळया स्वभावाचे असतात परंतु एक नियम म्हणून, कायदा म्हणून, समूह म्हणून ज्यावेळेला विचार करतो तेव्हा सचिवचालयातील कर्मचाऱ्यांनी संप किंवा मोर्चा काढलेला आहे असे आम्हाला दिसलेले नाही. या कर्मचाऱ्यांच्या अपेक्षांची शासनाला परिपूर्ती करता येत नाही अशा पध्दतीने सरकार निष्कर्षावर यावे असे कोणतेही आक्रमक आंदोलन ज्या गटाने कधी केले नाही त्यांच्या न्याय मागण्या कशा सोडविणार याबाबत तोडगा देण्याबाबत त्यांच्या मागण्यांचा अंतर्भाव गटामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...

करण्यात आलेला आहे. मला कोणाला प्रवृत्त करावयाचे नाही किंवा चिथावणी द्यावयाची नाही. सचिवालयातील कर्मचाऱ्यांच्या मागण्या असतील तर त्या सोडविण्याऐवजी त्यांचा या विधेयकात समावेश करण्यात आलेला आहे तो कशासाठी करण्यात आलेला आहे ?

सभापती महोदय, अतिवृष्टी किंवा वेगवेगळया पध्दतीच्या अफवा पसरलेल्या असतांना जो कर्मचारी वर्ग उशिरापर्यंत कार्यालयात राहून काम करतो त्यांचा अंतर्भाव विधेयकात केलेला आहे तो हुकुमशाही प्रवृत्तीनेच केलेला आहे असे दिसून येते.

सभापती महोदय, स्थानिक प्राधिकरणांच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या सेवेमध्ये सर्वकाही आले आहे. मी समजू शकते की,अतिवृष्टी झाली, स्वच्छतेशी संबंधित लोक, पाणी पुरवठ्याशी संबधित लोक असतील किंवा इमर्जन्सी स्वरुपाच्या सेवा असतील त्यांना आपण नियम लावले तर योग्य होणार नाही. आपण 2006 च्या अतिवृष्टीमध्ये अनुभवले आहे की, सरकारने अतिवृष्टी झाल्यमुळे सुट्टी जाहीर केल्यामुळे जनतेला अत्यावश्यक सेवाच मिळू शकल्या नाहीत. अशा गोष्टी होऊ नये यासाठी दक्षता घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, काही वेळेला नैसर्गिक दृष्टया माणसे कामावर पोहचू शकत नाहीत. परंतु या कर्मचाऱ्यांना अत्यावश्यक सेवेपर्यंत पोहचण्यासाठी सोयी-सुविधा शासनाने उपलब्ध करुन दिल्या नाहीत व असे असतांनाही कर्मचाऱ्यांवर शिस्तीचा बडगा ऊगारला जाईल त्याबद्दल या कर्मचाऱ्यांचे संरक्षण आपण कसे करणार आहात याबाबतचे उत्तर या विधेयकात दिलेले नाही.

सभापती महोदय, दुर्दैवाने जेव्हा संप होतात तेव्हा वीज अत्यावश्यक सेवेत येते परंतु संपामध्ये लोक विजेचे दिवे सुरु करतात परंतु नंतर ते बंद करण्यासाठी उपस्थित नसतात.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

आणि अशा पध्दतीने हे सरकार दबाव तंत्राचा वापर करुन लोकांना प्रवृत्त करीत आहे. शांततामय मार्गाने लोक मागण्या मांडतात त्यांना हिंसक आणि आक्रमक बनविले जाते. शासनाला स्वत:च्या प्रशासकीय क्षमतेबाबत न्यूनगंड वाटू लागला आहे अशी मला शंका वाटते.

महाराष्ट्रामध्ये कै. जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन झाले त्यावेळी संपूर्ण शासकीय सेवा ठप्प झाली होती असे चित्र निर्माण झाले होते. अशाप्रकारे कर्मचाऱ्यांच्या अधिकारांवर या विधेयकाव्दारे अतिक्रमण होणार आहे यामुळे समाजामध्ये तेढ वाढणार आहे, लोकांमध्ये सूडबुध्दी वाढणार आहे. लोक ज्यावेळी अस्वस्थ होतात त्यावेळी कायदा हातामध्ये घेतात. त्यामुळे त्यांच्या आंदोलन करण्याच्या कृतीला प्रतिबंध करणारे हे विधेयक आहे. विधानसभेमध्ये हे विधेयक मान्य झाले म्हणून आपण ते मान्य केले पाहिजे असे नाही. आपण हा कायदा करुन जनतेचे मूलभूत हक्क डावलण्यासाठी अयोग्य पध्दतीने आपली भूमिका रेटण्यासाठी चुकीचा पायंडा पाडीत आहोत. मला वाटते अत्यावश्यक सेवा पुरविण्याऱ्या लोकांना देखील मानवाधिकार दिलेला आहे, तो मानवाधिकार आणि त्यांची ती क्षमता, इच्छाशक्ती आपण चिरडायला लागलो आहोत. म्हणून या संदर्भात आपण या विधेयकाचा पुनर्विचार केला पाहिजे. आपण हे विधेयक कोणत्याही परिस्थितीत आणता कामा नये अशी मागणी करुन माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. ज़मा (विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, बिल नंबर 43 के बारे में आम धारणा यह है कि ट्रेड यूनियन के कार्यकर्ता इस बिल का विरोध करेंगे. लेकिन 40 साल तक ट्रेड यूनियन में काम करने के बाद जो आज का पब्लिक आर्डर अपने देश और अपने राज्य में मैंने देखा, उसके हिसाब से ऐसा लगता है कि सरकार के पास स्पेशल पावर्स होना आवश्यक है.

उप सभापति : जमा साहब इसके पहले भी आप इस बिल पर भाषण कर चुके हैं.

श्री एस. क्यू. ज़मा: नहीं सर, मैं नहीं बोला, मैं कब बोला ? इस बिल पर तो चर्चा ही नहीं हुई.

उप सभापति : आपने इस बिल पर भाषण दिया है. आपने 4.45 बजे से 4.55 तक अपना भाषण किया है.

श्री एस. क्यू. ज़मा: नहीं सर, इस बिल पर तो कोई बात ही नहीं हुई. आपने कहा था कि हम इस बिल पर अगले सेशन में चर्चा करेंगे, इतनी ही चर्चा पिछली बार हुई थी.

उप सभापति : यहां पर प्रोसीडिंग मौजूद है. इसलिए आप इस बिल पर दुबारा कैसे बोल सकते हैं? इस बिल पर आपने दस मिनट भाषण किया है. आपका यह भाषण सदन के काम-काज में रिकार्ड भी किया गया है.

श्री एस. क्यू. ज़मा: सर, मुझे नहीं लगता कि मैंने इस बिल पर भाषण किया है.

उप सभापति : यह भाषण आपने नागपुर में किया था.

श्री एस. क्यू. ज़मा: सर, यह बिल नागपुर में पास होने के लिए सदन में नहीं आया यह बिल अगले सेशन में पास करने की बात कही गयी थी.

उप सभापति : जो सत्य परिस्थिति है, वह मैंने आपको बतायी है. इसलिए अब आप इस बिल पर दुबारा नहीं बोल सकते.

श्री एस. क्यू. ज़मा: मैं सिर्फ दो मिनट ही यहां पर बोलूंगा.

उप सभापति : यह तो फिर यहां पर रिवाज ही हो जाएगा.

श्री एस. क्यू. ज़मा: सर, आपने ज्वाइंट कमेटी के बारे में बोला होगा. उसी बारे में मैं यहां पर दो मिनट बोलना चाहाता हूं.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापति : मैंने रिक्वेस्ट करके आपको बता दिया है कि आप भाषण कर चुके हैं, नहीं तो जिन लोगों ने पहले भाषण किए हैं वे सभी माननीय सदस्य उठकर बोलेंगे कि उन्हें भी भाषण करना है, तो फिर इस प्रकार तो यह बिल कभी भी पूरा ही नहीं होगा. इसीलिए मैं आपको यहां पर न बोलने की रिक्वेस्ट कर रहा हूं.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला भाषण करावयाचे नाही. मला फक्त एक सूचना करावयाची आहे की, हायकोर्टाने एका निकालात असे म्हटले आहे की, "The Government should bring school buses under the ambit of essential services." ते आता तत्काळ होणार नाही हे मला मान्य आहे, परंतु याबाबत केव्हातरी स्कूल बसेसचा अंतर्भाव या विधेयकामध्ये केला पाहिजे. ते केले तर बरे होईल. हायकोर्टाने सांगितले आहे म्हणून केले पाहिजे असे नाही. त्या जजमेंटच्या निमित्ताने महत्व विशद केले आहे ते महत्वाचे असल्यामुळे त्याचा नंतर अंतर्भाव होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

(यानंतर श्री. भारवि)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, वि.स.वि.क्र.43 -महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयकावर सखोल चर्चा नागपूर अधिवेशनात आणि आता देखील झाली आहे. या विधेयकाचा गैरवापर होईल असा या चर्चेमधून सूर दिसतो. नव्हे तशा पद्धतीची भीती येथे झालेल्या चर्चेतून निर्माण झाल्याचे दिसून येते आहे. मी सुरुवातीलाच सांगू इच्छिते की, लोकशाहीवर गदा आणण्याच्या उद्देशाने हे विधेयक आणलेले नाही. हे नवीन विधेयक आहे अशातला देखील भाग नाही. आपल्या राज्यामध्ये हा कायदा अस्तित्वात होता. सन 1994 मध्ये पहिल्यांदा कायदा करण्यात आला. हा कायदा दोन वर्षे अस्तित्त्वात होता. दिनांक 24 ऑगस्ट 1996 रोजी तो संपुष्टात आला. त्यानंतर 1999 मध्ये पुन्हा पाच वर्षासाठी हा कायदा केला. सन 2004 मध्ये तो संपुष्टात आला. पुन्हा सन 2005 मध्ये पाच वर्षासाठी हा कायदा केला. दिनांक 26 मे 2010 रोजी त्याचा कार्यकाळ संपला. हा कायदा 12 वर्षे अस्तित्वात होता. पण त्याचा कुठेही गैरवापर झालेला नाही. हा लोकशाहीवर गदा आणणारा कायदा आहे असा उल्लेख करण्यात आला आहे. वेगवेगळ्या पक्षाची सत्ता राहिली आहे. पण त्यांच्याकडून या कायद्याचा गैरवापर झालेला नाही, हे देखील मला सांगावयाचे आहे.

या कायद्याचा उपयोग देखील करण्यात आलेला आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे दिनांक 7.5.2007 चे आदेश होते. त्यानुसार शासकीय रूग्णालये, दवाखाने यातील सेवा देणारे निवासी आणि आंतरनिवासी डॉक्टर यांना संपावर जाण्यास मनाई करण्यात आली होती. नगरविकास विभागाचे दिनांक 12.8.2008 आदेश होते. बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम म्हणजे बेस्ट कर्मचाऱ्यांच्या संपास मनाई करण्यात आली होती. नगरविकास विभागाच्या दिनांक 25.8.2008 रोजीच्या आदेशा नुसार बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या संपास मनाई करण्यात आली होती. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षक विभागाच्या दिनांक 8.1.2009 रोजीच्या आदेशानुसार ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट कॉंग्रेस व ऑईल्स सेक्टर्स असोसिएशन यांच्या संपास मनाई करण्यात आली होती. संपामुळे कोणतेही सेवा ठप्प झाली आणि त्याचा त्रास जनतेला झाला तर शासनाला मनाई करण्याचा अधिकार आहे. तेवढ्या पुरताच हा कायदा आहे. हा डिटरंट कायदा आहे. हा कायदा संपा पासून कोणालाही रोखण्यासाठी नाही. कायदा व ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ....

सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर किंवा एखादी सेवा ठप्प झाली तर शासनाच्या हातामध्ये काही तरी इन्स्ट्रुमेंट असावे म्हणून हा कायदा करण्यात आला आहे आणि ते गरजेचे आहे असे मला वाटते. सन 2010 नंतर आपल्या हातामध्ये इन्स्ट्रुमेंट नव्हते. त्या कालावधीमध्ये संप झाले होते. त्यावेळी सेवा ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली होती. जुलै 2011 व 16 एप्रिल 2012 रोजी ऑटो रिक्षाचा संप झाला. हा एक दिवसाचा संप होता. रिक्षा भाडेवाढ न झाल्यास भविष्यात बेमुदत संपाचा इशारा देण्यात आला होता. बेमुदत संप झाला तर फार मोठा क्रिपलींग इफेक्ट समाजावर होऊ शकतो. दिनांक 20 डिसेंबर 2011 मध्ये स्कूल बस चालकांचा एक दिवसांचा संप झाला होता.

यानंतर सौ.रणदिवे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पण त्यांच्या मागण्या मान्य झाल्या नाही तर ते सुध्दा बेमुदत संपावर जाणार आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला क्रिपलिंगचा अर्थ समजला नाही.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, भाषा हे संपर्काचे साधन आहे आणि सर्व सन्माननीय सदस्य हे सुशिक्षित आहेत. 21 मार्च 2012 रोजी पुन्हा एक दिवसाचा संप झाला होता. त्यावेळी माननीय सर्वोच्च न्यायालयाने आदेशित केल्यामुळे संप मागे घेण्यात आला. त्यानंतर 22 मार्च ते 30 मार्च या कालावधीत एल.पी.जी.गॅस पुरवठा करणाऱ्यांचा नऊ दिवसाचा संप झाला आणि त्यावेळी गॅस पुरवठ्यावर विपरीत परिणाम होऊन गृहिणींना अतोनात त्रास सहन करावा लागला होता. त्यावेळी जवळजवळ 9 दिवस गॅसची टंचाई निर्माण झाली होती.जर अशा प्रकारे टंचाई निर्माण होणार असेल आणि त्याचा परिणाम समाजावर होणार असेल तर राज्य शासनाच्या हातात काहीतरी इन्स्ट्रुमेंटमेंट असावे असा त्याचा उद्देश आहे.पण त्याचा दुरुपयोग आजपर्यंत झाला नाही आणि पुढे भविष्यामध्ये कशाची भीती आहे हे मला स्वत:ला कळत नाही. नागपूर येथील अधिवेशनाच्या वेळी आणि आता जी चर्चा झाली आणि त्यामध्ये जे मुद्दे उपस्थित करण्यात आले त्यामध्ये महत्वाचा मुद्दा कलम 2 च्या बाबतीत उपस्थित करण्यात आला होता की,"कोणत्याही सेवेस अत्यावश्यक सेवा म्हणून ठरविण्याचा अमर्याद अधिकार शासनाने स्वत:कडे ठेवलेला आहे." पण अत्यावश्यक सेवा घोषित करताना सेक्शन (2) (क) अंतर्गत एक ते पाच यामध्ये कोणकोणत्या सेवा अत्यावश्यक असू शकतात याबद्दल व्याख्या दिलेल्या आहेत.पण सेक्शन 2 (क) नुसार कोणतीही सेवा ही अत्यावश्यक सेवा म्हणून घोषित होऊ शकते हे नमूद केले आहे. पण हे करीत असताना कोणतीही सेवा अत्यावश्यक सेवा घोषित करताना त्या संदर्भात अधिसूचना काढणे आवश्यक आहे. याचाच अर्थ ती बाब सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. हे चेक्स ॲण्ड बॅलन्स आहे. सभागृहाने एखाद्या बाबीस नकार दिला तर ते मान्य होणार नाही. त्यामुळे सरकारकडे अमर्यादित अधिकार आहेत असे आपल्याला म्हणता येणार नाही.

सभापती महोदय, प्रस्तावित विधेयकातील तरतुदी या अती कडक व जाचक आहेत आणि त्यामुळे मूलभूत अधिकारावर गदा येते यापध्दतीचा मुद्दा येथे उपस्थित करण्यात आलेला आहे. त्याबद्दल सेक्शन (1) यामध्ये असे सांगण्यात आलेले आहे की, हे फंडामेंन्टल अमर्यादित प्रकारचे नाही. कारण ज्याप्रमाणे फंडमेंटल राईटस् आहेत त्याप्रमाणे फंडामेंटल ड्युटीज सुध्दा आहेत. त्या ड्युटीमध्ये जर त्यांच्याकडून चूक होत असेल तर मग अशा वेळी शासनाच्या हातामध्ये काहीतरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . . .

इन्स्ट्रुमेंट असणे गरजेचे आहे.तसेच प्रस्तावित विधेयकातील कलम 2 (6), कलम 3 (1), कलम 4 (3), कलम 5(3) आणि कलम 6 (3) अन्वये शासनाकडून अमर्यादित वापर होऊ नये यासाठी शासनावर देखील मर्यादा घालण्याचे काम करण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, कलम 4 (5) (क) याबाबतीत एका महत्वाच्या मुद्याकडे आदरणीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी आपल्या सर्वांचे लक्ष वेधले होते की, याठिकाणी विधान परिषदेचे माननीय सभापती आणि विधान सभेचे माननीय अध्यक्ष असा एकेरी उल्लेख झालेला आहे. त्याठिकाणी आदरार्थी उल्लेख करणे आवश्यक आहे आणि सगळ्यांनी हे मान्य केले होते की, असे करणे गरजेचे आहे. हा किरकोळ बदल आहे. याबाबतीत माननीय सभापती यांनी निर्देश दिले होते की, ही बाब दुरुस्त करण्यात यावी आणि तशा प्रकारची दुरुस्ती करण्यात येईल.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ...

मला या ठिकाणी असे स्पष्टीकरण करावयाचे आहे की, भारतीय संविधानाच्या अधिकृत मराठी भाषांतरीत प्रतीमध्ये अनुच्छेद 142, 183 आणि 186 आणि पृष्ठ क्रमांक 61 मध्ये विधान परिषदेचा सभापती आणि विधानसभेचा अध्यक्ष असा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे प्रस्तावित विधेयकाच्या मराठी भाषांतरीत मसुद्यात तसा उल्लेख करण्यात आला. यापूर्वीच्या कायद्यामध्येही असाच उल्लेख होता. तथापी हे चुकीचे आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे त्याबाबत दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ही दुरुस्ती करण्यात येईल.

सभापती महोदय, या विधेयकाच्या कलम 5(5) मध्ये टाळेबंदी करणाऱ्या मालकांकरिता दोषसिध्दीनंतर सहा महिन्यापर्यंतचा कारावास आहे आणि 2 हजार रुपये दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. ही तरतूद कमी आहे. ही तरतूद 2 लाख रुपयांपर्यंत असावी असा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. माझी एवढीच विनंती आहे की, आपण जर हे विधेयक मंजूर केले तर नंतर आपण अशा पध्दतीची सुधारणा आणू शकतो. आजच्या स्थितीत जरी आपण ही तरतूद वाढविली नाही तरी पुन्हा या बाबतीत सुधारणा आणू शकतो असे मी सांगू इच्छिते. कलम 8 व 9 च्या बाबतीत अशी भीती दाखविण्यात आलेली आहे की, कामगार नेत्यांच्या भाषणावर यामुळे परिणाम होऊ शकतो. मी सुरुवातीला सांगितले की, हे नवीन विधेयक नाही. अनेकदा ही अट राहिलेली आहे. आपण ही भीती मनातून काढून टाकावी अशी विनंती आहे. पोलीस अधिकाऱ्याला वॉरंटशिवाय अटक करण्याचा यामध्ये अधिकार दिलेला आहे. त्याबद्दल मला असे स्पष्ट करावयाचे आहे की, शासनाने आदेश काढल्याशिवाय पोलीस अधिकारी स्वत: सु-मोटो अटक करु शकत नाहीत. शासनाच्या आदेशानंतरच ते अटक करु शकतील. त्यामुळे ही भीती सुध्दा असता कामा नये. स्कूल बसच्या बाबतीत आदरणीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी सांगितले. तो महत्वाचा मुद्दा आहे. त्या बाबतीत अवश्य विचार करण्यात येईल. हा कायदा यापूर्वी तीन वेळा, चार वेळा लागू राहिलेला आहे आणि त्याचा कोठेही दुरुपयोग झालेला नाही. त्यामुळे याची भीती मनामध्ये न ठेवता आपण हे विधेयक मंजूर करावे अशी विनंती करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, आज अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येणार आहे का ?

उप सभापती : अंतिम आठवडा प्रस्ताव आज चर्चेला घ्यावयाचा की नाही याबाबत मी सभागृहाला विचारले. त्यानंतर आज त्यावर चर्चा करावयाची की नाही या बाबतीत माननीय सभापतींकडेही विचारणा केली. त्यांनी आता मला लिहून कळविले आहे की, अंतिम आठवडा प्रस्ताव उद्या चर्चेला घ्यावा.

श्री. नारायण राणे : या प्रस्तावासाठी मी दिवसभर सभागृहात बसून आहे.

उप सभापती : माननीय विरोधी पक्ष नेत्यांची त्यावर आज चर्चा करण्याची तयारी आहे का ?

श्री. विनोद तावडे : अंतिम आठवडा प्रस्ताव उद्या चर्चेला घ्यावा. सभापती महोदय, बिलाच्या संदर्भात आमची कमिटमेंट होती त्याप्रमाणे आम्ही संसदीय कार्य मंत्र्यांची विनंती मान्य केली.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक.

L. A. BILL NO. XLIII OF 2011

(A BILL TO PROVIDE FOR THE MAINTENANCE OF CERTAIN ESSENTIAL SERVICES AND THE NORMAL LIFE OF THE COMMUNITY; AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

(चर्चा पुढे सुरु)

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, स्कूल बसच्या संदर्भात सांगू इच्छिते की, या विधेयकामध्ये कलम 2 (ए) (1) मध्ये त्याचा अत्यावश्यक सेवेमध्ये याचा समावेश केलेला आहे.

उप सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले

<u>खंड 4- विवक्षित नोकऱ्यांमधील संपास मनाई करण्याचा अधिकार</u>

उप सभापती : खंड 4 ला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सुधारणा सुचविलेली आहे, ती त्यांनी मांडावी.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

खंड 4, पृष्ठ क्र.4

ओळ क्रमांक 6 ते 8 वगळण्यात याव्यात.

सभापती महोदय, मूळ विधेयकावर बोलत असताना मी यासंबंधी तीव्र शब्दात आक्षेप नोंदविला होता. या विधेयकातील पृष्ठ क्रमांक 4 वरील ओळ क्र.6 मध्ये असे नमूद केले आहे की, "विधानपरिषदेचा सभापती आणि विधानसभेचा अध्यक्ष यांच्या विनंतीनुसार असेल ते खेरीज करुन," माननीय सभापती व माननीय अध्यक्ष यांच्याबद्दल या विधेयकात एकेरी उल्लेख करण्यात आला आहे तो बरोबर नाही असे मी त्यावेळी बोललो आहे. ओळ क्रमांक 7 मध्ये असे नमूद केलेले आहे की, "राज्य विधानमंडळाच्या सभागृहांच्या सचिवालयीन कर्मचारी वर्गामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या बाबतीत" म्हणजे हे सर्व कर्मचारी आहेत. हे विधिमंडळ स्थापन झाल्यापासून एकदाही या कर्मचाऱ्यांनी क्षणभरही कधीही आपली नाराजी व्यक्त केलेली नाही. आपल्या खाते प्रमुखाच्या विरोधातही ते कोठेही बसलेले नाहीत. त्यांना मिळेल ती नोकरी त्यांनी स्वीकारली आहे. त्यांना दिलेली जबाबदारी अत्यंत सक्षमतेने, प्रामाणिकपणाने, निष्ठेने आणि माझे हे कर्तव्य आहे या भावनेतून ते काम करीत असतात. सभापती महोदय, महाराष्ट्रातील मंत्रालयासहित इतर सर्व क्षेत्रातील कर्मचारी आणि विधिमंडळातील कर्मचारी यामध्ये प्रचंड अंतर आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक खात्याला कोणी तरी प्रमुख असतो. पण विधिमंडळातील कर्मचारी हे या सर्वोच्च सभागृहाच्या सेवेमध्ये असतात. या विधिमंडळात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सतत आपण सारेजण संपर्कात असतो.

मला येथे आर्वजून सांगितले पाहिजे की, राज्य सरकारचे मुख्य सचिव श्री.गायकवाड हे आहेत, आमच्या विधिमंडळाचे डॉ.अनंत कळसे हे प्रधान सचिव आहेत. त्यांच्या अधिपत्याखाली येथील सर्व कामकाज चालते. या कर्मचाऱ्यांना संप करण्याचा प्रश्नही येत नाही. शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या पगारासंबंधी जे जे निर्णय होतात. तेच येथे लागू केल्यामुळे त्यांच्याप्रमाणे यांनाही महागाई भत्ता किंवा पगार मिळत असतो. तेथे जे काही दिले जाते त्यासाठी या कर्मचाऱ्यांना वेगळा संघर्ष करावा लागत नाही. मला अत्यंत खेद होतो की, आपले हे अधिवेशन उशिरापर्यंत

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिवाकर रावते.....

चालू राहिल्यावर रात्री 2-2 वाजेपर्यंत त्यांना थांबावे लागते. त्यामुळे येथील कर्मचाऱ्यांना, सर्व महिला भगिनींची इच्छा असो वा नसो, घराची काहीही जबाबदारी असो, कितीही ओढ असो पण नोकरीसाठी थांबावे लागते. हे सर्व करीत असताना मी त्यांना काही ओव्हर टाईम मिळतो काय, जादा भत्ता मिळतो काय याची चौकशी केली असता असा त्यांना भत्ता मिळत नसल्याचे समजले आहे. फक्त जेवणाची कूपन्स उशिरा थांबल्यामुळे दिली जातात. ज्याच्याकरिता भत्ता मिळत नाही, ज्याच्याकरिता जास्त पगार मिळत नाही, तरीही बिनबोभाट रात्री 2 वाजेपर्यंत ते येथे थांबतात आणि सकाळी पुन्हा 8 वाजता येथे हजर राहून विधिमंडळाचे कामे पूर्ण करीत असतात. इतर वेळीही त्यांची कोणतीही तक्रार नसते. त्यामुळे वेगळ्या पध्दतीने काम करणारा हा वर्ग आहे. त्यांना अत्यावश्यक सेवेमध्ये सरकार आणू इच्छिते हे मला पसंत नाही. या महाराष्ट्रात या सभागृहाचे हे सर्वोच्च स्थान आहे. न्यायालयापेक्षाही ते वेगळे स्थान आहे. न्यायालय सुध्दा आमच्या सभापतींना जाब विचारु शकत नाही. त्या सभापतींच्या अधिपत्याखाली असलेल्या या कर्मचाऱ्यांना अत्यावश्यक सेवेमध्ये आणले जात आहे हे अत्यंत अयोग्य आहे असे माझे मत आहे. या कर्मचारी वर्गाला त्यामध्ये समाविष्ट केले जाऊ नये. जसे हे सर्वोच्च सभागृह आहे तसे या कर्मचाऱ्यांचे राज्यातील इतर कर्मचाऱ्यांपेक्षा वेगळे स्थान आहे. म्हणून कोणत्याही परिस्थितीमध्ये त्यांना अत्यावश्यक सेवेत आणू नये.

पोलिसांचीही संघटना नाही. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होत असेल तर त्यांनाही कोठेही दाद मागता येत नाही. दाद मागण्यासाठी त्यांचा नेता नाही. एकदा पोलिसांनी बंड केले होते. त्यावेळी परळमधील 12 पोलीस कर्मचारी गेले ते आयुष्यातून उठले. त्यानंतर पोलिसांची हिंमतही झाली नाही. तसे या कर्मचाऱ्यांच्या संपर्कात आम्ही सर्व आमदार असतो. त्यांच्या कामाची पध्दत आम्ही बघितली आहे. सभापती महोदय, आपल्या अधिपत्याखालील असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत हा कायदा लागू होऊ नये अशा प्रकारची माझी उपसूचना आहे. ती उपसूचना सभागृहाने मंजूर करावी अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.शिगम....

अशोधित प्रत / शोधनासाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ही उपसूचना स्वीकारावी अशी माझी विनंती आहे. ही उपसूचना स्वीकारली तर एक चांगला पायंडा पडेल. या विधिमंडळामध्ये काम करणा-या कर्मचा-यांचा सन्मान केल्यासारखे होईल. ते आवश्यक सेवेमध्ये येऊ नयेत असे वाटते.

सुधारणा प्रस्तुत झाली.

प्रा.फौजिया खान : आदरणीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी उपसूचना या ठिकाणी मांडलेली आहे त्याबद्दल मी सांगू इच्छिते की, जसे हे लेजिस्लेचर केडर आहे त्याप्रमाणे राज्यामध्ये अनेक केडर्स आहेत. ते देखील सिन्सिअरली काम करतात, ते सुध्दा कधी संपावर गेलेले नाहीत. या कायद्याखाली त्यांना कव्हर केलेले आहे. फक्त प्रोटेक्शनसाठी ही तरतूद आहे. कलम 4(5) वाचले तर आपल्या लक्षात येईल की, या कर्मचा-यांच्या बाबतीत माननीय सभापती, विधानपरिषद आणि माननीय अध्यक्ष विधानसभा यांच्या परवानगी शिवाय कोणताही आदेश काढता येणार नाही. तसेच उच्च न्यायालयाचे जे कर्मचारी आहेत त्यांच्या बाबतीत मुख्य न्यायाधीशांची परवानगी घेतल्या शिवाय कोणताही आदेश काढता येणार नाही.

श्री. दिवाकर रावते : एखाद्या कर्मचा-याच्या बाबतीत वॉरण्ट काढले तर पोलीस त्याला अटक करतील. सत्ताधारी पक्षाकडे बहुमत असल्यामुळे ते माझी सुधारणा नामंजूर करु शकतात. परंतु इतर कर्मचा-यां बरोबर यांची तुलना करु नका.

प्रा. फौजिया खान : ज्यासंबंधी माननीय सदस्यांनी उप सूचना सुचविली ती बाब कायद्यामध्ये अंतर्भूत झालेली असल्यामुळे ती स्वीकारता येणार नाही.

उप सभापती : आता मी सुधारणा मतास टाकतो.

अनुकूल असतील त्यांनी "होय" म्हणावे ("होय" चे आवाज) प्रतिकूल असतील त्यांनी "नाही" म्हणावे ("नाही"चे आवाज) "होय" चे बहुमत आहे....

...नंतर श्री. गिते..+

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी विभाजन मागतो.

उप सभापती : ठीक आहे.

(विभाजनाची घंटा वाजल्यानंतर आणि अनुकूल/प्रतिकूल सदस्यांची मोजणी झाल्यानंतर)

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : विभाजनाचा निकाल असा आहे.

अनुकूल : 14

प्रतिकूल : 25

सुधारणा असंमत झाली.

खंड 4 विधेयकाचा भाग झाला.

खंड 5 ते 12 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 43 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 43 संमत झाले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मध्य रेल्वेच्या नाहुर-मुलुंड रेल्वे स्टेशनच्या दरम्यान अपघात होऊन रेल्वे प्रवासी मृत व जखमी होणे

मु.शी.: मध्य रेल्वेच्या नाहुर-मुलुंड रेल्वे स्टेशनच्या दरम्यान अपघात होऊन रेल्वे प्रवासी मृत व जखमी होणे यासंबंधी माननीय वस्त्रोद्योग मंत्री यांचे निवेदन.

श्री.मोहम्मद आरिफ नसीम खान (वस्त्रोद्योग मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

दिनांक 18.4.2012 रोजी रात्रौ 12.30 वाजता कुर्ला ते विद्याविहार रेल्वे स्टेशन दरम्यान टॉवर केबलला लागलेल्या आगीमुळे रेल्वेची सिग्नल यंत्रणा विस्कळीत होऊन रेल्वे वाहतूक अनियमितपणे चालू होती. सदरहू सिग्नल यंत्रणा पूर्ववत करण्याचे रेल्वे प्रशासनाकडून युध्द पातळीवर काम चालू असून रेल्वे गाड्यांची वाहतूक चालू करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, आज सकाळी नाहुर ते मुलुंड रेल्वे स्टेशन दरम्यान ट्रेनमधून येत असताना सिग्नल दुरुस्तीसाठी सिग्नल खांबावर उभे राहण्यासाठी असलेला स्टॅण्ड रेल्वे स्टेशनच्या बाजूने फिरल्यामुळे लोकल गाड्यांमध्ये दरवाज्याजवळ उभे राहून प्रवास करताना 23 प्रवाशांना मार लागला. काही लोक मयत व काही लोक जखमी झाले आहेत. मी स्वत: पालकमंत्री म्हणून राजावाडी रुग्णालयाला भेट देऊन आलो आहे. 3 लोक मयत झाले आहेत आणि 20 लोक जखमी झाले आहेत. मध्य रेल्वेचे महाप्रबंधक यांच्याशी चर्चा झाली. काल सुध्दा संपर्क साधला होता. आज सुध्दा चर्चा झाली आहे. या सगळ्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्यांनी उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. परवाची आणि आजची घटना कशी घडली याची सखोल चौकशी व्हावी आणि पुन्हा अशी घटना घडू नये याची काळजी घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती नियुक्त केली आहे. त्या समितीचा चौकशी अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई मध्य रेल्वेतर्फे करण्यात येईल.

सभापती महोदय, आजच्या घटनेमध्ये जे मृत्युमुखी पडले त्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 2 लाख रुपये आणि जे जखमी झाले आहेत त्या सर्व 20 लोकांना मुलुंडच्या खाजगी दवाखान्यात ॲडमिट करुन मोफत इलाज करण्याची रेल्वे प्रशासनाच्या वतीने सोय करण्यात आली आहे.

नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत्र प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसीम खान .....

त्याचबरोबर शासनाच्या वतीने डिझॉस्टर मॅनेजमेंटच्या वतीने या प्रकरणावर शासनाचे संपूर्ण लक्ष असून प्रवाशांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेण्याचे निदेश संबंधितांना दिले आहेत. तसेच आतापर्यंत उपनगरीय रेल्वे वाहतूक 80 टक्के सुरळीत सुरु झाली असून उद्यापर्यंत 100 टक्के सेवा सुरु होईल ही माहिती या निमित्ताने मी सभागृहाला देऊ इच्छितो.

मा. मुख्यमंत्र्यांनी पाठविलेल्या निमंत्रण पत्रिकेत इंग्रजी उल्लेख असणे

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांकडून आम्हाला अधिवेशन संपताना जे निमंत्रण पाठविले जाते त्याप्रमाणे निमंत्रण बंद लिफाफ्यातून पाठविलेले आहे. या लिफाफ्यावर पत्ता मात्र इंग्रजीतूनच लिहिलेला आहे. तसेच या परिसराला राजगुरु चौक आणि मादाम कामा रोड अशी स्वातंत्र्य योध्यांची नावे दिली आहेत कारण या स्वातंत्र्य सेनानींचा आपण सन्मान करतो. असे असताना देखील पत्ता लिहितांना या थोर नेत्यांचा उल्लेख लिफाफ्यावर करण्याचे अनवधानाने राहून गेले असावे किंवा कदाचित विसर पडला असावा म्हणून मी या निमित्ताने ही जाणीव करुन देऊ इच्छितो.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, मंत्री महोदयांनी सभागृहात निवेदन केले. त्यात प्रवासी पोहचू शकत नाहीत म्हणून जादा बेस्ट बसेसची व्यवस्था केली पण किती पाहनांची व्यवस्था केली .....

उप सभापती : मंत्री महोदयांनी तसेच माननीय मुख्य मंत्री यांनी देखील सभागृहात सांगितले की, उपनगरीय गाड्यांची सेवा 80 टक्के पूर्ववत झालेली आहे व उर्वरित उद्या पूर्ववत होईल. तरी आपण त्याबाबत शंका घेऊन किती वाहनांची व्यवस्था झाली व कोणत्या ठिकाणापासून झाली अशी माहिती विचारणे उचित नाही, असे मला वाटते.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 20 एप्रिल, 2012 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.00 ते 11.00 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. या बैठकीत सन 2009 चे विधानसभा विधेयक क्र. 42 व इतर शासकीय विधेयके विचारात घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक 11.45 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी

6 वाजून 52 मिनिटांनी गुरुवार, दि. 20 एप्रिल, 2012 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही